म. ग्रं. सं. ठाणे
काव्य
२४३०

राम गणेश गडकरी

# संपूर्ण वाग्वैजयंती

संपादक
डॉ. भीमराव कुलकर्णी



REFBK-0024843
REFBK-0024843

# संपूर्ण वाग्वैजयंती

गोविंदाग्रजांच्या साऱ्या कवितांचा शोध घेऊन
संपूर्ण स्वरूपात
प्रसिद्ध होत असलेला पहिला संग्रह

संपादक
**भीमराव कुलकर्णी**

REFBK-0024843

सरिता प्रकाशन

वरदा, सेनापती बापट मार्ग, पुणे १६.

'**वाग्वैजयंती**' : पंधरावी आवृत्ती

'**संपूर्ण वाग्वैजयंती**' : पहिली आवृत्ती

**प्रकाशन :**
२६, मे १९८५, गडकरी जन्मशताब्दी दिन.

**प्रकाशक :**
सौ. मंदाकिनी भावे
'सरिता प्रकाशन'
'वरदा', सेनापती बापट मार्ग, पुणे १६.

**मुद्रक :**
सा. रा. भंडारी
भंडारी मुद्रणालय
२७१ नारायण पेठ, पुणे ३०.

**मूल्य : पन्नास रुपये**

# अनुक्रमणिका


१. अर्पणपत्रिका ७९७
२. वाचकांस विज्ञापन ७९९
३. तडजोड ७९९
४. माझी पहिली कविता ८००
५. नदीस पूर आलेला पाहून ८००
६. मोगऱ्याचा हार ८०१
७. काळ ८०२
८. कोणी कोणास तरी ८०३
९. सगुणस्वरूप ८०३
१०. नटमित्रास पत्र ८०४
११. अल्लड प्रेमास ८०७
१२. केशवसुत मेले ! ८०८
१३. श्रीमंत राजाधिराज पाचवे जॉर्ज यांच्या राज्यारोहणा-निमित्त पदे ८१०
१४. स्मृतिगीत ८११
१५. गुलाबी कोडे ८१३
१६. मनातली पाल ८१३
१७. पहिले चुंबन ८१४
१८. आंधळ्यांची माळ ८१६
१९. एखाद्याचे नशीब ८१६
२०. राजहंस माझा निजला ! ८१७
२१. वेडा ८२२
२२. मुरली ८२४
२३. हृदयशारदेश ८२९
२४. प्रेमपाठ ८३२
२५. हुकमे हुकूम ८४०
२६ अभिनंदनपर वर्धापन ८४१
२७. घुंगरवाळा ८४४
२८. चिमुकलीच कविता ! ८४४
२९. दसरा ८४९
३०. जगाचे गाणे ८५४
३१. ती कोण ! ८५४
३२. अरुण ८५५
३३. निद्रागीत ८५८
३४. भीमकबाळा ८५९
३५. ओसाड आडांतील एकच फूल ८६०
३६. फुले वेचिली पण ८६३
३७. 'दिव्य प्रेमाची जाती' ८६५
३८. पुनर्विकसन ८६७
३९. हलत्या पिंपळपानास ८६८
४०. हा क्षण ८७१
४१. मागे पाहणे ८७१
४२. फुटकी तपेली ८७२
४३. मनातली दिवसरात्र ८७५
४४. गीत–विरक्ति ८७६
४५. सुभाषित ८७६
४६. दुर्दर्शन ८७७
४७. त्याच तारकेस याचना ८७७
४८. –स ८७८
४९. एका जुन्या श्लोकाची आठवण ८७८
५०. निर्वाणीची विनवणी ८७९
५१. हृदयास ८८०
५२. एका शब्दासाठी विनंती ८८१
५३. प्रेम आणि मरण ८८१
५४. परमाणूंचे कार्यमाहात्म्य ८८५
५५. काही इंग्रजी कविता वाचून ८८६
५६. निर्दय बालेस ८८६
५७. शेवटचे प्रेमगीत ८८८

५८. कधी ? ८८८
५९. अंधाला दृष्टिलाभ ८८९
६०. प्रेमाची प्रामाणिकता ८९०
६१. इच्छा, उपभोग व विषय ८९१
६२. तीन तरी ८९२
६३. चिन्तातुर जन्तु ८९३
६४. फूल ना फुलाची पाकळी ८९४
६५. एक समस्या ८९४
६६. दैवाची निर्दयता ८९६
६७. फणसाचे पान ८९७
६८. जुन्या कवितांची आठवण ८९८
६९. माझा मृत्युलेख ८९९
७० गोफ ९००
७१. एक शंका ९०१
७२. हुरहूर ९०१
७३. स्मरणसृष्टी ९०२
७४. एकच मागणे ! ९०४
७५. सुखदुःख ९०४
७६. अवेळी ओरडणाऱ्या कोकिळेस ९०५
७७. भयाण एकान्त ९०८
७८ प्रेमाखातर ९११
७९. पुनर्जात प्रेमास ९१३
८०. प्रेमाचा प्रलयकाळ ९१४
८१. लांडोर ९१७
८२. गोड निराशा ! ९१८
८३. स्मशानातले गाणे ९२१
८४. घुबडास ! ९२८
८५. कलगीचे गाणे ९३८
८६. श्रीमहाराष्ट्रगीत ९४५
८७. अनामिकाचे अभंग ९४८
८८. निजलेल्या बालकवीस ९५१
८९. अरुण ( दुसरा ) ९५३
९०. एका बाल-कवीस ९५५
९१. कवितेसाठी धडपड ९५८
९२. पांखरास– ९५९
९३. हाय हाय ! ९६०
९४. कळ्यांची फुले कशी झाली ९६२
९५. चेंडू ९६३
९६. ये ये ये कविते ! ९६४
९७. ‘ वेषभूषा ’कारास सादरार्पित पद्यभूषा– ९६७
९८. काय करावे ? ९६८
९९. सत्सुम-दाम ९६९
१००. लोकमान्यांस भारत-वर्षाचा आशीर्वाद- ९७०
१०१. पांच देवींचा पाळणा ९७२
१०२. कारंजाचे चढते पाणी ९७३
१०३. प्रेमशोधन ९७४
१०४. गाणें चांगले कसे असावे ? ९७४
१०५. काव्याची व्याख्या ९७४
१०६. समशेर दुधारी दिसता ९७५
१०७. गुलाबाच्या पाकळ्या ९७५
१०८. दिवाळी ९७६
१०९. लक्ष्मीपूजन ९७८
११०. पानपतचा फटका ९७८
१११. कृष्णाकाठी कुंडल ९८८
११२. देवल ९९५
११३. घरात बसलेल्या काजव्यास– ९९६
११४. सांग कसे बसलो ? ९९७
११५. कवीचा वधूवरांस आहेर ९९८
११६. प्रासंगिक–किंवा अप्रासंगिकच ९९९
११७. विचार १०००

११८. घास १००१
११९. मोरपिसावरचा डोळा १००१
१२०. रांगोळी घातलेली
पाहून— १००२
१२१. विराम—चिन्हे १००४
१२२. बागेत बागडणाऱ्या
लहानग्यास— १००४
१२३. कवी आणि कैदी १००७
१२४. केशवसुतांची कविता
वाचून— १००९
१२५. रात्रीस ओरडणाऱ्या
घुबडास १००९
१२६. जीवितास— १०१०
१२७. " समसमा संयोग की
जाहला ! " १०११
१२८. गरिबीचे गाणे १०१२
१२९. प्रेमकाळ १०१३
१३०. लीला १०१५
१३१. विश्वाची विजयादशमी १०१७
१३२. अपराध यात कोणाचा १०१७
१३३. पुत्रशोक १०१८
१३४. काळाला बजावणे १०२०
१३५. गेले गोपाल कृष्ण
हाय ! हाय ! ! १०२१
१३६. वीणावती सुंदरीस १०२१
१३७. जिवास बोध १०२२
१३८. झडपिला घारिनें हार १०४४
१३९. कथाशेष १०४६
१४०. मंगलाचरण १०४८
१४१. मुरलीचा नाद १०४९
१४२. उचंबळूनी हृदयसिंधु हा... १०५०
१४३. विरहाचा शेवट आला १०५१
१४४. प्रणयिनी १०५४
१४५. शुक्राष्टमी १०५५
१४६. पुढें पहा ! १०५६
१४७. काष्टकोळिष्टक १०५७
१४८. ही दुनिया फिरती राही १०५८
१४९. कोंवळी हिरवळ १०५९
१५०. गुडघाभर गवता— १०६०
१५१. आपले आपल्याबरोबर १०६१
१५२. फुलतें निर्माल्य १०६२
१५३. निखळलेली पायरी १०६३
१५४. खडाष्टक १०६४
१५५. फुलांचा शोध १०६५
१५६. आगीवांचुन तेज न ज्यांना १०६६
१५७. किंकाळी १०६९
१५८. स्वागत १०७०
१५९. एका—स पाहून १०७०
१६०. तर्क-सर्कस १०७२
१६१. ज्ञानोदय १०७३
१६२. काव्याबद्दल १०७३
१६३. मर्दोपमर्द १०७४
१६४. जोडाजोडी १०७५
१६५. लठ्ठालठ्ठी १०७५
१६६. चेंदामेंदा १०७६
१६७. देव व दैव १०७६
१६८. मनास बोध १०७७
१६९. एका मित्रास १०७७
१७०. मरणकाळचें गाणें ! १०७८
१७१. प्रतीक्षा १०८०
१७२. नौका १०८०
१७३. बापासाठी रडणारास १०८१
१७४. 'न'साठी आर्या १०८१
१७५ सेवावीं म्यां चरणकमलें १०८१
१७६ सोडुनि गेला प्रियजनका १०८२
१७७. अंतकाळाची याचना १०८२
१७८. प्लेगानें मेल्यावर
सुचलेले विचार १०८३

१७९. जुन्या प्रेमास १०८३
१८०. धाव सख्या १०८४
१८१. त्राता १०८४
१८२. पुत्रशोक ( पुढे चालू ) १०८५
१८३. अनंताचे सूर १०८८
१८४. मोटारखालीं सांपडून
चेंगरताना १०८८
१८५. हेंच मरण बरें ! १०८९
१८६. हाय हाय ! १०९१
१८७. शेवटची कविता १०९४
१८८. नको ही परक्यांची सेवा १०९६
१८९ विद्ध मृग १०९७
१९०. चुंबन १०९७
१९१. गुलाबास १०९७
१९२. वंझ्याची चित्रकला १०९८
१९३. बिपिनचंद्र पाल यांची सुटका
झाली यास्तव ११००
१९४. का ? ११०१
१९५. धिग तव जीवन ११०१
१९६. अंतरिं खेद भरे ११०१
१९७. प्रणती ११०१
१९८. निर्दय देवीस ११०२
१९९. आकाशांत उडणाऱ्या
शिंगरास ११०६
२००. श्रीबालबोध रामायण ११०६
२०१. किर्लोस्कर नाट्यगृहाचे
उद्घाटन ११०७
२०२. ईशस्तवन ११०८
परिशिष्ट :
नाटकांतील पदे :
१. संगीत गर्वनिर्वाण १०२५
२. पुण्यप्रभाव १०३०
३. भावबंधन १०३८
४. राजसंन्यास १०४०

□

# प्रस्तावना

राम गणेश गडकरी ऊर्फ गोविंदाग्रज ( १८८५-१९१९ ) यांच्या कवितांचा ' वाग्वैजयंती ' नावाचा संग्रह त्यांच्या मृत्यूनंतर अडीच वर्षांनी १९२१ मध्ये प्रसिद्ध करण्यात आला. आपल्या हयातीत आपला कवितासंग्रह प्रसिद्ध झालेला पाहण्याचे भाग्य त्यांना लाभले नाही. जून १९१६ नंतर त्यांनी लिहिलेल्या कवितांची संख्या हाताच्या बोटावर मोजण्याइतकीही नाही. आयुष्याच्या शेवटच्या दोन-अडीच वर्षांच्या काळात, नाट्यलेखनामध्ये त्यांच्या साऱ्या चित्तवृत्ती इतक्या दंग झाल्या होत्या की, त्यांना आपल्या कवितांकडे आणि काव्यलेखनाकडे विशेष लक्ष देता आले नाही. या काळात आपली कविता आपल्याला सोडून गेल्याचे त्यांच्या तोंडचे उद्‌गार संबंधितांनी उद्‌धृत केले आहेत[1]. परंतु डॉ. मा. गो. देशमुख यांनी " मूळ काव्यसंग्रह, त्याचे नाव, अर्पण-पत्रिका ', ' वाचकांस विज्ञापन ', ईशस्तवन ' व ' माझी पहिली कविता ' तो ' माझा मृत्युलेख ' येथपर्यंतची संपूर्ण तयारी गोविंदाग्रजांच्या डोळ्यांसमोरच झाली असली पाहिजे " असा जो तर्क लढविला आहे[2] तो बरोबर नाही. एखादी गोष्ट मनात घेऊन उत्कटतेने त्याची सुरुवात केल्यानंतर ती तशीच ठेवून जिद्दीने नाट्यलेखनात ते दंग होत. मुलांसाठी काही ऐतिहासिक-पौराणिक स्वरूपांची चरित्रे लिहावयाचे ठरवून त्यांनी त्याची यादी तयार केली, प्रस्तावना लिहिली[3] ध्रुव व प्रल्हाद दोन चरित्रे लिहिलीही आणि नंतर त्यांनी ते सगळे गुंडाळून ठेविले. तशाच प्रकारे कविता-संग्रहाबाबतीतही ' अर्पणपत्रिका ', ' वाचकांस विज्ञापन ' व ' तडजोड ' लिहून त्यांनी पुढे काही केले नाही !

१९०४ मध्ये मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण होऊन गडकरी पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजच्या प्रिव्हियसच्या वर्गात दाखल झाले. तेथे स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी काढलेल्या ' आर्यन ' या हस्तलिखितासाठी गडकऱ्यांनी ' पानपतचा फटका ' लिहिला. ' आर्यन 'मध्ये प्रसिद्ध झालेले बरेचसे साहित्य शिवराम महादेव परांजपे आपल्या ' काळ ' पत्रात आवर्जून प्रसिद्ध करीत. गडकऱ्यांचा पानपतचा फटकाही ' काळ 'मध्ये प्रसिद्ध होऊन १९०७ मध्ये १२ पृष्ठांची पुस्तिका प्रसिद्ध करण्यात आली गडकऱ्यांचे प्रसिद्ध झालेले हे पहिले पुस्तक. त्याची दुसरी आवृत्ती त्यांच्या मृत्युनंतर १९१९ मध्ये प्रसिद्ध करण्यात आली आहे. ' आर्यन 'च्या निमित्ताने त्यांचा व सावरकरांचा जो काही अल्पकाळ संबंध आला तितकाच. सावरकरांचे क्रांतिकारी विचार गडकऱ्यांना मानवण्या-सारखे नव्हते. त्यांनी सावरकरांशी व त्यांच्या विचाराशी नंतरच्या काळात अधिक संबंध न येण्याची काळजी घेतलेली दिसते. या काळात लिहिलेली ' नको ही परक्यांची सेवा ' अशी एखादीच अपवादात्मक स्वरूपाची देशभक्तिपर कविता आढळते.

गडकऱ्यांचा मृत्यू २३ जानेवारी १९१९ रोजी विदर्भात सावनेर येथे झाला. त्यांचे अखेरचे दर्शनही घेता आले नाही म्हणून त्यांची मित्रमंडळी हळहळली. त्यामुळे मुंबईच्या त्यांच्या चाहत्यांनी त्यांच्या मासिक श्राद्धाच्या आदल्या दिवशी (२२।२।१९१९) एकत्र येऊन एक सभा घेतली. 'मासिक मनोरंजन'कर्त्या का. र. मित्रांनी त्यांच्या स्मरणार्थ त्या दिवशी मनोरंजनात प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या तीन कवितांचा खिसा-पुस्तकांच्या आकाराचा 'गोविंदाग्रज यांच्या तीन कविता' या नावाचा संग्रह प्रसिद्ध केला. या संग्रहात त्यांच्या 'राजहंस', 'दसरा' व 'केशवसुत' या तीन महत्त्वाच्या कविता आहेत. गडकऱ्यांच्या कोणत्या कविता 'मित्रां'स महत्त्वाच्या वाटल्या त्याचे हे निदर्शक आहे. मनोरंजनात गडकऱ्यांच्या ५०–६० कविता प्रसिद्ध झाल्या असून त्याखेरीज त्यांच्या प्रकाशित व अप्रकाशित मिळून आणखी ३०–४० कविता असाव्यात असा अंदाज मित्रांनी या पुस्तिकेच्या प्रारंभी 'पुष्पांजली'त व्यक्त केला आहे.

गोविंदाग्रजांच्या पहिल्या वार्षिक श्राद्धाच्या दिवशी (२३ जाने. १९२०) सांगलीच्या 'डी. व्ही. नातू आणि मंडळी'ने त्यांच्या सहा कवितांचा एक संग्रह पुण्याच्या फर्ग्युसन महाविद्यालयात प्रसिद्ध केला. त्यामध्ये 'अरुण', 'प्रेमपाठ', 'मुरली', 'प्रेम आणि मरण', 'ओसाड रानातील एक फूल' या पाच मासिक 'मनोरंजना'त प्रसिद्ध झालेल्या कविता असून सहावी 'कृष्णाकाठी कुंडल' ही अप्रकाशित कविता आहे. याच वर्षी पुण्याच्या 'पी. डी. बाबू ब्रदर्स'ने गडकऱ्यांच्या आणखी पाच कवितांची पुस्तिका प्रसिद्ध केली 'गोविंदाग्रज ऊर्फ महाराष्ट्राचा शेक्सपियर (कै. राम गणेश गडकरी) यांच्या पाच कविता' असे तिचे नाव आहे. 'गुलाबी कोडे', 'राजहंस', 'घुंगुरवाळा', 'स्मशानातले गाणे' व 'भीमकवाळा' अशा पाच कविता तीत आहेत. १९२१ ला गडकऱ्यांच्या दुसऱ्या पुण्यतिथिनिमित्त मुंबईला मो वा. देशमुख यांनी 'कविवर्य गोविंदाग्रज यांच्या निवडक सात कविता' प्रसिद्ध केल्या.

गडकऱ्यांच्या हाती लागतील तेवढ्या कविता एकत्रित करून, त्यांची निवड करून[४] त्यांचा अधिकृत संग्रह प्रसिद्ध होण्यास गडकऱ्यांच्या मृत्युनंतर अडीच वर्षांचा काळ जावा लागला.

त्या काळच्या लोकप्रिय कवींच्या कवितासंग्रहांच्या प्रसिद्धीबाबतीत कशी अनास्था होती, त्याच्या अनेक उदाहरणांपैकी हे एक उदाहरण.

आपल्या कवितासंग्रहाचे 'वाग्वैजयंती' नाव गडकऱ्यांनीच योजिले होते, यात शंका नाही. १९०७ च्या सुमारास लिहिलेल्या 'गर्वनिर्वाण' नाटकाच्या 'ईशस्तवन'मध्ये गडकऱ्यांनी 'वाग्वैजयंती'चा व आपल्या 'गोविंदाग्रज' या टोपण नावाचा उल्लेख केला आहे. वडिलांच्या मृत्युनंतर (१८९३) अल्पावधीतच अपघाताने निधन पावलेल्या धाकट्या भावाच्या स्मरणार्थ गडकऱ्यांनी 'गोविंदाग्रज' ही उपाधी काव्यलेखनासाठी स्वीकारली. केशवसुतांना 'केशवसुत' हे काव्यनाम जसे जळगावच्या 'काव्यरत्नावली-कारां'नी दिले,[५] तसा प्रकार गडकऱ्यांनी होऊ दिला नाही. 'माधवानुज',

' केशवसुत ' इ. कवींच्या धर्तीवर गडकऱ्यांनी स्वतःच ते स्वीकारले. " गडकरी यांच्या प्रत्येक कृतीत काहीतरी नावीन्य ( originality ) चमकावयाचेच, परंतु याच बाबतीत त्यांनी परानुकरण कसे केले याबद्दल मनाला विस्मय वाटल्यावाचून राहत नाही, कदाचित हा गडकऱ्यांच्या त्या वेळच्या वयाच्या ' कोवळेपणाचा परिणाम असावा ' असे गडकऱ्यांचे परममित्र विठ्ठल सीताराम गुर्जर यांनी म्हटले आहे[६].

' गर्वनिर्वाण ' नाटक बसवायला घेतल्यानंतर १९०८–१९०९ च्या सुमारास या नाटकासाठी गडकऱ्यांनी पदे केली व पहिल्या पदातच आपल्या ' गोविंदाग्रज ' या काव्यनामाचा त्यांनी उल्लेख केला, ही घटना महत्त्वाची आहे त्या पूर्वीच्या कवितांच्या शेवटी त्यांनी आपल्या या कविनामाचा उल्लेख केला नाही. १ ) स्वतःच्या नावाने लिहिलेल्या, २ ) ' राम ' या कविनामाचा उल्लेख असलेल्या व ३ ) ' गोविंदाग्रज ' या कविनामाचा उल्लेख असलेल्या कविता, असे त्यांचे कविनाम लिहिण्याबाबतीत तीन प्रकार दिसतात. पहिल्या दोन प्रकारचे उल्लेख ' गोविंदाग्रज ' हे निर्णायक नाव घेण्यापूर्वी असावेत असे वाटते. अर्थातच उत्तर काळात लिहिलेल्या काही कवितांच्या बाबतीत त्यांनी अपवादही केलेला दिसतो.

गडकऱ्यांच्या आस्तिक्यबुद्धीच्या व त्यानी कसोशीने केलेल्या मध्ययुगीन संतपंत-शाहिरादी कवींच्या काव्याच्या परिशीलनाचा प्रभाव त्यांच्या साऱ्या वाङ्मयावर दिसतो. विशेषतः ' गोविंदाग्रज ' या कविनामाचा वापर मराठी संतांनी आपल्या अभंगरचनेच्या शेवटी केलेल्या स्वतःच्या नाममुद्रेच्या धर्तीवर ते करतात, हे लक्षात घेण्यासारखे आहे. तत्कालीन मराठी कवींच्या काव्यलेखनात असा प्रकार आढळत नाही ! अनेक अर्वाचीन कवींचे संग्रह ' केशवसुतांची कविता ', ' बालकवींची कविता ', ' टिळकांची कविता '. ' विनायकांची कविता ', ' तांबे यांची कविता ' अशा नावांचे आहेत. गडकऱ्यांनीच संग्रहाचे नाव अगोदर योजिल्यामुळे त्याही बाबतीत या संग्रहाचे वेगळेपण मनात ठसते.

गडकऱ्यांच्या पहिल्यावहिल्या कविता हरिभाऊ आपटे यांच्या ' करमणूक ' व शिवरामपंत परांजपे यांच्या ' काळ ' पत्रातून प्रसिद्ध झाल्या आहेत. त्यांच्या काव्य-लेखनाला बहर आला तो ते किर्लोस्कर कंपनीत दाखल झाल्यापासून. १९०७–०८ मध्ये त्यांनी लिहिलेल्या सुमारे ३० कविता अमरावतीच्या ' कर्तव्य ' साप्ताहिकातून प्रसिद्ध नाटककार कै. वि ना. कोठीवाले यांच्या प्रयत्नाने उपलब्ध झाल्या आहेत. त्यानंतर मे १९०९ पासून आक्टोबर १९१७ पर्यंत मुंबईच्या ' मासिक मनोरंजना 'त त्यांच्या एकूण ४६ कविता प्रसिद्ध झाल्या आहेत, पुण्याच्या ' चित्रमयजगत ', मुंबईच्या ' नवयुग ' व ' उद्यान ' मासिकांतून त्यांच्या काही कविता प्रसिद्ध झाल्या आहेत. जळगावच्या ' काव्यरत्नावली 'त त्यांच्या जेमतेम तीन कविता, ' सत्सुमदाम ' ( मे, १९०८ ), ' स्मशानातले गाणे ' ( फेब्रु. १९१० ), आणि ' घरात बसलेल्या काजव्यास ' ( जुलै, १९१० ) परिष्करणासह प्रसिद्ध झाल्या आहेत. कविता म्हणून लिहिलेल्या

परंतु नाटकांत पदे म्हणून वापरलेल्या, अपुऱ्या अवस्थेत लिहून ठेवून दिलेल्या, अशा साऱ्या मिळून कवितांची संख्या सुमारे २०५ इतकी आहे.

'वाग्वैजयंती'ची पहिली आवृत्ती पुण्याच्या केशव रावजी गोंधळेकर यांच्या बुक डेपोने प्रसिद्ध केली. तिच्यात १५५ कविता आहेत. त्यांपैकी 'ईशस्तवन,' ('गर्वनिर्वाण'), 'भीमकव्वाळा,', ('वेड्यांचा बाजार'), 'स्मृतिगीत' ('प्रेमसंन्यास'), 'घुंगुरवाळा', 'नीद्रागीत', 'वीरमरणाला शोभण्याजोगें गाणें' 'देवाघरची दौलत हरपताना पाहून' (चारही 'पुण्यप्रभाव'). व घास ('एकच प्याला') या आठ कविता व 'मित्रप्रीती नाटकातील तीन पदें' अशा अकरा कविता त्यांच्या नाटकांमधील आहेत. (किंवा 'मित्रप्रीती' नाटकातील पदे सोडून राहिलेल्या आठ कविता अगोदर कविता म्हणून लिहिल्या आहेत व नंतर नाटकांमध्ये त्यांचा समावेश करण्यात आला आहे!)

या पहिल्या आवृत्तीत, उपलब्ध झालेल्या साऱ्याच कविता छापल्या गेल्या नाहीत. त्यांमध्ये निवड करण्यात आली होती. 'नवयुग' मासिकाच्या फेब्रुवारी १९२० च्या अंकामध्ये गडकऱ्यांच्या तीन अप्रकाशित कविता प्रसिद्ध करण्यात आल्या होत्या. त्यांपैकी 'माझी पहिली कविता' व 'प्रेमाचा प्रलयकाळ' या दोनच कवितांचा 'वाग्वैजयंती'त समावेश करण्यात आला आहे. तिसरी गाळली आहे. कारण तिच्यासंबंधी कवी अनंततनय यांनी दिलेली टीप निवड करणाऱ्यांना रुचण्यासारखी नव्हती, हे असावे[७].

या पहिल्या आवृत्तीला साहित्यसम्राट न. चिं. केळकर यांची प्रस्तावना आहे आणि गडकऱ्यांचे निकटचे शिष्य न. ग. कमतनूरकर यांची 'फर्ग्युसन कॉलेज'मधून लिहिलेला परिचयपर विस्तृत असा महत्त्वाचा लेख आहे. ('वाग्वैजयंती'च्या १९५९ पर्यंत प्रसिद्ध झालेल्या आणखी सहा आवृत्त्या म्हणजे या पहिल्या आवृत्तीची केवळ पुनर्मुद्रणे आहेत.) कमतनूरकर यांच्या प्रयत्नानेच या संग्रहाची सिद्धता झाली. प्रकाशक भरमसाठ प्रती काढून कमी प्रतींचा हिशेब देऊन लेखकाची नागवणूक करतात, हा अनुभव असल्याने या संग्रहाच्या प्रतींवर गडकऱ्यांचे धाकटे बंधू शंकर गणेश ऊर्फ मंजुबाळ यांच्या सह्यांचे शिक्के आहेत व असे शिक्के असलेल्या प्रती अधिकृत समजाव्या अशा अर्थाच्या वृत्तपत्रात जाहिरातीही आहेत.

'वाग्वैजयंती'ची पहिली आवृत्ती अल्पावधीतच संपली. तिची दुसरी आवृत्ती प्रसिद्ध होण्यापूर्वी त्यांच्या साऱ्या वाङ्मयाच्या स्वामित्व-हक्कासंबंधाने वाद उपस्थित झाला. मधल्या काळात गडकऱ्यांच्या वाङ्मयाच्या प्रसिद्धीसाठी चिंतामणराव कोल्हटकर यांच्या अध्यक्षतेखाली 'सरस्वती मंडळ' नावाची संस्था निर्माण झाली. या संस्थेतर्फे 'वाग्वैजयंती'ची दुसरी आवृत्ती १९२२ मध्ये प्रसिद्ध झाली. गडकऱ्यांचे मोठे बंधू विनायक गणेश ऊर्फ बाबुलनाथ हे वकील असल्याने त्यांच्या प्रयत्नाने गडकऱ्यांच्या वाङ्मयाचे स्वामित्व-हक्क गडकऱ्यांचे धाकटे बंधू मंजुबाळ यांच्याकडे सुपुर्द करण्यात आले, त्यामुळे सरस्वती मंडळाचे कार्य विसर्जित झाले.

१९३९ पर्यंत ' वाग्वैजयंती 'च्या आणखी दोन आवृत्त्या निघाल्या. पुण्याच्या ' नवयुग प्रकाशना 'ने मंजुबाळ यांच्याकडून हक्क विकत घेऊन त्या प्रसिद्ध केल्या. मात्र या दोन्ही आवृत्त्यांच्या विक्रीचे सारे हक्क ( सोल एजन्सी ) पुण्याच्या मॉडर्न बुक डेपोकडे देण्यात आले. प्रतींच्या छपाईवर नियंत्रण असावे, हे त्याच्यामागचे धोरण असावे ( प्रत्येक पुस्तकावर मंजुबाळ यांच्या सहीची योजना होतीच. ) १९४२ मध्ये मॉडर्न बुक डेपोनेच त्याच्या प्रकाशनाचे सारे हक्क मिळविले व त्याची पाचवी आवृत्ती प्रसिद्ध केली. याच वर्षी मंजुबाळ यांचे निधन झाल्याने गडकऱ्यांच्या वाङ्मयाच्या स्वामित्व-हक्कासंबंधाने कोर्टकचेऱ्या सुरू झाल्या. १९४५ मध्ये कोर्टाने निर्णय देऊन हे हक्क गडकऱ्यांच्या दोघा पत्नींकडे असल्याचा निर्णय दिला. त्यानुसार गडकऱ्यांच्या पत्नींनी हे हक्क पुण्याच्या नेर्लेकर बुकसेलर्सना काही हजार रुपयांना विकून टाकले. गडकऱ्यांचे मोठे पुतणे गोपीनाथ विनायक यांनी हक्क आपल्याकडे असल्यासंबंधाचा कोर्टामध्ये दावा दाखल केला कोर्टाने १९५० मध्ये हे हक्क गडकऱ्यांच्या पत्नीकडेच असल्याचा निकाल दिला, इतकेच नव्हे तर आपल्या निकालपत्रात ते पहिल्यापासून गडकऱ्यांच्या पत्नींकडेच असणे कायदेशीर होते. असेही म्हटले. गडकऱ्यांच्या पत्नींना अनुक्रमे १२ व १५ रुपयांची पोटगी देण्याचे ठरविण्यात आले होते. तेही कालांतराने त्यांना मिळण्याचे बंद झाले.[८] एका प्रतिभाशाली साहित्यिकाच्या मागे त्यांच्या पत्नींची झालेली दैना. हा एक मोठा दैवदुर्विलास म्हणावा लागेल.

मंजुबाळ यांच्याकडून कायमचे हक्क घेतल्याच्या सबबीवर मॉडर्न बुक डेपोने १९५९ पर्यंत ' वाग्वैजयंती 'च्या आणखी दोन आवृत्त्या काढल्या. नेर्लेकर बुकसेलर्सनी आपल्याकडे सारे हक्क आहेत हे न्यायालयाच्या निदर्शनास आणून मॉडर्न बुक डेपोला पुढील आवृत्त्या प्रसिद्ध करण्यास मनाई करविली. १९६२ मध्ये नेर्लेकर बुकसेलर्सनी डॉ. वाळिंबे यांच्या विस्तृत व विवेचक प्रस्तावनेसह आठवी आवृत्ती प्रसिद्ध केली[९], व तिचेच १९६५ मध्ये पुनर्मुद्रण केले [१०] १९६७ मध्ये आचार्य अत्रे यांच्या संपादनाखाली ' संपूर्ण गडकरी ' प्रसिद्ध करण्यात आले. गडकरी-वाङ्मयाचे स्वामित्वहक्क १९६९ मध्ये कायद्याने संपुष्टात आले म्हणून पुण्याच्या रम्यकथा प्रकाशनानेही १९६५ च्या आवृत्तीचे पुनर्मुद्रण केले व ती खपल्यानंतर त्याचीही आवृत्ती काढली. गडकरी शताब्दीनिमित्त पुण्याच्या सरिता प्रकाशनाने व महाराष्ट्र शासनाने अत्रे संपादित ' संपूर्ण गडकरी 'त वाग्वैजयंतीचे यथामूल स्वरूपात १९८४ मध्ये पुनर्मुद्रण केले. आता प्रसिद्ध होत असलेली ही आवृत्ती या प्रकारे १५ वी मानावी लागेल. ( दहाव्यापासून चौदाव्यापर्यंतच्या साऱ्या आवृत्त्या डॉ. वाळिंबे यांच्या १९६२ च्या आवृत्तीची पुनर्मुद्रणे आहेत. ) यांखेरीज गोविंदाग्रजांच्या निवडक कवितांचे संग्रह – आचार्य अत्रे ( राजहंस ), गो. म. कुलकर्णी ( हृदयशारदा ), रा. शं. वाळिंबे ( पिंपळपान ), कृ. ब. निकुम्ब ( फणसाचे पान ) इत्याकांनी संपादित करून वेळोवेळी प्रसिद्ध केले आहेत. अर्वाचीन मराठीतील कवितासंग्रहांच्या आवृत्तींचा व खपाचा हा उच्चांक आहे. इतक्या मोठ्या प्रमाणात वारंवार आवृत्त्या व संपादने

प्रसिद्ध होण्याचे भाग्य गोविंदाग्रजांप्रमाणे अन्य कवींच्या वाट्याला आले नाही.

गोविंदाग्रजांच्या सर्वाधिक लोकप्रियतेचे हे गमक आहे.

गडकऱ्यांच्या नाट्यलेखनामध्ये मोठ्या प्रमाणात प्रयत्नपूर्वकता आहे, याउलट गोविंदाग्रजांच्या काव्यलेखनामध्ये कमालीची उत्स्फूर्तता आहे. आपल्यासमोर घडलेल्या घटनेसंबंधाने ते तात्काळ एका बैठकीत कविता लिहितात. मोटारीखाली चेंगरून मेलेला इसम पाहिला, नातेवाईकांपैकी कुणाचा मृत्यू झाला आणि जवळच्या नातेवाईक रडताना दिसला, मित्राच्या घरच्या लहान मुलांच्या रेघोट्या ओढताना पाहिल्या, कुणी नातेवाईक खूप दिवसांनी आईस भेटायला आला, देवलांना भेटायला जायचे असले, नटमित्राला पत्र लिहायचे असले, कुणी ज्ञातीतला मॅट्रिकच्या परीक्षेत पहिला आला, एखाद्या दृश्याने मनात काही विचार आले तर ते तात्काळ त्यावर कविता करतात. अशा तऱ्हेच्या प्रासंगिक विषयावर लिहिलेल्या कविताची संख्या निम्म्याहून अधिक आहे. काही कल्पना, काही विषय दुसरीकडून त्यांच्या मनात संक्रांत होतात आणि त्यांची स्वतःची वेगळी कविता तयार होते. ' विहिणींचा कलकलाट ' आणि ' घरात बसलेल्या काजव्यास ' ही त्याची उत्तम उदाहरणे होत. ' करमणुकी 'च्या २७ मे १८९३ च्या व २४ नोव्हें. १८९४ च्या अंकात प्रसिद्ध झालेल्या कवितांवर संस्करणे करून गडकऱ्यांनी वरील दोन्ही कविता लिहिल्या आहेत.[११]

गोविंदाग्रजांच्या मनावरील केशवसुतांचा परिणाम हा १९१०–११ नंतरच्या काव्य-लेखनावर म्हणजे काहीसा उत्तरकालीन आहे. पूर्वीच्या कवितांवर संस्कृत, मध्ययुगीन मराठी, इंग्रजी कवितांचे संस्कार विशेष आहेत. त्यांची सारी कथाकाव्ये एकजात महत्त्वाची आहेत, आणि ती बहुतेक केशवसुतांच्या प्रभावाखाली येण्यापूर्वीची असावीत असे वाटते. ' पानपतचा फटका ', ' भीमकबाळा ' यांच्या लेखनाचा काळ उपलब्ध आहे. [१२] ' कृष्णाकाठी कुंडल ', ' राजहंस माझा निजला ', ' प्रेम आणि मरण ' या कविताही १९११ पूर्वी लिहिल्या असल्या पाहिजेत, असे वाटते. गोविंदाग्रजांच्या साऱ्या कवितांची कालक्रमवार मांडणी करणे अशक्यप्राय आहे, कारण त्यांच्या कविता-लेखनाचा काळ व त्यांच्या प्रसिद्धीचा काळ यात अंतर आहे; ' भीमकबळा ' १९०६मध्ये 'वेड्यांचा बाजार ' या नाटकासाठी लिहिली. १९१४ मध्ये तिच्यावर टीप देऊन ती पुन्हा प्रसिद्ध केली. ' दुर्दर्शन ' २–१२–१९१५ ला लिहिली व ' नवयुग 'च्या १९१८च्या नोव्हेंबर-मध्ये छापली आहे ' अल्लड प्रेमास ' ही त्यांची कविता मे १९०९मध्ये 'मनोरंजना'त छापली असली असली तरी त्यांचे सन्मित्र विठ्ठल सीताराम गुर्जर हे ' मनोरंजना 'त दाखल झाल्यानंतर १९११ पासून ' मनोरंजना 'त त्यांच्या कविता झपाट्याने प्रसिद्ध होऊ लागल्या[१३], गडकऱ्यांनी आपल्या कवितांच्या हस्तलिखितांच्या तीन-चार चोपड्या गुर्जरांच्या हवाली केल्या होत्या, त्यांतूनच जागेच्या सोयीप्रमाणे एकेक कविता निवडून ते मनोरंजनात प्रसिद्ध करीत. ' प्रेम आणि मरण ' ही कविता अपुऱ्या स्वरूपात एका वहीत होती. गुर्जरांनी गडकऱ्यांच्या मागे लागून ती पूर्ण करून घेतली[१४].

'वाग्वैजयंती'च्या पहिल्या सात आवृत्त्या व नंतरच्या सात आवृत्त्या यांमध्ये काही महत्त्वाचा फरक आहे. पहिल्या सात आवृत्त्यांतील ईशस्तवन, मंगलाचरण, विहिणींचा कलकलाट, वेड्याची चित्रकला, गुलाबास, मुरलीचा नाद, न-साठी आर्या, बिपिनचंद्र पाल यांचे सुटकेनिमित्त, सेवावी ग्यां चरणकमलें, कां ?, देवाघरची दौलत हरपतांना पाहून, वीरमरणाला शोभण्याजोगें गाणें या कविता व मित्रप्रीति नाटकातील पदे पुढच्या सर्व आवृत्त्यांतून गळलेल्या आहेत. त्यांतील मित्रप्रीति नाटकातील पदे सोडून साऱ्या कवितांचा या आवृत्तीत समावेश करून ते न्यून भरून काढण्यात आले आहे. तसेच समीक्षक मासिकाच्या फेब्रुवारी १९४४ च्या गडकरी–विशेषांकात प्रसिद्ध झालेल्या अप्रकाशित कवितांचा व नाटकांतील काही पदांचा समावेश करण्यात आला आहे. पुढच्या सातही आवृत्त्यांतून 'इच्छा, उपभोग व विषय' ही कविता चुकीची छापण्यात आली आहे[१५]. व 'ही कविता भाषांतर आहे' ही टीप 'सांग कसे बसलो ? या कवितेखाली छापण्याऐवजी, 'कवीचा वधू-वरांस आहेर' या कवितेखाली अनवधानाने छापण्यात आली आहे.

अशा प्रकारच्या काही त्रुटी, परिष्करणे यांची नोंद घेऊन 'वाग्वैजयंती'ची चिकित्सक आवृत्ती काढणे जरूर आहे. त्याची समग्र सिद्धता झाली असली तरी या आवृत्तीत तसा प्रयत्न अनेक अडचणींमुळे करता आला नाही. पुढील आवृत्तीत तसा प्रयत्न जरूर करण्यात येईल, असे आश्वासन द्यावेसे वाटते.

या आवृत्तीचा हेतू 'संपूर्ण वाग्वैजयंती' सिद्ध करण्याचा आहे.[१६] तो मोठ्या परिश्रमाने सिद्ध करण्यात यश मिळाले आहे याचा आनंद होतो. ज्या अनेकांच्या साहाय्याने व मार्गदर्शनाने त्याची सिद्धता झाली आहे, त्या सर्वांचे मनःपूर्वक आभार.

**संदर्भ व टीपा** –

१. न. ग. कमतनूरकर, "कै राम गणेश गडकरी", **वाग्वैजयंती**, आ. पहिली, पुणे, १९२१, पृ. १४.

२. "'वाग्वैजयंती'चे पूनर्मूल्यन", **वाङ्मयीन व्यक्ती**, पुणे-नागपूर, १९६७, पृ. ६९.

३. पहा–"प्रस्तावना"– **गडकऱ्यांचा बालमेवा**, संपा. भीमराव कुलकर्णी, पुणे, १९८५.

४. 'वाग्वैजयंती'चे हस्तलिखित तयार करण्याच्या कार्यात आपलाही हात होता असे आचार्य अत्रे यांनी नमूद केले आहे—("प्रस्तावना", **अप्रकाशित गडकरी**, मुंबई, १९६२, पृ. सव्वीस) आपल्या दुसऱ्या तरुण कोवळ्या पत्नीशी एकांतात गाठ पडल्यानंतर या दुसऱ्या विवाहाच्या वैफल्याची त्यांना पूर्ण कल्पना येऊन चुकली. त्या वैफल्याच्या भरात त्यांनी लिहिलेली एक कविता हस्तलिखितात होती.

गडकऱ्यांच्या चरित्रामधल्या एका अत्यंत खाजगी आणि दुःखद घटनेच्या तिच्यात उल्लेख असल्याने गडकऱ्यांचे धाकटे बंधु मंजुबाळ यानी ती कविता त्याचवेळी फाडून टाकल्याचे अत्रे यांनी नमूद केले आहे (**तत्रैव**) मात्र तिच्यातल्या स्मरणात राहिलेल्या खालील दोन ओळी त्यांनी उद्धृत केल्या आहेत :

**गोविंदाग्रज धाडी ही पहिली भेट संभ्रमें**
**पहिला आणि शेवटला संपला स्पर्श हा** × ×

(शेवटच्या ओळीतल्या दोन फुल्या 'रमे' अशा पत्नीच्या उल्लेखाच्या आहेत.)

५. भ. श्री. पंडित, "प्रस्तावना", **समग्र केशवसुत**, पुणे, आ. २, १९७०, पृ ४९.

६. "अकाल सूर्यास्त", **मनोरंजन**, फेब्रु., १९१९, पृ. १९८.

७. ती तिसरी कविता व तिच्यावरील टीप खालीलप्रमाणे आहे :

**एका विडीकरितां एक कविता**

[चाल – मज भीति नसे मरणाची]
चरणांस नमी मित्र तुझा हे विनायका,
वत्सराज सुकुलभवा, कुशल गायका ॥ ध्रु० ॥
भास्करसुत सुगुणघना, दुर्गुणानला —
अति विमला, पदकमला, दाखवी मला,
स्नेहभाव काय कसा नष्ट जाहला ?
म्हणुनि मजसि भेटसी न सुहृदनायका ॥ चरण० १ ॥

टीप : कै. गोविंदाग्रज यांची थोडीशी चरित्रविषयक माहिती वरील कवितेशी निगडित झाली आहे, म्हणूनच ती येथे प्रसिद्ध केली आहे. ही कविता लिहिली त्यावेळी गोविंदाग्रजांचे वय अदमासे १५ वर्षांचे होते. लोणावळ्यानजीक 'तोरणे' नावाचे एक लहानसे मावळी गाव आहे, तेथे एक दिवशी संध्याकाळी दाराशी पडलेल्या रिकाम्या गाडीत आपल्या "नारायणराव प्रधान" नावाच्या मित्राबरोबर गप्पागोष्टी करीत बसले असताना स्वारीला विडी ओढण्याची लहर आली. परंतु यांच्याजवळ विड्या नव्हत्या व त्या विकतही मिळत नव्हत्या अखेर त्यांनी नारायणराव प्रधानांना त्यांच्या 'विनायक भास्कर वत्सराज' नावाच्या एका गत मित्रावर एका विडीला एक कविता करून देण्याचे कबूल करून त्याजपासून एक विडी घेऊन त्यांना वरील एक कविता लिहून दिली. गोविंदाग्रजांना विडी ओढण्याची सवय फार लहानपणापासून लागलेली असून ती अगदी पूर्णावस्थेस पोचली होती. ते चहा मनमुराद पीत व विड्या मनसोक्त ओढीत. — अनंततनय "

८. वि. ना. कोठीवाले, **गडकरी–जीवनचरित्र**, पुणे १९७०, पृ. २८.
९. तिच्यावर ' सातवी आवृत्ती ' असा उल्लेख आहे.
१०. तिच्यावर आवृत्तीचा कसलाच उल्लेख नाही.
११. ' १९६२ 'च्या आवृत्तीवरून पुढच्या सर्व आवृत्त्या पुनर्मुद्रित झाल्यामुळे त्यांच्यातून ही प्रसिद्ध कविता गळलेली आहे. ती खालीलप्रमाणे आहे :

**विहिणींचा कलकलाट**

[ ओवी ]

वीरांच्या गर्जना थोर । घुबडांचा आवाज घोर ।
घायाळांचें रडणें अघोर । हेंही त्यांत घातलें ॥ १ ॥
रणवाद्यांचा दणदणाट । हत्यारांचा खणखणाट ।
विजयघंटांचा घणघणाट । एका जागीं मिळविले ॥ २ ॥
दारुकामाचा फडफडाट । घोड्यांचा खडखडाट ।
तोफांचा धडधडाट । यांचीं त्यात भर केली ॥ ३ ॥
प्रळयमेघांचा गडगडाट । आणि विजांचा कडकडाट ।
भूमिभंगाचा तडतडाट । भरतीस हे घातले ॥ ४ ॥
सागराचें खवळणें । दारू पिणाराचें बरळणें ।
आणि मुलांचें ओरडणें । शाळा सुटतां वेळचें ॥ ५ ॥
नाना वाजंत्रीं हीं सारीं । एक केलीं यत्नें तरी ।
त्या कलकलाटाची नये सरी । लग्नांत विहिणी करितात जो ॥ ६ ॥

१२. ' भीमकबाळा ' या कवितेखाली ' १९१४ ' असे लिहिल्याने, कसा घोटाळा होतो, याचे उदाहरण म्हणजे माधव मनोहर यांनी **अभिरुची**, ( जाने–मार्च १९६९ ) लिहिलेला ' गोविंदाग्रजांची काव्यभाषा ' हा लेख. गोविंदाग्रजांची भाषाविषयक वृत्ती उत्तरोत्तर बदलत गेली, ती कृत्रिमतेकडून सहजतेकडे वळली, असे त्यांचे प्रतिपादन आहे. ' भीमकबाळा ' ही कविता १९०६–०७ ची आहे ! कविता–लेखनाचा काळ माहीत असणे कसे महत्त्वाचे असते हे या उदाहरणावरून लक्षात घेण्यासारखे आहे.
१३. **पूर्वोक्त** ( संदर्भ क्र. ६ ) पृ. २०४.
१४. " मित्राय नमः ", **केसरी** ( दिवाळी विशेषांक ), नोव्हें, १९५६, पृ. ७४८, ४९.
१५. ही कविता खालीलप्रमाणे हवी.

**इच्छा, उपभोग व विषय**

[ या तिघांचा अन्योन्यपोषक त्रिवेणीसंगम स्वर्गात तरी असेल काय ? ]

अखंड गायन ऐकायातें पंजरांत धरिला पक्षी
उडती लकेर झरतां जीवा ! नादचित्र केवळ लक्षी १

तेजोदेवी चपला चमके गगनीं लोभवि मनोहरा
हृदय फाडुनी वृत्ति मारुनी जडदेहानें स्पर्श करा २
निर्झरमार्गें श्रीजलवन्ती झुळझुळ गाणें गात झुके
धरण बांधितां धावतसे जल परंतु गाणें होत मुकें ३
दृढालिंगनीं सौंदर्याच्या, दर्शनलाभ स्पष्ट नसे
चुंबुनिं बघतां कपोल हा ! हा ! नेत्रचि मिटती मोहवशें ४
" असें-असावें " यांच्या सीमा अपूर्णता ही दावितसे
" गोविंदाग्रज " सनिश्वास मग नभाकडे क्षण पाहतसे ५

जळगांव, ता. २२–११–१६

१६. पणजी येथील 'दीपस्तंभ' पाहिल्यावर त्यांनी लिहिलेल्या खालील अपुऱ्या कवितेचा समावेश संहितेत करावयाचा राहिला आहे : बारीक, अस्पष्ट, गिचमीड अक्षरांत लिहिल्यामुळे सारी कविता लागली नाही.

## दीपस्तंभ

दीपस्तंभ दिसणार चहुंकडे दीपस्तंभ दिसणार ॥
अज्ञानाला दुरी घालवुनि प्रकाश तो देणार ॥ १ ॥

.... .. ... .... ... .... ...

कितीक ऐसे आकाशार्णविं दिसति दीपस्तंभ ॥
परंतु दैदिप्याचा तारा शुक्राचा नभिं पारिंभ ! ॥ ३ ॥

... ... ... ... ... ... .... ...

जीवननौका हंसते, डुलते परि डुलतांना जी बुडते ॥
ज्ञानदीपस्तंभहि नसता तर ती कैची स्थिर राहाते ? ॥ ५ ॥

... ... .... .... .... ... ...

बुद्धिसागरीं विवेक माझा, तुमचा अथवा जगताचा ॥
दीपस्तंभ हा दावी मनुजा 'गोविंदाग्रज' ज्ञानाचा ! ॥ ६ ॥

**पणजी**, २४ मार्च १९१४.

□

# वाग्वैजयंती

२५३५
काव्य २४८४३
३०।१।८६

अर्वाचीन कवितेच्या प्रांगणात केशवसुतांच्या प्रभावाने आणि बालकवींच्या बरोबरीने गडकऱ्यांनी 'गोविंदाग्रज' या टोपण नांवाने केलेले काव्यलेखन हे त्यांचे एक स्वतंत्र दालनच होय.

'केशवसुतांचा सच्चा चेला' म्हणून त्यांनी ह्या संप्रदायाची जी कास धरली ती अनुकरणात्मक होती, आत्मप्रत्ययाची निदर्शक नव्हती म्हणून त्यांची सामाजिक सुधारणाविषयक आणि गूढगुंजनपर कविता दुबळी ठरली यात शंका नाही. दिपवून टाकणारा कल्पनाविलास आणि अलंकरणाचा व अद्भुतरम्यतेचा अनावर हव्यास यांमुळे त्यांची बरीचशी लोकप्रिय ठरलेली कविताही प्रमाणशून्यता आणि कृत्रिमता हे दोष टाळू शकत नाही. त्यामुळे त्यांच्या नाट्यलेखनामध्ये दुथडी भरून वाहणारे गद्यकाव्य जेवढे तेजस्वी व परिणामकारक आहे तेवढी त्यांची कविता नसल्याचा निर्वाळा अनेकांनी दिला आहे.

मात्र, त्यांच्या कवितेतील प्रेमकाव्यामध्ये आणि विशेषत: त्यांच्या विफल आणि निराश मन:स्थितीचे चित्रण करणारे प्रेमकाव्य त्यातल्या आंतरिक व्याकुळ आंदोलनामुळे प्रभावी व परिणामकारक उतरले आहे.

गडकऱ्यांच्या प्रतिभेची आणि वृत्तीची ही दोन्ही अंगे 'वाग्वैजयंती'त पाहावयास मिळतात.



# अर्पण पत्रिका

सत्—
चित्–हृत्–महत्
आनंद–पदवी–प्रदान–वदान्या ॥ १ ॥

प्रीतीची पवित्रता, चिरंतनाची चरित्रता,
सृष्टीची सचित्रता,
विश्वाची विविधता, अनंताची अगाधता,
ईश्वराचें अस्तित्व
या सर्वांच्या
अचल ऐक्याची
प्रत्यक्ष निदर्शना ॥ २ ॥

भूतकालांतली भावजीवना, वर्तमानांतली वरतराशा,
भवितव्यांतली भाग्यदेवी ॥ ३ ॥

हृदयाची स्फूर्ति, इच्छेची पूर्ति,
मांगल्याची कीर्ति
श्री
हृदयशारदा
ही
सर्वस्वानें अर्पिलेली
'वाग्वैजयंती' सदैव कंठांत धारण करो!

'गोविंदाग्रज'

(library stamp)

## वाचकांस विज्ञापन

शार्दूलविक्रीडित

जें जें या समयीं मनांत भरलें स्वच्छंद नानास्थळीं,
तें तें त्या समयीं जपून धरितां ही होय गंगाजळी !
मित्रा ! ही कविता – न गद्य – इजला निर्बंध कैचा बरें ?
सारें हें मनिं आणुनी मग धरीं ' वाग्वैजयंती ' करें ।। १ ।।

वसंततिलका

प्रेमें, सख्या धरिं हिला हृदयीं सदाही,
दे टाकुनी; तुडविं ही अथवा पदांही !
मातें दशा समचि या गमतात दोन्ही
माझी मलाच लखलाभ सदा असो ही ।। २ ।।

## तडजोड *

एका एक कधीं जसें दिसतसे स्वांतीं विकारांतरें,
अन्या तें न दिसे तसेंच; असतें ज्याचें तयातें खरें;
चित्तैक्यास्तव सर्वथा फुकट कां हेका धरावा मग ?
एका शून्य जगीं दिसे, तरि दिसे शून्यांत अन्या जग ! ।। ३ ।।

* ' गोविंदाग्रजा ' शीं ज्यांचा विचारभेद होईल त्यांना या तडजोडीनें समाधान वाटावयाला काय हरकत आहे ?

—राम गणेश गडकरी

## माझी पहिली कविता

[ आमचा एक वृद्ध गुजराथी शेजारी, रोज दुपारीं जेवण झाल्यावर आमच्या घरीं येऊन गप्पागोष्टी सांगत बसत असे, त्याचें पुढील आर्येंत वर्णन केलेलें आहे. माझे वडीलबंधु ती. विनायक गणेश गडकरी यांनीं या काव्याला थोडी मदत केली होती. मु. गणदेवी, प्रांत नवसारी, संस्थान गायकवाडी. १८९६ जून किंवा जुलै. ]

आर्या

चष्मा लावुनि डोळयां डोकिस पागोटि तांबडी घाली ।
काटी टेंकित टेंकित येऊनि बैसे पथारिच्या खालीं ॥ १ ॥

## नदीस पूर आलेला पाहून

[ मुठा नदीस एकदा फार पूर येऊन श्रीओंकारेश्वराचे मंदिरांत पाणी शिरलें होतें. ]

[ चाल : नृपममता रामावरती ]

विरहोत्सुक सागर झाला ।
प्रियसखीस भेटायाला ॥ मज गमे ॥

निजमित्र मेघ पाठविला ।
गिरिराज श्वशुर-सदनाला ॥ मज गमे ॥

सरिता ही सागरजाया ।
त्यासवें निघाली जाया ॥ मज गमे ॥

आकांत । करित अत्यंत । ठेवितां तात ।
तिजसि उतरोनि ।
भूवरती तटकटिवरुनि ॥ मज गमे ॥ १ ॥

तो प्रसंग जणुं बघवेना ।
म्हणुनी रवि झांकी नयनां ॥ मज गमे ॥

घन गाळिति अश्रूधारा ।
दुःखें नच वाहे वारा ॥ मज गमे ॥

शिवमंदिरिं भगिनी गिरिजा ।
भेटे तिस सागरभाजा ॥ मज गमे ॥

यापरी । सिंधुमंदिरीं । जात सुंदरी ।
पूर्ण जलसरिता ।
शिवगिरिजा दर्शनमुदिता ॥ मज गमे ॥

१९०१, पुणें.

## मोगऱ्याचा हार

[ चाल : नृपममता रामावरती ]

मुलगा— हा हार शुभ्र किति आई ।
किति कोमल सुंदर पाहीं ॥ क्षणभरी ॥

किति वास मधुर या येई ।
मम चित्त ओढुनी घेई ॥ बघ तरी ॥

कशिं फुलें डंवरलीं असतीं ।
किती अलंकार त्या वुडती ॥ बहुपरी ॥

भूवरी । जन्म घे तरी । वास जनशिरीं ।
कसा हा मिळवी ।
जनमनें कशानें वळवी ॥ वद तरी ॥ १ ॥

आई — मधुवासें प्रिय हा सकलां ।
स्वगुणांनीं तूं हो बाळा ॥ त्यापरी ॥

हा धवलत्वें सुंदरसा ।
चारित्र्यें शोभे तैसा ॥ तूं तरी ॥

हा शिरिं जसा नगभारा ।
तेज तूं लोपवि धीरां ॥ त्यापरी ॥

यापरी । वागशिल जरी । सकल जन तरी
तुजसि मम तनया ।
शिरिं धरितिल हारासम या ॥ कधिं तरी ॥

१९०३, पुणें.

## काळ

कोठें असे सकलपंडितमुख्य भोज ?
कोठें शिकंदर जगद्विजयी सुराज ?
कोठें स्वधर्मपरिपालक श्रीशिवाजी ?
कोठें तदीय यशवर्धक वीर बाजी ? ॥ १ ॥

ते राजकारणपटूत्तम धीट नाना
कोठें न कां दिसति ओढित कोण त्यांना ?
लोकैकवीर रणधीर मुरारबाजी
कोठें लपोनि बसले कळतें न आजी ॥ २ ॥

कोठें असे मयसभा स्पृहणीयशोभा ?
निस्तेज कां मज कथीं पृथुची यशोभा ?
धारा कुठें सकळ लोक ललामभूता ?
तें हस्तिनापुर कुठें हरि ज्यास त्राता ? ॥ ३ ॥

गेले कुठें सुकवि जे प्रिय शारदेसी ?
नेलें कोणीं अखिल भारतसंपदेसी ?
गेलें कुठें बहुल वैभव पेशव्यांचें ?
व्यापार-कौशल कुठें लपलें चिनाचें ? ॥ ४ ॥

कां मृण्मया बनलि रोमकराजधानी ?
कां ग्रीकराष्ट्रमहतीहि न येत कानीं ?
केलें कुणी परमदीन दमास्कसातें ?
नेलें कुणी मिसरच्या सुयशोधनातें ? ॥ ५ ॥

वाजीगजादि नवरत्नसुजातकोष,
प्राचीन वैभव नितान्त तसें अशेष;

स्तंभादि वीरजयसूचक वस्तुजात
केलें कुणी सकल हें स्मृतिमात्र ज्ञात ? ॥ ६ ॥

स्थित्यंतरा करित कोण असा विदेही ?
कीं नामरूप गुणवर्णन त्यास नाहीं ?
छे; सर्व हें वितथ; नाम तयास आहे—
तो 'काळ' जो करितसे स्थितिभेद बा हे ॥ ७ ॥

१९०३, पुणें.

## कोणी कोणास तरी

[ आपल्या रूपाचाच अभिमान धरणाऱ्या एका आचरटास उद्देशून. ]

[ चाल : श्रीहरीच्या वेणुनादें ]

तुज बघुनी वाटतें कीं भ्रम पावे विधिमती
पुरुषातें अर्पि कसा मधुरा ही स्वाकृति ।
कोमलता, वर्णशोभा; तनु तनुला ही अति
जरि असतीं स्त्रीप्रती सार्थकता पावतीं ॥ १ ॥

१९०५, पुणें.

## सगुण स्वरूप

[ पंढरीस पांडुरंगाची पायभेटी झाली त्या वेळीं या चार पाकळ्या अर्पण केल्या होत्या. ]

[ चाल : नाहिं सुभद्रा या वार्तेतें ]

धन्य पंढरी ! धन्य भीवरा ! धन्य चंद्रभागा !
भक्तांसाठीं वैकुंठींचा नाथ जिथें जागा ॥ ध्रु० ॥

स्वानंदाचा गाभा, शोभा ब्रह्मंडळाची ।
वैरागरिचें रत्न मनोहर, आशा पुण्यांची ॥

कैवल्याचें निधान केवळ, माता संतांची ।
तो प्रभु झाला सगुण सांवळा गोकुळिंच्या रंगा ॥ धन्य० ॥ १ ॥

भक्तराज तो पुंडलीक या जगीं एक जाणा ।
हांक जयाची ऐकुनि धांवे लक्ष्मीचा राणा ॥
करावयास्तव जगत्रयाच्या अखंड कल्याणा ।
कटिं कर, समपद, विटेवरी करि उभा पांडुरंगा ॥ धन्य० ॥ २ ॥

स्वच्छंदें सच्चिदानंदपद रमे वाळवंटीं ।
'जय जय विठ्ठल' नाद एक हा संतांच्या कंठीं ॥
पहावया स्वानंदसोहळा सुर करिती दाटी ।
'पुंडलीकवरदा हरि विठ्ठल' रंगति दिग्भागा ॥ धन्य० ॥ ३ ॥

१९०८, महाद्वार पंढरी.

## नट मित्रास पत्र *

दिंडी

ज्येष्ठ बंधो ! साष्टांग नमस्कार !
बांधवाचा घे आधिं गुणाधार ।
मान्य करुनी ही विनंती विशेष
वृत्त ऐकें सप्रेम मम अशेष ॥ १ ॥

पत्र पूर्वी तुज पाठविलें त्याचें
त्वरें प्रत्युत्तर खास यावयाचें ।
असें आधीं घेतलें मन्मनानें
परी ठरलें भलतेंच अनुभवानें ॥ २ ॥

पाहुनियां परि गद्य पत्र याचें
कठिण तुमचें मन, कठिण ह्रदयाचें ।

* के. गोविंदाग्रजांनीं हें पत्र सुप्रसिद्ध नट रा. रा. गणेश गोविंद बोडस यांस पाठविलें होतें.

शब्दसुमनांचा म्हणुनि करुनि झेला
पाठवीं मी; हा तरी वरिच झेला ॥ ३ ॥

जरा तुमच्या मी दृष्टिआड होतां
सृष्टिआडहि झालोंच काय आतां ?
वाटलें हें जरि अंतर स्थळाचें
काय प्रेमांतहि तेंच व्हावयाचें ? ॥ ४ ॥

आळसानें कां हा प्रकार झाला ?
पात्र किंवा मी नसें उत्तगला ?
राग अथवा का अजुनि नाहिं गेला ?
प्रेमसिंधुच कीं मुळीं शुष्क झाला ? ॥ ५ ॥

निकट असतां जो स्नेह दाखवीला
भासला तो तें सत्य मन्मतीला ।
आजि कळला परि खरा अर्थ त्याचा
भासला कीं तो तुझ्या अभिनयाचा ! ॥ ६ ॥

खरा नट तूं, रे नटवरा, खराच
तारतम्याचें ज्ञान परि न साच ।
अभिनयाची तुज शक्ति तर असावी,
समय पाहुनि ती परी दाखवावी ॥ ७ ॥

रंगभूमी अभिनयें भूषवावी
तीच वृत्ती सर्वत्र परि नसावी ।
कालपट जरि दृष्टीस आड आला
तरि न विसरावें कधीं मित्रतेला ॥ ८ ॥

एकट्यासचि तुज दोष देत नाहीं
वृत्ति सर्वांची हीच दिसत पाहीं ।
कांहिं काळें भेटतां तुम्हां कोठें
ओळखीसहि विसराल असें वाटे ॥ ९ ॥

ओघ कवितेचा येथवरी चाले
पत्र तुमचें इतक्यांत हेंच आलें ।
खिन्न माझें मन सु-प्रसन्न होत
प्रवाहाचा बदलुनी रोख जात ॥ १० ॥

पुढिल कार्यक्रम अजुनि ठाम नाहीं
परस्वाधिन ही गोष्ट असे पाहीं ।
छत्रपतिच्या पत्रांत परि तयाचा
कांहिं केला उल्लेख तोच वाचा ॥ ११ ॥

लेखनाचें कौशल्य फार माझें
तुझा उपहासच त्यास योग्य साजे ।
लिहित बसणें तुम्हांस नित्य पत्रें
लेखनाचें कौशल्य हेंच सारें ॥ १२ ॥

असें वरचेवर पत्र पाठवावें
आणि प्रकृतीतें नित्य जपत जावें ।
उण्या-अधिकाचा राग नच धरावा
भूतकालासह तोहि भूत व्हावा ॥ १३ ॥

बहुत लिहिणें वद काय याहुनीहि
विनति नित्याची लोभ असावा ही ।
काव्यदेवीतें द्यावया विराम
घेइ आज्ञा—

आपला—

मित्र,

'राम' ॥ १४ ॥

ओवी

मुक्काम—नागपूर शहर
वार-पवित्र गुरुवार ।
तारीख—एकोणीस नोव्हेंबर
एकोणीसशें आठची ॥ १ ॥

१९ नोव्हेंबर १९०८, नागपूर.

## अल्लड प्रेमास

क्षणभर वेड्या प्रेमा थांब !
अधिर मनासह जासी कोठें ?
चुकशिल—संकटिं पडशिल वाटे,
जग हें सारें बा रे खोटें !
हृदया सोडुनि; गड्या म्हणोनी, जाइं न कोठें लांब !

क्षणीं पांढरा, क्षणींच काळा,
रंग आवडे असा जगाला,
ठाव तयाचा कुणा न कळला !
खुळ्या तुलाची, अशा जगाची, कळेल का कृति सांग ?

जग सगळें हें देखाव्याचें !
गुलाम केवळ रे स्वार्थाचें !
स्मशान कीं हें शुद्धत्वाचें !
शुद्ध भावडें, सरळ रोकडें, अशांत करिशिल काय ?

प्रेमा येथें शपथ लागते !
प्रासावांचुनि कविता अडते !
कर्त्यावांचुनि कार्यहि घडतें !
देव बिचारा, तया न थारा, तुझी कथा मग काय ?

तुझ्यासारखा तुला सोयती—
मिळेल का या अफाट जगतीं ?
—संकुचितहि हें अफाट जरि अति—
आणी न मना, अशी कल्पना, अगदीं भोळा सांब !

कोणी तुजला मानिल खोटें,
तिरस्कारहि दिसेल कोठें,
अपमानाचेंही भय मोठें,
बाग जगाची, ही न फुलांची, कांटे जागोजाग !

टाकिल कुणि तुज धिक्कारानें,
रडविल किंवा उपहासानें,

फसविल नकली कीं मालानें,
कोणी भटकत, उगाच रखडत, फिरविल मागोमाग !

म्हणुनि लाडक्या ! कुठें न जाई,
या हृदयांतचि लपुनी राही,
योग्य मित्र नच सुख तरि नाहीं !
कुसंगतीहुनि, वेड्या ! मानीं, फार बरा एकान्त !

१९०९

## केशवसुत मेले ?

जगतास जागवायाला केशवसुत गाउनि गेले !
इंग्लंद भूमि शेलेची माहेर जडाचें बनलें,
सन्देश गूढ जे त्याचे तैसेच मानसीं जिरले,
तपोवना मानवतेच्या या बघतां मानस हंसलें !

देवांचे हेतु न पुरले,
अर्धेंच कार्य जें उरलें,
ते येथें करुनी गेले,
अवतरुनी फिरुनी शेले ! केशवसुत गाउनि गेले !

एकेका शब्दें भरले काव्याचे अद्भुत पेले !
ज्यांसाठीं मानव झटले, ते सुधाकुंभ भरलेले—
वाग्देवी वरुनी टाकी केशवसुतहृदयीं झेले !

अनुभवुनि निजानंदानें
मग त्यांचें केलें गाणें,
श्वासाच्या कारंज्यानें
चहुंकडे उधळुनी दिधलें ! केशवसुत गाउनि गेले !

हे तुषार पडतां अंगीं बिंदूंचे सिंधू झाले !
निजलेल्या जागृति आली, हो ताजें जें थकलेलें !
मरणासचि आलें मरणें, मग केलें त्यानें काळें !

तों शब्द मुक्याला सुचले !
गूढास रूप सांपडलें !
स्वच्छंद अचेतन हालें !
नश्वर तें ईश्वर केलें ! केशवसुत गाउनि गेले !

भेदभाव विलया गेला, सूक्ष्मांत स्थूल मिळालें !
गगनाचे फाडुनि पडदे दिसलें जें त्यापलिकडलें !
मरणाचें मूळच तुटलें, जन्माचें नातें सुटलें !
वस्तूंत वस्तुपण भरलें,
जीवंत जीवही झाले,
आत्म्यास आत्मपद आलें,
ब्रह्मही ब्रह्मसें ठरलें ! केशवसुत गाउनि गेले !

कळलें कीं ' आम्ही कोण !, *' हरपलें श्रेय ' सांपडलें;
आत्मा हो ' वेडापीर ', सृष्टींत ' भृंग 'सा रंगे;
मारुनियां ' गोफण ' काळा निज ' निशाण ' नाभिं फडकविलें !
ऐकतांच विजयि ' तुतारी '
हो चिरंजीव ' म्हातारी '
मग वाजवितांच ' सतारी '
सर्वत्र ' झपूर्झा ' झालें ! केशवसुत गाउनि गेले !

या स्थितींत त्या ब्रह्माची ब्रह्माशीं मिळणी घडली,
जें चिरंतनाच्यासाठीं सांगता तयाची झाली.
परि जनता वेडी कुठली, " केशवसुत मेले " वदली !
परि जन्ममरण हें वारें
कल्पनाच नाचवि सारें !
मूर्खांनो ! रडतां कां रे,
कीं " केशवसुत ते मेले ! " केशवसुत गाउनि गेले !

जे एकाठायीं होते, ते सर्वांठायीं भरले;
सर्वांच्या हृदयीं भरले सर्वांच्या जीवीं भिनले;
विश्व स्थिर ज्यांनीं केलें कां वदतां तेच निमाले ?

---

* हीं केशवसुतांच्या कवितांचीं नांवें आहेत. अरेरे ! हेंहि सांगावें लागतें !

लीलेनें त्यांनीं गातां
ही सजीव केली जडता,
अणुरेणूमधुनी आतां
निघतील तयांचे चेले ! केशवसुत गाउनि गेले

सर्व ठायिं सर्वहि काळीं सर्वांनीं ज्यास पहावें,
पाहतां पाहतां वाटे डोळ्यांनीं ज्यास गिळावें,
तो विषय होई मरणाचा जन बोले काय करावें ?

जे चकव्यावांचुनि चकले,
जरि ते कुणि कांहीं भकले,
तरि 'गोविंदाग्रज' बोले
केशवसुत कसले मेले ? केशवसुत गातचि बसले !

लेखनकाल : १९ फेब्रुवारी १९११. प्रसिद्धिकाल : ऑगस्ट १९१३.

## श्रीमत् राजाधिराज पांचवे जॉर्ज हिंदुस्थानचे बादशहा यांच्या राज्यारोहणानिमित्त पदें

(अभिवादन करीत)

अभिनंदन करितों प्रांजलि । मंगल काळीं ॥ ध्रु० ॥
प्रजाजनांच्या मंगल वचनीं ॥ वाद्यें वाजति सकलहि भुवनीं ॥
शुभलक्ष्मीं सुमनोहरांनीं ॥ श्रीवसुंधरा तुज वरुनी ॥ पावन झाली ॥ १ ॥

पितामहीसम अमरसुखातें ॥ सेवि भूवरी त्रिभुवननृपते ॥
जी शोभा दे तव जनकातें । शांत वृत्तिला त्या हातें ॥ बसवीं भालीं ॥
क्षमादयागण किरणीं रमवी । सदाहि भूपा वसुधा देवी ॥
जन सारे सदया करि तेवीं । तव कृपाचंद्रिकाजालीं ॥ वैभवशाली ॥

(दावर दादार)

विनति नाहिं इतर कांहीं, सदाहि स्वजनकसम तूंहि पाहिं नाट्यकलानिरत जनां कृपेक्षणांहि ॥ ध्रु० ॥ कुंठित गति होति न जरि नृपकरिं ॥ ललितकला

सकला ॥ भूपाल तरि तयाला ॥ द्रुततर गति वितरुनि अति पसरवि यश दशदिशांहि ॥ १ ॥ चंद्रबिंब कांति पसरि जगभरि ॥ तिमिर जी निवारी ॥ होई न तापकारी ॥ शमधन जनिं उधळि सतत तदमृतकण निजकरांहि ॥ २ ॥

२२ जून, १९११, पुणें.

## स्मृतिगीत

[ माझ्या 'प्रेमसंन्यास' नाटकांतील नायिकेच्या तोंडीं हें गाणें ठेविलें आहे. उत्तररामचरित्रांतील 'तेहि नो दिवसा गताः' एतदन्त सुप्रसिद्ध श्लोकाची लीलेच्या— नायिकेच्या— कोमल हृदयावर पडलेली ही विततच्छाया आहे अशी कल्पना करून तिनेंच हें गाणें जोडलें आहे असें दाखविलें आहे. एरवीं भाषांतर करण्याची माझी इच्छा नव्हती. ]

( चाल : चंद्रकांत राजाची )

आठवतो का सांग, सखे ! तो काळ विवाहाचा
बाळपणाचा, मुग्धपणाचा, निर्मळ भावाचा ?
संसाराचें चित्र चिमुकलें, चिमुकलेच जीव
फुललें नव्हतें हृदयांचेंही राजस राजीव !
पाहत होते तात तदा त्या लीला बालांच्या,
जणुं आठवती त्यांसहि लीला त्याच सुकालाच्या।
जपति परोपरी प्रसन्नहृदया पुण्यमया माता ।
गेले ते दिन, सीते, यापरि, हा ! बघतां बघतां ॥

बाळपणींचे प्रसंग जणुं ते घडति आज फिरुनी ;
चित्रपटा या अश्रुजलानें चल टाकूं धुवुनी ।
तूं सीता ती; राम तोच मी; त्याच आज माता ।
परि जे गेले दिन ते आतां येतिल का हाता ?
कशास आशा नसती आतां—झालें तें गेलें !
सुकलें फूल न देत वास जरि अश्रूंनीं भिजलें !

१९११

# गुलाबी कोडें

[ संध्याकाळीं सूर्य पश्चिम दिशेस असतांना पश्चिम तर तांबडी होतेच; पण पूर्व दिशेवरहि त्याच रंगाची छटा दिसते, हें पुष्कळांनीं पाहिलेंच असेल. ]

रंग गुलाबी संध्या पसरी पश्चिम दिग्भागीं,
समोर पूर्वा स्वमुख रंगवी त्याच रम्य रंगीं.

परी पश्चिमाहृदयिं तांबडें सूर्यबिंब विलसे,
कशी रंगली पूर्वा याचें कारण कांहिं नसे.

विनोदचतुरा मुग्धा बाला विचारि निज नाथा,
" शास्त्रज्ञा, पंडिता, उलगडा हें कोडें आतां !

अपरा वदनीं रमते लाली रविसहवासानें,
रवि नसतां परि कां रंगावें प्राचीच्या वदनें !

रंग इकडचा तिकडे वळला, छटा कुठुनि गेली ?
ही जादूची नजरबंदि कुणिं कधीं कशी केली ? "

विनोदपंडित पति कौतुकला, हंसे तसा थोडें;
ओठ गुलाबी, गाल गुलाबी, गुलाबीच कोडें !

वदे तिला, " हें रहस्य असलें कथीन कानांत ! "
करि कंठीं कर एक, दुज्यानें धरि दुसरा हात !

ओढुनि जवळी, ऐकविला तिस मुकाच कानांत,
—गालावरचें गीत कसें तें वळवूं गानांत !

दूर सरकतां लज्जित बाला, प्राणनाथ बोले
" बघ हृदयाच्या आरशांत जें चित्र तुझे डोले !

रविबिंबासम चुंबन-बिंबचि विलसत या गालीं !
सहज तयाची छटा गुलाबी पसरे भंवतालीं.

चुंबनचित्र न परी उमटतां या दुसऱ्या गालीं,
सांग वल्लभे ! नाचतसे कां त्यावरिं ही लाली !

रंग इकडचा तिकडे वळला, छटा कुठुनि गेली ?
ही जादूची नजरबंदि कुणिं कधीं कशी केली ? "

" कांट्यानें काढावा कांटा ", शास्त्रज्ञा ठावें,
गुलाब टाकुनि गुलाबास मग कां नच उडवावें ?

हीं हृदयाचीं कोडीं सोडवि हृदयांचा मेळ,
शास्त्रांना हा कसा कळावा हृदयाचा खेळ !

ओठगोष्ट मग कशीं बोललीं तीं मिटलीं तोंडें,
' गोविंदाग्रज ' रसिकां टाकी गुलाबीच कोडें !

सप्टेंबर, १९११.

## मनांतली पाल

[ कांहीं विचार मनांत आला आणि तितक्यांत पाल चुकचुकली म्हणजे मनाला धक्का बसतो; तसेंच कांहींहि अलौकिक करावयास जा, आधींच कसेसें वाटतें ! ]

( चाल : कसें मीं मारूं ? माझें नवलाचें पांखरूं० )

करितां कार्या । चुकचुके पाल ही वायां ॥ ध्रु० ॥

क्षणैक भरतें भलतें वारें । संभ्रामिं बुडतें जग हें सारें ।
कारागृहिंचीं उघडति दारें । समयिं अशा या ।
चुकचुके पाल ही वायां ॥ १ ॥

सजीवतेची उकळी फुटते । बेडी पायांमधली तुटते ।
नसती लाज जनाची सुटते । तोंच भिववाया ।
चुकचुके पाल ही वायां ॥ २ ॥

ओळख निजरूपाची पटते । क्षणभर भेकड वृत्तिहि हटते ।
शक्तिहि सर्वस्वानें नटते । जीव तों घ्याया ।
चुकचुके पाल ही वायां ॥ ३ ॥

दृष्टिहि अनंत ठायीं शिरते । बघतां बघतां उलटी फिरते ।
चहूंकडे वा ठायींच जिरते । विरते माया ।
चुकचुके पाल तों वायां ॥ ४ ॥

मर्यादेच्या सीमा सरती । भणूंत सर्वस्वाची वसती ।
' मी तूं ' शून्यामाजीं रमती । वायुमय काया ।
चुकचुके पाल ही वायां ॥ ५ ॥

जडतां पारदर्शि जों होई । स्फूर्तिस पद अवकाशहि देई ।
कल्पकता जडरूपा घेई । ब्रह्ममय माया ।
चुकचुके पाल तों वायां ॥ ६ ॥

अंधुक जें जें तें लखलखतें । ' असतें ' सहजचि हातीं बसतें ।
नसतें तेंहि मग दिसतें । ठाव ना शून्या ।
चुकचुके पाल ही वायां ॥ ७ ॥

होतों सुखी सदा ज्या गांवीं । पुन्हां आठवण त्याची व्हावी ।
नसती व्याद टाकुनी द्यावी । निघावें जाया ।
चुकचुके पाल ही वायां ॥ ८ ॥

न दिसे कोठें अंत:करणीं । नाहीं तैशी वातावरणीं ।
नाहीं कधीं पाहिली कोणीं । ज्या त्या ठायां ।
चुकचुके पाल परि वायां ॥ ९ ॥

न कळे चांडाळिण ही कुठली । निशिदिनिं अडवायातें उठली ।
कर्तव्याची चालच खुटली । मार रे मार ।
पाल ही प्रभो अनिवार ! ॥ १० ॥

मार्च, १९१२.

## पहिलें चुंबन

[ पहिलें फूल, पहिलें मूल— सर्व कांहीं पहिलें म्हणजे पहिलेंच ! तसेंच पहिलें चुंबन ! पहिल्याची अजब जादू दुसऱ्यांत नाहीं ! ]

( चाल : श्रवणांत पेरणि केली इ० )

जें मनास शिवलें नाहीं । ठावें न कल्पनेलाही । सुख असें ।
जें दिसे न कवण्या जागीं । जें अवर्ण्य वाणीलागी । सुख असें ।
कविताही प्रतिभाशाली । कल्पितां जयातें थकली । सुख असें ।

एकदां । कष्टतां सदा । पुढतिं नच कदा- ।
अनुभवा येई । तें पहिलें चुंबन देई । सुख असें ॥ १ ॥

चित्रासम रमणी बसली । नवयौवनशोभा ठसली । तन्मुखीं ।
करिं ठेवुनि कोमल गाला । करि विचार न कळे कसला । सारखी ।
डोले ना अथवा हाले । मग कुठलें बोले चाले । चित्र तें ।
रंजना । मुग्धयौवना । करित कल्पना ।
भावि कालाची । ( तुज ठावें ) त्या दिवसाची । दिवस तो ॥२ ॥

चित्र हें पाहुनी असलें । नेत्रांचें सार्थक झालें । वाटलें ।
परि तरंग अद्भुत उठले । अनुभवा न पूर्वी आले । जे कधीं ।
जाउनी चोरट्या चालीं । झांकिले नयन करजालीं । न कळतां ।
संभ्रमें । दचकली गमे । त्वरित विभ्रमें ।
श्रमवि कर दोन्ही । काढाया नयनांवरुनी । मम करां ॥ ३ ॥

तों बघुनी उघड्या गाला । उन्माद मानसीं भरला । स्वैरसा ।
संमोह पडे नयनांला । मज विसर जगाचा पडला । क्षणभरी ।
ठेवुनि मुख सखिच्या गालीं । आणिली गुलाबी लाली । त्यावरी ।
हांसली । फार लाजली । दूर जाहली ।
एक निमिषांत । झिडकारुनि माझा हात । हंसतची ॥ ४ ॥

हा खेळ एक निमिषाचा । एकदांच अनुभव त्याचा । नच पुन्हां ।
तें वारें आलें गेलें । जन्माचें सार्थक झालें । परि गमे ।
तें निमिष, स्थिति ती, सुख तें । चित्ताच्या दृष्टिस दिसतें ॥ सारखें ! ॥
स्वानंद— । कमलमकरंद । सुधानिस्यंद ।
भूवरी आणी । जें वर्णावें तें कोणी । सुख तसें ॥ ५ ॥

एकदांच अनुभव त्याचा । आरंभ अंत सौख्याचा । एकदां ।
आयुष्य न त्याला क्षणही । जन्मही पुन्हां त्या नाहीं । एकदां ।
मनिं चटका लावायासी । पाठवी दैव जणुं त्यासी । एकदां ।
निशिदिनीं । वाटतें मनीं । नित्य जन्मुनी ।
मरण सोसावें । परि पहिलें चुंबन घ्यावें । फिरुनिही ॥ ६ ॥

एप्रिल, १९१२.

## आंधळ्यांची माळ *

रानोमाळ । *आंधळ्यांची चाले माळ ॥ ध्रु० ॥

दृष्टि न यांतिल एकालाही । एकामागें दुसरा जाई ।
अर्धा डोळस ऐसा दावी । करी संभाळ । आंधळ्यांची...॥ १ ॥

तुकड्यासाठीं करिती ओरड । पैशासाठीं लागे धडपड ।
तोंडीं हरिनामाची बडबड । हातीं टाळ । आंधळ्यांची...॥ २ ॥

यांना साजे नांव भिकारी । थोड्यासाठीं लोचट भारी ।
धरुनी धरणें बसती दारीं । उठवि कपाळ । आंधळ्यांची...॥ ३ ॥

यांना दिसतें केवळ 'आज' । नाहीं कांहिं 'उद्यां'ची लाज ।
मिळेल कैसी अगदीं वांट । सायंकाळ । आंधळ्यांची...॥ ४ ॥

येईल 'उद्यां' जरी एखादी । ठेवूं दृष्टि मिळवुनी आधीं ।
न सरे पुढिल हीं कर्मांकरवीं । दुःखां जंजाळ । आंधळ्यांची ॥ ५ ॥

असा विचारें भवापाशीं । मागति कधीं ही दृष्टि न खाशी ।
काय म्हणावें या मूर्खांसी । प्रभो संभाळ । तूंच ही आंधळी माळ ॥ ६ ॥

मे, १९१२.

## एखाद्याचें नशीब

कांहीं गोड फुलें सदा विहरती स्वर्गांगनांच्या शिरीं,
कांहीं ठेवितसे कुणी रसिकही स्वच्छंद हृन्मंदिरीं;
कांहीं जाउनी बैसती प्रभुपदीं पादत्रा वारि तें,
एकादें फुटकें नशीब म्हणुनी प्रेतास शृंगारितें!
कोणी पर्वत आपुल्या शिरिं धरी हिमप्रभा शीतला,
कोणाच्या उदरामधून निघती मोठ्या नद्या निर्मला;

* मात्रादोष येथें आहीं अपरिहार्य आहे.

कोणाला वनदेवता वरितसे मोदांत जी नाहते,
एकाद्यामधुनी परंतु जळती ज्वालानदी वाहते !

झाडें जोडुनी पत्रयुग्म फुटले मेघांप्रती याचती,
स्वच्छंदें जलबिंदु तोंच सगळ्या पानांवरी नाचती;

सारी पालवती, फुलें विहरती, शोभा वरी लोळते,
एखाद्यावर मात्र वीज पडुनी त्या जाळते पोळते !

चाले खेळ असा जगांत; बहुधा सौख्यांत सारे जरी,
एखादा पडतो तसाच चुकुनी दुःखार्णवीं यापरी

पाही कोण अशा हताश हृदया ? जो तो असे आपला,
देवा ! तूं तरि टाकिं अश्रु वरुनी, त्यासाठीं तो तापला !

जून, १९१२.

## राजहंस माझा निजला !

[ पतिनिधनानंतर अल्पावधींतच बापडीवर एकुलत्या एक मुलाचें निधन पाहण्याचा प्रसंग आल्यावर असा भ्रम होणार नाहीं ? ]

( चाल : उद्धवा शांतवन... )

हें कोण बोललें बोला ?
'राजहंस माझा निजला !'

दुर्दैवनगाच्या शिखरीं । नवविधवा दुःखी आई !
तें हृदय कसें आईचें । मी उगाच सांगत नाहीं !
जें आनंदेंही रडतें । दुःखांत कसें तें होइ--
हें कुणी कुणां सांगावें !
आईच्या बाळा ठावें !
प्रेमाच्या गांवा जावें—
मग ऐकावें या बोला । 'राजहंस माझा निजला !'

होउनी कळस शोकाचा । भ्रम तिच्या मानसीं बसला ।
मग हृदय बधिरची झालें । अनि दुःख थिजवि चित्ताला ।
तें तिच्या जिवाचें फूल !
मांडीवर होत मलूल !
तरि शोकें पडुनी भूल—
वाटतची होतें तिजला । ' राजहंस माझा निजला ! '

जन चार भोंवतीं जमले । मृत बाळा उचलायाला ।
तो काळ नाथनिधनाचा । हतभागि मना आठवला ।
तो प्रसंग पहिला तरला । हा दुसरा आतां असला !
तें चित्र दिसे चित्ताला !
हें चित्र दिसे डोळयांला !
निज चित्र चित्तनयनांला,
मग रडुनि वदे ती सकलां । ' राजहंस माझा निजला ! '

करूं नका गलबला अगदीं । लागली झोंप रम बाळा !
आत्तांच झोंप त्या नाहीं । खेळाचा एकच चाळा !
जागतांच वाऱ्यासरसा । खेळाचा घेइल आळा !
वाजवूं नका पाऊल !
लागेल तया चाहूल !
झोंपेचा हलका फूल !
मग झोंपायाचा कुठला ! राजहंस माझा निजला !

हें दुध जरासें प्याला । आतांसा कोठें निजला !
डोळ्याला लागे डोळा । कां तोंच भोंवतीं जमलां ?
जा ! नका उठवूं वेल्हाळा । मी ओळखतें हो सकलां !
तो हिराच नेतां केला !
हिरकणीस आतां टपलां !
परि जिवापलिकडे याला —
लपवीन ! एकली न भ्याला ! राजहंस माझा निजला !

कां असलें भलतें सलतें । बोलतां अमंगळ याला ?
छबकड्यावरुनि माझ्या या । ओंवाळुनि टाकिन सकलां !
घेतें मी पदराखालीं । पाहूंच नका लडिवाळा !

मी गरीब कितिही असलें ।
जरि कपाळ माझें फुटलें ।
बोलणें तरी हें असलें—

खपणार नाहिं हो मजला ! राजहंस माझा निजला !

हें असेंच सांगुनि मागें । नेलात जिवाचा राजा ।
दाखविलाहि फिरुनी नाहीं । नाहिंत का तुम्हां लाजा ?
न्यावयास आतां आलां । राजहंस राजस माझा !

हा असा कसा दुष्टावा ?
कोणत्या जन्मिचा दावा ?
कां उगिच गळा कापावा—

पाहुनी गरिब कोणाला । राजहंस माझा निजला !

हे काळे कुरळे केश । खेळतात डोक्यावरतीं ।
ही दृष्टि पहा मम वदनीं । नेहमीं अशी ही असती ।
हें तेज अशा रत्नांचें । झालें का आहे कमती ?

कानांत नाचती डूल,
तोंडावर हंसरें फूल,
जीवाची घालुनि झूल—

मी असाच झांकिन याला । राजहंस माझा निजला !

या अर्ध्या उघड्या नयनीं । बाळ काय पाहत नाहीं ?
या अर्ध्या उघड्या तोंडीं । बाळ काय बोलत नाहीं ?
अर्थ या अशा हंसण्याचा । मज माझा कळतो बाई !

हें हंसें मुखावर नाचें !
जणुं बोल दुग्धपानाचे !
कीं मुक्या समाधानाचे !

इतुकेंहि कळे न कुणाला— । राजहंस माझा निजला !

या माझ्या मानससरसीं । सारखें प्रेमजल वाही ।
त्या तरंगलहरींवरतीं । राजहंस पोहत राही ।
सारखा पोहुनी दमला । मग मला भुकेला वाही !

नयनांच्या शिंपांमधुनी,
अश्रूंचे मौक्तिकतनुमणी,
मी दिले तया काढोनी,

मोत्यांचा चारा असला । राजहंस खाउनि निजला !

ते वैकुंठेश्वर गेले । पदिं त्यांच्या अर्पायाला ।
ही अखंड या अश्रूंची । वैजयंति मोहनमाळा !
मी करित असे केव्हांची । धरुनिया उराशीं बाळा ।

कौस्तुभ हा माळेमधला !
हृदयाचें कोंदण याला !
तो चोराया कां आला ?

दैन्याहुनि दैन्यचि झाला ! राजहंस माझा निजला !

हें असें जाहलें म्हणतां । तरि देवचि निजला कां हो ?
जरि निर्दय होउनि निजला । आळवीन फोडुनि टाहो ।
कीं असा पोटचा गोळा । पोटांतचि देवा राहो !

ही कुऱ्हाड आकाशाची,
मजवरती पाडायाची,
नाहींच कल्पना त्याची,

हा तुमचा कावा सगळा ! राजहंस माझा निजला !

जरि दूत यमाचे आले । लाडक्यास या न्यायाला ।
ते निष्ठुर असले तरिही । भुलतील पाहुनी याला ।
हृदयाचें होउनि पाणी । लागतील चुंबायाला ।

मी मुका असा घेतांना—
हा पहा—पुन्हां हंसलाना !
कां अशा फिरवितां माना ?

सुख खुपे काय डोळ्यांला ? राजहंस माझा निजला !

हें सर्वस्वाचें फूल । त्या भंवतीं झाला गोळा ।
मी बघतें– कधिंचा आहे । त्यावरतीं तुमचा डोळा !
एकदां करावा त्याचा । वादानें चोळामोळा !

सर्वांच्या मनिंचा लाहो,
हाच ना ? स्पष्ट बोला हो,
मी इतकी वेडी का हो—
कीं हेंहि कळेना मजला । राजहंस माझा निजला !

जरि होउं नये तें झालें । तरि सोडणार या नाहीं !
पाळणाहि रुततो ज्याला । प्रेमें जरि निजवी आई !
तो देह खांच दगडांत–छेः । नको नको ग बाई !

हृदयाची खणुनी खांच,
झांकिन मी बाळ असांच,
दुःखांचे फत्तर साच !
जा ! जाउनि सांगा काळा । 'राजहंस माझा निजला !'

जरि काळाचाही काळ । बाळाला न्याया आला !
तरि नाहीं मी द्यायाची । या जीवाच्या जीवाला !
सारखीं गाउनी गाणीं । निजवीन कल्पवर याला !

जा ! करा आपुलें काळें !
माझेही दमले डोळे !
प्राणांचें पसरुनि जाळें—
मी निजतें घेउनि याला ! राजहंस माझा निजला !

* * *

सांगुनी असें सकलांशीं । मृत बाळ उराशीं धरुनी ।
तन्मुखीं स्वमुख ठेवोनी । चुंबिलें एकदां फिरुनी ।
पाहिलें नीट निरखोनी । आणि तीही गेली निजुनी !

मग पुन्हां कधीं ती उठली,
जाणीव कुणा ही कुठली ?
परि मति या प्रश्नें हटली—
"बोलेल कोण या बोला । राजहंस माझा निजला !"

मग मातापुत्रांवरि त्या । तरु गाळिति कोमल पानें ।
ढाळिति लता निज सुमनें । पशुपक्षिहि रडती गानें ।
दशदिशा दगडही कढती । मन दुभंगुनी शोकानें ।
दुमदुमतें स्थळ तें अजुनी,
त्या एकच करुणागानीं,
जा जाउनि ऐका कानीं !
ऐकाल याच बोलाला —' राजहंस माझा निजला ! '

जुलै, १९१२

## वेडा

[ कुणाला कशाचें वेड लागेल आणि त्याचा शेवट कशांत होईल, हें कोणीं सांगावें ? ]

वेडा कोणि जगास सोडुनि पळे बाहेर गांवाचिया,
मैदानांत भयाण जाउनि उभा राही; न कांहीं बघे
संध्यारंग नभःपटांत रमती गांवीं न ते त्याचिया
वेडाचे नवरंग चित्तफलका रंगाविती; तेच घे.

त्याचें वेड कशांतुनी उपजलें कोणास हें नाकळे —
त्याचें त्यासहि नाकळे, मज गमे देवाहि ना ठाउकें !
त्याची ती विमनस्कता नच वदे कांहीं जरी आगळें,
वेड्याच्या हृदयास आपण तरी कैसें म्हणावें मुकें ?

व्हावें काय तयास हें समजण्या रस्ता न कांहीं उरे,
शून्या दृष्टि गमे तिच्यांत दिसलें कोणांविशीं प्रेम न !
तोंडाचा पडदा विकार विसरे; बेरंग सारा स्फुरे;
होतें का मग भावशून्य नुसतें ओसाड त्याचें मन ?

छेः ! मैदान उजाड तें; तरि तिथें हा वायु आहेच ना ?
वारें कांहिं तरी तसें घुमवितें ओसाड वेड्या मना !

[ २ ]

तारा एक तशांत पश्चिमदिशा फोडून बाहेरली.
संध्या कुंकुमिं दिग्वधूच टिकली लावी रुपेरी जणूं!

वेड्यानें तिजला भकास नयनीं येतांक्षणीं हेरली;
हांसे भेसुर तो; सवेंच अपुलें हृद्गान ल.गे म्हणूं!

वाटे कीं पटली तिला बघुनियां त्या खूण कांहीं तरी,
तोंडाच्या पडद्यावरी उमटले चित्तांतले खेळ ते!

कांहीं वेळ तसाच पाहि तिजला; एकाग्रता ती खरी
आशा प्रीति तसेंच वेड असलें, यांनाच ती साधते!

तारा आड ढगां–जरा क्षणभरीं झांकून राहे जर
वेड्याच्याहि तरी विषण्ण वदनीं काळीच छाया दिसे!

केला कांहिं विचार – निश्चय; वठे तच्चित्र तोंडावर,
भासे दीपसम स्मशानतिमिरीं तें निश्चयाचें पिसें!

नैराश्यादि विकार तीव्र करिती हा खेळ ऐसा पहा—
आश्चर्यें बघती तयास थिजले डोळे दिशांचे दहा!

[ ३ ]

किंचित् मस्तक हालवी; पुटपुटे तोंडांतची कांहिंसें
तारास्थानपथें सवेग मग तो चालावया लागला;
हातीं तीस धरीन– निश्चय दिसे; धांवें पुढें तें पिसें!
टाकी सारखिं पावलें झपझपां; नाहीं मुळीं भागला!

काळी घोर निशा; उदास हृदयीं तैशी निराशा जडे—
तारा तारक त्या तमीं; मनिं जसा तो एक आशाकण,
पायांखालुनि जाति डोंगर नद्या– पाही न मागें पुढें;
वर्षें कैक असाच चालत तरी लाभे न तारांगण!

वेडा यापरि जातजात पुढतीं झाला कुठें नाहिंसा!
तारा ती दिसते अजून! परि हो पत्ता तयाचा कसा!

काळाच्या उदरीं कधीं भटकतां कोणा कुठेंही कसा
वेडा सांपडतां, कथा मज– पुढें झालें तयाचें कसें?
त्याचें वेड तरी कुणास मिळतां द्या तें मला आणुनी;
माझ्या जी मनिं चांदणी चमकते, जाईन तीमागुनी!

ऑगस्ट, १९१२.

## मुरली

[ प्रीति, भक्ति आणि मुक्ति या भावयोगाच्या तीन पायऱ्या आहेत. प्रीतीच्या परमोच्च स्थितीवरच भक्तीचें पहिलें पाऊल उमटून भक्तीच्या मोकळ्या भरारींत भक्त-भगवंतांचें पूर्णैक्य होत असतें, हें दाखविण्यासाठीं स्त्रीहृदयाचें प्रेमळ रहस्य ओळखून भागवत कवींनीं 'राधा गौळण' कृष्ण-परमात्म्यासमोर उभी केलेली आहे. जगाच्या भूतकाळांत भोळ्या भाबड्या भक्तिप्रीतीच्या संयोगाचें इतकें ठळक चित्र याव्यतिरिक्त इतरत्र सांपडणार नाहीं. म्हणून या गीतांत राधारूपानें भक्तजीवात्मा दाखवून प्रीतिभक्तीच्या बदलत्या सीमारेषेवर त्याची स्थापना केली आहे. मनुष्याच्या आयुष्यांत असा एक काळ एकदां तरी येतोच कीं, ज्या वेळीं ईश्वराचें अस्तित्व भावपूर्ण हृदयाला पटतें. आणि तेव्हां मात्र, बुद्धिप्रधान मस्तकाचें समाधान करण्यासाठीं तळमळणारा जीवात्मा ईश्वरी साक्षात्काराची–प्रत्युत्तराची–याचना करीत असतो. हें दैवी प्रत्युत्तर त्या योग्य वेळीं मिळालें नाहीं म्हणजे मात्र मनुष्य पुन्हां भोंवऱ्यांत गुरफटतो. या गाण्यांत अशा ईश्वरी उत्तराला 'मुरलीध्वनि' कल्पून त्यासाठीं झुरणाऱ्या राधेच्या पांच चढत्या स्थिति (कडवीं १४।१८।२१।३२।३७) दाखविण्याचा प्रयत्न केलेला आहे— ]

'गोविंदाग्रज'

ही एक आस मनिं उरलि ॥
कन्हया ! बजाव बजाव मुरली ! ॥ ध्रु० ॥

जरि फुटले दोन्ही कान ॥ नच राही भूक तहान ॥
तिळभरही नुरलें भान ॥
बघ वृत्ति वृत्तिमधिं मुरली ॥ कन्हया ! बजाव० ॥ १ ॥

कां गाणें मजला व्हावें ॥ चित्तासहि नाहीं ठावें ॥
दृष्टीला केवि दिसावें ॥
मम आस नसे परि पुरलि ॥ कन्हय्या ! बजाव० ॥ २ ॥

मी अगदीं भोळी राधा ॥ तूं माधवजी ! नच साधा ॥
मोहिनी करी सुखबाधा ॥
तुज दासी विनवुनि झुरलि ॥ कन्हय्या ! बजाव० ॥ ३ ॥

चांदणें चहूंकडे खुललें ॥ फत्तरही सारे फुलले ॥
आनंदें विश्वहि झुललें ॥
स्फूर्तीच त्यांत तव शिरलि ॥ कन्हय्या ! बजाव० ॥ ४ ॥

तीनेंच शब्द मम निघती ॥ जग फिरुनि, फिरुनि मनिं रिघती ॥
मज आतां दुसरी न गति ॥
जगतींच सारी जणुं जिरलि ॥ कन्हय्या ! बजाव० ॥ ५ ॥

अणुरेणुहि देहीं स्वैर ॥ भिन्नता विसरली वैर ॥
अब नंदलाल ! कर खैर ॥
प्रेमाची दुनिया उरलि ॥ कन्हय्या ! बजाव० ॥ ६ ॥

बुद्धीचा तुटला धीर ॥ आशामय होय शरीर ॥
जलिं बुडे जलधिचें तीर ॥
बघबघतां दृष्टिहि विरलि ॥ कन्हय्या ! बजाव० ॥ ७ ॥

कथुं काय काय मज वाटे ॥ आनंद मात्र मनिं दाटे ॥
तरुशिरीं मूळ उफराटें ॥
शून्यांत परार्धें भरलिं ॥ कन्हय्या ! बजाव० ॥ ८ ॥

जन्माचें झालें चीज ॥ कायमची मेली नीज ॥
विश्वांचें गवसे बीज ॥
चिद्वृत्ति त्यांत अवतरलि ॥ कन्हय्या ! बजाव० ॥ ९ ॥

मायेची मेली बिजली ॥ परि खऱ्या जलीं ती विझली ॥
तीव्रता तियेची थिजली ॥
सुकलेलीं विश्वें भिजलिं ॥ कन्हय्या ! बजाव० ॥ १० ॥

कोसळति सरींवर सरी ॥ लहरींवर उठती लहरी ॥
अश्रूंची गरदी भारी ॥
अत्रकाशें तुडुंब सगळें ॥ कन्हय्या ! बजाव० ॥ ११ ॥

पुष्पाविण येई वास ॥ वाऱ्याविण चाले श्वास ! ॥
हर्षविण आतां हास ॥
मरणाविण सुटका झाली ॥ कन्हय्या ! बजाव० ॥ १२ ॥

ब्रह्मगोल त्वन्मय झाला । चहुंकडेच मुरलीवाला ॥
त्वद्रूप गोपिकाबाला ॥
मी मला शून्य या कालें ॥ कन्हय्या ! बजाव० ॥ १३ ॥

सांवळ्या यशोदाबाळा ! बंधाला पडला आळा ॥
स्वैराचा वाढ चाळा ॥
बावरी राधिका बनलि ॥ कन्हय्या ! बजाव० ॥ १४ ॥

किति करूं कन्हय्या ! यावा ॥ गा, नाच, वाजवि पांवा ॥
त्यांतच हा जीव विरावा ॥
यावांचुनि इच्छा नुरलि ॥ कन्हय्या ! बजाव० ॥ १५ ॥

एकेका ऐकुनि सूर ॥ दुःखाचा हो जरि चूर ॥
सारखी तरी हुरहूर ॥
न कळे ही लागे कसलि ॥ कन्हय्या ! बजाव० ॥ १६ ॥

तूं मनांतला चंडोल ॥ मग माझ्या मनिंचे बोल ॥
जरि हृदयीं लपले खोल ॥
तरि खोल हृदय या कालें ॥ कन्हय्या ! बजाव० ॥ १७ ॥

बोल, बोल तव विनमोल ॥ जीवाचें देइन मोल ॥
परि बोल एकदां बोल ॥
नातरी राधिका मुकलि ॥ कन्हय्या बजाव० ॥ १८ ॥

फिर विश्वाचा हा गोल ॥ सांभाळुनि माझा तोल ॥
प्रेमाचा धरुनी खोल ॥
बघ मागुन राधा आलि ॥ कन्हय्या ! बजाव० ॥ १९ ॥

मुरलीची प्यालें भांग ॥ घडिघडी थरारे अंग ॥
या लहरि उठति कां सांग ॥
आनंदवृत्ति पाझरलि ॥ कन्हय्या ! बजाव० ॥ २० ॥

उलगडति पीळ हृदयाचे ॥ जणुं सुटति बंध देहाचे ॥
कीं जीव देहभर नाचे ॥
कुणिकडे राधिका भकलि ॥ कन्हय्या ! बजाव० ॥ २१ ॥

ही लहर अशा देहाची ॥ हालचाल आनंदाची ॥
चेतनाच कीं जीवाची ॥
तुज भेटाया जणुं आलि ॥ कन्हय्या ! बजाव० ॥ २२ ॥

तिजमुळें होउनि दंग ॥ वाऱ्यांत तरंगे अंग ॥
अणुअणुही होति दुभंग ॥
त्यांमाजि नादवी मुरलि ॥ कन्हय्या ! बजाव० ॥ २३ ॥

हृदयाचे ठोके पडती ॥ अवकाश त्यांत जे उरती ॥
करि मुरलिरवाची भरती ॥
मग एकच धडकी सगळि ॥ कन्हय्या ! बजाव० ॥ २४ ॥

मुरलीचा मंजुळ नाद ॥ हृदयांत खुलवि पडसाद ॥
मम जीवाची ही साद ॥
तुज हांका मारित सुटली ॥ कन्हय्या ! बजाव० ॥ २५ ॥

सारखा मुरलि वाजीव ॥ अणुअणुसि देहिं दे जीव ॥
त्यांमाजि नाद गाजीव ॥
हृदयाचे पडदे उकलि ॥ कन्हय्या ! बजाव० ॥ २६ ॥

जीवाच्या कमळा भुलवी ॥ निजगुंजारविं त्या झुलवी ॥
पाकळी पाकळी खुलवी ॥
झुलवी त्या पाडुनि भुरळिं ॥ कन्हय्या ! बजाव० ॥ २७ ॥

कृष्णजी ! त्यांत तूं भृंग ॥ त्यांतच रे होई गुंग ॥
गुंजारव करि उत्तुंग ।
ही मोहरात्र ओसरलि ॥ कन्हय्या ! बजाव० ॥ २८ ॥

चांदणें खुले दिलरंगी ॥ हो एक नादरसरंगीं ॥
पोहत मी स्वैर तरंगीं ॥
बघ शुद्धबुद्ध मम हरलि ॥ कन्हय्या ! बजाव० ॥ २९ ॥

या रसीं देहकण न्हाले ॥ जो तो निजनादीं डोले ॥
क्षणभरांत सारे फुलले ॥
बघ फुलें तयांचीं झालिं ॥ कन्हय्या ! बजाव० ॥ ३० ॥

करुनि त्या फुलांचा झेला ॥ जीवाचा छेलछबेला ॥
नटवीन कधीं अलबेला ॥
झेला मज, आलें जवळि ॥ कन्हय्या ! वजाव० ॥ ३१ ॥

शृंगाररसानें नटली ॥ तुज राधा रमवूं झटली ॥
जन्मांची ओळख पटली ॥
कृष्णांत राधिका रमलि ॥ कन्हय्या ! बजाव० ॥ ३२ ॥

वांकड्या अधरिं हा पावा ॥ वाकडाच डोळा डावा ॥
किती वेळ असाच पहावा ?
अब खेल करो वनमालि ! कन्हय्या ! बजाव० ॥ ३३ ॥

श्वासें मज हृदयीं भरवीं ॥ नादें कीं ओढुनि नेईं ॥
चुंबनें च वीं मज बनवी ॥
तव ओंठावरली लालि ॥ कन्हय्या ! बजाव० ॥ ३४ ॥

दृढ आलिंगन दे अथवा ॥ अवकाश न त्यांत असावा ॥
एकरूप जीवाभावां ॥
तव देहिं देह मम जिरवि ॥ कन्हय्या ! बजाव० ॥ ३५ ॥

बघ आतां घटका भरली ॥ बोलाची बोली सरली ॥
जीवाची भाषा हरली ॥
ठायींच वृत्तिही हरलि ॥ कन्हय्या ! बजाव० ॥ ३६ ॥

जीवाचा पंची प्यारा ॥ मज आतां दिससी न्यारा ॥
मुरलीचा पिउनी वारा ॥
चहुंकडेच राधा झुकलि ॥ कन्हय्या ! बजाव० ॥ ३७ ॥

उरलें न शीत वा उष्ण ॥ कांहीं न शुभ्र वा कृष्ण ॥
एकरूप राधाकृष्ण ॥
जयनाद गात ही मुरलि ॥ कन्हय्या ! बजाव० ॥ ३८ ॥

चहुंकडेच आतां शांत ॥ विश्व शांत, आत्मा शांत ॥
कृष्ण शांत, राधा शांत ॥
मुरलींत शांतता भरलि ॥ कन्हय्या ! बजाव० ॥ ३९ ॥

भोगुनी तापमय उष्णा ॥ मुरलिची लागतां तृष्णा ॥
जग गाइल राधाकृष्णां ॥
ही साक्ष मनोमन मुरलि ॥ कन्हय्या ! बजाव० ॥ ४० ॥

ही अखंड मुरली वाजे ॥ सर्वांच्या हृदयीं गाजे ॥
मग कोण वदाया लाजे ?— ॥
'कीं धन्य धन्य ही मुरलि' ॥ कन्हय्या ! बजाव० ॥ ४१ ॥

त्या नादरसाचे प्याले ॥ मनिं 'गोविंदाग्रज' प्याले ॥
शाहीर मुरलिचे बनले ॥
मग गानिं वाजविति मुरलि ॥ कन्हय्या ! बजाव० ॥ ४२ ॥

सप्टेंबर, १९१२.

## हृदयशारदेस

[ कोणी कवीनें आपल्या कवितेस 'शब्दशारदा' व प्रणयिनीस 'हृदयशारदा' अशीं नांवें देऊन हें म्हटलें आहे. ]

हृदयशारदे ! या कवनाचे बोल ऐक माझे !
सरस्वती शब्दाची माझी तुजला जरि लाजे.

तुझ्या मनाचा, तुझ्या जिवाचा एक एक बोल,
मम कवितेच्या जादूलागीं ठरवीलच फोल !

नवशब्दांचे घुंगुर बांधुनि रसवंती माझी,
नाचत डोलत करि शिणलेलीं मनें पुन्हां ताजीं.

तिच्या गुणांवर कुणा कुणाचे जीव गुंग कांहीं,
तरि जादूनें जादूगारच काय फसुनि जाई ?

जरी शिरावर कुणीं बांधिला अमोल शिरपेंच,
दिसतो का तो ज्याचा त्याला ? स्तुतिचेंही हेंच !

शब्दांचा बाजार बदलतां जीवाची वेठ;
नको नको हें; उघड आपुल्या प्रेमाची पेठ !

प्रेमाच्या जिवलगे ! जिव्हाळा करितां रसभरती
भिन्नरंगीं हृत्तरंग रंगति उचंबळुनि निघती !

शब्दचित्र परि काढूं जातां त्यांचें उल्हासें,
रंग तयांचे उडुनी जाती निःश्वासासरसे.

जानिं जें दिसतें, मानिं जें बसतें, हृदयीं जें सलतें,
तें बोलावें— तंव हें वळतें भलत्याचें सलतें !

रस तारांचा नभीं पाझरे, भूवर नच येई;
शुष्क होउनी खालीं येतां शीतलता राही.

मूर्तरसाच्या कैक अप्सरा गगनगीत गाती;
नाद विरे परि नभींच; उतरे वारा भूवरतीं.

हा मोत्यांचा सडा घातला वरतीं आकाशीं,
चमक तेवढी येते त्याची या भूमीपाशीं !

आशीर्वचनीं शब्द तेवढे धांवुनि येतात;
स्फूर्तिदायिनी इच्छा उरते तशीच हृदयांत.

तीच दशा मम होते तुजला जावें जों गाया,
हृदयभावना मूर्तिमती तूं ! कविता तव छाया !

सुकला चुकला जीव आजवर तुजवांचुनि फिरतां
हृदयशारदे ! शब्द-शारदा नको मला आतां !

धरी सांवरुनि कविता पडत्या हृदयाचा तोल !
मरत्या जीवा परी वांचवी तुझा प्रणयगोल !

प्रीतीचीं पाउलें उमटलीं जीं या हृदयांत,
जीवस्वामिनि ! किती दिवस वद बसूं तींच गात ?

प्रणयतटिनि ! तूं दूर न राहीं– करपलाच जीव;
हृदयसाक्षिणी ! प्राणरक्षिणी ! न कां येत कींव ?

तव वसतीच्या दिशेवरी जी तारा लखलखते,
नेत्रयुग्म हें तीवर खिळतें; नच कधिंही हलतें !

तव हास्याचा नाद नाचला ज्या वाऱ्यावरतीं,
जीव कोंडला वांचविण्याचें बळ त्याच्या हातीं.

अनंत तारा, अखंड वारा, नच माझ्या कामीं !
माझी तारा, माझा वारा, तुझ्या प्रेमधामीं !

वस्तुवस्तुवर नेत्र वठविती तव मूर्तिच एक !
जग ताराया जणूं प्रीतिचा त्वन्मय अभिषेक !

नामाचा जप तुझ्या सारखा; अश्रूंची स्मरणी—
प्रतिक्षणीं प्रतिनामें वाढे तिच्यांत एक मणी !

ध्यास मांडिला तुझा असा हा असह्य विरहानें,
कधिं येशिल, कधिं घेशिल मजला हृदयीं प्रेमानें ?

प्रीतीनें रंगलीं पावलें हृत्पटिं नाचीव;
प्रेमामृत पाजुनी, देवते ! भक्ता वांचीव !

प्रेमदृष्टिनें, प्रिये ! मिळवितां डोळ्याला डोळा,
पंचप्राणहि होतिल माझे नयनीं क्षणिं गोळा !

हृदयीं जडवीं; चरणीं तुडवीं, मग त्यां ओढुनियां,
सोक्षमोक्ष करि, तार मार वा, प्रेमाची दुनिया !

हृदयशारदे ! दर्शन परि दे, हृदयीं दे स्थान,
वक्षःस्थलिं तव पडतां पडतां येऊं दे मरण !

या प्रेमाचीं, तुझ्या यशाचीं गाणीं या नादीं
गाइन; जाइन गात गात तीं तुजसह ईशपदीं.

प्रीतिदेविच्या पायांमधला कवि घुंगुरवाळा !
प्रीतिदेवता जरा हालतां कवि करि गानाला !

त्या प्रीतीला कविनें पुसतां, “ गाऊं काय गडे ? ”
प्रीति म्हणे, “ जा तिलाच गाई जी तव हृदयिं जडे ! ”

हृदया, नयनां, ध्याना, गाना, जिनें जिंकिलेंस,
‘ गोविंदाग्रज ’ गाइल त्या तुज हृदयशारदेस !

ऑक्टोबर, १९१२.

## प्रेमपाठ

चित्तकोकिला ! प्रेमा गाथा जगद्गायनाला
पंचप्राणांचा पंचम तव लावि याच काला.

हृदयवसंतहि भुलला, भुलला जीव तुझ्या गानें,
वृत्तिलता बहारल्या, फुलांनीं विसरविलीं भानें.

प्रेमाश्रूंच्या मधुबिंदूंच्या करूं सेचनातें,
संतोषाच्या श्वासाच्या या मंदमंद वातें.

प्रेमरसाच्या या वर्षावें भूदेवी हृदयीं,
तृणांकुरांच्या रोमांचांची पेरणीहि व्हावी.

चला मनाच्या मळ्यांत पेरूं प्रीतीचीं बीजें;
चित्तगीत-पुष्पें मग उधळूं; कोण उगिच लाजे ?

आज जगाची लाज सोडुनि होऊं या वेडे !
प्रीतिपटाच्या खालीं दडवूं जें जें मनिं तेढें.

पहा नदीच्या जलांत संध्यारंग उड्या घाली !
हृदयनदाच्या जलीं पडूं द्या प्रीतीची लाली.

दीप तटींचे जलीं करविती किरणांचा नाच,
नयनदीपकिरणांस नाचवा हृदयजलीं साच.

काळ्या काळ्या ढगांढगांवरि संध्येची लाली,
काळीं हृदयें तशीं रंगतिल प्रेमें जरि धुतलीं.

उषा-संगमीं तप्त-करांचा रवि होई गार,
तद्विरहें तापतां जगावरि गाजवि अधिकार !

त्या मंगल संगमीं रंगले सृष्टीचे गवई,
मंजुळ गुंजारवें प्रीतिच्या गुणगुणती कांहीं !

आकाशाच्या लग्नमंडपीं लता करवल्या या,
वृक्षबालकां लाजुनि पल्लव सांवरितां दमल्या !

कळया कोंवळया, हलती कानीं डूल मजेदार;
उषा-वधूवरि सुमाक्षतांही करिती भडिमार,

नवरदेव नाचरा निघाला, ती पाठोपाठ—
लाजुनि झाली उषा दूर; कुणि द्या पदरा गांठ.

नव तेजाची साखर वांटित कोठें तीं लपलीं ?
स्त्रीपुरुषांची जोडी किंवा एकरूप झाली ?

श्रीमंतांच्या घरीं चालती खेळ असे फार,
परी गरीबां, प्रीतिदेवते ! तुझाच आधार !

क्षयी कलंकी चंद्रासाठीं, प्रेमा ! ऊठ तरी,
वसुंधरेशीं लग्न तयाचें लावी शीघ्र करीं.

दिशेदिशेच्या दिक्पालांनो ! सावधान सगळे !
संध्यापट-पीतांबर काढा; ताराबल जमलें.

प्रेममंगलाष्टकें सारखीं जगीं गाजवा हो;
मेघांचा चौघडा गगनिंचा जगीं वाजवा हो.

नक्षत्रांच्या करा अक्षता, शुभ मंगल बोला;
सप्तपदीची चाल चालवा सप्तभुवनिं सकलां.

दुग्धचंद्रिका जिकडे तिकडे नवरदेव ओती,
पुष्परेणु-शर्कराकणांची पृथ्वी करि भरती !

त्रिभुवनीं साऱ्या दुग्धशर्करा वांटा ही असली.
म्हणेल जग मग ‘ दुधांत कीं या साखर ही पडली ’ !

हृदयदीपिके ! प्रीतिदेवते ! मार्ग असा दावी,
जिकडे तिकडे शुभलग्नें हीं सारखींच लावीं !

चराचरांनो केवळ खेळा प्रेमाचे खेळ !
दुसरें तिसरें नकोच कांहीं करा हृदय-मेळ !

दिनरजनींची जोडी एकच, चांदणें न तिसरें —
त्या दोघांचें संमीलन हें जमलें एकसरें !

एकएकट्या फिरतां कां ग, तारांनो ! गगनीं ?
जमवा जोड्या प्रेमाच्या मग गा फिरतीं गाणीं !

निळ्या नभाला द्या ग उजळा शुभ्र चांदण्याचा,
प्रेमासाठीं प्रेमसागरीं खुशाल मग नाचा !

महासागरा ! उगाच लाटा उधळतोस कां रे ?
विझवी वडवानलासि पिउनी प्रेमाचें वारें !

नदीमुखाचें चुंबन घेतां ज्या लाटा उठती,
त्याच तेवढ्या नाचूं दे; त्या प्रेमपाठ गाती !

हृदय सळसळे, फेंस उसळला, टाकुं नको खालीं,
त्या फेंसाचे गेंद रुपेरी नदीपदीं घालीं !

नदीनदीच्या पदीं बांधुनी प्रेमाचे चाळ,
नाचूं दे तुजभंवतीं त्यांना या रानोमाळ !

वनांत लपलेल्या वेलींनो ! या ग बाहेर !
वृक्षांचे कर धरुनी घ्या मग प्रेमाचे घेर

गवताचा गालिचा कोंवळा हळू हळू चाला,
पायघड्या पसरल्या– फुलांचा सडा वरतिं घाला.

वाऱ्यावरतीं वरात काढा जीवाभावांनीं,
वनदेवींच्या मुलिंनो ! या ग, या लौकर नटुनी !

कुणी गुलाबी पातळ नेसा, शालू कुणि हिरवा,
कुणि मोत्यांची जाळी लेउनि हव्या तशा मिरवा !

चला चला ग फुलाफुलाला देऊं या नांव !
जसा जयाचा येइल दिसुनी प्रेमाचा भाव !

शोभापुष्पें कमलें; नुसती शोभा त्यां ठावी !
काव्यपुष्पपदवीही दे त्यां सरस्वती देवी !

सूर्यकमल दिनपुष्प साजिरें दिवसभरीच फुले,
निशापुष्प तव बालक कुमुदिनि चंद्रा बघुनि खुले!

उषा-पुष्प जास्वंदीवरतीं तसा रंग त्याचा,
प्रथमपुष्प दिवसाचें भावहि अस्फुट वासाचा!

फुलें गुल्बशीवरतिं विहरती तांबुस अंगाचीं
संध्यापुष्पें संध्यासमयीं संध्यारंगाचीं.

तीन रंग दिवसांतुनि दावित फूल तेरड्याचें,
बालपुष्प तें; बालवृत्तिचे भडक रंग त्याचे!

यौवनपुष्पाचा निशिगंधा दिधला अधिकार;
हृदय खळबळे, वास दरवळे जों अपरंपार!

सुरकुतलें कोरांटीवरि जें कांट्यांतिल फूल,
जरठपुष्प तें रजःकणांची वृथा उठवि धूळ!

एकलकोंडा नीरस भावहिं या धत्तूराचा,
स्मशानस्थ शिव सदा हावरा स्मशानपुष्पाचा!

धड न पांढरें, लालहि नाहीं, वासहि उग्र तसा,
गर्वपुष्प हें कण्हेर दावी, गर्वाचाच ठसा!

व्यर्थ पसारा वासावांचुनि या मखमालीचा,
दंभ-पुष्प परि नको, पथ न हा प्रेमळ चालीचा!

उगाच नांवें अशीं कशाला कुणास ठेवावीं!
मंगलकालीं मंगलवदनीं मंगलताच हवी.

लीला-पुष्पें खुल्या दिलाचीं या शेवंतीचीं,
मुग्धा-पुष्पें हीं जाईचीं कोमल वृत्तीचीं;

शुभ्र मोगरा दंतनिदर्शक हंसऱ्या तोंडाचा,
हास्य-पुष्प तें; शुभ्र रंग हा दावित हास्याचा.

लालि गुलाबी जी लज्जेची रमणीच्या वदनीं;
गुलाब दावी लज्जापुष्पापरि ती निज सुमनीं.

मदपुष्पें हीं आम्रावरचीं मत्त मना करितीं,
पुण्य-पुष्प तुलसीदलिं साधी पुण्य मंजरी ती.

श्वासानें जें सुमन करपतें पारिजातकाचें,
हृदयपुष्प अतिकोमल तें अतिकोमल वासाचें.

सुकलें तरिही सुवास राखी; दृढतेचा भाव;
प्रेमपुष्प बकुलाचें वसवी प्रेमाचा गांव !

त्या गांवाचा, त्या नांवाचा कायमदायमचा
रहिवाशी हा जीव गातसे प्रेमपाठ तुमचा !

वनदेवींनो ! तुम्हांसाठिं हा थाट बारशाचा !
फुलाफुलांचें नांव दाखवी भाव आरशाचा !

फुलें तुम्ही घ्या, फुलें मला द्या, प्रेमाची टेव,
कृष्ण घ्या कुणी, कृष्ण द्या कुणी, हीच देवघेव !

चला लतांनो ! मुलें बसवुनी कटिखांद्यावरतीं,
लग्न निसर्गासह लावी कविहृदयस्था प्रीति !

सृष्टिदेवता माता तुमची, कार्य तिच्या घरचें,
लग्न निघे माहेरवरीं मग आळस काय रुचे ?

हृदयपटावरि निजलज्जेचा लाल रंग उधळा,
प्रेमपल्लवीं लिहुनी कुंकुमपत्रें द्या सकलां.

प्रीतिदेविचें आज निघालें लग्न निसर्गाशीं;
वऱ्हाड जमलें, मुहूर्त भरला, धीर न कोणाशीं,

वनदेवींच्या मुलिंनो ! या ग, या लौकर म्हणुनी,
पराग उधळित, सुवास पसरित, कोमल हातांनीं !

हिमवंतींच्या जलीं मिसळुनी मरंदमय तेला,
स्नान सुमंगल घाला कोणी प्रीतिदेवतेला !

शशिकिरणांचे तंतु भिजवुनी संध्यारंगांनीं,
अष्टपुत्रि द्या नव नवरीला कुणीतरी विणुनी.

हिमगिरिशिखरीं स्फटिकशिलांतरिं रविकिरणें शिरतीं,
प्रतिकिरणें पाझरती भराभर, अति कोमल असती.

मुग्ध अधरिंच्या गुलाबि रंगीं रंगवुनी त्यांना
त्या सूत्रांची काचोळी कुणि नवरीला द्याना !

पराग कोळुनि करुनि हरिद्रा उटी तिला लावा,
इंद्रधनुष्यें वळवुनि हातीं वज्रचुडा भरवा.

शुभ्र फुलांचें तेज आटवुनि घडवा कुणि त्याचीं
वेढिंविरोदीं; सौभाग्याचीं लेणीं पायांचीं

रात्रीचें तम, उषा-रक्तिमा, कांहिं नका टाकूं;
प्रीतिदेविच्या सौभाग्याचें हें काजळकुंकूं !

मणिमंगलसूत्रांत चांदण्या चंद्र चटकदार,
तिला तिच्या भाग्याचा भगवान् निसर्ग देणार !

संध्याकाळीं संध्यापटिं जो असे सूर्य गगनीं,
भरा प्रीतिची ओटी असल्या खणांनारळांनीं.

मयासुराची माया शिकुनी कविकल्पकतेनें,
मंगलभूषणरचना मग ही करा शीघ्रतेनें

मुक्या मनाचीं म्हणा मंगलाष्टकें, जीं न सरतीं
हृदयाश्रूंच्या दिव्य अक्षता वधूवरांवरतीं !

खुल्या दिलांचा मिलाफ घडवा मुहूर्त हा सरतां,
अंतरंगिचा अंतःपटही दूर करा आतां !

शुभमंगल वच तूंच बोल श्रीमहन्मंगला रे !
हृदयाचा चौघडा वाजवुनि विश्व भरा सारें !

पाउल त्यांचें एक एक मग जन्माजन्माचें,
सात पावलें सात जन्मभर सप्तपदी नाचे !

पतिव्रतांनो ! मंगल विश्वचि तुमचें माहेर,
वधूवरांना मांगल्याचा कराच आहेर !

सकल वेलिनो ! वरात त्यांची चला चला पाहूं,
ही सोन्याची संधी ! मागें नका कुणी राहूं !

लाजाळू लाजते कुणाला ? नका तिला रुसवूं !
चला चिमुकल्या करवलीस त्या जाउनिया हंसवूं.

वंशतरुवरा ! असाच गा रे प्रेमाचे सूर !
हृदयस्था हृदयाशिं धरा कुणि; नका राहुं दूर !

जनिं कीं रानीं, जलीं स्थलीं, वा गगनीं पाताळीं,
जिवाजिवाला बांधा पसरुनि प्रेमाचीं जाळीं !

जलदेवींनो ! स्थलदेवींनो ! गगनदेवतांनो !
सकलां शिकवा प्रेमपाठ; गा हाच अप्सरांनो !

हृदयशारदे ! हृदयिं राहुनी करि मज प्रेमकवी !
तुझ्या प्रीतिची स्फूर्तिच मज हा प्रेमपाठ शिकवी !

पशूस करशिल मानव ! मानव नेशिल देवपदा !
देवपणा स्थिर देवांचाही राखिसि तूंच सदा !

प्रेमतरंगें चित्त तरंगे, आत्माही रंगे !
जगत् रंगलें, विश्व रंगलें एक प्रेमरंगें !

चराचरांनो ! स्थिरास्थिरांनो ! नश्वर ईश्वर वा,
प्रेमें जिंका ईशा; साक्षात् कीं परमेश्वर व्हा !

हृदयसंपुटीं स्नेहिं पाजळुनि जीवाच्या ज्योती,
प्रीतीच्या गंगेंत सोडुनी गा मंगल अरती !

हृदयाचीं राउळें उघडुनी हृदयदेवतेला,
पंचेन्द्रियकृत प्रभावळीमधिं वरच्यावर झेला !

इतर वृत्तिंचा देवीभवतीं चालू द्या नाच;
जीवेंभावें तिच्या पुढें गा प्रेमपाठ हाच !

चित्ताच्या ताटामधिं अर्पा निजपंचप्राणां;
त्या नैवेद्यें हृदयदेवता तृप्त होय जाणा !

प्रेम नसे तर जीव नको हा ! प्रेमें जग चाले !
प्रेमावांचुनि धिग् जीवन हें असे आज झालें !

प्रेमरसावर हृदय तरंगत प्रेमपाठ बोले,
मनांतलें हें गाणें माझें जनांतलें झालें !

प्रियमित्रांनो ! प्रेमरंगणीं प्रेमानें नाचा !
मुक्या मनाला फुटली आतां प्रेमाची वाचा !

प्रेमपाठ हा सदैव गा रे प्रेमानें ताज्या,
आण घालितों अशी तुम्हांला गळ्याचीच माझ्या !

चला गड्यांनो ! या प्रेमाचीं ऋणें आधिं फेडा,
हेंच मागतों हात जोडुनी प्रेमाचा वेडा !

प्रेमपाठ हा सरता झाला, मन हो बेताल !
प्रेमरसें गुंगलें यावरी फुकट शब्दजाल !

त्या गुंगीच्या भरांत गातों पडुनि मना भूल !
क्षमा करा हो गातांना जरि होइ चूकभूल.

प्रेमपाठ हा रुचे कुणाला, न रुचे कवणाला,
एक नसे; जगिं आवडनावड तों ज्याची त्याला !

तशांत हें तर वोलुनिचालुनि मन वेडें झालें !
बंधन कसलें मग त्या ? गाई जें सुचलें रुचलें !

परवा न तया; हंसा रुसा, वा निंदा, कीं वंदा,
मी प्रेमाचा बंदा ! माझा हाच असे धंदा !

स्तुतिनिंदेचा भेदचि अवघा प्रेमजलीं जिरला,
भेदाभेदचि, न परि जीवही प्रेमांतचि विरला !

हृदयशारदा हृदयमंदिरीं चित्तरंग तारा,
छेडित बसली त्या गीताचा वाहे प्रेमझरा !

देहभरी त्या निर्झरलहरी थरथरुनी भिनल्या,
वृत्तिवृत्ति त्या गायननादें प्रेममयी बनल्या !

भाव बहिरला, जीव बहिरला, बहिरलाच आत्मा !
प्रेमरूपची, प्रेमलभ्यची, रमला परमात्मा !

त्या दोघांच्या या ऐक्याचा गाया जयवाद,
घुमत सारखा बधिरवृत्तितुनि प्रेमगीतनाद !

कायावाचामनसा होउनि प्रेमाचा भाट
' गोविंदाग्रज ' आळवीत मग सदा ' प्रेमपाठ ' !

नोव्हेंबर, १९१२.

करमत नव्हतें म्हणुनि एकदा असाच गेलों रानीं ॥
वसंत का– परि ऋतु दुसरा कधिं कुणीं पाहिला कवनीं ? ॥

समोर होता झाडावरतीं एक चिमुकला पक्षी ॥
बोलुनि चालूनि कवि पडलों मी— सहजचि त्याला लक्षीं ॥

वसंत ऋतु तो; रम्य वनहि तें; पक्षि आणि कविराय ॥
तुम्हीच सांगा रसिका, आतां हवें आणखी काय ? ॥

सत्वर कविच्या रसिकपणानें सांगितलें त्या गाया ॥
नवल वाटतें सांगण्या परि–कीं तें गेलें वायां ॥

" वृक्षावरच्या माझ्या मित्रा, कांहीं गाणें गाच ॥
गमतीखातर आणि जरासा इकडे तिकडे नाच ॥

बंधु तुझा मी— माझ्यासाठीं गळ्या लाग तूं गाया ॥
हें बघ देतों कण धान्याचे कांहीं तुजला खाया ॥

स्तुति गाण्याची तुझ्या बहुपरी करिन चारचौघांत ॥
चित्रहि आणिन तुझें दशाच्या तरी खास अंकांत ॥

गाण्याची या तुझ्या शिफारस करूं अशी भरपूर ॥
कीं शाळाखातेंही वेडया करील तें मंजूर. " ॥

अशा प्रकारें फार विनविलें जीव तोडुनी साच ॥
भिकारडें तें कांहीं केल्या परंतु ऐकेनाच ॥

गा म्हटल्या जो गात नसे त्या सृष्टीचा कवि म्हणती ॥
मस्तक फिरलें हातपायही रागानें थरथरती ॥

" एक मारितों दगड असा कीं पडेल वासुनी चोंच ॥ "
म्हणुनि वाकलों तसाच खालीं आवेगानें तोंच—

लगबग दिसले स्नेही माझे– संपादक त्या -ह्याचे ॥
म्हणूं लागले, " भले ! तुम्हांला कुठें कुठें पाह्याचें ? ॥

या अंकाचा चालू तक्ता ( फर्मा ) होत नाहिं भरपूर ॥
कामाचा खोळंबा झाला, द्या कांहीं ' मजकूर ' ॥

वसंत-अंकीं वसंतवर्णनपर कविता चालेल ॥
परंतु झटदिशिं करा; नातरी काम उगिच लांबेल ॥

सरासरी द्या खरडुनि ओळी अठरापासुनि वीस " ॥
ऐकिलें न हें तों कवनाची झाली स्फूर्ति कवीस ॥

झाडावरचा पिसाट कवि तो तसाच टाकुनि रानीं ॥
चला रसिकहो लांबी रुंदी नीट ठेवुनी ध्यानीं ॥

वसंतकाळीं त्या वर्णाया वनांतुनी माघारी ॥
' गोविंदाग्रज ' कवीश्वराची घरीं परतली स्वारी ॥

१०-१२-१९१२, पुणें.

## अभिनंदनपर वर्धापन

[ श्रीयुत चिन्तामणि द्वारकानाथ देशमुख, I. C. S., मुंबई विश्वविद्यालयाच्या सन १९१२ च्या प्रवेशपरीक्षेंत पहिले आले. त्या प्रसंगावर खालील ' शब्दपुष्पहार ' कै. गोविंदाग्रज यांनीं गुंफिला होता. ]

धन्य ! धन्य ! बा, तव सुयशाची होतां जाणीव,
सहर्ष वर्षत आशीर्वच कवि " वत्स, चिरं जीव. "

परिचय नसतां करित अतिक्रम कविमानस माझें,
राग नसावा त्याचा, बाळा ! क्षमा इथें साजे.

आनंदाचे भरांत नाचे मन्मानस, बाळ !
कशास त्याला उगीच सांगू " शिष्टनियम पाळ ! "

हर्षदर्शना नियम न कांहीं; हृदयहि अनिवार;
गुण आकर्षणकारण; परिचय केवळ उपचार !
अथवा कविला बंध न कोठें मनिं आणुनि हेंची—

क्षमा करावी, बाळ ! माझिया पुरोभागितेची.
विद्येच्या दरबारीं मिळतां तुज पहिला मान,
तुझ्या कुळाला, जातीलाही त्याचा अभिमान.

पारितोषिकें त्रिविध गौरवी श्रीविद्या तुजला,
स्वानंदानें उधळूं आम्ही सहजचि अश्रुजला !

स्वज्ञातीचें नांव उजळिलें आज, महाभागा !
भरुनी जाइल दुथडी म्हणुनी तुझी जातगंगा !

समाधानमय निःश्वासाच्या वातें तुजवरती
उत्कटाश्रुजललहरी उडवुनि सुखविल शतधा ती !

गरीब माझी रसवंती; परि होतां अतिहृष्ट
शब्दमौक्तिकें ओवाळुनि तुजवरुनि, काढि दृष्ट.

ममत्वमय दोषाचें लावुनि तुला गालबोट,
सदा सदिच्छासदनीं तुजला जपूं कडेकोट.

धरिलें आम्हीं शिरिं तुज पाहुनि तुझा गुणासार,
परी तुझ्याही शिरिं भार नव तसाच देणार.

वंश, जाति तव, समाज, त्यापरि महाराष्ट्रभाषा,
आजपासुनी सर्वांनाही तुझी फार आशा.

दिव्य अलौकिक जें जें दिसलें ईशें मनुजाला,
ईश्वरांश तें सदा लावणें ईश्वरकार्याला.

ईश्वररूपा जगीं रमे श्री मानवता देवी,
निजदिव्यांशा जीवंभावें तिच्या पदीं ठेवी !

गुढी पाडवा आज तुझ्या हा यशोजीवनाचा,
वर्षोवर्षीं असाच उगवो चढत्या मानाचा.

दंभ, गर्व, अभिमान दडपुनी पायांनीं अरतीं
निजपुण्यबळें असा सारखा जा वरतीं वरतीं.

प्रतिक्षणीं वर जातां दृष्टी व्यापकतर होई,
क्षितिजवर्तुलासह वाढूं दे स्वार्थ-वर्तुलाही !

"मी, माझें कुळ, माझी जाती, समाज माझा हा,
श्री मानवता देवी माझी, ईश्वर मीच अहा !"

अशा भावना मनिं ठेवुनियां जा वरतीं वरतीं,
हृदयसागरा सदा येउं दे अमर्याद भरती !

उंच भराऱ्या गगनीं तुजला पाहुनि घेतांना,
परस्परांना दावूं इथुनी डोलवून माना.

धन्य धन्य तूं त्रिवार धन्यचि; धन्य पिता-माता!
हर्षाश्रूंनीं न्हाणित असतिल ते तुजला आतां!

फुला उमलल्या! वास यशाचा नित्य नवा पसरी,
दरवळुनी मोहुनी गुंगवी ही दुनिया सारी!

"विजयी भव, महदायुष्मान् भव, चढवि यशोनाद!"
खेळतील तुजभंवति आमुचे हे आशीर्वाद!

पाप, अमंगल, अनिष्ट किंवा अभद्र जें कांहीं,
स्पर्श तयाचा कधीं न होवो तव छायेलाही.

जें जें मंगल, दिव्य तसें जें, पुण्यहि जें जगतीं,
वृष्टि तयाची होवो, बाळा, सदैव तुजवरती!

नभीं चकाके सकल कलांची तारामय सृष्टि,
करो तुझ्यावर निजतेजोयुत दिव्यपुष्पवृष्टि!

श्रीपरमात्मन्! मागतसों हें तुजपाशीं एक,
करिं बाळावर कृपादृष्टिचा अखंड अभिषेक.

असो; असों दे ओळख बाळा, लोभहि राहूं दे.
नित्य नवा उत्कर्ष तुझा या नयनां पाहूं दे.

बालमित्र तव जमले असतिल सर्व तुझ्याभंवतीं,
अथवा चिमणीं भावंडेंही असतिल आवडतीं.

किंवा कौतुक करीत असतिल तात गोड वचनीं,
असेल जननी तुज कुरवाळित सजल अशा नयनीं.

अशा सुखाच्या काळीं आलों घटकाभर आड,
क्षमा तयाची करि; कविता ही अशीच रे द्वाड!

हृदयदर्शना कसाबसा हा शब्दपुष्पहार—
'गोविंदाग्रज' धाडी प्रेमें, बाळा, स्वीकार.

१९-१२-१९१२

## घुंगुरवाळा

[ जगाच्या संगीतांत शब्दमय काव्यापेक्षां निःशब्द– किंबहुना, नादशून्यसुद्धां –काव्यांचाच भरणा विशेष आहे. अल्लड मातेला सातआठ महिन्यांच्या चिमुकल्यानें उत्कट आनंदानें वाळा वाजविला म्हणजे एकाग्रतेनें ऐकत राहावेंसें वाटतें, तें याच कारणामुळें. ]

वाजिवरे वाळा ! वेल्हाळा ! रुम्झुम् घुंगुरवाळा ! ॥ ध्रु० ॥
अस्फुट विश्वाचें । प्रेमाचें । गाणें आनंदाचें—
वदलों जें नादीं । संवादीं । तुझिया जन्माआधीं—
पहिल्या प्रीतीचे । गमतीचे । कांहींसे भीतीचे,

वाळा ! ते बोल । तूं बोल । आज मनीं जे खोल.
रात्रीच्या काळीं । जो बसली । ब्रह्मानंदीं टाळी,
मानें तेव्हां बाणे । जें गाणें । अस्फुट मंजुळवाणें,
धीर न परि हृदया । उघडाया । उघडपणें तें गाया !

वदलों मग पाहीं । दोघेंही । लाजूनी कांहीं कांहीं !
हृदयीं खळबळलें । दरवळलें । विना ऐकिल्या कळलें !
गाणें मंजुळ तें । झुळझुळतें । तुझिया वाळ्याभंवतें !
वाळा हालूं दे । बोलूं दे । आनंदे डोलूं दे.

एकच हा चाळा । वेल्हाळा । घे रे तान्ह्या बाळा !
एकच पायाचा । वाळयाचा । नाच गोड बाळाचा—
ऐकुनि आनंदें । त्या छंदें । घर सगळें नाचूं दे !
'गोविंदाग्रज' ही । कवनांहीं । त्या छंदावर गाई !

फेब्रुवारी, १९१३.

## चिमुकलीच कविता !

नाजुक सुंदर गोंडस चिमणी बाला दशवर्षा,
कोण कुणाची कुठें चालली उधळित ही हर्षा ?

हात चिमुकले, पाय चिमुकले, चिमुकलाच बांधा,
भूदेवी–स्वर्देवी यांतिल हाच काय सांधा ?

धवल वर्ण हा देहावरती फुलल्या पुष्पाचा,
लाल छटा वर, जणूं पसरला रसचि गुलाबाचा !

त्याच फुलांच्या वळुनि पाकळ्या पोकळशीच घडी
झालि तीच वाऱ्यावर हलत्या ओठांची जोडी !

सडा पसरला आंत कोंवळ्या बारिक मोत्यांचा,
ओंठाआडचि अर्धा पडला खेळ पहा त्यांचा !

इवलीशी हनुवटी गोजिरी, खळी तिच्यावरि ही,
निजहृदयिंच उतराया वर्तुळ मुख जणुं लांबवि ही !

सरळ नासिका चांफेकळिचा जणुं अंतर्भाग,
दळांआड दडला परागमय अवकाशांग.

कपाळपट्टी विशालतेचें बालरूप पहिलें,
कुणा भाग्यवंताचें भावी भाग्य त्यांत लिहिलें ?

किंचित खुलल्या भिंवया–चिमणीं धनुष्येंच साचीं
चित्रपटांतिल काय चिमुकल्या रामलक्ष्मणांचीं ?

नखाएवढ्या दोन हिरकण्या हंसती, ह्याखालीं,
तेजोरूपा श्रीकमला जणुं निजकमलीं रमली !

फुलें वसविलीं वेलीवरतीं, गगनीं तारांना,
त्याच मुहूर्तीं त्याच करें का विधि करि या नयनां !

किरणां किरणां टाकुनी भंवतीं या नेत्रांमधुनी
पापस्पृष्टा वसुंधरेला बाला का न्हाणी !

अभ्यासास्तव सोडित उघडुनि नयनांची खाण
बालमदन निर्दोष किरणमय हे बोथट बाण !

केंस कोंवळे सरळचि काळे, कुरळेही कांहीं,
तुळतुळीत मोकळे, मनासम नच बंधन त्यांही !

गालिं लोळती कांहीं, कांहीं कानांवर पळती,
पवनीं खेळति कांहीं किंवा मानेवर डळती;

पाशरूप पुष्कळसे परि ते पाठीवर रुळती,
चकचकीत जणुं लहरि जलाच्या पवनें झुळझुळती !

बालसर्प जणुं, अथवा उपमा कुणीं अशी द्यावी ?
तच्छिरिं वसवुनि साप निजशिरीं पाप कोण वसवी ?

तळपति जललहरी रविकिरणीं जणूं जागजागीं,
उंच सखलशा सुटल्या वेणीच्या बंधनभागीं.

झुळझुळ मंजुळ वाहे चिमणा ओघ जसा कांहीं,
गमते रमते उगमस्थानीं ही कृष्णाबाई !

गाल कोवळ्या गुलाबकळिचीं रूपें विधिमनिंचीं,
पदार्थसंसर्गाविण नुमल्या चिंतनमय खनिचीं !

लज्जा निर्मायाची स्फूर्तिच विधिनयनीं चमके,
त्या नयनांनीं बघतां गालीं लाली ही फडके !

चुंबन घेतां येतिल गालचि हे श्वासासरसे
वाऱ्यावर वाहुनीच चुंबन ओठांसह खासें

सहज मुखावर हंसें खेळतां गालीं गोड खळया,
फुटती मुग्धचि आनंदाच्या तयांतुनी उकळ्या !

ओठ कशाचे—देंठचि फुलल्या पारिजातकांचे;
हास्यरसाचे करी मोगरा सांचे कलिकांचे !

कां हंसते सारखी अशी ही ? नेत्रहि हंसती कां ?
फुलें झेलि चालती बोलती ललितदला लतिका !

कीं भावी प्रणयाचें अत्तर हृदयपुष्प पिळुनी—
बालमदन करि; उडे हास्यमय सुवास दरवळुनी.

किंवा कांहीं क्रियाच इजला येत नसे दुसरी
निष्कारण म्हणुनीच सदाची मुद्रा ही हंसरी ?

नखें पदतलीं, कीं वर्खाच्या टिकल्या चकचकत्या !
कापुनि कच्चीं पोंवळींच मृदु केल्या का चकल्या !

करांगुलीमधिं बालमुद्रिका विराजते भद्रा,
पवित्रतेच्या सम्राटाची हीच राजमुद्रा !

तिलक गोजिरे गोंदवणाचे हिरव्या रंगाचे,
शुभ्र मुखावर तुषार कुठल्या दिव्य तरंगाचे ?

निळ्या नभीं कर शुभ्र तारका जमवितात मेळ,
शुभ्रमुखनभीं इथें निळ्याशा तारांचा खेळ !

इचा उद्यांचा धनी कोण, हें ठरवावें म्हणुनी,
पुण्याईचें गणित करित विधि दशांशचिन्हांनीं !

लाल छटा वदनिंची नभींच्या शुभ्र मौक्तिकांत
कोर बालचंद्राची विलसे संध्याहृदयांत !

रक्त कपालीं दिला रक्ततर कुंकुमतिलक वरा,
अरुणपटावर मांगल्याचा नव मंगलतारा !

चिमण्या देहा शोभविणारी चिमणीशी साडी
नीटनेटकी नेसवुनी हिस कोण कुठें धाडी !

घालित बाला चित्रिंचेच का चित्र अलंकार ?
स्वप्नांतिल संसार कुणाच्या घे कीं अवतार ?

केला विधिनें स्त्रीत्वाचा हा टीचभरचि नमुना,
नवतीर्थांस्तव हिंडति संगततनु गंगायमुना ?

गर्भजन्म या उपाधि भोगी कीं ही तदतीता
कीं भूमींतुनि अशीच वर ये ही दुसरी सीता ?

उषा–चंद्रिका जणूं भेटल्या; त्या संगमकालीं
तांबुस धवलहि रस पाझरतां काय त्यांत न्हाली !

किंवा स्वर्गांतुनि ही सुटुनी आली आतांच,
नंदनवनिंचा मंद वात तरि करि भंवतीं नाच !

महाकवींच्या कल्पनेंतली भावमूर्ति का ही
बलवत् भावें स्फुरणार होउनि वस्तुरूप वाही ?

पहा थांवली विभ्रमललिता सलीलगति बाला,
बालभाव मनिं विमल, जोडि करयुग परमेशाला,

अहा ! कोणता भाव असे हा पापमना न कळे !
द्रवुनि भक्तिनें आत्मा सारा देहीं कीं खेळे !

देवमनीं निजभक्ताविषयीं वसे भावना जी
भावरूप ती काय खेळते या हृदयामाजीं ?

शुद्ध भाव हा तिच्याच मनिंच्या पुण्याचा वारा,
हाच भाव, भगवंता ! आतां जगत्त्रयीं पसरा.

हात जोडुनी विमले वाटे ! मागितलें काय ?
स्फूर्तिनेंच कीं पाडिय्याच्या नत झाला काय !

जें पावन, जें विशुद्ध, त्याची तूं मंगलमूर्ति,
देव कोणती करील आतां तव आशापूर्ति ?

तुझ्या मनींचा विमल भाव हा कळतां तया क्षणीं
दगडाचा देवही वांकविल देह तुझ्या चरणीं !

स्वर्गहि तुजवर धरिल सारखी दिव्याची गळती !
त्वद्दर्शनपुण्याला मुकले गतमुनि हळहळती !

तीर्थें, पुण्यें, देवदेवता ज्यां पाहुनि पळती,
नसलीं पापें नेत्रकिरण तव पडतां क्षणिं जळतीं !

टाक नजर एकदां तरी ती या पाप्यावरती—
स्वर्गी रुहज तरि जाण्याइतकी पुण्याची भरती.

शुद्धभाव-परिपूर्ण मनीं क्षण मजला जाऊं दे,
कवित्व पावन करून घ्याया जराच राहूं दे.

ओघ एकदां त्या कवितेचा जगांत वाहूं दे.
नांव तरी पापाचें उरतें का मग पाहूं दे.

मम हृदयाच्या हिंदोळ्यावर चल ये घे झोले,
ज्यांतुनि निघत्या कवनश्वासें विश्व सहज डोले !

कवनस्फूर्ती, मंगलमूर्ति, जराच धांव गडे !
दिव्य सुधारस वर्षू जगतीं ये जिकडेतिकडे !

अहा ! चालली बाला टाकुनि मज संशयवादीं
रंगत गुंगत दंग सदा ती आपल्याच नादीं !

नवल न तिजसह नेत्र जरी मन हे भिरभिर फिरती,
भुलतें, खुलतें, डुलतें विश्वचि तिजभवंतीं !

पाळिण्याची उपा काय, कीं कळी पूर्णतेची ?
आशीः कीं ही जगास पुढच्या प्रभुतन्मयतेची !

किंवा कांहीं तरल कल्पना कुणास आठवली,
नटवाची कशि कानीं ती या विचारिं मति रमली.

तोंच चुकवुनी टोला धांवे कल्पनाच बाल
स्वच्छंदानें पांघरल्याविण शब्दांची शाल !

पवन पिउनि मग तिची होत का अशी बालमूर्ति ?
बाला कसली ?—खास तीच ही नवकवनस्फूर्ति !

भरभर फिरते नग वाऱ्यावर ताराशा जगता
कुण्या कवीची चुकलीमुकली चिमुकलीच कविता !

मूर्तिमती कविताच यापरी हृदया हालवितां
' गोविंदाग्रज ' ही गाई मग चिमुकलीच कविता !

सप्टेंबर, १९१३.

## दसरा

[ रूढीचें सीमोल्लंघन हाच समाजाचा दसरा. ]

चला आज हा आला दसरा !
पाउल पुढतें टाकायाला,
सीमोल्लंघन करावयाला,
आनंदानें नाचायाला,
सणांमध्यें सण हाच खरा !

चौमासाला आतां विसरा !
मुसळधार तो पाऊस वरला,
तुडवित पायांखालीं चिखला,
शेत पेरिलें येत पिकाला;
येतां आनंदाचा दसरा !

पहिल्या दुभत्या गाई विसरा !
उन्हाळ्यांत त्या उडाल्याच ना ?
त्या गाईच्या खिल्लारांना
नव्या दमानें सोडा राना,
चला खाउं द्या पहांटचारा !

करा जरासा मुखडा हंसरा !
आतां कां हीं तोंडें रडवीं ?
कडवीं बीजें करी गोडवीं,
फुटलें तुटलें पुन्हांहि जडवी,
आला ना तो तुमचा दसरा !

चला रूढिवर आतां घसरा !
टाकुनि सीमा मृत धर्माच्या,
दंभाच्या या अंधपणाच्या,
जुनेपणाच्या, अहंपणाच्या
सीमोल्लंघनकालचि दसरा !

जुन्या मतांचा जाळा कचरा
नव्या मतांचे जे राऊत,
खरेखुरे मायेचे पूत,
येऊं द्या धैर्याला ऊत,
नका हातचा दवडूं दसरा !

नका हातचा दवडूं दसरा !
जुन्या ऋषींना सलाम ठोकुनि
करा तयारी छाती ठोकुनि
आजकालच्या ऋषींमागुनी
जा तिकडे नेइल हा दसरा !

श्रुतिस्मृतींना आतां विसरा !
अंधभक्तिचा पांगुळगाडा
मोडुनि तोडुनि उपडा पाडा !
पाताळीं तो नेउनि गाडा !
करा साजरा यःपरि दसरा !

नेट धरा धीराचा जबरा !
खुल्या मनाचा अबलख घोडा
जीन नको उप्लाणी सोडा !
जेरबंद वा लगाम तोडा !
सीमोल्लंघनकालचि दसरा !

जुन्यापुराण्या चिंध्या विसरा;
जरि पटका घ्या सुधारणेचा !
भगवा शेंडा नव्या मताचा !
नव्या दमानें फडकविण्याचा
मानवधर्मांचा हा दसरा !

नव आशेच्या तृणांकुरांचा
तुरा शिरावर; चढवा साज,
मढवा न्यायाचें शिरताज,
समचित्ताचे बरकंदाज,
चला जमूं द्या जमात तुमचा.

काळाचें मैदान अफाट,
दिसतां कोठें खंदक खांचा
द्या घोड्याला अमीन टांचा
वाऱ्यावरच्या करवा नाचा
कापा रस्ता आटोकाट !

चला निघूं द्या असली स्वारी;
जुनाट पोकळ नगारखाना
उंटावरला कुणी शहाणा
वाजवितां, त्या आधीं हाणा !
घ्या कृष्णाची करीं 'तुतारी' *

रूढीच्या किल्ल्यावर स्वारी,
'अगरकरां'ची झडवा नौबत !

---

* या गाण्यांत ' केशवसुतां 'च्या ' तुतारी ' या सुधारणाप्रेरक जोरदार गीताचा उल्लेख ' कृष्णाची तुतारी ' या नांवानें केलेला आहे.

‘ भागवतां ’ची धराच हिंमत !
‘ केशवचंद्रां ’चें घ्या चिलखत !
फुंका ‘ कृष्णा ’चीच ‘ तुतारी. ’

रूढीचा गड खालीं उतरा,
पाकोळ्या घुबडांना उडवा,
जिवंत सोनें अखंड लुटवा,
कृपण मनाचा रस्ता खुटवा.
असा साजरा कराच दसरा !

कसले पूर्वज घेउनि बसलां ?
होते मोठे सोन्या भरले
त्यांचें आतां काय राहिलें ?
त्यांचें त्यांच्या मागुनि गेलें.
शिक्का कायमचा तो कसला !

उगाच खाउनि बसतां हाय !
पूर्वज आले चार पावलें,
एकसारखे पुढें सरकले,
म्हणुनिच ना ते इतके आले ?
त्यांना पूर्वज नव्हते काय ?

कुंभारासारखेच लोटे,
खोटें ठरतें तत्त्व आज तें.
पूर्वज संतत पुढें चालते
घायकूत ही नसती धरिते
बडे बापके तुम्ही बेटे !

रडत बैसले महारमांग.
दीनपणाला गर्वें छळतें,
अज्ञानाला भिउनी पळतें,
त्यां वर घ्याया नच जें वळतें
उच्चत्वा त्या लावा आग !

थांबा, ऐका देउनि कान—
सुकल्या हातीं बाला कोमल,

तशाच विधवा करिती तळमळ;
फत्तर फुटतिल येउनि कळकळ.
कुठला पोकळ गताभिमान ?

चला उठा रे बांधा कंबर !
तुमच्या पुरती ही घी–शक्कर
टाकुनि, रूढीशीं द्या टक्कर !
युद्ध माजवा रे घनचक्कर !
फोडा कुजकें हें अवडंबर !

गेल्या धर्माचें हें भूत
पाहुनि बसलां कां रे भीत ?
नव्या मतांचे भालाईत
घोडे अपुले या उडवीत,
नातरि रडते व्हा राऊत !

अनंतकाळाचें मैदान,
हिम्मतवाले चाबुकस्वार,
उत्साहाची करि तलवार,
चित्साक्षीची ढाल तयार,
घोडा फिरवा रानोरान !

सरतां काळाचें मैदान
घोडा उडवा मग आकाशीं,
भिडवा नेउनि स्वर्गापाशीं
पूर्णपणाशीं ईशपदाशीं,
तरीच होईल दसरा छान !

कुणी मनाचा असेल कच्चा
करील त्यालाही मनशूर
या गाण्यांचे गाउनि सूर
'केशवपुत्रा'चा मशहूर
'गोविंदाग्रज' चेला सच्चा !

ऑक्टोबर, १९१३.

## जगाचें गाणें

[ केव्हांहि पहा, जग उगवत्या सूर्याला अर्घ्य देत असतें. ]

नमोऽस्तु ते ! धन्य एक सकल जगीं तूंच ! उगवत्या रवे !

भावगुणीं जी अतुला । भक्तीनें अर्घ्य तुला,
स्वीकारी या ऋतुला । पुण्य ज्यांत सांठवें.

गगनिं सदा जरि असती । तरि अमुच्या नयनांसी
काल न तूं दिसलासी ! आज तुझे कर नवे ।

थोर हृदय परि तव हें । अपराधा नच पाहे,
गतवृत्त न मनिं राहे । फिरुनि कधिं न आठवे !

मावळले काल रवि । वार्ताही ती न हवी !
तेज तुझें त्यां लपवी । स्वकर पसरि नवनवे !

जो प्रकाश काल रमे । आतां तो तिमिर गमे !
हा प्रकाश कधिं न शमे । तव करिं जो संभवे.

थोर तूंच ! धन्य तूच ! तेजोनिधि दिव्य तूंच !
नयनिं मनीं एक तूंच । इतर कांहिं नाठवे !

झालें मनिं हेंच ठाम । कीं रवि तुजलाच नाम !
तेजाचें तूंच धाम । सांगावया का हवें ?

स्तुति आतां इतरांची । कधिं नाहीं व्हायाची !
वंदन हें तुजलाची । सतत, उगवत्या रवे !

जुलै, १९१४.

## ती कोण ?

दूरस्था जलधीकडे स्वहृदया नेते नदी वाहुनी,
शोधाया रसिकास नित्य कविता हिंडे, न आशा तुटे;

भूलोकावर राहते कुमुदिनी चंद्राकडे पाहुनी,
रात्रीमागुनि धांवतो दिवसही, कीं भेट व्हावी कुठें ?

जीवाचें जगणें असेंच असतें सापेक्ष प्रेमावरी !
डोळेभेट दुरून; भाव अथवा आशाहि त्याला पुरे !

मी हें पाहुनि जीववंधन असें शोकातें होतों परी,
कांकीं या मम लक्ष्यशून्य हृदयीं कांहीं न आशा स्फुरे !

ओठांशीं भिडतें रहस्य मनिंचें— सांगू कुणाला परी,
अश्रू हे नयनींहि— माळ करुनी घालूं कुणाच्या गळां ?

आलें हें भरुनि रितें हृदयही— देऊं कुणाच्या करीं ?
आला दाटुनि कंठ— हाय ! रडुनी कोठें करूं मोकळा ?

जी माझ्यास्तव, मी जिचें सकलही; आधार जी जीवनीं
देवा ! भेटवि — दाखवी तरि मला ती कोण देवी जनीं ?

ऑगस्ट, १९१४.

## अरुण

अहा ! उगवला पहा अरुण हा उधळित तेजाला.
जगा जागवी, तसा जागवी कविच्या चित्ताला,

जसा उडवि हा अरुण चहुंकडे गगनीं रंगाला !
तसा पहा कवि उडवी अपुल्या चित्त-तरंगाला !

विश्वसूत्रधर सारुनिया करिं पडदा रजनीचा
जगद्रंगभूवरि का उडवित गुलाल गगनींचा ?

करी मंगलाचरणा मंजुल द्विज गुंजारव हा,
येत्या संसाराची नांदी चाले काय अहा !

पूर्वदिशेवर लाल रंग हा कोण कुठुनि उधळी ?
किंवा फुटली तिच्याच हृदयीं प्रेमाची उकळी ?

रविसदनाच्या गवाक्षास ही काय लाल कांच ?
पलशाड लपलें तोंड तयाचें, दिसेल आतांच !

प्रातःकाळीं गगनपुष्प कीं सूर्याचें फुललें ?
सुगंधमकरंदांचे रस हे चहूंकडे झुकले ?

सदा सर्वदा जगदुद्धारा धरिती ज्या घेर
त्या मंगल सरितांचें आहे का हें माहेर ?

कुणी महात्मा विश्वोद्धारास्तव तप आचरितां
उचंबळुनि का वाहत त्याच्या हृदयाची सरिता ?

गत पुण्याच्या पुष्करिणींतुनि तेज काढण्याला
उडी रवीनें घालितांच कां फेस उचंबळला ?

अखंड सौभाग्याची सरिता माझी भूमाता
काय लाविते कपाळभर ती हा मळवट आतां ?

कीं सोडुनि जी अम्हां चालली कष्टे निस्तूळ
महाराष्ट्र-लक्ष्मीची त्या ही दिसे पायधूळ ?

भरतें स्वर्गी ये पितरांच्या करुणारसरंगा,
अम्हां आळशांवर मग ये कीं पूर्वपुण्यगंगा !

कल्पलतांवर फुलें वहरता सडा परागाचा
काय तरंगे स्वर्गंगाजलिं तांबुस रंगाचा ?

दिनरजनींच्या फटींतून या फार दूर ओंड
दिसतें कीं हें कालगर्भिच्या स्वर्गाचें तोंड ?

हा रजनीच्या उदरीं दिसतो गर्भचि दिवसाचा,
कीं काळाचा बाळ नवा हा सव्याच नवसाचा !

दिनरजनींचा, शुभाशुभांचा, पापापुण्यांचा,
मंगल संगम रंगपटचि हा दावित गगनाचा !

काय निघाला मानसपुत्रचि विराट पुरुषाचा
विश्वैक्यास्तव मिरवित हा ध्वज विश्वममत्वाचा ?

विश्वहितास्तव रोज सोडि जो रविरूपा गगनांत;
पुराणपुरुषाचा कीं उघडा पळता तळहात ?

विश्वहितपरा ही ख्रिस्ताची रक्तमया माया,
महंमदाच्या पैगामाची किंवा ही काया ?

शांत रसा या अभंग वाणी प्रसवे तुकयाची,
दया परतली कीं बुद्धाच्या उदार हृदयाची ?

दिव्य भावना भक्तमनीं ज्या त्यांची ही मूर्ति,
भावि कवींच्या रसवंतीची कीं अस्फुट स्फूर्ति ?

आज निपजल्या प्रीतीचा हा मंगल अभिषेक,
जगदिशाच्या कृपावृष्टि ची कीं पहिली फेक ?

पतिव्रता गतसती जयांचें अग्निशयनिं निजणें
अखंड सौभाग्याचें त्यांचें किंवा हें लेणें ?

यज्ञकाळची ही रामाची सोन्याची सीता,
येत्या अवताराची छाया, कीं रक्तस्फीता ?

कीं, भवितव्या या देवीच्या या विमल दुग्धधारा
धांवत सुटल्या, परितोषाया विश्व शुद्ध सारा ?

उद्धाराया पुन्हां धांवली किंवा भवभीतां
श्रीकृष्णाच्या मनिं उरलेली श्रीभगवद्गीता ?

भावि काळचें हें स्वर्गाचें स्वप्न असे काय ?
ब्रह्मस्वाचा भावि सगुण कीं तेजोमय काय ?

विश्व रची जी आधीं, करि मग वृद्धि पुढें त्याची,
'आज' रचाया आली का ती इच्छा ईशाची ?

ब्रह्मपदाच्या किल्ल्यावर कीं फडके जरिपटका ?
चिरंतनाची सनद मानावा, तिचा ताम्रपट का ?

अंत न पाही भगवंताला आली काय दया ?
चिन्मंगल मग उभें नभीं हें भूवरिं उतराया ?

अहा ! तयाच्या स्पर्शें होई शुद्ध हृत्तरंग,
दिव्य दृष्टिला पुरता कळला अरुणाचा रंग !

मना ! कल्पना पुरे ! प्रभूची हीच असे जाण
सौंदर्याची, मांगल्याची, प्रेमाची खाण !

प्रीतिरसाच्या, सौंदर्याच्या, देवींच्या मूर्ति
नित्य निर्मि ही परमेशाची अरुणमया स्फूर्ति !

आज उद्यांच्या महाकवींनो ! हृदयीं नीट ठेवा
प्रेमरसाचा, मांगल्याचा हा अद्भुत ठेवा !

अरुण-रसानें याच रंगवा मनिंचीं परि चित्रें !
रंगवीत जा तशीं उद्यांच्या देवींचीं चित्रें !

या रंगानें रंगवितों मी माझ्या हृदयाला,
पडद्यापडद्यावरी काढिलें चित्राचित्राला !

एका पडद्यावरि परि रंगे प्रेमचित्र एकः
हृदयाच्या हृदयांतिल माझ्या तोच शिलालेख !

त्या चित्राचा, त्या पडद्याचा, मम गाना धीर;
त्या चित्रांतिल देवीचा मी विकला शाहीर !

मरतां मी, तो जपाच माझ्या हृदयाचा पडदा;
त्या देवीचा झालों अगणित जन्मांचा बंदा !

तिच्या गालिंचा अरुण सारखा, लज्जे ! वाहूं दे !
' गोविंदाग्रज ' कविच्या ' अरुणा ' त्यांतच राहूं दे !

सप्टेंबर, १९१४.

## निद्रागीत

नीज गुणी बाळ झणीं शान्त, यावरी—
गाउं किती ? कुंठितमति, नीज झडकरी !
विश्वाच्या स्नेहरसीं मग्न जाहलें,
प्रेमाच्या अश्रुजलें बाळ नाहलें,
मायेची तीट गालिं, चित्र जणुं हले,

सुयशाचें दुग्धपान गोड त्यावरी !
हृदयाचा केला हा पाळणा नवा,
बांधाया ममतेचा पाश मग हवा,
हृत्तरंग हलवि तया करुनि मृदु रवा,
ब्रह्म सगुण बाळरूप रमत अंतरीं !

माता करि मंगलमय गायना अहा !
प्रेमभरें विश्व त्यांत रंगलें पहा;
सोड गड्या ! हट्ट तुला शोभतो न हा,
अजुनि तुजसि नीज न ये--सांग कां तरी ?

नोव्हेंबर, १९१४.

## भीमकबाळा

[ माझ्या 'वेड्यांच्या बाजारांत' एका उपवर मुलीच्या तोंडीं हें साधें गाणें तिचीच स्थिति वर्णन करण्यासाठीं घातलें आहे. गाणें त्या मुलीनेंच केलें आहे, अशी कल्पना आहे. माझी स्वतःची एवढीच कविता मला आवडते. ]

( चाल : यादवराया भाई याहो )

भीमकबाळा ती वेल्हाळा टाकुनि गोपाळा ।
निश्चय केला बंधुवरानें द्यावी शिशुपाळा ।।

विवाहकाळीं खळ तो आला तंव राजसबाळा ।
शोकभरानें विव्हळ झाली, दोष देइ भाळा ।।

" अजुनि तरी या दासीसाठीं या हो गोपाळा ।
काळवेळ ही जवळी आली, संकट हें टाळा ।।

ऐन समयिं का निष्ठुर झालां ? काय असें केलें ?
दीनांवरिचें प्रेम सदाचें आज कुठें लपलें ?

कधिं पाहिनसें झालें मजला सांवळि ती काया ।
कधिं वाहिन ही काया माझी देवा तव पायां ?

कधीं सांठविन रूप मनोहर या नयनीं देवा ?
मिळेल केव्हां अभागिनीला प्रेमाचा ठेवा ?

नका करूं छळ याहुनि माझा अजुनी घननीळा ।
वाट बघूं किति घेउनि हातीं अश्रूंची माळा ?

किती आळवूं परोपरीनें ? कंठ किं हो सुकला ।
तरी यावया अजुनी माझा माधव कां चुकला ?

सर्वसाक्षि भगवंता ! आतां अंत नका पाहूं ।
—कीं विषपानें प्राण तरी हा पद्कमला वाहूं ।

मीच अभागी; म्हणुनी आपण अजुनी नच आलां ।
ब्रह्म सगुण जें दुर्लभ सकळां; मिळे कसें मजला !

रडतां यापरि अश्रुजलानें पदर भिजुनि जाई ।
ऊर भरूनि ये—शब्द न चाले—कवन विरुनि जाई ॥ १ ॥

१९१४.

## ओसाड आडांतील एकच फूल

होता एक जुनाट आड पडका, ओसाडसा जो असे,
कोठेंसा, कधिंचा, विशेष नव्हता कोणास तो माहित;

होतें काय तयांत हें नच कधीं कोणी पहाया बसे,
नाहीं जात कधीं तिथें कुणि जिथें नाहीं स्वतांचें हित !

होता आड खरोखरीच अगदीं तैसा दिसायास तो,
जो जैसा दिसतो जगास दुरुनी, तैसाच तो भासतो;

घेतो कोण उगाच कष्ट इतके लोकीं खऱ्याखातर !
' आहे भूत तयांत खास ! ' वदती ऐसेंहि कोणी तर

बोले वाइट त्यास कोणि, नसती होती वदंता जरी,
लोटी सृष्टिहि त्याप्रती जरि तशा त्या आडमार्गावर,

टाकीना नुसती जरी नजरही कोणी बिचाऱ्यावर,
देवानेंहि दिलें असेंच नव्हतें टाकून त्याला तरी !

देवाला करणें—विचित्रच तरी आहे किती गोष्ट ही,
होतें नाचत एक फूल तसल्या ओसाड आडांतहि !

[ २ ]

पानांची गरदी लता करिति त्या आडाचिया भोंवतीं,
वाटे अंथरलें जणूं कफन तें जीवंत तोंडावरी;
काळीभोर कभिन्न गर्द विलसे छाया मधें खोल ती,
आडांतील जलांतही मिसळुनी त्यालाहि काळें करी !
आडाच्या असल्या भकास उदरीं होतें तसें फूल तें;
प्रेमाचा मृत अश्रु जेविं गिळिला जीवन्मृताच्या मनीं;
केव्हांही नच लागला सुमनसा वाराहि बाहेरुनी;
काळोखांतिल तेवढेंच जग तें होतें तयाभोंवतें.
पुष्पाचें वळलें असे मुख सदा पाण्याकडे खालती,
श्वासानें जणुं त्याचिया चिमुकल्या लाटा जलीं हालती;
केव्हां तन्मकरंदबिंदु पडतां जीं वर्तुळें चालतीं,
घालाया रमणीकरांत बघतां तेव्हांच मागाल तीं !
येई एक कसाबसा तरि सदा तेथें रवीचा कर,
पुष्पाचें प्रतिबिंब तो जलिं करी त्यालागिं दृग्गोचर.

[ ३ ]

त्या चित्राप्रति भावबद्धनयनें आशादृशा पाहणें—
हा नित्यक्रम भाबड्या सरळ त्या माझ्या फुलाचा असे;
त्याला सर्वहि वाहणें, विरुनिया त्याच्यामधें राहणें,
आशा एकच एवढी मनिं सदा वेड्या फुलाच्या वसे.
त्याचा वास असे मनोहर सदा, शंका नसे याविशीं,
या भालें परि गंध जो दरवळे न्यारीच त्याची मजा !
केव्हांही हलतांच फूल पवनें खेदास देते रजा,
प्रेमानें डुलतां परी करितसे वृत्तीस वेडीपिशी !
हांसे फूल जलांतल्या बघुनियां त्या स्वीय चित्राकडे,
हांसे तेंहि तसेंच तों अधिक हें हांसें तसें बापडें;
नाचे हें पवनांत, तेंहि तिकडे पाण्यामधें बागडें,
‘ माझा भाव तयाप्रती कळतसे ’ मानीत हें बापडें;

जोडीचा महिमा असा चहुंकडे; धिक् सर्व जोडीविणें
लाभे जोड तरी कुणास न रुचे शून्यांतलेंही जिणें ?

[ ४ ]

खालीं तोंड करून चंचल जलीं पाहून वेड्यापरी
भावाचे अपुल्याच रंग वठवी त्या प्रेमचित्रावरी;
घेई यापरि बांधुनी उगिच तें जीवास आशागुणीं,
हांसूं मात्र नका म्हणून कधिंही माझ्या फुलाला कुणी !
त्या आशेंत रहस्य काय लपलें जाणावयाला जरा—
वाऱ्यानें करपून जातिल अशीं व्हावीं फुलांचीं मनें;
चित्रें चंचल जीं अदृश्य उघड्या डोळ्यांस भावाविणें
पाहायास तयांस नीट तुमचे डोळे फुलांचे करा !
भावाचे अपुल्याच रंग बघणें वाटेल तेथें मना,
त्या वेड्याबगड्या फुलांतच असे का तेवढ्या दोष हा ?
मोठे पंडित काय लाविति दिवे, ते एकदांचे पहा,
कोणीं काय कधीं कुठें बघितलें जें ये विकारांत ना ?
जो तो या जगतावरी पसरतो छाया मनाची सदा
निःश्वासें तुमच्याच सृष्टि करपे, तेव्हांच ती तापदा !

[ ५ ]

कांहीं काळ असाच फूल गमवी, आशा पुढें वाढली;
चुंबावें जलिंच्या फुलास म्हणुनी तें मान खालीं करी;
वाऱ्यानें मुख लागतांच उदका छाया विराली जलीं,
पाणी मात्र पडे मुखीं सहज तों, तैसेंच आशेवरी !
त्या धक्क्यासरसेंच फूल मग जें कोमेजलें एकदां,
नाहीं तें हंसलें पुन्हां ! विकसलें नाहीं पुन्हां तें कदा !
आशेनें दुसऱ्या दिनीं फिरुनि तो आला रवीचा कर,
गेला खिन्न मनें, परी न चमके त्या प्रेतमात्रावर.
पाण्यामाजि पुढें गळून पडलें तें फूल वेडें पिसें,
पाताळांत कुठें असेल दडलें का प्रेमनिर्माल्य तें ?

छेः छेः ! प्रेममय स्वरूप धरुनि भूतापरी हिंडतें,
कोठें आज उजाड जें, अजुनिही तेथें कधीं तें दिसे !

तें मेलें म्हणुनी उणें न ठरतें; मच्चित्त त्याला भुले;
मेलेल्या हृदया मदीय असलीं वाहीन मेलीं फुलें !

नोव्हेंबर, १९१४

## फुलें वेंचिलीं पण–

[ प्रेमस्थान नाहीं अशा मनुष्याला चांगल्यानेंसुद्धां खेद होतो. ]

पन्हाळगडचा पठार सगळा घालुनि पायांखालीं।
फुलें जमविलीं तऱ्हेतऱ्हेचीं जीं जीं हातीं आलीं ॥

शेवंतीचा गेंद हांसरा, शुभ्र मोगरा फुलला।
मदनबाण हा पाहुनि असला पुष्पबाणही भुलला ॥

नाजुक जाईचीं हीं बाळें; गुलाब ताजा छानं।
हीं इवलालीं रानफुलेंही रंगें हरितां भान ॥

ही तुळशीची मंजुळ, तैसा सबजा महंमदाचा।
भू-कमळें हीं, अनंत फुलतां औरच वास तयांचा ॥

किती आणखी सांगूं नांवें—आणि कशाला नुसतीं ?
हेंच पुरें कीं सगळीं होतीं जीं वासें घुसमुसतीं ॥

फुलवंतीनें ओंजळ माझी भरुनी लागे शीग।
सुगंधि सौंदर्याचा नाचे हातावरतीं ढीग ॥

काव्यभरानें तरुण नयन हे नवतेजानें न्हाले।
प्रणयरसानें हृदयहि माझें उचंबळुनि वर आलें ॥

“ फुलें वेंचिलीं— पण–आतां हीं द्यावीं कोणालागीं ? ”
राक्षसवृत्ति स्मरणदेवता क्षणांत झाली जागी ॥

“ हतभागी हा जीव एकला; प्रीतिदेवता नाहीं।
मोडुनि पडलें हृन्मयमंदिर शतधां आघातांहीं ॥

निष्प्रेमाचें जीवन माझें रुक्ष चिंतनीं जावें।
संकल्पचि हा वरला ठरला; कां तें दैवा ठावें।

कांट्यांवरि या कोमल हृदया टाकुनि देवा क्रूर।
कुठें फुलांची धनीन माझी दिली दवडुनी दूर ?

कृतकर्मांचीं फळें भोगणें अवश्य जीवा जगिं या।
गुदस्त तें गुल्दस्त; नको तें पुनःपुन्हां मनिं याया '' ॥

अभंग निश्चय अशा प्रकारें कितीकदां जरि केला।
या पुष्पांसम मृदुहि कारणें दुभंगती परि त्याला ॥

वृत्ति बावरी झालि, आंतल्या आंत बिचारी रडली।
जीवाचीं नयनांतुनि पुष्पें त्या पुष्पांवरि पडलीं ॥

जीव जाहला जड; तीं हातीं पुष्पेंहि जड झालीं।
'' फुलें वेंचिलीं पण–पण–आतां देतों टाकूनि खालीं ॥

चिरंमृताला हवा कशाला हा कसला हव्यास ?
जिवंत फुलवंतीचा असला दुःखप्रद सहवास !

डोळे असुनि अंध असा कुणि तुडविल यांना पायीं।
रसिक कुणी प्रेमांध उचलुनी अर्पिल रमणीहृदयीं ॥

ज्या देवानें असे मांडिला असला निष्ठुर खेळ।
असेल त्याला बसवायाचा तसाच कांहीं मेळ ॥

त्याचीं त्याला फेंकुनि देतों; हें ब्रह्मार्पणमस्तु।
कुठेंहि पडतां पावतील त्या विश्वचि त्याचें वास्तु ॥

नाजुक असलीं फुलें अशा या माझ्या हृदयासाठीं।
देवाजवळी दाद मागतिल लागुनि त्याच्यापाठीं. ''

देत उधळुनि फुलें अर्पितां देवा चहूंकडेही।
' गोविंदाग्रज ' तशीं फुलें हीं रसिकां तुम्हां देई ॥

जानेवारी १९१४, अथणी.

## ' दिव्य प्रेमाची जाति '

संध्यापट गगनीं पसरी ।
तारांची राणी हंसरी ॥
कधीं गालिचा अरुणाचा ।
करि ती तेजस्वी नाचा ॥
शुक्रतारका अशी नभा ।
नवी नवी देई शोभा ॥

तारा गगनीं
परि भूवरुनी;
बघतां नयनीं
जी संचरते हृदयीं, ती ।
दिव्य प्रेमाची जाति ॥ धृ० ॥ १ ॥

न मिळे अवसर अभिलाषा ।
' दे घे 'ची नाहीं भाषा ॥
भाव आमचा थरारला ।
तरि दादहि त्याची न तिला
एकाद्या किरणापुरता ।
प्रेमबंध होतो पुरता ॥

जिच्या जिवाला
तिळ मोबदला
नकोच कसला;
निराश जन्मापासुनि ती
दिव्य प्रेमाची जाति ॥ २ ॥

प्राण चंद्र ज्या कुमुदांना ।
काय जाणतो तो त्यांना !
फुलें हंसति पाहुनि रविला
कळे न परि त्याचें त्याला –

चंद्रकांत मणि पाझरती ।
चंद्र फिरे वरच्यावरतीं ॥
कवि कोठेंतरि,
तत्कवितापरि
फिरे दिगंतरिं,
रसिकमनें मग कविवरतीं ।
करितो ती दिव्य प्रीति ॥ ३ ॥

सौंदर्याचा उत्कर्ष ।
कुठें असे तरि दे हर्ष ॥
दिशाकाल होउनि सान्त ।
त्या वृत्तिंत विरघळतात ॥
दर्शन— किंवा स्मरण पुरें ।
तन्मयता देहीं प्रसरे ॥
प्रभुची शोभा
दिव्य यशोभा
हरिते लोभा;
तदाकार करिते वृत्ति ।
दिव्य प्रेमाची जाति ॥ ४ ॥

सौंदर्याच्या ज्या श्रेणि ।
तीं देवाघरचीं लेणीं ।
जिवास होतां जाणीव ।
देहाची सांडी शींव ॥
उदास वृत्तीचा प्रसर ।
स्वार्थाचा पाडी विसर ॥
सौंदर्यानें
ऐश्वर्यानें
रंगुनि जाणें
दिव्य जीवनें तीं लोकीं ।
तच्चिंतनीं तदालोकीं ॥ ५ ॥

प्रेमविषय अपरंपार ।
सूक्ष्म-रूप भव्याकार ॥
निरभिलाष तन्मयता ती
दिव्य प्रेमाची जाति ॥
कौतुक, विस्मय आश्चर्य ।
शून्यवृत्ति किंवा सभय ॥
अनेक परिचीं
त्या प्रेमाचीं
रूपें साचीं
आविष्करणीं जाणविती ।
दिव्य प्रेमाची जाति ॥ ६ ॥

फेब्रुवारी १९१४, म्हापसें.

## पुनर्विकसन

दयाघना ! विनति करित मन तुज हें चिरविरहें तापतां !
धन्य विश्वरचना ही । यथासांग सर्व कांहिं
न्यून तींत मुळिं नाहीं । मत्सरेंहि पाहतां !
वस्तुवस्तुमात्राला । नाशकाल जरि दिधला,
तरि फिरुनी उदयाला । काल असे तत्त्वतां !
अस्तंगत सूर्याला । सुप्रभात उदयाला,
शुक्लपक्षिं चंद्राला । फिरुनि वरी पूर्णता !
वर्षाऋतु समयाला । प्रतिवर्षीं ये चपला,
प्रतिवसंत वृक्षाला । जन्म नवा आणिता !
भरतीचा नियतकाल । जलधिचे हरित हाल
रात्रीं नक्षत्रजाल । वरि नवी अपूर्वता !
पाहुनि हें नवविकसन । सुप्रसन्न होई मन,
परि विचारि दीनवदन । बालक हा नेणता !

या मदीय चिरनिराश । जीवन्मृत माणसास
पुनरपि उमलावयास । काल दिला कोणता ?

डिसेंबर, १९१४.

## हालत्या पिंपळपानास

[ राहत्या घराच्या खिडकीसमोर पिंपळाचें पान वाऱ्यानें सारखें फडफडत होतें. परमेश्वराच्या इच्छेवांचून पानसुद्धां हालत नाहीं; या लौकिक श्रुतीवरून पुढील विचार सहजच मनांत वावरूं लागले. ]

कोवळ्या हालत्या चिमण्या पिंपळपाना !
कल्पना हले तुज बघुनि असें हालताना !

निजशाखेच्या या शेवटच्या टोंकाशीं
कां इकडुनि तिकडे सांग सारखें फिरशी ?
हा हिरवा, तांबुस रंग काळसर कांहीं;
तूं भिरभिर फिरतां स्पष्ट भेद नच राही.

या झुळझुळत्या वाऱ्यानें नाचसी,
कोंवळ्या सूर्यतापानें तळपसी,
आपल्या मिश्र रंगानें झळकसी,

तुजकडेच माझें लक्ष सारखें लागे,
बांधिलें नयाला गूढ कांहिं अनुरागें !

जीं गूढ अप्सरागीतें नभिं पाझरतीं,
तीं वहात येतीं खालीं वाऱ्यावरतीं ।
ऐकुनी तयांचे सूर मुके नवलाचे,
या हृदयकंपनें जीव काय तव नाचे ?

कीं जगीं ताप जो सारा उसळला,
रवितेजामाजिं भरारा मिसळला,
लागतां तयाचा वारा, कोमला,

थरकांप होत हा तव कोमल देहाचा !
वद नाच भीतिचा कीं हा आनंदाचा ?

हें तुझ्याच दुःखें हृदय असें तडफडतें ?
विश्वैक्यवृत्तिची ध्वजा काय फडफडते ?
तूं स्वयें हालसी, कीं तुज कोणी हलवी ?
सुखदुःखी झुलसी स्वतां इतर कीं झुलवी ?

कळतसें तुझें तुज का हें हालणें ?
कीं दुसऱ्यासाठीं आहे चालणें ?
कीं भावावांचुनि पाहे डोलणें ?

तव अस्तित्वाचें ज्ञान असे कां तुजला ?
तुज इच्छातृप्ति क्रियाभेद का कळला ?

तुजभंवत जी ही सृष्टि असे पानांची,
कल्पना असे का तिला तुझ्या नाचाची ?
रस एकच तरुचा तुम्हांमधूनी वाही—
सुखदुःखभाव ही जोडि तुम्हां कीं नाहीं ?

विश्वेंच्या विश्वें सारीं यापरीं
स्थलिं भिन्न, भिन्न आकारीं, भूवरीं
नांदती गड्या कांतारीं कितितरी !

जाणीव तुम्हांला परस्परांची का रे
जीवैक्य असे कीं, भिन्न भिन्न जग सारें ?

क्रम हाच काय वद तुझ्या जीवनाचा रे ?
परिणाम करित का सृष्टीवर हें सारें ?
कुणि चित्रगुप्त हें लिहून टेवित आहे ?
कीं स्वैरनदाच्या ओघावर हें वाहे ?

हें अवश्य जग चालाया कां असे ?
कीं नसत्याहुनिही वायां हें पिसें ?
स्फूर्तिची कुणाच्या काया हलतसे ?

मम नयनिं चित्रसम जाउनि बैसायाचें,
इतुकेंच कार्य का सांग तुझ्या नाचाचें ?

मम करीं कपाळीं दुर्दैवाच्या रेषा
मजसाठिं लिहिति चिरदुःखभोग हा पेशा !
परि असति तुझ्या तर रेषा साऱ्या अंगीं,
दुःखही असे का तितुकें त्यांच्या संगीं ?

कीं वाऱ्यावरच्या ताना यापरी
उमटल्या अशा फिरतांना, तुजवरीं ?
त्या फिरुनि फिरुनि घेतांना अंतरीं—

निजनादब्रह्मीं गुंग होउनी डुलसी ?
तें गीत आंतल्या आंत ऐकूनी खुलसी ?

कीं दुर्दैवाच्या किंकाळ्या, या ताना,
तव कोमल हृदयीं ठेविति वण जातां ना ?
खालतीं पडुनि मग मातिंत मिसळुनि जाया,
तूं फडफड करिशी अशी भूमिवर याया ?

परि थांब ! जरा गा गाना, तोषदा,
ऐकवीं माझिया कानां एकदां;
स्थिर राहिं न, पिंपळपाना ! तूं कदा.

मज गाऊं दे, मज नाचूं दे, तुजसंगें,
सुखदुःख सारखें सेवूं मानसरंगें !

संबंध असो वा नसो आपणांमाजीं,
मी एक कारणासाठीं तुजवर राजी—
नवबालाहृदयीं प्रीति नवी हलतांना
नच्छिरीं हलसि तूं तसाच पिंपळपाना !

जीं हृदयकंपनें सारीं मानसीं,
तीं आम्हांतें बाहेरी दाविशी !
निर्दोष मनानें भारी हालसी !

कुणि बाला जरि मज देइल असला मान,
तरि सुखेंच होइन मीही पिंपळपान !

डिसेंबर, १९१४

## हा क्षण

रमणि ! स्मरणीं आमरणचि या हृदयपटावर ठसा
सदाचा ठेविला हा क्षण असा !
भूतभविष्यांमधें तरलतर वर्तमान ज्यापरी
चंचल सीमारेषा धरी;
गतदुःखाच्या भावि सुखाच्या मधें तसा सुंदरी !
क्षण हा संशयरेषेपरी !
गतकालाच्या दुःखाचें हें पळतें पाऊल !
सुखाची येत्या चाहूल !
जरि संशय माझ्या क्षणास या दूषवी,
तरि आयुष्यातें अवघ्या क्षण भूषवी,
करि दुभंग जीवनदास दे गति नवी;
अनंत सौख्याचा हा होइल आदिकालची तरी,
नातर अंत तरी सुंदरी !

जुलै, १९१५.

## मार्गें पाहणें

( चाल : नोहे हा पवन जवन० )

चालतसे सारखीच ही मुशाफरी ॥
जहांगीर या फकीर हा पिशापरी ॥ ध्रु० ॥
जिकडे मज मार्ग फुटे। न नकळत मी फिरत सुटे ॥

नच कसलीही माया। पायबंद बांधाया।
मागुनि मज शोकवशा। पाहिना कुणी आशा।
मग मागें वळुनी कां। पाहणें तरी? ॥ १ ॥

३०–७–१९१५, पुणें.

## फुटकी तपेली

[ आत्मज्ञान मायेंतून गळूं लागलें म्हणजे आत्मा अगतिक होतोच. ]

नको तपेली फुटकी असली!

जीव बोलतो पाणी पाणी
चिरकालाची तहान लागुनि;
अशी तपेली मजला देउनि, थट्टा करितां तेथें कसली?

प्रवास करणें फार दूरवर!

आद्याच्या पर्यंतापासुनि
अंताच्या आरंभामधुनी—
एक अनंतें माप घेउनी, कैक अनंतें जाणें भरभर!

विश्व कशाचें घेउनि बसलां?

विश्व मला जें दिसतें, त्यांतिल
विश्वें तुमचीं अणुसम होतिल;
निजक्षणीं तें तुमच्या जिरविल, काळांचा बाजारच सगळा!

प्रवास माझा असा भयंकर!

या विश्वाच्या मागुनि जाणें,
मागुनि सुटुनी पुढें धांवणें,
अथवा सर्वांठायिं पसरणें, आद्यंताचें कापुनि अंतर!

कडक कायदा धांवायाचा!

पाउल एकादें जरि चुकणें,
पहिल्यापासुनि पुन्हां धांवणें!
आपुल्याच वा भंवतीं फिरणें! मार्ग कुठुनि मग सरावयाचा?

आधीं असते पुष्कळ सोबत;
कितीक ‘ मी, मी ’ मजला दिसती,
पुढें चालतां भरभर मरती;
मरुनी माझ्या ठायीं जगती, माझीच मला उरते संगत !

माझें मीपण फारच मोठें !
दुज्या रहाया जागा नाहीं,
एकलकोंडा म्हणुनी राही,
खोटें ‘ मी ’ ही अंगिंच पाहीं, राहिल सोबत मग तो कोटें ?

मज जाणाया मीच विचक्षण !
नसते परके आधिं जाणतों,
असत्या मलाच न परी बघतों;
मज ओळखतां इतर विसरतों, माझें सर्वच फार विलक्षण !

तऱ्हाच माझी विचित्र असली !
असला मी— तो प्रवास तसला !
कडक कायदा त्याचा असला.
तशा प्रवासीं मजला, अशी तपेली देतां कसली ?

अनंततेची तहान माझी,
मिळतां पाणीं वाढे उलटी,
अधिकचि पाणी—अधिकचि मोठी;
जलब्रह्म द्या परि तिजसाठीं, तरीच होइल मग ती राजी !

भांडीं असलीं कां मज देतां ?
भरतांना जीं होति रिकामी,
भरुनि ठेविलीं तरि कुचकामी,
पडतिल कोणाच्या तीं कामीं ? कधीं परत बोला हो घेतां !

वागविण्याचें उगाच ओझें !
करी प्रवासामाजीं खोटी,
फुटकि तपेली तुमची खोटी,
मृगजळ नसतें दावी खोटी, कधीं तिच्यांतुन नच गळलें जें !

मायेची ही खरी तपेली;
मृगजळ प्याया आंत उतरतों,
अफाट तरि मी त्यांतच बुडतों,
नसल्यामाजीं असतां जिरतों; नको मला ही असली मेली !

ब्रह्मांडाची करा तपेली !
माझी ओळख पाणि तिच्यांतिल,
कैक अनंतें तयांत जिरतिल,
माझ्यावांचुनि सारे विरतिल, शिरे तपेली ही अशा जलीं !

ब्रह्मांडाची खरी तपेली;
करा रिकामी तरिही भरली,
भरुनी भरणें भरवुनि उरली,
जिरतिल विश्वें कितीक असलीं, कांठवरी जरि आधीं भरलीं !

माझी ओळख विचित्र पाणी;
जुनि ओळख मग नवीस आणी,
पाण्या वी अव्याहत पाणी,
पाण्यांतहि मग खेळे पाणी, हाय ! कसें हें कोणि न जाणी !

ब्रह्मांडाची करा तपेली;
तृषा नाहिंशी तिनें करीन,
तपेलीसही जालिं भरवीन;
प्रवासही जालिं जिरवीन, नको मला ही असली मेली !

प्रकार घ्या हा मनिं एकंदर;
सर्वस्वाची करा तपेली;
माझ्या पाण्यानें भरलेली,
पाहुनि तिजला तीन्ही काळीं, खुबी ओळखा क्या है अंदर !

जुलै, १९१५

अनंत नभ हें वरी पसरलें न मर्या तया;
अनंत मनहि तसें जरि लघु शरीरांत या;
सदैव नाभिं खेळती दिनदिशा लपंडाव हा;
मनांतहि तशाच या दिवसरात्र दोन्ही पहा !

उषा विरुनि जात तों प्रकटतो नभीं भास्कर;
नवा दिवस नाचतो नवनव्या जगाच्या वर !
मनात उगवे तसा क्षणिं नवीन आशारवि;
प्रफुल्ल तर कल्पनेप्रति नवीन ये पालवी !

फिरे दिनभरी रवि; प्रकट होई संध्या पुढें;
गमे उदयकाळशी, रविच तो बिचारा बुडे !
तशीच मनिं सारखी वरिवरीच आशा चढे;
गमे क्षणच जाहली सफल, तोंच खालीं पडे !

तमास पसरी निशा मग जगांत जातां रवि;
दिसें सकल शून्यसें, तम नव्या तमा मात्र वी !
विषण्ण हृदयीं तशी भयकरा निराशा जडे;
तमोमय रसा गिळी मन मनीं बिचारें रडे !

तशांत गगनामधें दिसत दूर तारा परी—
मनांतहि सहस्रधा फिरत कल्पना बावरी !
पुन्हां उगवतो रवि प्रभवतो प्रकाशा नव;
निराश मनिंही पुन्हां करि तशीच आशा रव !

असें सतत चालतें जनिं तसें मनीं सारखें;
असे हृदयिं आज जें गमत तें उद्यां पारखें !
नको दिवसरात्र तीं न सरती कधीं जी पहा.
सरेल कधिं तो सरो हृदयिंचा लपंडाव हा !

ऑगस्ट, १९१५.

## गीत–विरक्ति

देवी दर्शनदुर्लभ झाली
  आशालेशहि नच कांहीं;
संसाराची होउनि भाषा
  जीवनकवनांतुनि वाही !

प्रतिवस्तूचा शब्दचि उरला
  भावमया जगतीं राही;
त्या शब्दांचा अर्थ कुणातें
  वस्तुज्ञानाविण नाहीं !

गूढार्थचि तो अलिखित भागीं
  मत्कवनीं भरुनी जाई;
नसतां परि संकेत जिवाचा
  उमगेना तें कवणाही !

गीत कळावें जीस नसे ती
  दिशा शोधिल्या जरि दाही;
'गोविंदाग्रज' सहजचि कवनें
  जाळि निराशा खर दाहीं !

नोव्हेंबर, १९१५.

## सुभाषित

### खरें औषध

जे जे रोग मनास होति, हृदया संताप जो जाळतो,
जे जे घाव जिवास लागुनि जगा तो नित्य कंटाळतो;

त्या त्या विस्मृति हेंच औषध खरें आहे गमे एक तें;
जें लोकीं नसतें तरी मग कुणी जीवंत ना राहतें !

२५-११-१९१५, पुणें.

## दुर्दर्शन

नाना रोग, जुगुप्सिता, व्यसनिता विच्छिन्न प्रेतावलि,
भूकंपादि अनर्थ, दैववटितें हीं सर्वही पाहिलीं;
त्यांहीं खिन्न न चित्त होत, परि तें होतें तदा ज्यापरी
विश्रब्ध प्रणयास वंचित यदा सौंदर्य स्वार्थास्तव !

२-१२-१९१५, पुणें.

## त्याच तारकेस याचना

थांब जरा, तारके ! जरा तरि थांब, सखे सुंदरि !
कुणिकडे नेशी मज यापरी ?

तव किरणांच्या सुंदर कोमल आधारावरि सखे !
केलें माझें मज पारखें !

स्वर्गसुखाची आशा लावुनि ओढिसि मजला गडे !
थांबचि— सांग परी कुणिकडे ?

अति दुःखांच्या सतत अनुभवें हळवा जिव जाहला,
सुखाची सवय नाहिं त्याजला !
परि आशा लावुनि नेशी मज वरिवरी,

देशील टाकुनी स्वर्गांतुनि मज जरी,
तो अधःपातही या उन्नतिच्या परी !

उच्चतेस या योग्य न मी तरि स्वप्रेमें सांवरी,
याचना ' गोविंदाग्रज ' करी.

२८-१२-१९१५, पुणें.

प्रेमें जीं कुसुमें दिलींस मजला
तूं, प्रेमले ! धाडुनी,

कोमेजून उद्यांच जातिल— सुखें
जावोत कोमेजुनी !

नाहीं वाटत खेद लेश, उलटा
आनंद वाटे मना;

प्रेमाची स्मृति त्या जिवास जडुनी
आजन्म राहील ना !

जानेवारी, १९१६

## एका जुन्या श्लोकाची आठवण

" डोळ्यांनीं बघतों, ध्वनी परिसतों कानीं, पदीं चालतों ।
जिव्हेनें रस चाखतों, मधुरही वाचें अम्ही बोलतों ॥
हातांनीं बहुसाल काम करितों— विश्रांतिही घ्यावया ।
घेतों झोंप सुखें— फिरून उठतों ही ईश्वराची दया. " ॥ १ ॥

पूर्वीं पूर्ववयें प्रसन्नमयता जेव्हां मिळे सृष्टिला ।
शाळेच्या चिमण्या जगांत असतां हा श्लोक मीं वाचिला ॥
साध्या बाळमनास अर्थ पटला— आनंदही वाटला ।
आतां का करुणारस स्मृतिबळें त्याच्या असा दाटला ? ॥ २ ॥

डोळ्यांनीं बघणें, ध्वनी परिसणें इत्यादि सर्व क्रिया ।
आतांही घडती; उपाधि चुकल्या नाहींत जीवासि या ॥
जेव्हां जीव थकून पाहत परी विश्रांतिही घ्यावया ।
नाहीं झोंप सुखें— अहो, हरपली ती ईश्वराची दया ! ॥ ३ ॥

सौंदर्यें भरल्या जगास बघुनी हा प्रश्न चित्तीं उठे ।
जीवानें जगिं काय कार्य करणें श्लोकांत नाहीं कुठें ॥ ४ ॥

१२-२-१९१६, मुंबई

## निर्वाणीची विनवणी

( चाल : धाडुनि दिधले )

पाहसि आतां अंत असा कां ? पीडिसि कां या दीना ?
सुंदरि, पदरीं मदीय हृदया घेसि न कां पदलीना ?

क्षणैक हंससी, क्षणभर रुससी; निष्ठुर चंचलता ही;
संदिग्धा ही वृत्ति व्याकुल करित मनाप्रति पाही.

लाजुनि अजुनी स्वजना हा जन जवळी कां नच केला ?
किंवा हृदया द्वेषचि दूषवि मजविषयींचा पहिला ?

सुंदर वदनीं तव निर्दयता हृदय विदारत माझें;
पडुं दे श्रवणीं ती शुभ वाणी मौन न हें तुज साजे.

प्रत्युत्तर दे प्रश्ना कांहीं; अंत वृथा न पहावा;
विनोदवचनीं थांबवि नच त्य', प्रश्नं परनवि नच वा.

संशयविष हें जाळित जीवा अधरसुधा दे रमणि;
करी विनवणी निर्वाणीची गोविंदाग्रजवाणी !

२-३-१९१६, मुंबई.

## हृदयास

जिवलग हृदया ! मूढ वृत्ति ही धारण केली कां असली ?
लाथ मार त्या चंचल जगता— प्रेमाचीं सोंगें कसलीं !

चंचल, लहरी, रंग बेगडी सुंदरतेच्या मोहानें,
कां वाटेवर पडसी हृदया विकुनी कवडीमोलानें ?

तुझ्या जिवाच्या बोलासाठीं हपापले हे रसिक पहा !
स्वागत करिं जा त्यांचें— त्यांना हर्ष किती होईल अहा !

नटव्या सोंगामागें लागे जें, त्या सौंदर्यासाठीं
नवलाखाचें मोल देसि कां ? कशास या आटाआटी ?

जिथें गुणांची चाड न कांहीं— कमअस्सल जें जातीचें;
सौंदर्यचि तें कसलें ?— केवळ एक बाहुलें मातीचें !

विद्यावैभव कुठें तुझें !— तो ज्ञानाचा गौरव कोठें !
आणि कुठें रंगांत खेळणं !— नवल खरोखरि हें मोठें !

उदारता तव विशाल पाहुनि देवांनाही मोह सुटे;
आणिक असलें खोटेंनाटें नकली नाणें सांग कुठें !

गर्वाचें घर खालीं पडुनी खुशाल मिळू दे मातींत;
रसिकांच्या मृदुहृदयमंदिरीं रहा, निजयशा मिरवीत !

चितारसी कां चित्र जिवाचें पाण्यावरच्या रेघांनीं ?
' गोविंदाग्रज ' सांगे तुजला ' रहा त्याहुनी स्वस्थानीं ' !

९-३-१९१६, मुंबई

## एका शब्दासाठीं विनंति

क्षमा करी, जिवलगे ! क्षमा करीं ! न लावितां अवधि ॥
कोमल हृदया कठोर वचनीं छळि हा अपराधी ॥ १ ॥

क्षमा करावी मी तुज, बाले, आणि तूंहि मातें ॥
असेंच आतां जडलें आहे दोघांचें नातें ॥ २ ॥

परस्परांस्तव आपण ऐसा प्रत्ययही आला ॥
तुजवांचुनि मज सुचेरुचेना; मजविणही तुजला ॥ ३ ॥

क्षणमात्राचा राग अनावर– स्वभाव दोघांचा ॥
समजुनि हें मग राग धरावा कोणीं कवणाचा ? ॥ ४ ॥

जीवाच्या बागेंत खेळतो पक्षी प्रेमाचा ॥
पिसामागुनी पिसें काढणें, मार्ग न सुज्ञाचा ॥ ५ ॥

पश्चात्तापें हृदय हलवितां अश्रूंच्या धारा ॥
वाहुनि त्याला लाभूं दे तो मोत्यांचा चारा ॥ ६ ॥

जें झालें तें विसरुनि, सखये ! टाकुनि इतराजी ॥
भला बुरा मी मान्य करुनिया होशिल ना माझी ? ॥ ७ ॥

‘ गोविंदाग्रज ’ आणुनि नयनीं जीवाचें तोय ॥
विनवित; बाले ! लिहीं स्वहस्तें तूंच पुढें—॥ ८ ॥

२४-३-१९१६, मुंबई.

## प्रेम आणि मरण

“ जगीं सांगतात प्रीत पतंगाची खरी ।
झड घालून प्राण देतो दीपकाचे वरी ॥

—श्रीहोनाजी बाळ.

कुठल्याशा जागीं देख।
मैदान मोकळें एक ॥ पसरलें ॥
वृक्ष थोर एकच त्यांत।
वाढला पुऱ्या जोमांत ॥ सारखा ॥
चहुंकडेच त्याच्या भंवतें।
गुडघाभर सारें जग तें ॥ तेथलें ॥
झुडुपेंच खुरट इवलालीं।
मातींत पसरल्या वेली ॥ माजती ॥
रोज तीं। कैक उपजती। आणखी मरती।
नाहिं त्या गणती। दादही अशांची नव्हती ॥ त्याप्रती ॥

त्यासाठीं मैदानांत।
किति वेली तळमळतात ॥ सारख्या ॥
परि कर्माचें विंदान।
कांहीं तरि असतें आन ॥ चहुंकडे ॥
कोणत्या मुहूर्तावरतीं।
मेघांत वीज लखलखती ॥ नाचली ॥
त्या क्षणीं। त्याचिया मनीं। तरंगति झणीं।
गोड तरि जहरी। प्रीतीच्या नवथर लहरी ॥ न कळतां ॥

तो ठसा मनावर ठसला।
तो घाव जिव्हारीं बसला ॥ प्रीतिचा ॥
वेड पुरें लावी त्याला।
गगनांतिल चंचल बाला ॥ त्यावरी ॥
जातिधर्म त्याचा सुटला।
संबंध जगाशीं तुटला ॥ त्यापुढें ॥
आशाहि। कोठली कांहिं। राहिली नाहिं।
मारखा जाळी। ध्यास त्यास तीन्ही काळीं ॥ एक तो ॥

मुसळधार पाउस पडला।
तरि कधीं टवटवी त्याला ॥ येइना ॥
जरि वारा करि थैमान।

तरि हले न याचें पान ॥ एकही ॥
कैकदा कळ्याही आल्या ।
नच फुलल्या कांहीं केल्या ॥ परि कधीं ॥
तो योग । खरा हठयोग । प्रीतिचा रोग ।
लागला ज्याला ।—लागतें जगातें त्याला ॥ हें असें ! ॥

ही त्याची स्थिति पाहुनिया ।
ती दीड वीतीची दुनिया ॥ बडबडे ॥
कुणी हंसे कुणी करि कींव ।
तडफडे कुणाचा जीव ॥ त्यास्तव ॥
कुणि दयाहि त्यावरि करिती ।
स्वर्गस्थ देव मनिं हंसती ॥ त्याप्रती ॥
निंदिती । कुणी त्याप्रती । नजर चुकविती ।
प्रीतिही कोणी । जड जगास अवजड गोणी ॥ होइ तो ॥

इष्काचा जहरी प्याला ।
नशिबाला ज्याच्या आला ॥ हा असा ॥
टोंकाविण चालू मरणें ।
तें त्याचें होतें जगणें ॥ सारखें ॥
हृदयाला फसवुनि हंसणें ।
जीवाला न कळत जगणें ॥ वरिवरी ॥
पटत ना । जगीं जगपणा । त्याचिया मना ॥
भाव त्या टाकी । देवांतुनि दगडचि बाकी ॥ राहतो ॥

यापरी तपश्चर्या ती ।
किति झाली न तिला गणती ॥ राहिली ॥
इंद्राच्या इंद्रपदाला ।
थरकांप सारखा सुटला ॥ भीतिनें ॥
आश्चर्यें ऋषिगण दाटे ।
ध्रुवबाळा मत्सर वाटे ॥ पाहुनी ॥
तों स्वतां । तपोदेवता । काल संपतां ।
प्रकटली अंतीं । " वरं ब्रूहि " झाली वदती ॥ त्याप्रती ॥

" तप फळास आलें पाही ।
माग जें मनोगत कांहीं ।। यावरी ।।
हो चिरंजीव लवलाही ।
कल्पवृक्ष दुसरा होई ।। नंदनीं ।।
प्रळयींच्या वटवृक्षाचें ।
तुज मिळेल पद भाग्याचें ।। तरुवरा ।। "
तो वदे । " देवि सर्व-दे, । हेंच एक दे– ।
भेटवी मजला । जीविंच्या जिवाची बाला ।। एकदा ।। "

सांगती हिताच्या गोष्टी ।
देवांच्या तेतिस कोटी ।। मग तया ।।
" ही भलती आशा बा रे ।।
सोडिं तूं वेड हें सारें ।। घातकी ।।
स्पर्शासह मरणहि आगी ।
ती तुझ्या जिवाची रागी ।। त्या क्षणीं ।।
ही अशी शुद्ध राक्षसी । काय मागसी ।
माग तूं कांहीं । लाभलें कुणाला नाहीं ।। जें कधीं ।। "

तो हंसे जरा उपहासें ।
मग सर्वेच वदला त्रासें ।। त्यांप्रती ।।
" निष्प्रेम चिरंजीवन तें ।
जगिं दगडालाहि मिळतें ।। धिक् तया ।।
क्षण एक पुरे प्रेमाचा ।
वर्षाव पडो मरणांचा । मग पुढें ।। "
निग्रहें । वदुनि शब्द हे । अधिक आग्रहें ।
जीव आवरुनी । ध्यानस्थ बैसला फिरुनी ।। वृक्ष तो ।।

तो निग्रह पाहुनि त्याचा ।।
निरुपाय सर्व देवांचा ।। जाहला ।।
मग त्याला भेटायाला ।
गगनांतील चंचल बाला ।। धाडिली ।।
धांवली उतावीळ होत ।
प्रीतीची जळती ज्योत ।। त्याकडे ।।

कडकडे । त्यावरी पडे । स्पर्श जों घडे ।
वृक्ष उन्मळला । दुभंगून खालीं पडला ॥ त्या क्षणीं ॥
दुभंगून खालीं पडला ।
परि पडतां पडतां हंसला ॥ एकदा ॥
हर्षाच्या येउनि लहरी ।
फडफडुनी पानें सारीं ॥ हांसलीं ॥
त्या कळ्या सर्वेही फुलल्या ॥
खुलल्या त्या कायम खुलल्या ॥ अजुनिही ॥
तो योग । खरा हठयोग । प्रीतिचा रोग ।
लागला ज्याला । लाभनें मरणही त्याला ॥ हें असें ॥

अनुष्टुभ्

स्मरणार्थ तयाच्या ही बोलांची रानपालवी
मराठी रसिकांसाठीं ' गोविंदाग्रज ' पाठवी ॥

एप्रिल, १९१६.

## परमाणूंचें कार्यमाहात्म्य

गिरिशिखरें खरतांना त्यांतुनि कण वाळूचे पडतात,
महासागरोदरीं तेथुनी विश्रांतीस्तव दडतात;
कालमापनास्तव जन त्यांना घटिकायंत्रीं भरतात,
क्षणाक्षणासह एक एक ते खालीं भरभर झरतात.
गिरिस्वरूपा उन्नतिच्या ते करिनी देहाची घटना,
विस्तारास्तव शय्यारचना मग करणें लागे त्यांना;
झटति अनंतर अनंतांतही शोधायास्तव परिमाणा,
कालस्वरूप कालाचीही मोजिति घटका भरतांना;
निजकवनाचें मसिलेखन हें, पुसुनि न जावें क्षुद्र नरीं,
' गोविंदाग्रज ' यास्तव त्यावरि वाळूचे कण हे पसरी !

६-४-१९१६.

## क्रांहीं इंग्रजी कविता वाचून—

[ स्वयंपूर्णतेची जाणीव मुद्धां साधुवृत्तीला बाधक म्हणून म्हटली आहे. मग तिच्या अभावीं केवळ नुसत्या अभिमानाकडे पाहून आपलेपणाला काय वाटत असेल बरें ? ]

पिठांत पाणी घालुनि केलें दूध भलें निष्ठुर काळें,
पितात गरिबांचीं बाळें.

अम्हां मराठी शाहीरांच्या कवनाचा वाहे पूर,
समाधान त्यांतच चूर !

पोत घालुनी गळ्यांत फिरती भिल्लांच्या काळ्या पोरी;
कवीश्वरें चढलीं भारी !

गरिबीला बोलणें नसे हें, दोष दरिद्री गर्वाला—
हात घालि जो स्वर्गाला !

बाष्कळ बडबड ऐकुनि चित्तीं हास्याचे ध्वनि उठतात,
—आणि आंतडीं तुटतात !

खेद वाटला— तोंच आठवे बालकवीची रसवंती;
धीर जरा वाटे चित्तीं.

नव्याजुन्यांचा प्रेमळ पाइक ‘ गोविंदाग्रज ’ नमन करी—
भल्याबुऱ्यांना एकसरीं.

मे, १९१६.

## निर्दय बालेस

( चाल—- मला शांत मुनि भासतो )

अखेर झाली आतां ॥ घे हा ॥ प्रणाम जातां जातां ॥ ध्रु० ॥

जिंकुनि तुजला प्रेमें होइन दास तुझा जन्माचा
या आशेवर जीव टांगला होता या दीनाचा ॥ १ ॥

नजर जराशी तुझी बदलतां थोडा थोडा होई ॥
वेडा माझा जीव बुडविला तूं शोकाच्या डोहीं ॥ २ ॥

होतें नव्हतें त्याची केली तुझ्या ठिकाणीं पोंच ॥
जीवांच्या जाळ्यांत झेलला शब्द न पडला तोंच ॥ ३ ॥

रूप मनोहर असलें, बुद्धिहि तीव्र लाभली तुजला ॥
खऱ्या गुणाची पारख कांहीं असेल तव हृदयाला—॥ ४ ॥

वेडी आशा अशी धरुनिया धडा जिवाचा केला ॥
भल्याबुऱ्याचा भेद न तुजला, अनुभव भलता आला ॥ ५ ॥

केल्या ज्याच्या पायघड्या मीं तुझ्या पावलांसाठीं ॥
त्या हृदयाला तुडवुनि गेलिस नटव्या थाटापाठीं ! ॥ ६ ॥

जग सगळें हें डोळ्यांपुरतें, रूप जिवाला पुरतें ॥
उदार हृदया परि निर्दय जग दगडाखालीं पुरतें ॥ ७ ॥

ज्या देवानें जग हें केलें, ज्या प्रेमें हें चाले, ॥
त्या देवाला, त्या प्रेमाला, जाळिन आतां, बाले ॥ ८ ॥

जगावांचुनी लाभतीस तरि जग मीं केलें असतें ॥
तुझ्यावांचुनी जग हें आतां असून झालें नसतें ! ॥ ९ ॥

दिला तिलांजलि अश्रूंचा हा त्या प्रेमाच्या नांवा ॥
परतायाचें नाहीं आतां त्या प्रेमाच्या गांवा ॥ १० ॥

होइल होइल वाटत होतें तेंच अखेरिस झालें ॥
नांव घेतल्यावांचुन आतां मनांत झुरणें आलें ॥ ११ ॥

( अपूर्ण )

मे, १९१६.

( चाल : मला शांत मुनि भासतो )

तुटे स्नेहसंबंध सर्वस्वि आतां । टाकितां तूं असें या अनाथा ।। ध्रु० ।।

सात वर्षें, सखे ! हर्षद स्वप्न जें । पाहिलें, भोगिलें तेंच आतां ।
घोरतिमिरा निशा सहज भय देतसे । जीव हा एकला आज उरतां ।।

अश्रुधारा पहा वाहती निर्भरा । चित्त विव्हल; नसे वृत्ति शांता ।
नयनजाळीं नाहतां, त्यासवें वाहतां । पाहिना तुजविना जीव जगता ।।

जीवनव्याप हा व्यर्थ वाटे पहा । नयनविषयाच ही विश्वसंस्था ।
कांहिं नाहीं पुढें, जीव तिमिरीं बुडे । स्तिमित वा बधिर वा जात अंता ।।

नाश तरि सर्वथा होउं दे एकदां । आपदा लोपवी रे कृतांता !
कष्टला जीव हा दुःखामालावहा । शून्यता जीविताप्रति वहातां ।।

यत्न केले सखे ! रत्न तुजसारखें । कधिं तरी व्हावया प्राप्त हातां ।
अन्य घटना परी नाकळे कां करी । देव कीं दैव कीं तो विधाता ! ।।

जन्म हा व्यर्थसा होत ! होवो तसा । सर्वथा शिवपरा ईशसत्ता ।
प्रेमयज्ञाप्रति प्रथम ही आहुति । अपरिहार्यच जी जीवजाता ।।

एक आशा उरे-( तीच परि मज पुरे ) । तिजसवें जीव करि एकमयता ।
" जन्मजन्मांतरीं एकदां क्षणभरी । प्रेम लाभो तुझें शोकघाता " ।।

अनुष्टुभ्

भावोल्लेखार्थ आलेखी कष्टदें शोकनिग्रहें ।
" गोविंदाग्रज " हें बोले ! अंतिम प्रेमगीत हें ।।

१-६-१९१६, मुंबई.

कधीं ?

चित्रपटावरि रम्याकृतिच्या सीमारेषा परोपरी;
रंग कधीं वठतील परी ?

कानाला आनंद देति हे झुळझुळ गाउनि गोड झरे;
अर्थ कधीं कळणार बरें ?

अंधुक अंधुक गोड भावना डोकावति कविमनाकडे;
शब्द कधीं होतील खडे ?

सतेज वचनें देई तारा, परी लकाके नभामधीं;
खालीं येईल परि कधीं ?

झांपड पडते डोळ्यांवरती — चिंता छळिता हृदंतरीं;
झोंप कधीं येईल परी ?

प्रतिरात्रीं हीं स्वप्नें दाविति इच्छाचित्रें जीवाचीं;
सृष्टि कधीं होइल त्यांची ?

अंतर्नयनिं ही बघते आशा विश्वचि हें रम्याकार;
जगीं कधीं तें दिसणार ?

—आणि वल्लभे ! दिलींस वचनें; गोड अहा तीं कितीं तरी !
खरी कधीं होणार परी !

' गोविंदाग्रज ' जें जें आळवि कवनीं—आणिक—मनामधीं;
पटेल तें तें सांग कधीं ?

जून, १९१६.

## अंधाला दृष्टिलाभ

[ आंधळा मागतो एक डोळा आणि देव देतो दोन; कधीं कधीं हा उपकार असेल; नेहमींच मात्र नाहीं. ]

अंधपणें मी पाहत होतों माझ्या प्रेमाची मूर्ति ।।
जीवनदेवी, जी हृदयानें देई दिव्याची स्फूर्ति ।।
मम अंधत्वा वाटत होती ती सौंदर्यें अप्रतिमा ।।
अमर्याद आशेच्या राज्याचीही उल्लंघी सीमा ।।
न कळे निर्दय दया कुणाला मजविषयीं ही कां आली ।।

प्राणघातपर उपकाराची इच्छा कोणाला झाली ? ॥
अमोघगुणदिव्यांजन दुर्लभ— हाय ! तेंहि परि सांपडलें ! ॥
विनायत्न या उभयहि नयनीं नेमकेंच कां हो पडलें ? ॥
स्पष्ट दृष्टि मज अंधाप्रति ही कशी लाभली अवकाळीं ॥
सतेज निजकिरणांनीं जी मृदु जीवा जगता जाळी ॥
कृष्णवर्ण हा– प्रमाण कांहीं अवयवास या मुळिं नाहीं ॥
कुरूप दर्शनतापद असली बाला ही पुढती राही ॥
दृष्टि लाभतां मूर्तिभंग हा—मनोभंगही जन्माचा ! ॥
शतविध हानीहूनही असला लाभचि दुःखप्रद साचा ! ॥
दृष्टि लाभतां पहावयाचें असें तेंच उरलें न परी ॥
'गोविंदाग्रज' अंधत्वास्तव विलाप आतां सदा करी ॥

२५-९-१९१६, पुणें.

## प्रेमाची प्रामाणिकता

[ महाकवि बायरन् एके ठिकाणीं प्रणयीजनास असा उपदेश करीत आहे कीं, " प्रेमविषयापासून आपल्या प्रीतीची उत्कट व शरणागत उत्सुकता लपवून ठेवा म्हणजे तुमच्या इच्छेची पूर्तता होईल. " प्रस्तुत लेखकाच्या एका बुद्धिमान् मित्रानेंहि त्याच्याजवळ अशाच अर्थाचें विधान केलें होतें. या दोन्ही प्रसंगीं या लेखकाला जरा चमत्कारिक वाटलें होतें. ]

सख्या ! सांगसी बोध हिताचा चातुर्याचा तसाच हा ॥
व्यवहाराच्या परी संगती प्रीति होईना सुखावहा ॥

दळादळाची पुरी खुलावट फूल उमलतें जरी ॥
रसिक भ्रमरा तरीच वाटे गुंगावेंसें तदंतरीं ॥

मेघांआडुनि रविकिरणें जरि स्पष्ट दर्शनें नच देती ॥
फुलें खालतीं काय उमलती ? किंवा रसरंगा येती ?

मूठ झांकली लाखाची ती भरिते जरि चालू तूट ॥
दैव उद्यांचें पाहावया परि उघडावी लागे मूठ ॥

गंगास्नानें पावन व्हाया इच्छा झाली जरी मना ॥
देहावरचें वस्त्र वस्त्र तरि दूर करावें लागे ना ? ॥

प्रीतीची रसगंगा बघतां जीव विकारी असे जरी ॥
शिष्ट कल्पना त्यजुनि तयाच्या होतो आत्मा अविकारी ॥

हृदयार्पण जरि करणें आहे स्पष्ट दान तरि करावया ॥
अश्रुजलासह अर्पावें या पुण्यमार्ग एकच सखया ॥

स्वप्रेमातें लपवायाचा बोध तुझा लाभो तुजला ॥
'गोविंदाग्रज' वाहिल प्रेमा हृदयासह निजअश्रुजला ॥

१५-११-१९१६, जळगांव.

## इच्छा, उपभोग व विषय

[ या तिघांचा अन्योन्यपोषक त्रिवेणीसंगम स्वर्गात तरी असेल काय ? ]

अखंड गायन ऐकायातें पंजरांत धरिला पक्षी ।
उडती लकेर झरतां, जीवा ! नादचित्र केवळ लक्षी ॥ १ ॥

जनसंमर्दी अलभ्य शोभा पाहुनि, ठसवुनि मनिं घेणें ।
एकांतीं तच्चिंतन करणें; दुःखावेगीं विस्मरणें ॥

दिव्यदर्शनें हृदयपटावर नवरंगांनीं रेखावीं ।
आणि आंतल्या अश्रूंनीं तीं सर्वच धुवुनी काढावीं ॥

अवश्य जीवश्वसनें निर्दय निःश्वासांनीं योजावीं ।
हृदयजलानें भरतां नयनें गेली घटिका मोजावी ॥

आद्यंतींचे क्षण सोडुनिया अशेष जीवनिं या देख ।
परिस्थितीचा रंग काढितां क्षणयुग्मचि उरतें एक ॥

पहिला क्षण तो कीं ज्यावरतीं स्वप्रकाश आशा धाडी ।
दुज्या क्षणावरि तीव्र निराशा छाया प्रेतमया पाडी ॥

आयुष्याचा क्षणाक्षणाचा हिशेब केवळ हा आहे !
परंपरेला त्यांच्या दिधलें नाम मनोहर जीवन हें ॥

रंग बदलुनी खेळत राही अशा क्षणांची ही जोडी ।
स्थलकालाच्या भिन्नत्वानें नित्य नवीं दिसतीं कोडीं ॥

क्षणाक्षणाला जननमरण हें प्राणिमात्र भोगित राही ।
चौऱ्यांशीचा फेरा याविण आणिक दुसरा तो नाहीं ॥

फसव्या पाण्यावरी पोहुनी, दम कोंडुनि मरतां मरतां ।
'गोविंदाग्रज' म्हणे,-'जीविता ! लाभ तुझा नच यापरता!' ॥

२२ नोव्हेंबर, १९१६

## तीन तरी

[ जीवनाच्या काव्यांत 'जर, तर, पण, परंतु' हीं इच्छेला विरोध करणारीं उभयान्वयी अव्ययें दुबळ्या मनुष्याला विश्वनियंत्या ईश्वराशीं जोडीत असतात. ]

चल, सख्या जिवा रे, पुन्हां घरीं । कां उगाच फिरसी पिशापरी ? ॥ ध्रु० ॥

पाय लागुनी कांच तडकली । पुन्हा जोडणें कुणीं तरी,
ती कशी तरी कीं कधीं तरी ॥ चल० ॥ १ ॥

कळस देवळावरला ढळला । पुन्हां बसविणें कुणीं तरी,
तो कसा तरी कीं कधीं तरी ॥ चल० ॥ २ ॥

वेजीं उतरे मोतीदाणा । पुन्हां सांधणें कुणीं तरी,
तो कसा तरी कीं कधीं तरी ॥ चल० ॥ ३ ॥

हार घेउनी घार पळाली । पुन्हां आणणें कुणीं तरी,
तो कसा तरी कीं कधीं तरी ॥ चल० ॥ ४ ॥

लवून गेली बहार बिजली । पुन्हां पाहणें कुणी तरी,
ती कशी तरी कीं कधीं तरी ॥ चल० ॥ ५ ॥

लाट जळांतरिं पळांत जिरली । पुन्हां चढविणें कुणीं तरी,
ती कशी तरी कीं कधीं तरी ॥ चल० ॥ ६ ॥

सूर विराला वाऱ्यावरती । पुन्हां छेडणें कुणीं तरी,
तो कसा तरी कीं कधीं तरी ॥ चल० ॥ ७ ॥

पळे सपाटीवरती पाग । पुन्हां बांधणें कुणीं तरी,
तो कसा तरी कीं कधीं तरी ॥ चल० ॥ ८ ॥

घडूं नये तें घडून गेलें । पुन्हां घडविणें कुणीं तरी,
तें कसें तरी कीं कधीं तरी ॥ चल० ॥ ९ ॥

'गोविंदाग्रज' वघे सदाही । या संसारीं नवलपरी,
कीं तरीमागुनी तीन तरी ॥ चल० ॥ १० ॥

१९-४-१९१७, पुणें.

## चिन्तातुर जन्तु

"निजलें जग; कां आतां इतक्या तारा खिळल्या गगनाला ।
काय म्हणावें त्या देवाला ?—" "वर जाउनि म्हण जा त्याला." ॥ १ ॥

"तेज रवीचें फुकट सांडतें उजाड माळावर उघड्या ।
उधळणूक ती बघवत नाहीं—" "डोळे फोडुनि घेच गड्या." ॥ २ ॥

"हिरवी पानें उगाच केलीं झाडांवर इतकीं कां ही ।
मातींत त्यांचें काय होतसें ?—" "मातिस मिळुनी जा पाहीं !" ॥ ३ ॥

"पुराबरोबर फुकटावारी पाणी हें वाहुनि जात ।
काय करावें जीव तळमळे—" "उडी टाक त्या पूरांत." ॥ ४ ॥

"ही जीवांची इतकी गरदी जगांत आहे का रास्त ।
भरती मूर्खांचीच होत ना ?" "एक तूंच होसी जास्त." ॥ ५ ॥

देवा, तो विश्वंभर राहूं द्या राहिला तरी ।
या चिन्तातुर जन्तूंना एकदां मुक्ति द्या परी ॥ ६ ॥

९-११-१९१७, पुणें.

## फल ना फुलाची पाकळी

शहाजहानाआधीं मेली ख्यालिखुशाली ती त्याची।
खडा तेवढा ताजमहालच भूषा जी या जगताची ॥

चुकल्या तरुणा! वेश्याक्रीडन आज तुझें स्मरणांत नसे।
कालिदासकृत शाकुंतल परि सरस्वतीच्या कंठि असे ॥

खुनी खड्यांनीं भरले रांजण वाल्ह्याचे फुटले सारे।
उरलें रामायण तें नटवी श्रीरामा निज आधारें ॥

गोकुळांतल्या चोराचा नच गोपींना आतां त्रास।
श्रीकृष्णाची गीता उरली द्याया मरत्या उल्हास ॥

गडगडणें, काळोख, विजा हीं गेलीं वळवाच्या मागें;
अन्नब्रह्मची साक्ष तयाची द्याया हें राही जागें ॥

कांटे सुकले फांदीवरतीं– धन त्यांची झाली राना।
गुलाब देवा, तुम्हां वाहिला, गोड करुनि तो कां घ्याना ॥

दूषण वगळुनि भूषणमात्रें प्रभुपूजन करि काळ असें।
तुम्हीं आम्हीं कष्टी होणें हा कुठला मग न्याय असे? ॥

[ अनुष्टुभ् ]

'गोविंदाग्रज' अर्पी ही स्वभावें चरणांवरी।
रसिका, घ्या फूल नाहीं फुलाची पाकळी तरी ॥

२४-११-१९१७, पुणें

## एक समस्या

असे एकदां दोघे चौघे कामाला प्रातःकाळीं ॥
घरांतुनी बाहेर निघालों; घाई जाण्याची सगळी ॥

तोंच धडकली समोर येऊनि वृद्धा विधवा दारांत ॥
अपशकुन हा पाहुनि बसला त्रासिक चरका चित्तांत ॥
" वेळ साधिते कशी बरोबर पहा अशी पीडा नसती ॥
या विद्रुप अवदसा सारख्या अशा चहुंकडे वणवणती " ॥

*　　*　　*

चार पावलें पुढें सरकलों विसरुनि सारें झोकांत ॥
एक अडाणी कुणबट आलें कागद घेउनि हातांत ॥
अडवुनि बोले, " वाचुनि दावा दादा कागद हा इतुका " ॥
त्रासुनि वदलों, " बाबा, आम्हां दुसरीं कामें नाहिंत का ? " ॥
गिचमिड ओळी– भिकार अक्षर; लावित बसणें हें कोणीं ? ।
दुसऱ्या कोणाच्या पाठीवर लाद नेउनी ही गोणी ॥
येईना वाचतां तुम्हांला तरि पत्रांचा व्यवहार ॥
कां करितां मग उगाच हा अव्यापारेपुव्यापार ? " ॥
दिलें चिटोरें त्याचें त्याच्या अंगावरती टाकुन ॥
चालू झालों गप्पा मारित कांहीं कांहीं हांसून ॥

*　　*　　*

जातां किंचित पुढें आढळे– नांव न घेणें कवनांत ॥
डोकीवरती पाटी घेउनि अगदीं शेजारुनि जात ॥
त्या घाणीनें मस्तक फिरलें– रागहि आला भरपूर ॥
बोलत कांहीं आम्ही झालों त्यापासुनि आधीं दूर ॥
" इतका झाला दिवस तरी हे खुशाल अजुनी फिरतात ॥
घाण घेउनी चहूंकडे ही हवे तसे वावरतात ।
उमेट तर हे इतके असतां— बेसुवेत देतिल धक्का ॥
बंदोबस्तच या लोकांचा केला नाहीं कुणिं पक्का " ॥

*　　*　　*

जातां जातां पुढें यापुढे एक दिसे पिंपळपार ॥
तत्ताचें देवालय खालीं छोटेसें शोभे फार ॥
सुंदर तरुणी हिंडत होती त्या देवाच्या मंडपातलीं ॥
निरखुनि बघतां–हरहर ! होती विधवा ती बाल असली ॥

उचंबळुनी ये करुणारस– नेत्रहि अश्रूंनीं भिजले ।।
निर्दयता दैवाची बघुनी हृदय बिचारें तें थिजलें ।।
न्यायदेवता जागृत झाली त्या सौंदर्या बघतांच ।।
विषय दयेचा लावित नाहीं कोणाच्या जीवा आंच ? ।।
" धिग् धर्माला–धिग् रूढीला–तेतिस कोटी देवांना –" ।।
किती बोललों— नको सांगणं ! पाठ असे तें सर्वांना ।।
काम कशाचें ! धाम कशाचें ! एक प्रश्न मग हृदयांत—।।
" सुधारणा होणार तरि कधिं या दुर्दैवी देशांत ? "

अनुष्टुभ्

प्रश्नाच्या उत्तरासाठीं रसिकां जोडुनी करां
' गोविंदाग्रज ' प्रार्थी—' कीं समस्या पूर्ण ही करा ' ।।

११-१०-१९१७, पुणें.

## दैवाची निर्दयता

श्रीहरि मथुरानगरीं गेले, गोकुळ मागें तळमळतें ।
प्राणिमात्र नच केवळ, परि तें यमुनेचें जळही जळतें ।।

कळे सकळ हें श्रीगोपाळा कळवळुनी मनिं आणि दया ।
धाडुनि दिधला व्रजांत उद्धव प्रियजनसांत्वन करावया ।।

सत्वर हरिचा निरोप घेउनि उद्धव भेटे सकळांतें ।
वृत्तश्रवणा क्षणांत जमलें गोकुळ सारें त्याभवतें ।।

हें नंदाला, यशोदेस हें, कोणाला कांहीं कांहीं ।
निरोप सांगे सांत्वनपर तो; सुनें कुणी उरलें नाहीं ।।

या गोपीला, त्या गोपीला, गोड शब्द दे वांटुनिया ।
राधेला तर बहाल केली हरिनें जीवाची दुनिया ।।

प्रेमकथांच्या संस्मरणानें जल सर्वांच्या ये नयनां ।
व्याकुळ विव्हळ झाली राधा, सांवरितां हो पुरे जनां ।।

सुखदुःखांच्या मिश्र सागरीं निमग्न गोकुळ सर्व असे ।
परि दुर्दैवी एक जीव तो त्या काळीं त्या स्थळीं नसे ॥

अष्टावक्रा, काळी, कुबडी, कुब्जा तेथें नच दिसली ।
दीन बिचारी एकटीच ती कुठें तरी जाउनि बसली ॥

स्मरण कशाचें तिचें कुणाला जी बघवेना डोळ्यांनीं ।
गजबजतां जग आनंदानें दुर्दैवी पळती रानीं ॥

तोंड झांकुनी, ओंठ दाबुनी, रडे आंतल्या आंत मनीं ।
पुसुनी टाकी झणि पदरानें अश्रू आले जरि नयनीं ॥

" प्रेमळ देवा, जिवलग देवा, माझ्या जीवाच्या देवा, ।
कसे विसरलां या दासीला ? देवा हो, एकच देवा ! ॥

कशी विचारूं उद्धवजींना क्षेम तुझें या लोकांत ? ।
म्हणेल कोणी काय मला हें त्या न कळे भर आनंदांत ? ॥

सुंदर गोपी योग्य रडाया जगन्मोहना तुजसाठीं ।
परी कुठें मी ? आणि कुठें तूं ? लोकसुंदरा जगजेठी ॥

रडायासही मुक्तकंठ हा देवा रे जीवचि लाजे ।
श्रीहरिसाठीं कुब्जा रडते हेंच हंसें होईल माझें ! " ॥

अनुष्टुभ्

घडेना कार्य या लोकीं भाग्यावांचूनि कोणतें ।
हंसायातेंच न परी रडायानाहि लागतें ॥

असावें लागतें भाग्य हंसायानें न काय तें ।
रडायानेंही जीवाचें या लोकीं भाग्य लागतें ॥

२-१-१११८, मुंबई.

## फणसाचे पान

साकी

सहजचि दिसलें पायाखालीं मज फणसाचें पान ॥
सर्वंच कवनाचें हृदयींच्या चढत चाललें मान ॥

फणसाच्या त्या पानावरतीं दिसल्या ज्या मज रेषा ॥
कधींकाळच्या उघडुनि दाविति मनिंच्या आंतरवेषा ॥

लिहुनि ठेविली पूर्ववयामधिं कथा गोड जी पानीं ॥
पुन्हां वाचिली; —आणि जाहला सखेद हर्षहि रमणि !

दोनच नयनीं नीट दिसेना; अंधुक जग हें अवघें ॥
प्रीतीच्या उपनेत्रांवांचुनि –पुढें बोलणं नलगे ॥

डोळे झांकुनि भरभर फिरुनी कथा वाचिली मग ती ॥
हतभागी हे जीव जगीं या स्मरणें केवळ जगती ॥

गांव कुणाचें ?–नांव कुणाचें ?–आणि कुणाचें पान ? ॥
सरोवराला परका मधुकर करित रसाचें पान ॥

वाऱ्यासरशीं अंगावरतीं येउनि पडतीं पानें ॥
नेमधर्म त्यां कसला ? अथवा नेम देव तो जाणे ॥

सुंदर चित्रा ! मदपूर्ण ती कथा तुझी आठवते ॥
बाले ! रमणी ! प्रणयभरानें हृदय किती खळबळतें ॥

सळसळती हीं आजहि सखये, भंवतीं हिरवीं रानें ॥
'गोविंदाग्रज' परी शोधितो तीं फणशीचीं पानें ॥

१०-२-१९१८, बोरिवली.

## जुन्या कवितांची आठवण

साऱ्या त्या कविता तशाच असती; ते अर्थही त्यापरी ।
शाळाही अजुनी नवीच दिसते त्या रम्य जागेवरी ॥
**! वाहतसे भरूनि दुथडी 'उल्हास[१]' तेव्हां जशी ।
गेला वाहुनि काळ तो, सकळ तीं सौख्येंहि त्यांचीं तशीं ॥ १ ॥

१. ही नदी बोरघाटांत खंडाळ्याच्या तळ्यांत उगम पावून कर्जतनेरळहून वाहत जाऊन कल्याणच्या खाडीस मिळते.

आनंदें भरलें असें जग तसें आताहि**! पहा ।
**ही असतील त्यापरि किती लोकांत रम्य अहा ॥
प्रेमाचीं नवजीवनेंहि दिसतीं स्वच्छंद चोहींकडे ।
ज्याचें त्यास नसे तरी जगभरी शून्यत्व ये रोकडें ॥ २ ॥

बाले, दृष्टि मनोज्ञ मजवरी तूं टाकिली ज्या क्षणीं ।
गेला तो क्षण सांग सांप्रत कुठें ? हें शल्य राही मनीं ॥
काळाच्या उदरांत खोल दडला जाऊनि कोठें तरी ।
**! शोकच शेष आज उरला प्रेमांतुनी अंतरीं ॥ ३ ॥

विद्याशानिं नसे विशेष गति त्या बाल्यांत आम्हां तरी ।
प्रेमाचा पहिला धडा गिरविला निर्दोषशा मानसीं ॥
**! तीं वचनें मरून पडलीं; पद्यांत त्यां पाठवी ।
"गोविंदाग्रज" आज विव्हल मनें, **! तुला आठवी ॥ ४ ॥

१३-२-१९१८, बोरिवली,

## माझा मृत्युलेख

यावज्जीवहि 'काय मी' न कळलें आम्हांप्रती नीटसें ।
मित्रांनेंहि कळे न गूढ — न कळे माझें मलाही तसें ॥
अज्ञाता ! मरणोत्तर प्रकट नें होईल तूंतें कसें ॥
कोठें आणि कधीं तरी जगातें मी होऊन गेलों असें ॥ १ ॥

An April Fool's Work. १-४-१९१८.

# गोफ

[ घटनेपेक्षां विघटना सुकर असते, हा व्यवहारी जगाचा सिद्धान्त आहे. हृदयाच्या ब्रह्मांडांतहि ज्यांना हेंच सत्य पटलें आहे, ते भाग्यशाली ! ]

पदर आणिले तुझे कांहिं तूं, माझे आणीं मीहि तसा ॥
हांसत खेळत गोफ गुंफिला, कळलें नाहीं कधीं कसा ॥ १ ॥

एकामेकांभंवतीं फिरतां, गिरकी जीवांना आली ॥
चढत चालला खेळ जसा तो, नजरहि धुंद तशी झाली ॥ २ ॥

कुणीं निंदिलें, कुणीं वंदिलें, कुणि हंसलें, रडलेंहि कुणी ॥
नाहिं पाहिलें आम्हीं तिकडे, विश्व बुडालें प्रेमगुणीं ॥ ३ ॥

परि दैवाचा खेळ निराळा —खेळ नकोसा तुज झाला ॥
ज्या खेळानें जीव रंगला, त्याचा कंटाळा आला ॥ ४ ॥

गोफ गुंफिला उलगडण्याचा कठिण काळ येउनि थडके ॥
हाय, वदावें काय ? जिवलगे, ऊर तेवढा हा धडके ॥ ५ ॥

हळूहळू ओढणें हळु जरा ओढायाची कां घाई ? ॥
भलता धागा ओढितांच तूं, जीव जिवलगे. हा जाई ॥ ६ ॥

थांब, उलगडूं गोफ कठिण हा शांत बुद्धिनें सखे असा—॥
कीं न तुटावा पदर एकही, धागा धागा नीट तसा ॥ ७ ॥

ना तरि होईल हानि आपुली आणि जगाचें हंसें तसें ॥
एक्या ठायीं आलों कां वद दूर व्हावया सखे असें ? ॥ ८ ॥

कठिण असे, तरि उलगडणें हा गोफ असे आतां भाग ॥
ना तरि त्याचा पीळ राहुनी छळील तो जागोजाग ॥ ९ ॥

मनापासुनी जें केलें, जें मान्य जिवांनाही झालें ॥
विमनस्कपणें परी आज तें निस्तरणें नशिबीं आलें ॥ १० ॥

कठिण जोडणें, परी तोडणें सुकर वाटतें जनांप्रती ॥
उलटा अनुभव आला आम्हां, गुंग जाहली इथें मति ॥ ११ ॥

अनुष्टुभ्

खेळतां गुंफिला गोफ, जीव त्यालागिं वाहिला ॥
' गोविंदाग्रज ' सांगेना -- कीं त्याचा पीळ राहिला ॥

## एक शंका

नाहीं राहत वास-लेश कुसुमीं कोमेजतां तें त्वरें,
होतें पात्रहि कोरडेंच घडिचा तो पूर जों ओसरे,
कां प्रेमस्मृति राहते हृदय हें दुःखें दुभंगे तरी ?
आशा वावरते उगाच मग कां ही माझिया अंतरीं ?

मराठी ग्रं... ग्रा. क... कार्य... संग्र, शाळा

## हुरहूर

काळोखामधुनी पल्याड न दिसे या रात्रींचा शेवट,
आणी मोहकता तिला तरि कसा दुष्प्राप्य तारागण ?
अज्ञेयांतुनि आरपार न दिसे दिक्काल यांचा तट,
चित्ताच्या नयनीं दुरून खुपती कां दिव्य आशाकण ?
मी श्वासाज धनी, अखंड फिरतो वारा भरारा जरी,
आधीं बारिक वाडगें तरि तया हीं कुंपणें घातलीं !
या वाऱ्यावर बांधणार कधिं मी उंची मनोरे परी ?
केव्हां नांगरणार ताल उवडी ही माळरानांतली ?
जें दृष्टीस दिसे न, तेंच पटुनी वाटेल चित्ता कधीं ?
बुद्धीला जिरवीन भावजलिं कां ?—आशा न मातें दुजी
तेजाला हुडकीन कां लपलिया या अंधकारामधीं ?
केव्हां मस्तक लोपुनी हृदयिं या होईल उंची खुजी ?
माझें होइल सर्व हें कधिं, मला जें आजला पारखें !
माझें चित्रच नाचवीन नयनीं माझ्या कधीं सारखें ?

प्रेमाचे ते जीव || दयाळा || आज कुठें दाखीव ||
काय न ये तुज कींव || ध्रु० ||

प्रेमरसाचे हृदयभूवरीं वाहत होते पाट ||
पाट कोरडे आज; खडकाची चिखलाचे घनदाट || १ ||

प्रेमनदीसह आज बाळपण वाहुनि गेलें दूर |
जें सुखकारण तेंच दुःख दे; स्मरण लावि हुरहूर || २ ||

अश्रु वाहती, दुःखस्मृतिचें मूर्तरूप हें जाण ||
शोधुनि बघतां त्यांत जीव ते, नलगे ठावठिकाण || ३ ||

नवतेचा वाहेर आड हा ! स्मृतिची हृदयिं विहीर |
दीन मनानें कुठें लपावें ? प्रभो, तुटे रे धीर || ४ ||

दुःखद जीवन आज कठिनीं; पुढेंहि दिसतें तेंच ||
अमृतसुखाचा बाळकाल तो; प्रभु, ने मज मागेंच || ५ ||

प्रेमनदीचीं पात्रें हृदयीं वाळुनि झालीं कोळ ||
नातरि त्यांतचि जाउनि मरतों करुनि जिवाचा घोळ || ६ ||

तारुण्याचें सौख्य निराळें असे जरि बहु तें गोड ||
बाळसुखाच्या स्मृतिचीही तरि अधिक जिवाला ओढ || ७ ||

या सौख्यातें सेवित असतां सेवनींहि ये वीट ||
त्या सौख्याची दुःखस्मृति तरि; दगडाहुनि मज वीट || ८ ||

हृदयस्मशानिं मृत लीलांना जाळुनि केल्या खाक ||
दीप स्मृतिचा जळक्या जागीं दावित आतां राख || ९ ||

प्रेमळ नातीं, सुगंधि सुमनें शिशुतालनिकेचीं ||
दाब मनाचा फत्तर त्यांवर सुख हें अत्तरचीं || १० ||

फार सुगंधी अल्पजीवि तरि क्षणांत उडुनी जात ||
स्मृतिरूपानें किंचित पसरे मिसळुनि या पवनांत || ११ ||

मायेची ही जादू जमवी त्या चंचल पवनास ॥
स्मरणसृष्टि ही दिसे एकमय चित्ताच्या नयनास ॥ १२ ॥

अहा ! तेच हे जीव लाडके ! जमुनी त्यांचा मेळ ।
अवकाशाच्या रंगावरि करि बाळपणाचा खेळ ॥ १३ ॥

स्मरणसृष्टिचा असा पसारा अद्भुत देवा फार ॥
जडसृष्टीचें जाळुनि गाळुनि काढियलें जणुं सार ॥ १४ ॥

अवकाशाचें राज्य तयांना; इच्छेचा अवतार ॥
जीव विदेही, खूण पटवि तरि वायूचा आकार ॥ १५ ॥

भूतकाळच्या रेषा गिरविति; एकच काळ तयांस ॥
एकच; तोही सान्त काळ; स्मृति अडवी त्याचे तास ॥ १६ ॥

उडविति घडलें जें जें, जोंवरि जीवाची हो सुटका
भविष्यकाळा वाव न; त्याचा कडा दिसतसे तुटका ॥ १७ ॥

जडसृष्टिचीं चित्रें वठलीं का हीं आकाशांत ॥
कीं वायूवर ठसा उमटवी घडलेला वृत्तान्त ॥ १८ ॥

अथवा प्रसंग ते नयनांनीं गिळिले जे घडतांच ॥
निजकिरणांनीं तेच उगळिले बसतां हृदया आंच ॥ १९ ॥

भिन्न कालिंचे, भिन्न स्थलिंचे जीव दिसति हे सांग ॥
ओळख त्यांची परस्परांना पटते का रे सांग ॥ २० ॥

अनुभविति का गतलीलांतें फिरुनि तेच हे जीव ॥
अवताराची अपुल्या त्यांना आहे का जाणीव ? ॥ २१ ॥

स्मरणसृष्टिला पटे खूण जरि तरि मजश्री दीनास ॥
स्मृतिरूपानें तींत रमूं दे; फिरुनि टाकि देहास ॥ २२ ॥

माझी सृष्टिच जातां झालों जिवंतपणिं मी भूत ॥
बांधितसे मज येथें नसत्या आशेचें हें सूत ॥ २३ ॥

तोडूनि त्यातें, ने मज देवा, त्या भाझ्या मिलांत ॥
नको जाळुं हा देह यापरी जगताच्या सत्रांत ॥ २४ ॥

## एकच मागणें !

आहे जो विधिलेख भालिं लिहिला कोणास तो नाकळे ॥
आहे जो सुखदुःखभोग नशिबीं, कोणास तो ना टळे ॥
आहे जीविन हा हिशेब सगळा—हा बोध चित्तीं ठसे ।
देणें हें गतकालिचें सकळही सव्याज देणें असे ॥ १ ॥

आशा मावळल्या; समूळ तुटले हृद्बंध नानापरी ।
इच्छा केवळ दुःखदा, अनुभवें हें बाणलें अंतरीं ॥
आतां एकच मागणें तव पदीं, देवा, असे एवढें ।
संसारीं मिळतां न तें, मन सदा शोकाग्नितापें कढे ॥ २ ॥

आतां दुःख नको, नकोच सुखही, होणार होवो सुखें ।
इच्छा वावरती मनांत, तरि हीं केलीं मुकीं तन्मुखें ॥
" जें कांहीं घडतें मदैव तुझिया इच्छाबळें तें घडे "
ऐसें जाणुनि सोसण्यास मज तें सद्धैर्य दे तेवढें ॥ ३ ॥

## सुखदुःख

" सुखदुःखांच्या द्वैतामधुनी दुःख सदा वगळावें;
सुख सेवावें, " हीच वासना सामान्यांची धांवे. १

एक पायरी चढतां वरतीं मानवता मग बोले,
" सुखदुःखांची समता आहे; एकानें नच जग चाले. " २

सदा भरारी गगनीं ज्यांची ऐसे कविवरही वदती,
" संसाराच्या गाड्याचीं हीं दोन्हीं चाकें जणुं असतीं ! " ३

परि सुखदुःखां पुढें टाकुनी, वदतां " घे जें रुचे तुला, "
अचुक सुखाला उचली मानव; दुःखा त्याची न ये तुला. ४

यापरि जगतीं सुखदुःखांचें खरें मर्म ना कळे कुणा,
रुचे मला तर दुःख सुखाहुनि; वेडा वाटे तरी म्हणा ! ५

सुख निजभोगीं नरा गुंगवी विसर पाडितें इतरांचा,
दुःख विलगतें थेट जिवाला; ध्वज फडकवितें समतेचा. ६

सुख उद्दाम करी आत्म्याला ओळख ज्याची त्या नसते,
कोण कुणाला पुसनें जगीं या दुःख जरि मुळीं ना वसतें ! ७

गर्भवासगत अंधपणानें दिशाभूल होवोनी,
परक्या ठायीं आत्मा आला स्वस्थानातें त्यजुनी. ८

परमात्म्यापर्यंत तयाला पुन्हां असे जें जाणें,
नांव तयाला दिलें गोडसें कीं ' जीवाचें जगणें. ' ९

परि ' जगणें ' ही मुदत ठरविली मूळपदा जायाची
सदा चालतां आत्मा तरिही मजल न संपायाची. १०

इष्ट पदा ने दुःखभोग हा प्रवास आहे आत्म्याचा
विश्रांतीचा मुकाम अगंतिक काळ जात जो सौख्याचा. ११

दुःख असे कर्तव्य; तयाची जाणिव पटते जीवाला,
इंद्रियांस वरच्यावर शिवुनी सौख्य जातसे विलयाला. १२

मजल मारणें इष्ट जयाला ठरलेल्या मुदतीमाजीं
प्रवास दुःखांचा भोगाया त्यानें व्हावें राजी. १३

## अवेळीं ओरडणाऱ्या कोकिळेस

[ मध्यरात्रींच्या सुमाराला कोकिळेचा शब्द, विषण्ण निराश हृदयाला किती सांत्वनपर वाटतो, याची सुखनिद्रित मनाला साक्ष पटणार नाहीं. ]

अवेळ तरिही बोल, कोकिळे, अवेळ तरिही बोल !

रात्र पसरली जगतावरनी,
मुके काळे मेघहि फिरती,
वारा वाहे भरभर भंवतीं,
बालचंद्रचंद्रिका बावरी गोरीमोरी होत.

उदासीनता छाया पसरी,
सृष्टि दिसे जरि वरुनी हंसरी—
खिन्नताच जरि अंतरिं सारी,
व्यर्थ बोलतो, व्यर्थ डोलतो संसाराचा गोल !

आनंदाच्या प्रातःकाळीं,
दिवसाच्या गजबजल्या वेळीं,
किंवा संध्या जेव्हां नटली,
आनंदाचीं गाणीं गाया गवई लाखकरोड !

असतां आनंदाची माया,
वृद्धि क्षणभर तिची कराया,
लागे ज्याचा तोच गावया,
आनंदाला द्विगुणित करिती आनंदाचे बोल !

परंतु जेथें उदासीनता
व्याकुळ करिते विषण्ण चित्ता,
तेथें त्याला द्याया समता—
गाणें गावें, हेंच अलौकिक ईश्वरतेचें काम !

बाह्य सृष्टि जरि निद्रा भोगी,
अंतःसृष्टि तरी हतभागी;
उडते तशीच राहुनि जागी,
निजवाया तिजलागीं असलें गाणें गाई गोड !

अवेळ येथें कसली बाई ?
दुःखसांत्वना गा केव्हांहि !
अनुकंपेला नियम न कांहीं !
रित्या मनीं या ओत सूर; त्यां जाऊं दे अति खोल !

वळवाचा ह्या वारा गार
झोंबुनि पीडा देई फार,
येत गवाक्षांतुनि अनिवार;
येतां जातां सूर काढितो भलभलते भेसूर !

खिन्न चांदणें ढगांआडचें
भग्न मनोरथ झाले ज्याचे—
हंसें जणूं तें अशा मनाचें,
पुष्पवतीच्या तोंडावरची छाया काय उदास !

या अवकाळीं—या एकान्तीं,
निद्रेची मिळवाया शांति,
थकुनी भागुनि पडलों अंतीं,
निद्रा कुठली परि त्या हृदया, भविष्य नाहीं ज्यास

हातीं संसाराची माती,
मनिंच्या आशा मनींच खाती,
भूतकाळचीं भूतें रडतीं !
मिटल्या जाग्या डोळ्यांपुढतीं शून्याचें मैदान !

निष्प्रेमाची शेज सोबती,
भयाण दुनिया सारी भंवतीं,
विवष्ण येती विचार चित्तीं,
बाह्यांतर विश्वांत खेळते उदासीनता एक !

गा तर चित्ता मम रमवाया;
हीच खरी जादूची माया;
आनंदा खेळविणें वाया.
मशाल दिवसां लावुनि होतो लाभ कुणाला काय !

दूर कराया उदासीनता
गाच गडे ! अंगाई गीता,
झोंप येउं दे माझ्या चित्ता,
लक्ष लागतें सुरांकडे तव; वाटति ते बिनमोल !

पाहुनि ही तव दयाशीलता
द्रवेल कोणी भगिनी माता,
शांत कराया हताश चित्ता—
रुक्ष जगावर स्त्रीहृदयांतिल टाकिल अश्रू एक !

त्या अश्रूंच्या शीतलतेनें
भोंवतालची आग जाळणें,
निद्रा घेतां शांत मनानें
' गोविंदाग्रज ' ऐकत राहिल गुंगींतहि हे बोल !

कोकिळे ! अवेळ तरिही बोल !

## 107 एकान्त

शांत शांत असि बाह्यसृष्टि जरि चोंहिकडे शांत,
हृदयिं करी थैमान मारखा भयाण एकान्त.

क्षणामागुनी क्षण जाउनियां संतत वय वाढे;
देहहि वाढे त्यासहि परि नच हृदय तसें निधडें.

क्रमाक्रमानें नैराश्याचे कडे तयावरतीं
कोसळले किति, तरि, कोमलता होईना कमती.

एकामागुनि एक सारखे होउनि आघात
घाव तयांचे अजुनी ताजे तसेच हृदयांत.

महती आशा, तीव्र निराशा, द्वंद्व हृदयिं करिती;
एकीमधुनी दुसरी निपजे, खळ नाहीं कशि ती.

त्या दोघींचें हृदयभूमिवर समर सदा चाले;
काळ लागला जो त्या समरा जीवन तें झालें.

कडा कडा पडतांना तुटुनी आघातासरसें
हृदयाचें या झालें जाळें राम न त्यांत असे.

तुटतां तुटतां जाळें झालें; भिन्न भिन्न तारा;
तशांतुनीही जोडी त्यांना नशिबाचा तारा.

पुढें निराशा तोडित जाई हृदयाचें सूत;
निर्जिव तरि त्या बांधित मागुनि आशेचें भूत.

तुटतां तुटतां असें आजवर तुटे न कां पार ?
अशा धोंगडीवर हृदयाला कसला आधार ?

नव्या दमाची कोमलताही तशीच का राही ?
नैराश्याच्या दगडासम ती कठिण कां न होई ?

अजुनी पडतां नवा निराशाघट हृदयावरतीं
पहिल्याइतके खोल घाव हे कां त्यावर बसती ?

जरा कुठेंसें कोमलतेहुनि हृदय होइ दूर,
तोंच कशाला प्रेमाची ही लागे हुरहूर ?

दुःखामागुनि दुःख भोगुनी मन फत्तर बनतां,
कधींच मेलें प्रेम; पुन्हां तें निपजे कां आतां ?

सहवासानें, अभ्यासानें तीव्र निराशेच्या,
विसरत होतें हृदय भावना सौख्यकल्पनेच्या.

हृदयशारदे ! तशांत टाकिसि उडी कशाला गे ?
भविष्यचिंतानें मृत आशांची मना कशा लागे ?

न कळतांच मज कसें हृदयिं तूं बसविलेंस ठाणें ?
वश न कुणा जें मन तें वश तुज कसें कोण जाणे ?

पडक्या भिंताडावर हृदयीं कळस उंच असला;
कसें करावें ? हृदयशारदे ! वसूं नये बसला !

ढळला, चळला, तुटला, फुटला, कीं पडला झडला;
सहन करावा कसा पात तो ? जीव इथें अडला.

चढती, पडती; पुरे, सुखाचा पुरे पाठलाग;
नको दिवस तो रात्र धांवते ज्या मागोमाग.

तुझी उपजती आशा मनिंची मनींच चिरडावी ?
कीं विसरुनि अनुभवा, एकदां पुन्हां धांव घ्यावी ?

निराशेंतुनी प्रवास इतका पडला जो पार;
परतावें कां त्यांतुनि फिरुनी बिकट जरी फार ?

पूर्वसंचिता ! वद कायमचा का तो सरणार ?
किंवा नशिबीं पहिल्यापासुनि पुन्हांहि येणार ?

सहज जोडिला मित्र तोडितां कष्ट होति फार;
एक तोडितां सखा जिवाचा एक जीव ठार.

प्रेमाची एकदां पुरी जी झाली मनिं होळी,
विसरावी ती किंवा घ्यावी कायमची झोळी ?

भवाब्धिमधुनी कशीबशी जी निघते वर मान
पुरती काढावी तों धरुनी असेंच अवसान ?
किंवा ताळिंच्या रत्नांसाठीं द्विगुणित उत्साहें
पुन्हां बुडी मारावी खालीं ? शंका मनिं आहे.

सरतां प्रवास नैराश्याच्या भलाबुरा झाला;
म्हणविल का तो भावि कालचा परी बरा त्याला ?

अशा भावना जीवांभंवतीं घालितात वेढा;
कोण त्यांतुनी काढिल होतां ज्याचा तो वेडा ?

आधीं आशा तुटतां सुटलें बंधन जगताचें;
उदास हृदया वेड लागलें चढत्या कवितेचें.

शब्दशारदा परि तुज लाजुनि आज दूर झाली.
हृदयशारदे ! तुझ्या निशाणा प्रेम घाव घाली.

अशा विचारें तुझी मूर्तिही परि होतां दूर,
खराखुरा एकान्त करी हा हृदयाचा चूर.

कशा भोंवतीं तरि गुंगावें हा हृदयाचा धर्म;
कविता गेली, तूंही जासी, ओढवलें कर्म !

पूर्वीं जग अंतरतां हृदयीं कांहिं तरी होतें;
परि या कालीं तूं त्यजितां मग काय तिथें उरतें ?

अनुभवितों हा, हृदयशारदे खराच एकान्त;
भीत भीत आत्माहि बावरे भयाण हृदयांत.

स्थापन करि तव मूर्ति पुन्हां ही हृदयमंदिरांत;
तुजवांचुनि एकटा फिरावा जीव कसा त्यांत.

एकान्ताचें हृदयिं माजलें, सखि ! जें थैमान,
जीव बिचारा जाइ न त्यामधिं; शून्य हृदय जाण

आण ह्या मनिं हृदयशारदे, चल ये हृदयांत;
शंका विवेक दूर, मरूं दे; दे मजला हात.

चल धांवुनि ये; नको असा हा भयाण एकान्त;
' गोविंदाग्रज ' वेडा तुजविण; करी तया शांत !

## प्रेमाखातर

[ प्रेमनिराशेमुळें हेतुशून्य व हताश झालेल्या मनुष्याला पुन्हां प्रेमाचा आधार सांपडला म्हणजे नवा जीव लाभतो. असा एक प्रणयी पुरुष पावसाळ्यांत आपल्या प्रेमळ संजीवनीला भेटावयास निघाला असतां त्याच्या मित्रानें त्याला न जाण्याचा उपदेश केला आहे, व त्या उपदेशाला त्या प्रणयी पुरुषाचें हें उत्तर आहे, अशी या गाण्याची कल्पना आहे. ]

प्रणयदर्शना जातां मित्रा, न करी उपहासा,
नको थांबवूं मजला, मानुनि खोल हृदयहासा.

कसले डोंगर ? नद्या कशाच्या ? हीं विघ्नें कसलीं ?
प्रेमपथावर तारकींच हीं जरि असलीं नसलीं.

हृदयदेवतादर्शनिं आतां ओढ जिवा लागे;
चला थांबवा त्याला, पाहूं फिरतो का मागें.

मार्गीं डोंगर नद्या पाहुनी घे पळता पाय;
असें निरर्थक निर्जिव माझें प्रेम असे काय ?

नव्या दमाचा, नव्या जयाचा, ज्याचा अवतार,
त्या प्रेमाचा वीर करारी काय न करणार !

हटतिल डोंगर, तटतिल सरिता ना आपोआप,
झटतिल मेघहि साह्य कराया धरुनि इंद्रचाप !

गिरिशिखरांची पडेल खालीं मोडुनिया मान;
प्रेमापुढतीं सांग कुणाचा टिकतो अभिमान ?

नव्या दमाचा, नव्या जमाचा, त्याचा अवतार
पाहुनि करितिल नद्याच त्याला स्वयें पैलपार.

जो निजहृदया फाडित चपलाप्रिया खेळवाया,
वृष्टि कशी ती मेघ करिल, वद, मला थांबवाया ?

तोच आपुल्या पंखांवरि मज वाहुनि नेईल;
निदान मार्गी मला विजेचा दिवा दाखवील.

प्रेमें बोले, प्रेमें डोले, प्रेमें जग हाले;
प्रेमाखातर जगीं आजवर काय नाहिं झालें ?

गिरितट फोडुनि नद्या कशाला धांवतात ? सांग.
लता तरूविण सांग कुणाचे फेडितात पांग ?

संध्याहृदयीं रमावयाला सूर्य धांवतो ना ?
नातर गगनाच्या पड्यावर भटकवेल कोणा !

प्रेमासाठीं, रामापाठी सीता वनवासी;
वृंदेस्तव हरि स्मशानांतला वृंदावनवासी.

रघुवीरांनीं जलनिधिवरती पर्वत नाचविले;
सांग कोणतें संकट दुसरें त्यावरि ओढवलें !

गोपिजनांच्या करुणरवाच्या ऐकुनिया ताना,
कसा नखावरि गोवर्धन धरि गोकुळिंचा कान्हा ?

पुराणांतल्या कथा कशाला ? पहा आजकाल !
नाचतसेना हवें तसें जग प्रेमें बेताल ?

कां ब्राह्मणपदपादशहाला राणी मस्तानी ?
कां धर्मावर लाथ मारिली पंडितरायांनीं !

ब्रिजभाषेचा प्रेमवाल्मिकी प्रेतावर तरला;
सांग तयाला प्रेमावांचुनि कोणीं हात दिला ?

नजर गुंतली तुझी तरी कां तिकडे त्या नयनीं ?
तसाच इकडे या नयनांस्तव मी बसलों ध्यानीं.

सतीदेवता पतिसह गेल्या रचुनि अग्निशय्या;
प्रेमावांचुनि धीर कवण दे दुसरा लढवय्या ?

तलवारींच्या धारेवरतीं जीवांचा नाच,
रणशूरांनीं कां केला ? जा विचार त्यांनाच.

प्रेमाचा हा प्रभाव असला अखंड बा चाले;
तशांत हें तर निराशेंतुनी प्रेम जन्मलेलें !

नव्या दमाचा, नव्या जमाचा, ज्याचा अवतार,
त्या प्रेमाचा वीर करारी काय न करणार ?

## पुनर्जात प्रेमास

प्रेमा ! उठ— चल उघड, झाकली मूठ !

तुंबळ सागर तव खळबळला,
हृदयीं तटवू त्यास कशाला ?
जगभर लाटा उधळायाला
दिली तुज सूट—चल उघड, झाकली मूठ !

कोंडुनि असला सागर धरिला,
माझा मूर्खपणा मज कळला,
मिळतां स्थल तुज नाचायाला
करीं रे लूट— चल उघड, झांकली मूठ !

क्षणभर वाटत होतें मजला,
कीं तव ओघ आटुनी गेला,
परि जो अखंड भरला त्याला
कशाची तूट ? — चल उघड, झाकली मूठ !

उगवे सूर्य काल मावळतां,
फिरुनी फुलतें फूलहि मिटतां,
प्राणजीवना, तुजही शिवतां,
मरण हें झूट— चल उघड, झाकली मूठ !

द्वेषावरतीं, दुःखावरतीं,
फिरवी तुझ्या यशाची महती,
जा, जा, नाच सर्वहि जगतीं,
धांव बेछूट— चल उघड, झाकली मूठ !

विसरुनि जाऊं अनुभवजाला,
तुडवूं पायीं चल खेदाला !
टाकूं जाळुनि नैराश्याला !
दुःख सब झूट ।— चल उघड, झाकली मूठ

तुझिया श्वासाच्या उद्गारें
टाकूं भरुनी जग हें सारें,
एकच नादें करूं आतां रे,
सुखाची लूट— चल उघड, झाकली मूठ !

मी तूं दूर न राहूं आतां,
दाखवुं शक्ती अपुली जगता,
आणूं परमेश्वरही हातां,
ऊठ रे ऊठ— चल उघड, झाकली मूठ !

## प्रेमाचा प्रलयकाळ

[ बुद्ध, तुकाराम, ख्रिस्त, नानक यांच्या मनाचें गाणें असेंच असावें. ]

चला चला रे चला चला ।। विसरुनि विश्वा चला चला ।। ध्रु० ।।

पूर लोटला प्रेमाचा ।। प्रलयकाळ हा विश्वाचा ।।
लोट सारखा उचंबळे ।। आतां कसला ओघ खळे ।।
स्वार्थाचे तट हे फुटले ।। चहूंकडे पाणी सुटलें ।।
फुटकी होडी ।। टाका उपडी ।।
सोडुनि साऱ्या मोहाला ।। चला मिळूं या ओघाला ।। १ ।।

अलोट प्रेमाचा पूर ॥ धरणें करि सारीं चूर ॥
विश्व बुडालें पाण्यांत ॥ या प्रळयाच्या लाटांत ॥
अथांग पाण्याचा अंत ॥ जाणि एक तो भगवंत ॥
पाणी इकडे ॥ पाणी तिकडे ॥
पाणी पाणी चहूंकडे ॥ आतां लपवतां कुणीकडे ॥ २ ॥

खडक बुडाले गर्वाचे । विरले डोंगर रागाचे ॥
खंदक जिरले द्वेषाचे ॥ कडे मोडले त्वेषाचे ॥
जीव कोंडला आशेचा ॥ श्वासचि बंद निराशेचा ॥
प्रेमजलाचा ॥ हृदयरसाचा ॥
सागर करि तांडव नाच ॥ प्रलयकाळ तो बा हाच ? ॥ ३ ॥

दिशा दहाही खळवळल्या ॥ सीमा त्यांच्या विरघळल्या ॥
त्रिवेणिसंगम काळांचा ॥ मागेंपुढें न व्हायाचा ॥
रजनीचा पडदा धुतला ॥ दिवसाशीं तन्मय झाला ॥
पांचहि भूतें ॥ पंचत्वातें — ॥
गेलीं; गिळिलीं प्रेमजळें ॥ त्रिगुणांचा रंगहि निवळे ॥ ४ ॥

पाण्याच्या चढत्या लाटा ॥ उचंबळति बारा वाटा ॥
पृथ्वीसूर्य ग्रहगण तारे ॥ बुडबुडेच त्यांवर सारे ॥
प्रकाश वरचा फेस असे ॥ तिमिर नीलिमा आंत नसे ! ॥
एकाकारें ॥ विरलें सारें ॥
पहा पहा रे पहा पहा ॥ प्रळयाची ही मौज अहा ! ॥ ५ ॥

पाहणार परि कोण उरे ॥ जेथें सर्वचि विश्व मुरे
हृदयाचें पिंपळपान ॥ आत्मा माझा भगवान ॥
बाळरूप निजलें शांत ॥ उठविल त्याला कल्पांत ॥
चला तोंवरि ॥ आपण सारीं ॥
प्रेमाच्या या प्रळयांत ॥ उडी घालुं या निमिषांत ॥ ६ ॥

जन्म इथें मरणा जाई ॥ जन्म इथुनि मरणा नाहीं ॥
सर्वांवर फिरतां पाणी ॥ कोणास्तव रडणें कोणी ? ॥
हृदयसागराच्या लहरी ॥ पोहत आत्मा तयांवरी ॥

विश्व बहिरलें ॥ विश्व महिरलें ॥
प्रेमजलाचा भडिमार ॥ करि जीवा गारीगार ॥ ७ ॥

चिरविश्वाचा अवतार ॥ या पाण्यामधली गार ॥
विरुनि जाऊं द्या एकसरें ॥ जिरुनि जाऊं द्या प्रेमभरें ॥
' समा ' होऊं द्या भरतीची ॥ एकसारखी चढतीची ॥
अखंड राही ॥ अखंड वाही ॥
प्रेमसागरा ! तव भरती ॥ चढवि सदा वरनीं वरतीं ॥ ८ ॥

प्रेमसागरा, तव लहरी ॥ उडवी अजुनी वरीवरी ॥
अफाट लाटा नाचीव ॥ ब्रह्मनाद तो ऐकीव ॥
लाटांचे देऊनि झोके ॥ काळाचीं मिळवी टोकें ॥
या बाजूला ॥ त्या बाजूला ॥
कुठेंहि मग मी पडे जरी ॥ सर्व सारखें मला तरी ॥ ९ ॥

थांबवील असला पूर ॥ कोण असा आहे शूर ? ॥
अनंतास देउनी वळसा ॥ ब्रह्माच्या जाइन कळसा ॥
विश्व बुडे मम हृदयांत ॥ पूर्ण हरपलें अंशांत ॥
बोलत जय जय ॥ डोलत थय थय ॥
अनंततेच्या पलीकडे ॥ प्रेमप्रळया, जाच गडे ॥ १० ॥

गाणें माझें प्रळयाचें । कुठलें तें संपायाचें ॥
प्रळयाच्या लाटा उडती ॥ गाण्याचीं कडवीं चढतीं ॥
ब्रह्मस्थितिची शून्यगति ॥ तिच्यांतुनिहि गाणीं निघतीं ॥
स्वानंदाच्या— ॥ ब्रह्मपदाच्या— ॥
पूर्णपणाच्या पैलथडी ॥ गाण्याची जाईल उडी ॥ ११ ॥

ब्रह्महि स्वपदिं हालेल ॥ गाणें तरि हें चालेल ॥
शून्यकल्पनेहुनि खोल ॥ प्रेमप्रळयाचे बोल ॥
नका थांबवूं प्रेमाला ॥ नका थांबवूं गाण्याला ॥
हृदयचि हरलें ॥ शब्दहि सरले ॥
निःशब्दांच्या नादभरीं ॥ गाणें ऐकत रहा तरी ॥ १२ ॥

टाकुनिया चिद्राजीव ।। प्रळयामाजीं द्या जीव ।।
अचेतनाच्या गुंगींत ।। ऐका प्रळयाचें गीत ।।
मृतविश्वाचें तेरावें ।। कडवें चालें तेरावें ।।
कोणी निंदा ।। कोणी वंदा ।।
प्रेमप्रळया प्रेमरसें ।। 'गोविंदाग्रज' गात बसे ।। १३ ।।

## लांडोर

[ मोर नाचतो तशी लांडोर नाचते याचा अनुभव बिचाऱ्या तेजस्वी मोराला येतच असतो; लांडोरीला त्या म्हणीचा अर्थ कळून चुकला तरी उपयोग होत नाहीं; एकूण हें गाणें फुकट आहे. ]

नाचतां मोर ।। नाचते पहा लांडोर ।। ध्रु० ।।

कोठें त्याचा भव्य पिसारा ।। कोठें रंगाचाहि पसारा ।।
कोठें थाटमाट तो सारा ।। कुठें ही चोर ।। नाचते ...।। १ ।।

त्याचा आनंदाचा नाच ।। दिवे लाविले जाळुनि पाच ।।
कोठें हिरा कुठें ही कांच ।। तरिहि समोर ।। नाचते...।। २ ।।

जगांत कसरत चाले थोर ।। तारेवरतीं नाचत मोर ।।
पायीं अपुल्या कच्च दोर ।। तरिहि छिचोर ।। नाचते... ।। ३ ।।

कच्चा कुचका तो आधार ।। केव्हां तुटुनि जाइल पार ।।
फुटतां आत्र हसतिल चार ।। नसे हा घोर ।। नाचते ... ।। ४ ।।

जेथें तेथें प्रकार हाच ।। नाच न नुसत्या मोरांचाच ।।
नाचे मोर कुठें तो साच ।। बढाईखोर ।। नाचते ... ।। ५ ।।

हलतां सजीव बळकट काया ।। लागे नसतें झट चिकटाया ।।
भंवतीं भंवतीं छाया । जीव ना जोर ।। नाचते ... ।। ६ ।।

कला निसर्गामागें जाण ।। माया ब्रह्मामागें घाण ।।
छाया देवाची सैतान ।। थोरा पोर ।। नाचते ... ।। ७ ।।

सत्यामार्गें लागे भास ।। नक्कल अस्सलास हमखास ।।
तुटली मधें जरि दमसास ।। तरी बिनजोर ।। नाचते ... ।। ८ ।।

जमाव यांचा जमतां थोर ।। मोरावरही यांचा जोर ।।
चोरावरती होती मोर ।। अशी शिरजोर ।। नाचते ... ।। ९ ।।

कमअस्सल या अक्करमाशा । ताज्या रक्ता जळवा बाशा ।।
करिती जगतीं स्वैर तमाशा ।। रूप अघोर ।। नाचते ... ।। १० ।।

खोटें नाटें जगीं पसरतें ।। फारपणानें खरेंहि ठरतें ।।
खरें बिचारें दिसतें भलतें ।। मग बिनघोर ।। नाचते ... ।। ११ ।।

बघुनी प्रकार उलटा असला ।। येत जगाचा वीट मनाला ।
वाटे विनवावें देवाला ।। नको तो मोर ।। आणि ही नको लांडोर
।। नाचते ...।। १२ ।।

## गोड निराशा !

जादूची माझी बाग
तींत फुलें जागोजाग;
रम्य जरी बागाईत;
तरी तिची न्यारी रीत;
कळी कोंवळी चांफ्याची
मिटलेली ती कायमची;
जरि न कधीं उमलायाची
करिल वृष्टि तरि वासाची;

तशाच कोणी,
सूत्रावांचुनि
दिधल्या रचुनि

कुंदाच्या वेण्या दोन
मोल जिवाचा त्यां होन !

नाहीं पाणी जरि भंवतीं
तरी दोन कमळें हंसतीं;

जन्म जलामधिं कमळांचा
न्याय असे हा जगताचा;
परि या कमळांच्या रंगा
खेळे प्रेमाची गंगा !

तुमच्या जगतीं,
किरणं पडतीं,
कमळें फुलतीं,

परि माझीं कमळेंच बघा
निजकिरणीं खुलविती जगा

गुलाब होते दोन तसे,
आनंदाचे गोड ठसे;
कळयावांचुनी फुललेले
कांट्यांच्या त्रासा चुकले;
जणूं फडकती मौजेचीं
नवीं निशाणें लाजेचीं !

गुलाब असले
हांसत बसले,
मनांत ठसले,

हृदयीं धरिलें या भावा
एकतरी काढुनि न्यावा !

परी फुलें तीं जादूचीं;
लपंडाव खेळति साचीं;
रक्षण त्यांचें करणार
मनांतला जादूगार !

दिसतां हातीं लागत ना,
वेड लागलें तेंच मना;

क्षणांत फुलतीं,
क्षणांत लगतीं,
दिसतीं हंसतीं,

घेर घेतला गिर्कींचा
फेर थरकत्या फिर्कींचा
निश्चय केला जिंकाया
जादूची असली माया;
तोंडानें उडवायाचा
मंत्र हाकिला प्रेमाचा;
श्वासानें हृदयीं भरिला
मनिं वाटे आतां धरिला;

परि तो कुठला
गवसायाला !
तसाच उरला,

अधिक पसरला चहूंकडे,
तोडितांच उलटा वाढे !

यत्न मांडिला तोच पुन्हां
जीव गुलाबावीण सुना;
स्वस्थानांतुनि हलत नसे
काढावा तो वाटतसे;
गुलाब तर न मिळे मजला
परि कांटे मम देहाला !

त्या कुसुमाचे
संसर्गाचे
कांटे साचे

मांडिति अंगीं थैमान !
कांट्यांचें माजे रान !

कोण असा जादूगार
खेळ करी हा अनिवार ?
उखळ्यावरती टाकुनियां
राखी ती फुलती दुनिया
चोरितांच वाटे ऐशी !
चोरीची थट्टा खाशी !
    चित्त शरमलें
    जरी विरमलें
    तरिही रमलें;
चोरी असली लाजेची
वाटे त्याला मौजेची !

अशी निराशा भरे मनीं
शरीर भरलें कांट्यानीं
गुलाब मज हांसत बसला
हाताशीं नाहीं आला;
नवल तरी कैसें होई—
दुःख निराशा नच देई !
    न कळे कांहीं,
    हुरहुर कां ही ?
    वेचें मनही
कां विनवितसे देवासी ?—
निराशाच दे गोड अशी !

## स्मशानांतलें गाणें

[ बोलून चालून भुतांचेंच गाणें— त्यांत अर्थ तरी काय असावयाचा ? व राग तरी काय धरावयाचा ? ]

वाटे स्मशान शांतिस्थान ! ॥ ध्रु० ॥

सजीवतेचा चाले चाळा,
कवीस त्याचा ये कंटाळा,

त्रास जगाचा चुकवायाला,
शांतपणाचें, रूप जगाचें, अशा स्मशानीं जात ॥ १ ॥

विश्रांतीस्तव निसर्गदेवी,
निजसदनींचा दीप मालवी,
( ज्यातें वदती अल्पधी रवी ! )
किंवा केल्या, तारा टिकल्या, फोडुनि झुंबर छान ! ॥ २ ॥

प्रकाश रवीचा यापरि मेला,
संध्यारक्षारूप पावला !
परी तिचाही शेवट झाला,
आकाशीं जी ' गंगामाई, ' पडे तिच्या तीर्थांत ! ॥ ३

अनंत-तारा-तारक-नयनीं
जरी यावया खुणवी रजनी
चंद्र न वरती परि ये भिउनी,
स्थिति जी रविची, तीच तयाची, होईल हें भय त्यास ! ॥ ४ ॥

दुष्कृत्यांचा बहर चालला,
जोड तयांच्या कृष्णत्वाला
द्याया, अंधारही पसरला,
दुष्टत्वाशीं, अंतरनाशी, मिसळुनि जाई त्यांत. ॥ ५ ॥

भयाण जागीं, भयाण काळीं,
भयाण वृत्ती होत निराळी;
भयाण झाली तों आरोळी !
जरा दचकला, कवि तो उठला, ऐके देउनि कान. ॥ ६ ॥

" शांतीची ही स्मशानकारा,
सजीवतेला इथें न थारा,
म्हणती मरुनी पडतो वारा !
प्रेम जगाचें, जर हें साचें, कसला मग हा नाद ? ॥ ७ ॥

पवन गातसे कां बेसूर ?
हंसें भुतांचें कीं भेसूर ?

प्रेतांचा चौपदरी सूर ?
कीं प्रेतांतुनिसुटला म्हणुनी आत्मा करि थैमान ? ॥ ८ ॥

तों सरणांतुनि अस्थिच उडती,
त्यांचीं तुटकीं प्रेतें होतीं,
स्कंधीं त्यांच्या भुतें बैसतीं !
करिती बडबड, शब्दही न धड, कवि बसवी अनुमान. ॥ ९ ॥

अणुरेणूंच्या अवकाशांत
प्रेतांचे कण हे शिरतात,
स्वैर घर्षणें ध्वनि करितात,
स्मशानांतलें, गाणें चाले; त्याचा पडसाद. ॥ १० ॥

रातकिड्यांचा किर्र शब्द या
निघे, सारखा सूर धराया,
श्वान रडे हें साथ कराया,
तुझिया हृदयीं, धडधड जी ही, धरि तबल्याचा ताल ! ॥ ११ ॥

कवि ऐकुनि हें स्तब्ध जाहला,
प्रकार सारा कळे तयाला,
मृत जिव्हेला फांटा फुटला !
ऐकायासी, त्या गानासी करि आत्म्याचा कान. ॥ १२ ॥

" धन्य धन्य ती स्मशानभूमि !
धन्य येथलीं भुतेंहि आम्ही !
सदाहि देवा या सुखधामीं—
घडवी वसती; सजीव जगतीं, नको नको आम्हांस ! ॥ १३ ॥

धन्य तशी ती मानवजाति !
श्रेष्ठपणा जी मिरवी जगतीं,
सजीवतेचा आव घालिती,
भुतें परांतें, वदतां भूतें, तिरस्कार ये फार ! ॥ १४ ॥

बाह्यरूप नच भुतांस म्हणुनी,
तुच्छ मानिती त्यां अवगणुनी,
द्विविधरूप जरि धरिती प्राणी—
तरि बाह्यांतर, रूपीं अंतर, जहनमूसे अस्मान्! ॥ १५ ॥

देवनाम भूतांप्रति पळवी.
देवाची त्यां कळे थोरवी,
मानव नवसें परि त्यां फसवी !
कोणी म्हणती, 'ईश्वर नास्ति'—हाच तयाचा मान ! ॥ १६॥

अनेक माता, एकचि वनिता,
न्यायमार्ग हा ऐसा असतां,
अनेक वनिता, एकचि माता।
व्यर्थ सारा, मांडिति पसारा, नीतीच्या जगतांत ! ॥ १७ ॥

भुतें भुतांस कधीं न खाती,
बंधु बंधुच्या रंगत रक्तीं !
बाप मुलाची करितो माती !
हा जगताच्या मनुष्यतेच्या, प्रेमाचा बाजार ! ॥ १८ ॥

नीतीसाठीं वपन मांडिती,
प्रेताहातीं नवरी देती,
अनाथ विधवा पदीं चिरडती !
सैतानावरि, ताण कसा करि, सृष्टीचा सुलतान ! ॥ १९ ॥

शास्त्रांचे तोंडांत फवारे,
रूढीचे परि गुलाम सारे !
स्वतंत्रतेचें उसनें वारें;
पक्षी सदनीं, वसले कोंडुनि, गाति यशाचें गान ! ॥ २० ॥

समानतेच्या मारी बाता,
वरच्या लत्ता झेलित माथां,
सर्वेंच खालीं झाडी लाथा;
न ती निवारी, न ही आवरी, बेशरमी हैवान ! ॥ २१ ॥

अनाथांचुनी सपिंड मरती;
मरतां त्यांचे पिंड अर्पिती!
सजीव तोंवरि लत्ता देती
मरतां घेती, खांद्यावरती, उरफाटा सन्मान! ॥ २२ ॥

पुण्यविक्रया करि धनदानीं,
मांग बसे तो उच्च स्थानीं!
भाविकतेला शिवे न कोणी,
कपटी मांजर, दिलें तया घर, दारिं इमानी श्वान. ॥ २३ ॥

दोन पतींनीं विधवा न सती,
पतिव्रतेला परि पांच पती!
धर्म भाळला आईवरती;
परी आपुलें, तेंच चांगलें, विवेक झाला ठार! ॥ २४ ॥

देवद्वारीं बसला नंदी,
राजद्वारीं स्वारशिबंदी,
रक्ष्य जनांला होई बंदी,
रक्ष्य वस्तुला, धक्का अपुला, रक्षक राखी प्राण. ॥ २५ ॥

गर्भीं भार धरि तिजला भजती,
धेनु दुग्धदा, माता वदती,
भर वाहुनि आजन्म पोषिती!
मरतां उदरीं, मातृभूमि धरि; परी तिशीं बेमान! ॥ २६ ॥

विधवा मार्गीं मार्गें फिरवी,
मांजर अडवें कार्य बिघडवी,
कर्तृत्वाची हीच थोरवी!
प्रेता हंसतां, कार्यक्षमता, न धरी परीं गुमान. ॥ २७ ॥

भुतें बिचारीं रात्रीं फिरती,
म्हणुनी त्यांतें तिरस्कारिती;
रात्रीची तर गोष्ट दूर ती—
परि दिवसांही दुष्कर्मांहीं पाडिति जन अंधार! ॥ २८ ॥

कसांनीं जे गळे कापिती,
स्त्रीच्या केसांनीं ते तरती !
प्रायश्चित्तं शुद्धहि होती.
शास्त्रें रडतीं, कराच सत्कृति तरिही हलते मान. ॥ २९ ॥

धर्मस्त्रीचा गळा कापुनी,
समाधान मग करि हिंडवुनि,
तुळशीभंवतीं, देवायतनीं,
विचित्र लीला दावुनि तिजला, दे दुःखावरि डाग ! ॥ ३० ॥

गोपी सोळा सहस्र असती,
तरिही वृंदसाठीं श्रीपति
निघे स्मशानीं; धीर न पोटीं;
तुळशीभंवतीं, विधवा करिती, काय न हाच विचार ? ॥ ३१ ॥

वैराग्याच्या सोप्या गोष्टी !
राम रडे परि सीतेसाठीं !
ब्रह्मा लागे मुलिच्या पाठीं !
भोळा शंकर, स्त्री अंकावर, गणेश राखी दार ! ॥ ३२ ॥

घरच्या देवा स्त्रिया न भजती,
पुराण-कीर्तन धुंडित फिरती,
देवहि त्यांचे वेश्यांभंवतीं,
विवाहकालीं, शपथ वाहिली, दोघे पाळिति छान ! ॥ ३३ ॥

सुधारणेचे भक्त निपजती,
'स्वतंत्रता द्या स्त्रियांस' म्हणती,
पारतंत्र्य परि आपण वरिती
परानुकरणीं दंग; सोडुनी स्वत्वाचा अभिमान. ॥ ३४ ॥

कोणि काढितां नवी कल्पना,
करिती सारे वृथा जल्पना,
मिळतां यश त्या, देउनि माना—
पायां पडतां, लाज न चित्ता, म्हणतो तो अवतार ! ॥ ३५ ॥

सफेत येतो रंग शिराला,
रंग आंतला तसाच काळा!
वृद्धपणा नच दुष्टत्वाला,
भय काळाचें, नच देवाचें, तेंहि परी देहास! ॥ ३६ ॥

चुना पांढरा, कातहि काळा,
रंग तयांतुनि निघे निराळा!
सहकार्यातें, असल्या ताळा!
दोघे मिळुनी, एक ठिकाणीं करिति परस्परनाश! ॥ ३७ ॥

मित्रपणानें पडे गळ्यांत,
गळफांसहि तो घालिन हात!
कुणी कुणाचा करणें घात—
नेम न याचा; उपकाराचा मोबदला अपकार! ॥ ३८ ॥

सुखदुःखांचा भावहि नसतां,
सुखदुःखांची दावी समता.
सुखी व्हावया भगवद्गीता
वेद मंथुनी श्रीकृष्णांनीं, हेंच काढिलें सार! ॥ ३९ ॥

बळी पोंचतां भुतें न छळिती,
अल्पतुष्टता हास्यास्पद ती,
मानवतेची परी न रीती.
पिंड जयाचा खातो त्याचा करितो जगिं बोभाट! ॥ ४० ॥

म्हणती आम्हां भुतें बाधतीं
भूतांची परि नाहीं छाती—
जायाची या असल्या जगतीं!
भुतेंच भीती या भूतांप्रति, भुतें भुतां हीं खास! ॥ ४१ ॥

"मरतां मानव भुतें निपजतीं!"
बोलायाची परि ही रीती.
भांगेंतुनि कां तुळशी निघती?
कोठें आम्ही? कोठें तुम्ही? कशास कांहीं ठाव? ॥ ४२ ॥

ब्रह्मपदाहुनि आत्मा ढळतो,
मरुनि जगाच्या स्मशानिं येतो,
मन मानव – छेः ! भूतचि होतो
चितेंत जळुनी, दिव्य भोगुनी, सुटतो आत्माराम ! ॥ ४३ ॥

भुतें विदेही, मानव सुंदर,
दिव्य भूमिका स्मशान-मंदिर,
प्रवास येथें फारचि दुष्कर !
प्रेत आणितां बोले जनता, ' राम कहो, श्रीराम ! " ॥ ४४ ॥

इतकें गाउनि भूतें हंसलीं,
अखेरची जणुं तान घेतली,
तया वाहवा घुबडमंडळी—
घू घू ' शब्दें, देत मग वदे ' घ्या आतां आराम ! ' ॥ ४५ ॥

श्वानहि सांथ करोनी दमले,
विधवेनें मृत बालक त्यजिलें,
दूध तयाच्या मुखिं सांपडलें,
पिउनि तेवढें, बघुनि कविकडे, हांसत पडलें श्वान.॥ ४६ ॥

कवि हें पाहूनि विस्मित झाला,
म्हणे, " पात्र मी न या स्थळाला ! "
पळुनी पापी जगांत आला,
स्मशानांतलें, गाणें असलें, कवीस नुरवी भान ! ॥ ४७ ॥

म्हणे, " वरुनि जग दिसतें सुंदर—
' राम ' जाणतो ' क्या है अंदर ' "
स्मशानातलें गाणें सत्वर—
अमोल म्हणुनी, टाकि उधळुनी चहूंकडे जगतांत ! ॥ ४८ ॥

## घुबडास !

" या निशा सर्वभूतानां तस्यां जागर्ति संयमी ।
यस्यां जाग्रति भूतानि सा निशा पश्यतो मुनेः ॥ "

[ या प्रवचनाची आठवण घुबडाचा शब्द ऐकून होऊं नये असे बिचाऱ्यानें कोणतें पाप केलें आहे बरें? आमच्या दृष्टीचा रंग त्याला लावायचा ? ]

घुबडा, बोल रे घू घू । नकोत चिमण्या राघू ! ॥ ध्रु० ॥

मांदिंत मिसळुनि झाली माती
घडपड असल्या फोलासाठीं
चिंवचिंव नुसत्या पोटासाठीं
ओवाळुनि टाकिलें जगीं तें मीं तूं कधिंहि न मागूं. ॥ १ ॥

आज आपला बोलति नाद
उद्यांच भलत्याचा पडसाद !
पोपटपंची पोकळवाद !
जळल्या खाईसाठिं म्हणाया मी तूं कधिंहि न मागूं. ॥ २ ॥

शंख कुणाचा पोटापाठीं !
गात कुणी तर तिसऱ्यासाठीं !
छाया जीवाची उफराटी.
" जो तो ज्या त्यासाठीं ! " चल, हें मी तूं यांना सांगूं. ॥ ३ ॥

पोपट गातो मंगल नाम,
जळु दे;— कुठला तयांत राम ?
उष्ट्या गुळगीचा तो ' राम ! '
आपण आपुला राम रमवितां मी तूं कधिंहि न भागूं ! ॥ ४ ॥

सताड उघड्या रविकिरणाच्या
प्रकाशांतला जो तो नाच्या,
नाचत तालावर इतरांच्या,
ताज्या घोड्यावर गोमाशा खुशाल दे या गुंगूं ॥ ५ ॥

पोपट चिमण्या या जाऊं दे,
खुशाल रडगाणें गाऊं दे,
गोष्पदिं मुंगीला न्हाऊं दे,
मार्ग आमुचा सडेतोड हा; जगास दे रे रांगूं ॥ ६ ॥

धनी जगाचा कुठला आला
तुम्हांअम्हांला शिकवायाला ?
निघेल तोची सूर आपुला !
माझें मजला, तुझेंहि तुजला, ' मी-तूं पण ' ना त्यागूं ॥ ७ ॥

मनांत माझ्या जी हुरहूर
जनांत काढिन तीचा सूर,
सांथ मला कर; जरि तूं दूर—
भेसूरानें, भेसूरानें, झोंप जगाची भंगूं ! ॥ ८ ॥

तुमची अमुची न्यारी रीत,
एकान्ताचे भालाईत,
काळोखावर लिहिलें गीत,
उचल जागत्या अशा जगाला चल, वाचाया सांगूं ! ॥ ९ ॥

ऐकूनि असल्या पिशाचगाना
कितीक मोडुनि पडतिल माना,
कितेक हलतिल ऐकुनि ताना,
तुला मला परि काय होय तें ? रंगांखातर रंगूं ॥ १० ॥

गगनाच्या उदरांत भरारा
काळोखावर घुमतो वारा
घो घो घो घो ओघचि सारा,
दक्षिण-उत्तर कापुनि अंतर नभास लागे लंघूं ॥ ११ ॥

वेताळाची येतां स्वारी,
भूत वाजवी काय तुतारी ?
भालदार कीं त्या ललकारी ?
मरत्या रात्रीचा हा श्वासचि लागे काय तरंगूं ? ॥ १२ ॥

वरतीं नभ हें, अरतीं भूतळ,
सटवीच्या जात्याचे हे तळ,
पीठ तयाचें गळतें भळभळ,
त्या जात्याची घरघर वारा; त्यावर गाया लागूं ॥ १३ ॥

अफाट वारा सुटला असला
काय कुणाला भिववायाला ?
तसा घोगरा घसा आपला,
नच रिझवाया, नच खिजवाया; रंगाखातर रंगूं ॥ १४ ॥

मेघ मारुनी वरुनी गारा
काय कुणावर करिती मारा ?
त्यांतुनीच परि निघती धारा,
'गोड कडू' चें गाणें असलें चल ये जगता सांगूं ॥ १५ ॥

गुरफटलें जग सारें मोहुनि,
कालतरंगावर परि वाहुनि,
बघ मी आलों त्यांतुनि पोहुनि,
फिरता फकीर तूं; तव चरणीं जरा मला दे लागूं ॥ १६ ॥

संन्यासी तूं जन्माचा रे;
इतरांची तर कथाच विसरे
होतीं का परि मातापितरें ?
पूर्वाश्रमिंच्या संसाराचा थांग न देसी लागूं ! ॥ १७ ॥

प्रीति असे का ठाउक तुजला ?
जीव कधीं का दुःखें सुजला ?
प्रकाश नयना कधिं का दिसला ?
तुझ्यावाचुनी तुझ्या जगांत न देसी कोणा वागूं ॥ १८ ॥

व्याप कधीं जन्मामरणाचे
भोगिलेस का स्मरतें साचें ?
कीं संस्कारहि हे पूर्वींचे ?
येतां जातां किंवा प्राणा देह लागतो बिलगूं ? ॥ १९ ॥

एकान्ताला कां पतकरशी ?
समाधींत या कधिंचा रमशी ?
कुठें असा संन्यासहि शिकशी ?
"घू घू" वांचुनि दुसरें कांहीं तुझें न देशी उमगूं ॥ २० ॥

शिष्य तुझा मी झालों म्हणुनी,
निःसंगाची संगत धरुनी,
काळोखाची राख फांसुनी,
सांग तुझा गुरुमंत्र मला तो; करीं एकदां घू घू ॥ २१ ॥

ऐकुनि वाटे तव हें गाणें
निजल्या विश्वाचेंच घोरणें,
वाऱ्याचें बेछूट वरळणें,
किंवा काळोखाचें रडणें लागत काय तरंगूं ? ॥ २२ ।

काळे डोंगर जिकडे तिकडे,
कडेकपारी त्यांचे जबडे,
काळोखामधिं असतां उघडे—
तुझा शब्द जणुं निघतो त्यांतुनि 'आ' करितांना घू घू ॥ २३ ॥

नादब्रह्माचें हें प्रेत ?
कीं जीवाचा नाच हवेंत ?
मृत ओंकाराचा ध्वनि येत ?
तांडवकालीं कीं शंभूचा डमरू करि हा घू घू ? ॥ २४ ॥

भटक्या जीवा आला थकवा,
पाहुनि भुलावणीचा चकवा,
काळोखांतुनि घाली पकवा,
उलूनि काळिज ब्रह्मांडाचें लागे काय दुभंगूं ? ॥ २५ ॥

विश्वात्म्यानें शंख स्फुरिला,
विश्वहृदयीं तो घुमूं लागला
हृदयामाजीं या दुमदुमला,
फोडुनि हृदया गगनपथावर काय लागला वेंधूं ? ॥ २७ ॥

कीं वाऱ्याचे घुटके घेत,
रात्र करी प्रळयाचा बेत,
काळ तिला हुंकारा देत,
भीषण रव तो शब्दांवर लागत काय तरंगूं ? ॥ २७ ॥

बहिरासहिरा होतो जीव,
घुमघुमण्याची नच जागीव,
कानावांचुनचें ऐकीव,
थरथरतो अंगांत जगाच्या एकांतांतिल घू घू ? ॥ २८ ॥

चोर मनाचे मनीं चरकनी,
हलल्याविण मागेंहि सरकनी,
खुलीं दिलें भ्रमभरें थरकनीं,
घुम् घुम् घुम् घुम् एकसारखा घुमतो आता घू घू ॥ २९ ॥

असें असे जर गाणें भेसुर
ऐकाया तरि आत्मा आतुर,
कां न कळे तें लावी हुरहुर,
त्यांत काहिं तरि असे थेट जें जिवास लागे विलगूं ॥ ३० ॥

असल्या गाना तूं गातांना.
काळोखावर ठरतिल ताना,
रेषारूपें दिसतील नयनां,
तुझी तीव्रता ऐकुनि माझ्या हृदया दे या जागूं ॥ ३१ ॥

मीही मिळविन माझा सूर,
लाडें लाडें जें कमसूर,
करुनी टाकूं त्यांचा चूर,
' गुळाचेच गणपती ' जगीं जे त्यां वेशीवर टांगूं ॥ ३२ ॥

खरें न कोणा कधींच दिसतें,
म्हणुनिच दिसतें तें तें पटतें,
चुकल्या चित्ता खरें वाटतें,
वस्तुवस्तुवर परि तेजाचा छाप लागतो रंगू ॥ ३३ ॥

मूळ रूप परि अंधारांत,
न फिरे त्यावर भलता हात,
तें तूं बससी सदा पहात,
तमोभेदिनी दृष्टि तुझी ती दे मम नयानें तरंगूं ॥ ३४ ॥

दृष्टिस इतर न दिसतां कांहीं,
सैरावैरा हिंडत नाहीं,
जो तो ज्याचा त्याला पाही,
आत्मनिरीक्षण काळोखांतिल काम दृष्टिला सांगूं ।। २५ ।।

अहंपणाच्या गाऊं गाना,
मुक्या मनाच्या उघड्या ताना,
स्वानुभवानें हलवूं माना,
ठराविकाला लाथ मारुनी नभासही उल्लंघूं ।। २६ ।।

तुझी आपुली संगत' छान,
एकान्ताचें गाऊं गान,
बाणा ज्याचा त्या अभिमान,
वेळ आपुली भरास आली चल चे गाया लागूं ।। २७ ।।

रात्र रंगली काळोखानें,
गेलीं संगीताचीं गानें,
विलया गेलीं उसनीं भानें,
कोणी निजलें, कोणी मेलें, आतां मी तूं जागूं ।। २८ ।।

वरती नभ हें खाया पाही,
खालीं काळ्याकभिन्न राई,
काळोखाच्या भकास खाई,
सळसळुनी काळोख उकळतो; पवनहि लागे झिंगूं ।। २९ ।।

तेजाची गंगाच आटली,
काळोखाची प्रभा दाटली,
भयानकाची सभा थाटली,
चिरंतनाचें प्रेतचि नाचे; लागे विश्व दुभंगूं ।। ४० ।।

दिवे चमकती आकाशांतिल,
नसत्या चिरंतना ते गातिल,
अपुल्या काळोखाला खातिल,
जळत्या आशेच्या या ज्योती काळोखानें डागूं ।। ४१ ।।

मरुं दे त्यांचें फसवें तेज,
खोट्या मोत्यावरचें वेज,
कृष्णनभाची अखेरशेज —
करुनि घोंगडी देउनि त्यांच्या अखंड वाती भंगूं ॥ ४२ ॥

पिळुनी पार्गा काळोखांतिल,
दिवे मालवूं आकाशांतिल,
आले जेथुनि तेथें जातिल,
काळोखाची धूळ मिळुनि मग काळे काळे रंगूं ॥ ४३ ॥

शरीर काळें, जीवहि काळे,
बटबटीतसे काळे डोळे,
तारांच्या काजळिचे गोळे,
काळभैरवचि मी; तूं माझा गोजिरवाणा रावूं ॥ ४४ ॥

घोर शब्द तूं करिं या काळीं,
–एकांताची जणुं किंकाळी,
शांतिब्रह्माची कीं टकळी,
स्वानुभवाचा तुझेपणाचा, दे रव मंत्रनीं पांगूं ॥ ४५ ॥

मध्यरात्रिच्या या अवकाळीं,
गात बसूं चल गाणीं काळीं,
काळीं किरणें नेत्र उगाळी,
सजीवतेच्या काळया काळया प्रेताला आलिंगूं ॥ ४६ ॥

ठराविकानें मग जें भरलें,
ठराविकचि तें आतां निजलें,
ठराविकचि रीतीनें मेलें,
स्मशानांतला जलसा अपुला; चला गावया लागूं ॥ ४७ ॥

ज्याच्या प्रेताच्या तोंडावर,
काळोखाची टाकूं चादर,
' राम ' तयानें म्हटला, ये तर —
रामप्रहरच्या अशा भुपाळ्या आपण गाउनि रंगूं ॥ ४८ ॥

भूपाळयांचा विशाल राग,
भयानकाला लाविल आग,
ढवळुनि तमास जागोजाग,
काळोखाच्या लाटांवरती लाविल तेज तरंगू ।। ४९ ।।

आलापाविण जीव डोलती,
बोलावांचुनि भाव बोलती,
गाणीं त्यांचीं दूर खोल तीं,
अर्थ खोल ते करूं बोलते; चल ये, त्यांतच गुंगू ।। ५० ।।

काळोखाचे पीळ मोकळे,
गतकाळाचें गाणें सगळें,
घुमुनि सारखें त्यांत गोंधळे,
अर्थ तयाचा चल ये, आपण सर्वांआधीं उमगूं ।। ५१ ।।

फुलें कालचीं काळवंडलीं,
नक्षत्रेंही नभीं झिरपलीं,
निःश्रेयाचीं बिजें करपलीं,
जित्या सुराचा जरा जिव्हाळा दे रे त्यांना लागूं ।। ५२ ।।

ऐकुनि तव हें शांतरसाचें,
काळें गाणें करुणरसाचें,
उफळतील कण काळोखाचे,
प्रकाशबीजें गूढ लागतिल फुलुनी स्वैर तरंगूं ।। ५३ ।।

स्वैर नाचतीं प्रकाशांतलीं
विश्वें सारीं बघ हीं सुकलीं,
उदास छाया त्यांवर भरली,
सूर खडा धर, खेळ तुझी ही; गूढ आपुलें सांगूं ।। ५४ ।।

फुंक आपुलें भयाण शिंग,
काळोखाचें फोडुनि भिंग,
अज्ञेयाचें उकली बिंग,
पृथ्वीचें नारिंग फुंकरावर उडवाया लागूं ।। ५५ ।।

नारिंगाच्या अशा शिदोऱ्या,
काळोखाच्या वळुं या दोऱ्या,
भुरक्या गहिऱ्या गोऱ्यामोऱ्या,
करितिल त्यांच्या आधारावर नाच उद्यांचे राघू ! ॥ ५६ ॥

जरी आपुलें गाणें काळें,
निघेल त्यांतुनि विश्व उजाळें,
चिरंमृतांना उठविल काळें
मरत्या ब्रह्मालाहि आजच्या होइल मात्रा लागूं ॥ ५७ ॥

झाडांच्या पानांची सळसळ,
मृतप्राय आत्म्यांची तळमळ,
विश्वाच्या हृदयांतिल खळबळ,
दूर कराया— दूर हराया चल ये, गाया लागूं ॥ ५८ ॥

काळोखांतुनि जग जें दिसतें,
परब्रह्म तें त्यावर वसतें,
काळें गाणें ऐकुनि हंसतें,
नित्यासाठीं साक्ष तयाची सुरासुरावर मागूं ॥ ५९ ॥

शांतरसाचा, एकान्ताचा,
स्वानुभवाचा, वैराग्याचा,
काळोखांतिल अज्ञेयाचा,
गीतझरा सोडुनी तयावर देऊं जगा तरंगूं ॥ ६० ॥

शांत शांत मग जिकडे तिकडे
ब्रह्मजलाचे सडे चहुंकडे,
जें तें होइल तेव्हां उघडें,
परात्पराचें गीत रोकडें गातिल चिमण्या राघू ॥ ६१ ॥

घुबडा ! आतां वेळ न उरला,
जीव कधींचा गाया झुरला,
भाव तयाचा मनींच मुरला,
तोंड तयापरि फोडिलेंस तूं आतां दे त्या रंगूं ॥ ६२ ॥

काळोखाचें भिनतां वारें
शरीर सारें पहा थरारे
पंचप्राणहि थिजले सारे
सुन्न मस्तकीं घुमतो आतां एकसारखा घू घू ॥ ६३ ॥

काळीं गाणीं अशीं गाढ तीं
रसरसलीं हृदयांत वाढनीं,
पिळुनी हृदया सूर काढनीं,
'गोविंदाग्रज' घुमवितात मग घू घू घू घू घू घू ॥ ६४ ॥

## कलगीचें गाणें

बोल बोलतों मलगीचे
गाणें माझें कलगीचें !
एक वेळ जी आवडती
सारंगी माझी होती,
नानापरिचे सूर तिचे
निघती कितितरि गमतीचे;
काळ पुढें तो परि गेला
आनंदहि कांहीं मेला
नवी नवाई– कायम नाहीं– थोडी राही
पुढें सुरानें नच रमवी
स्मृतिनें परि त्यांच्या भ्रमवी !

असाच बसलों कुठेंतरी
सारंगी घेऊन करीं;
खेद मना जरि बहु झाला
आशा होती फार मला—
धिन्ना धिन्ना धिन्नकना
प्रसन्न करिशील खिन्न मना;
ही सारंगी– रंगुनि रंगीं– चित्ततरंगीं

हलविल मनिंच्या तारांना
काढिल नानापरि ताना !

ढोल नगारें मजभंवतीं
नाना नादें परि रडती;
त्यांची पोकळ ओरड ती
एकपणाची करि माति;
गरीब माझी सारंगी
मुळीं खुलेना हमरंगीं;
सूर जमेना– चित्त रमेना– मज करमेना,
विरमेना रव भंवतींचा,
खेदहिं माझ्या चित्तींचा !

दाटी केली तों गगनीं
कृष्ण भयंकर मेघांनीं,
स्वैरपणें हृदयीं शिरले,
मस्तकांतही ते भरले;
कडकडाट त्यांचा भारी,
धुकें पसरलें बाहेरी;
मन घाबरलें– बहु बावरलें– भटकत फिरलें.
कांहिं सुचेना, समजेना,
कांहिं रुचेना, उमजेना !

मेघांच्या छायेसरसें
काळोखाचें राज्य दिसे;
दाट तमाच्या तेजांत
नाहिंपणाचा गिरि दिसत;
काळोखाच्या किरणांचे
कांटे खुपती मग साचे;
वाटे क्षणें पर– गिरिशिखरावरि– बाळ एक धरि
मंजुळ गाण्याचे घेर
ऐकींवाच्या बाहेर !

मेघांच्या थैमानानें
क्षणांत विसरे परि गाणें;
कल्लोळाच्या मग नादीं
यत्न करीं मी संवादीं;
पडुनी भलत्या अशा भरीं
सारंगीं मी न धरिं करीं;
परि तें गाणें-- मधुनि ऐकणें-- पुनः विसरणें,
रचणें काळोखावरतीं
मग वाऱ्याच्या इमारती

मेघांच्या गर्जनेसवें
मीहि ओरडें दीर्घ रवें;
ढोल नगारे बेसूर
त्यांतच मी मिळवीं सूर;
आशा ऐशी मन भावी
सहसुरां मिळणी व्हावी;
अखेर फसलों-- उगाच बसलों-- भयाण हंसलों
सूर भिन्न एकेकाचा,
एक भाव तेथें कसचा !

यत्न करीं मग अखेरचा
सूर धरीं सारंगीचा;
भेसूराचें संगीत
ऐकाया आत्मा भीत !
संतापानें भूमिवरी
सारंगीचा चुरा करीं !
भान गळालें-- ऐक्य पळालें-- सूर जळाले,
झालें गोडीचें काळें
ताराचें झालें जाळें !

हृदयीं मेघांची गरदी
दंग असे भीषण नादीं;

नाहिंपणाचा डोंगर तो
अंधपणें पाहत होतों;
मधुनिमधुनि त्या बाळाचें;
गाणें चाले भासाचें;
वृत्ति बावरी– रडे बिचारी– ऐकाया तरि
नसत्या पडद्याआड
गमे बाळ दडलें द्वाड !

स्थितींत या त्या मेघांचा
कडकडाट हो शेवटचा;
तोंच कडकडे वीज भरे
अवसानाचें ये वारें;
धुकें पळालें फार जवें
मेघ जळाले जळासवें;
वृत्ति रंगली– फारच रमली– हर्षें रडली
उफराटी सारी सृष्टि
मेघाविण झाली वृष्टि

खरेपणाचा पाऊस
स्वच्छ धूत काळोखास;
दाट तमाचें तेज बने
गेलीं तीं काळीं किरणें;
सारंगी तों करीं हंसे
नवल, जशीच्या तशी असे !
समोर डोंगर– परि शिखरावर– बाळ मनोहर
स्वच्छंदें गाणें गाई
सूर सूर ऐकूं येई !

वृत्ति ऐकुनी थरारली
सारंगी वाजवुं सजली;
सात सुरांस्तव ती वेडी
मुदें तिच्या तारा छेडी !
सूर एकची निघे परी
पहिल्याहुनि किति गोड तरी !

सुराबरोबर– विरला डोंगर– शिखरतळावर
नाहींचें नाहीं झालें
बाळ गात पुढें बसलें !

ढोल नगारे ते पहिले
पहिल्यापरि चालू झाले;
गाण्याचे परि या सूर
पोकळ करिती चूर !
वृद्ध वधूचें हो खासें
बालवराशीं लग्न असें !
त्या जोडीचें– अपत्य साचें– गाणें अमुचें
उपजे बाळपरी नाहीं
पितराच्या जन्माआधीं !

ढोल नगारे एकसरी
त्या लग्नाचीं वाजंत्रीं;
सुमुहूर्ताचा क्षण फुटुनी
युगें निघालीं त्यामधुनी !
बाळचि तें गाई गाणें;
नवरामुलगा मंत्र म्हणे;
नव्या जुन्याचें– उण्यापुऱ्याचें– असेनसेचें
लग्न चाललें चौफेर
सारंगी मम आहेर !

साथ कराया गाण्याशा
सारंगी घे हाताशीं;
" गा तूं, करील साथ, मुला !
माझी सारंगी तुजला. "
बाळ तें स्वच्छंद
गाणें करि अपुलें बंद !
बालक हसलें–पळत चाललें– अंधुक झालें,
माझी सारंगी म्हणतां
मुकेपणा वरि तें नसता !

चेड लागलें गाण्याचें
आर्जव केलें बहु त्याचें
" बाळा गा रे ! गाच पुन्हां,
गाण्यावांचुनि प्राण सुना !
माफ करीं कसलाहि गुन्हा,
गाच, गाच, परि गाच पुन्हां ।"
पायां पडलों– " चुकलों ! " वदलों– अखेर रडलों:
राग तयाचा जाईना !
कांहीं केल्या गाईना !
" जपलों जीतें जिवापरी
सारंगी ही तूंच धरीं ! "
ऐकुनि आनंदें हंसलें
बाळ पुन्हां गाऊं सजलें;
एकपणा भिन्नत्वाचा
जीव तोच त्या गाण्याचा !
चिरकालींचे– मखमालींचे– मऊ गालिचे
केले माझ्या हृदयाचे
गाणें मग त्यावर नाचे.
बाळ सारखें गात पुढें
गाण्यामाजीं जीव बुडे;
सर्वांगीं तें विष भिनलें;
सुख मरणाचें सांपडलें;
ऐकत असतां मी मेलों,
प्रेतावरि माझ्या बसलों !
भान न साचें– आज-उद्याचें– मग-आतांचें:
दिवस वाटले जायाचे
प्रेताच्या आयुष्याचे !
चहूंकडे गाणें भरलें;
सारंगी गाणें झालें;
मूर्त भाव ये गाण्याला
धरीनसें गमलें मजला:

धरावया जों हात हले
हाताचें गाणें झालें !
कानांचेंही— दृष्टीचेंही गाणें— होई !
मजला मी पाहूं गेलों
तों मीही गाणें झालों !

गाणें झालें सर्वांचें,
गाणें झालें काळाचें;
गद्याचें गाणें सगळें,
गाण्याचें गाणें झालें;
गाण्यानें मग त्या गाणें
गाण्यानें ऐकत बसणें !
नादब्रह्मीं— जिरलां ' तुम्हीं ' — जिरलों ' आम्ही '
ऐकतांच ऐके त्याचें
झालें जें ऐकायाचें.

स्वार्थ नसे, ना परमार्थ,
गाण्याला कुठला अर्थ ?
वृत्ति जाहली चवचाल,
गाण्याला नुरली चाल !
ध्रुवपदिं गाणें जें सारें
ध्रुवपद मग कसलें बा रे ?
गाण्यांतचि जिरतां काळ
गाणें सहजचि बेताल !
क्षणिं शब्द सुरे— क्षणिं राग हरे— मग नाद मरे,
फुकट नव्हे बा, तें गाणें,
करिशिल मग " गाणें गाणें ! "

बोल बोललों सलगीचे,
गाणें माझें कलगीचें !
तोच तयावरि करिल तुरा
वेडा जो मनिं खराखुरा
खराखुरा परि पुरापुरा

असला वेडा करिल तुरा !

गा जगतांना– गा मरतांना– मर गातांना,

मरुनि सदाही गाच परी

गाणें मरणें एक करीं !

स्वप्नेतावरि जो बसतो,

तुझ्याठायीं मजला बघतो,

गाण्यामाजीं दोघांना

पाहुनि घेइल तो ताना !

त्याका हें देतों गाणें

अर्थ जयाला मानें बाणें;

आदिहि गाणें– मध्यहि गाणें– अंतहि गाणें,

असलें गाणें मिळे नवें,

काय याहुनी तुला हवें ?

होतें गाणें जरि माझें,

आतां झालें तेंच तुझें !

तुझें तरी परि तें कसचें ?

गाणें झालें सर्वांचें !

जाणे तें गाणें साचें

गाणें असलें कोणाचें ?

सवाल घ्यारे– पुढें सरारे– तुरा करारे !

बोल संपले सलगीचे,

गाणें माझें कलगीचें !

* * *

( तमाशांत कलगीच्या सवालाला तुऱ्याचा जबाब मिळतो; जगाच्या तमाशांत तरी तसें कां नसावें ? )

## श्रीमहाराष्ट्रगीत

मंगल देशा ! पवित्र देशा ! महाराष्ट्र देशा ।

प्रणाम घ्यावा माझा हा, श्रीमहाराष्ट्रदेशा ॥ ध्रु० ॥

राकट देशा, कणखर देशा, दगडांच्या देशा।
नाजुक देशा, कोमल देशा, फुलांच्याहि देशा।
अंजनकांचनकरवंदीच्या कांटेरी देशा।
बकुल फुलांच्या प्राजक्तीच्या दळदारी देशा॥
भावभक्तिच्या देशा, आणिक बुद्धीच्या देशा।
शाहीरांच्या देशा, कर्त्या मर्दांच्या देशा,॥

ध्येय जें तुझ्या अंतरीं
निशाणावरी
नाचतें करीं॥
जोडी इहपरलोकांसी
व्यवहारा परमार्थासी
वैभवासि वैराग्यासी॥

जरिपटक्यासह भगव्या झेंड्याच्या एकचि देशा॥
प्रणाम घ्यावा माझा हा. श्रीमहाराष्ट्रदेशा॥ १॥

अपर सिंधुच्या भव्य बांधवा! महाराष्ट्रदेशा।
सह्याद्रीच्या सख्या! जिवलगा! महाराष्ट्रदेशा॥
पाषाणाच्या देहीं वरिसी तू हिरव्या वेषा।
गोदा, कृष्णा, भीमा तुझिया ललाटिंच्या रेषा॥
तुझिया देहीं करी प्रतिष्ठा प्रथम प्राणांची॥
मंगल वसती जनस्थानिंची श्रीरघुनाथांची॥
ध्येय जें तुझ्या अंतरीं......॥ २॥

भिन्न वृत्तिचीं भव्य भिन्न हीं एक जीवसत्त्वें।
तुझिया देहीं प्रकट जाहलीं दिव्य जीवतत्त्वें।
चित्पावन बुद्धीनें करिसी तूं कर्तबगारी।
देशस्थाच्या भुल्या दिलाची नजला दिलदारी॥
कायस्थांचें इमान फिरवी रक्ताचा फेर।
टाक मराठा मनगट लावी तुझें हाडपेर॥
ध्येय जें तुझ्या अंतरीं......॥ ३॥

ठायीं ठायीं पांडवलेणीं सह्याद्रीपोटीं।
किल्ले सत्तावीस बांधिले मराठीपाठीं॥

तोरणगडचा, प्रतापगडचा, पन्हाळगडिंचाहि ।
लढवय्या झुंझार डोंगरी तूंच सख्या पाही ॥
सिंधुदुर्ग हा, विजयदुर्ग हा, ही अंजनवेल ।
दर्यावर्दी मर्दुमकीची ग्वाही सांगेल ॥
ध्येय जें तुझ्या अंतरीं...॥ ४ ॥

तुझ्या भुकेला वरी नागली आणि कणीकोंडा ।
वहाण पायीं अंगीं कांबळी उशाखालिं धोंडा ॥
विळा कोयता धरी दिगंबर दख्खनचा हात ।
इकडे कर्नाटक हांसतसे, तिकडे गुजरात ॥
आणि मराठी भाला घेई दख्खन कंगाल ।
तिकडे इस्तंबूल थरारे, तिकडे बंगाल ॥
ध्येय जें तुझ्या अंतरीं...॥ ५ ॥

रायगडावर माय जिवाची गवळण विनधोक ।
झोंक हिरकणी नांव ठेवुनी जाइ रोखठोक ॥
करीत पावन अर्पुनि पंचप्राणांचा पिंड ।
हिरडस-मावळचा श्रीबाजी, नी पावनखिंड ॥
करी रायगड रायरिचा तो जिजाइचा तान्हा ।
कोंडाण्याचा करि सिंहगड मालुसरा तान्हा ॥
ध्येय जें तुझ्या अंतरीं...॥ ६ ॥

रसवंतीच्या पहिल्या बाळा मुकुंदराजाला ।
पहिलावहिला अष्टांगांनीं प्रणाम हा त्याला ॥
शहर पुण्याच्या, शिवनेरीच्या, पंढरिच्या देशा
पुंडलिकाच्या, शिवरायांच्या, टिळकांच्या देशा ॥
अनंत कोटी ग्रंथ रचुनिया जोडि तुझ्या नामा ।
वाल्मीकींचें शतकोटी यश विष्णुदास नामा ॥
ध्येय जें तुझ्या अंतरीं...॥ ७ ॥

मयूर कविच्या पूर्ण यमकमय महाराष्ट्रदेशा ।
कवि कृष्णाच्या* निर्यमका हे महाराष्ट्रदेशा ॥

---

* केशवसुत.

देवी ज्ञानेश्वरी करि जिथें भक्तीचा खेळ ।
तिथेंच गीतारहस्य बसवी बुद्धीचा मेळ ॥
जिथें रंगलीं साधींभोळीं जनाइचीं गाणीं ।
तिथेंच खेळे श्रीपादांची† कलावती वाणी ॥
ध्येय जें तुझ्या अंतरीं...॥ ८ ॥

विकावयाला अमोल असली अभंगमय वाणी ।
करी तुझी बाजारपेठ तो देहूचा वाणी ॥
तुला जागवी गेन पहांटे गवळी गोपाळ
धार दुधाची काढित काढित होनाजी बाळ ॥
मर्दांनी इष्काचा प्याला तुझा भरायासी ।
उभा टाकला सगनभाउ हा शाहुनगरवासी ॥
ध्येय जें तुझ्या अंतरीं...॥ ९ ॥

प्रभाकराची जडण घडण कडकडित म्हणायाला ।
दो हातांचा मुजरा माझा तुळशीरामाला ॥
भीमथडीहुनि चहुंमुलखांवर फिरले धारकरी ॥
भीमथडीवर चहुंमुलखांतुनि जमले वारकरी ।
आळंदीच्या ज्ञानोबांची भिंत घेत धांव ॥
पुंडलिकाचें नांव चालवी दगडाची नाव ॥
गोलघुमट घुमवीत सारखा नवलाची भाक ।
जेजूरीवर चढी पायरी उभी नऊ लाख ॥
ध्येय जें तुझ्या अंतरीं...॥ १० ॥

( अपूर्ण )

## अनामिकाचे अभंग

[ ज्या प्रदेशांत पाऊल टाकावयाचें आहे तेथील रहिवासी साधुसंतांना तुमचा आमचा स्पर्श अनामिकापेक्षांहि अमंगळ आहे; शिवाय, मराठीचिये नगरीं या पंढरीच्या पाहुण्यांची श्रीचंद्रभागातटीं जी प्रेमळ पंगत झाली

† श्रीपाद कृष्ण कोल्हटकर.

तिच्या उष्ट्याखरकट्यासाठीं हात पसरण्याचा जिथें संकल्प आहे, तिथें नांवाचा अभिमान अनाठायीं आहे. मराठी रसवंतीच्या पवित्र अभंगस्वरूपाला माझ्या अनामिक वृत्तीच्या पामर वाणीनें स्पर्शदूषित करणाऱ्या या अति-प्रसंगाची जनस्वरूप जनार्दनाकडून मला क्षमा होईल अशी आशा आहे. ]

## मंगलाचरण

नमो पांडुरंगा ! नमस्ते श्रीरंगा । रुक्मिणीच्या रंगा नमोनमः ।। १ ।।
सर्वा मंगळाचा एकरूप निधि । तूंच देवा विधि-हरिहर ।। २ ।।
ऐकिल्या देवांच्या तेहतीस कोटी । तीं रूपें गोमटीं देवा तुझीं ।। ३ ।।
निर्गुणाचें ब्रह्म सगुणाची मूर्त । दोहीं ठायीं कीर्त एका तुझीं ।। ४ ।।
म्हणे ' × × ' अगा पंढरीच्या देवा । अनामिक सेवा घ्यावी आतां ।। ५ ।।

१

कवित्वाचा येथें वाहिला मीपणा । लक्ष्मीनारायण तुझे पायीं ।। १ ।।
गणांमात्रांचा तो नको ताळेबंद । नको वृत्त छंद नाम गाया ।। २ ।।
विना कानामात्रा आणिक वेलांटी । लेखन-कामाठी मांडिली हे ।। ३ ।।
साहित्याची कळा झाली तिऱ्हाईत । शुद्धाशुद्धातीत नाम तुझें ।। ४ ।।
म्हणे ' × × ' जें जें मनीं मुखीं आलें । तें तें येथ झालें ब्रह्मार्पण ।। ५ ।।

२

क्षणमात्र थांबा असंगाच्या संगा । अहो पांडुरंगा कृपावंत ।। १ ।।
मनाचा मुहूर्त साधुनि हा आज । सोडूनिया लाज बोलतों मी ।। २ ।।
माझ्यावरी मीच मांडीन फिर्याद । तुझ्यापायीं दाद मागावया ।। ३ ।।
नका देवराया धरूं भीडभाड । कराल तो निवाड मान्य आहे ।। ४ ।।
म्हणे ' × × ' देवा रखुमाईच्या कांता । परी दूर आतां नका राहूं ।।५।।

३

जीवेंभावें देवा आम्ही अमंगळ । जातीचे चांडाळ, थोर नांवें ।। १ ।।
पांडुरंगा आम्ही युगांचे दुर्जन । क्षणाचे सज्जन पश्चात्तापें ।। २ ।।
व्रत एकादशी मात्र हें देहाशीं । नित्य मनापाशीं दिवाळीच ।। ३ ।।
नांवाचेच साव आम्ही थोरथोर । मनाचे हे चोर सर्वकाळ ।। ४ ।।
तुझे पायीं आतां चोरी नसे कांहीं । म्हणे ' × × ' नाहीं भयभीत ।।५।।

४

मागायाची आहे मेख । तुजपाशीं हीच एक ॥ १ ॥
सुखदुःखें हीं केवळ । जन्मा आलियाचें फळ ॥ २ ॥
इंद्राचंद्रा कर्मरेखा । तेथें माझी कोण लेखा ? ॥ ३ ॥
हेंचि एक द्यावें दान । घडी कांहीं तुझें गान ॥ ४ ॥
म्हणे ' ×× ' हीनदीन । मृगजळींचा हा मीन ॥ ५ ॥

५

नाहीं भक्तिभाव नीट । तरी हांक मोकली तो धीट ॥ १ ॥
नाहीं मुक्तीचा हव्यास । नसे नामाचाही ध्यास ॥ २ ॥
नेमधर्म कोणा ठावा । एकरूप उजवाडावा ॥ ३ ॥
तुम्ही यावें आम्हांसाठीं । कवित्वही न ऐसें गांठीं ॥ ४ ॥
म्हणे ' ×× ' हांके साच । अधिकार पाप हाच ॥ ५ ॥

६

आला गोपगोपींसाठीं । देवा तुम्ही यमुनाकांठीं ॥ १ ॥
पुंडलिका द्याया भेटी । देव आले वाळवंटीं ॥ २ ॥
नामयाच्या कारणीं । राउळाचीही फिरवणी ॥ ३ ॥
दामाजीच्या संकष्टीं । विठू धेड होई कष्टी ॥ ४ ॥
म्हणे ' ×× ' मायबापा । भीशी काय माझ्या पापा ॥ ५ ॥

७

धन्य धन्य माझें पाप । तुज आणिल आपोआप ॥ १ ॥
माझ्या पातकांची रास । देवा पाडील इरेस ॥ २ ॥
" आजवरी थोरथोर । पायीं नेले पतित घोर- ॥ ३ ॥
परि याचें पाप फार । पाहूं होतो का उद्धार " ॥ ४ ॥
म्हणे ' ×× ' ऐशा भरीं । देवा याल माझ्या घरीं ॥ ५ ॥

८

नेघे देवा तुझ्या नांवा । तुझा माझा उभा दावा ॥ १ ॥
नामें उद्धरिले सारे । मीच एक राहिन बा रे ? ॥ २ ॥
तुझ्या नांवा गालबोट । सुखें खावे दांतओठ ॥ ३ ॥
पाहूं बोलाविल्यावीण । हरी का नें माझा शीण ॥ ४ ॥
देवा तुझी घ्याया लाज ॥ ' ×× ' ठाकलें आज ॥ ५ ॥

९

काय महिमा नामांकित । आज दाखवा प्रचीत ॥ १ ॥
पूर्वीं नांव झालें फार । नको त्याचा बडिवार ॥ २ ॥
दावीं मज प्रत्यय कांहीं । नको संतांची ग्वाही ॥ ३ ॥
देणंघेणं हातोहात । उधारीची नाहीं बात ॥ ४ ॥
धन्य '××' भाग्यवंत । देवा तुझा पाही अंत ॥ ५ ॥

१०

काळयवनाच्या भेणें । दडी पाण्यापोटीं देणें ॥ १ ॥
धाकें आणि दैत्याच्याच । मोहिनीचा केला नाच ॥ २ ॥
काच बळीचा अगोचर । देवा झाला मूठभर ॥ ३ ॥
परि येतां पापें माझीं । कुठें दडला देवाजी ? ॥ ४ ॥
म्हणे '××' धीटपाठ । येथें अस्सलाशीं गांठ ॥ ५ ॥

निजलेल्या बालकवीस—

[ माझे परमप्रिय मित्र रा. त्र्यंबक बापूजी ठोमरे- महाराष्ट्र रसवंतीचे रसाळ बांधव—'आनंदीआनंद' करून सोडणारे सुप्रसिद्ध बाल-कवि एकदां प्रातःकाळ अतीत झाला तरी झोपेंतच गुंग होते; गद्यांत दोनतीनदां हांका मारून फुकट गेल्यावर पुढील गीतवादानें त्यांना जागें केलें. सदर पद्य फारच थोड्या वेळांत केलें असल्यामुळें बाल-कवींचें यथार्थ गुणवर्णन त्यांत कोठून सांपडणार ? त्यांच्या 'अरुण' व 'चौघडा' या दोन मुरलीगीतांचा प्रस्तुत गीतांत उडता उल्लेख केला आहे. ]

जगद्‌गायका बालकवे ! चल, ऊठ ऊठ आतां ॥
तूंच निजसि तरि कोण सांग मग जागवील जगता ? ॥ ध्रु० ॥
हा तुझा अरुण बघ उगवे पूर्वेकडे ॥
वद कोण तयाचें गाणें गाइल गडे ? ॥
हा देवद्वारीं चौघडाहि धडधडे ॥
करि कोण तुझ्याविण बोल तयाचे खडे ? ॥
तव कवनाची वाट पाहतीं पहा उगवतीं किरणें ॥
गाउनि गाणीं प्रेमळ त्या उल्हास तूंच रे देणें ॥ १ ॥

बघ सृष्टीचे कवि कसे भराऱति गगनीं ।।
गातात कोणत्या स्वैर सुरांचीं गाणीं ? ।।
चल एकजीव हो लौकर त्यांच्या गानीं ।।
स्वर्गींत सांग मग तेंच आमुच्या कानीं ।।
सौंदर्याची द्वाहि फिरविण्या बा तव अवतार ।।
मग ऊठ निजसि कां असा गड्या रे झोंप झालि फार ।। २ ।।

बघ फुलें उमललीं आतां सारीं नवीं ।।
तव रसवंतीचीं फुलेंहि आम्हां हवीं ।।
तव रसाळ रसना-रससागरिं जग झुलवीं ।।
रस उधळुनि गगनीं लपल्या मुकुला खुलवीं ।।
नव्या सृष्टीच्या नव्या यशाचा तूंच शिलेदार ।।
नव कवितेच्या जरिपटक्याचा तुलाच अधिकार ।। ३ ।।

तव गान खळाला नेइल पुण्याकडे ।।
शिकवील यमाला सदयत्वाचे धडे ।।
फत्तरांत वाजविल प्रेमाचे चौघडे ।।
नेईल सज्जना आनंदापलिकडे ।।
सूर खडा धर लावुनि गगनापलिकडे नक्की
करि पुढें खडा जगदीश देउनी प्रेमगांठ पक्की ।। ४ ।।

भ्रमभरें विश्व हें सर्व जयांमधिं बुडे ।।
चल फोडुनि टाकूं ते फसवे बुडबुडे ।।
मग बसूं जाउनी काळाच्याही पुढें ।।
तव सुराबरोबर कोण न यापरि उडे ? ।।
‘ गोविंदाग्रज ’ कविसि* तुजसवें ने देउनि हातां ।।
जगद्‌गायका बालकवे ! चल, ऊठ ऊठ आतां ।। ५ ।।

* स्वतःकडे हा शब्द लावून घेतला याबद्दल उदार हृदयांकडून क्षमा होईलच अशी आशा आहे.

# अरुण ( दुसरा )

[ रा. ठोमरे यांची 'अरुण' या नांवाची एक कोमल कविता आहे. ती ऐकून अगदीं निराळ्या दृष्टीनें प्रस्तुत कवितेंत अरुणाकडे पाहिलें आहे. त्याच गोड गीताचा या कवितेंत शेवटीं उल्लेख केलेला आहे. यापूर्वींची या विषयावरील पहिली कविता रा. ठोमरे यांच्या वळणाची आहे. ]

पहा फडकला पूर्वदिशेवर रक्तरंग कसला ? ||
अरुण हाच का ? उषा हीच का ? सांगा कुणि मजला ||
लालभडक दिग्भाग जाहला मोदें वा खेदें ||
अनुरागाचा कीं रागाचा रंग नभीं कोंदे ? ||

विरहजागरण घडलें ज्यांना फार निशाकालीं ||
त्या नयनांची एकवटुनि का ये सारी लाली ? ||
रजनीच्या सहवासें सृष्टिंत घडलें जें पाप ||
होत असे का सृष्टिस आतां हा पश्चात्ताप ? ||

किंवा कोमल बाला मेली तीव्र निराशांनीं ||
हृदया फोडुनि तिच्या प्रीतिची लाट चढे गगनीं ? ||
दुखावलेल्या जळणाऱ्या परि हताश हृदयांचे ||
जे रागाचे, जे सूडाचे, प्रेत निराशेचे— ||
रात्रीं त्यांचे श्वास चालले मिटल्या डोळ्यांनीं ||
देवपदीं मग दाद मागण्या रिघती का गगनीं ? ||

आग लागली किंवा कोठें खालीं पाताळा ||
उंच दूरवर काय भडकल्या तिच्या अशा ज्वाळा ? ||
निशापाप निजहृदयीं धरिलें अवकाशें म्हणुनी ||
पूर्वा जळते पुण्यरवीच्या का पहिल्या किरणीं ? ||
अन्यायानें रक्त करपलें वाफ काय झाली ? ||
रक्तनिमग्न त्या जग बुडवाया कीं भरती आली ? ||
मुक्यांच्या इच्छा, आशा झाल्या कोणाच्या खाक ||
रागानें ही लाल जाहली का त्यांची राख ? ||
दिनरजनींची झडक मस्तकीं परस्परां बसली ||
ही दिवसाच्या डोक्यावर का रक्ताची लाली ? ||

कीं रजनीची टिकल्यासाठीं फाडुनि कांचोळी ॥
जरीपुराण्यासाठीं केली तारांची होळी ? ॥
रविकिरणांचे भाले शिरले आकाशापोटीं ॥
रक्ताचें शिंपणें करी का जखम अशी मोठी ? ॥
कीं पृथ्वीच्या पापश्वासें स्वर्गचि विरघळला ॥
निराधार रस जाउनि भिडतो आतां पाताळा ? ॥
निशा संपवुनि दिन आणाया सकल देव आले ? ॥
रात्र चालवूं या बाण्यानें दैत्य पुढें झाले ? ॥
त्या दोघांचें समर जुंपलें पूर्व दिशाप्रांतीं ॥
हा रक्ताचा सडा फडकवी कीं त्याची ख्याति ? ॥
मृत रात्रीची चिता उषा ही अरुणमया ज्वाला ॥
रविरूपानें प्राणगोल का हा वरतीं आला ? ॥
भ्रमण दिवसभर करुनी संध्यागर्भीं हा प्राण ॥
शिरतां होईल मृतरजनीचा पुनर्जन्म जाण ॥
मरण सकाळीं; सायंकाळीं जन्म पुन्हां घेई ॥
रजनी यापरि रूबचक्रावर सदा फिरत राही ॥
फार विचारें कविकल्पकता अति भ्रांत झाली ॥
बालकवींचें 'अरुणगीत' तों मनीं उडी घाली ॥
जसा निवळवी रंग नभाचा अरुणतेज पार ॥
'अरुणगीत' ही भीषणतेचा जिरवी हुंकार ॥
वसुंधरेशीं लग्न कराया सूर्य उत्तरंग ॥
यें अरुणाचें हें सोनेरी बांधुनि बाशिंग ? ॥
स्वर्भूसंगम त्या लग्नाचा शुभकर परिणाम ॥
पुण्यमया श्री-वसुधा होइल शुद्धप्रेमधाम ॥
दहा दिशांनो ! जरा जगाशा बाजूला सरका ॥
दिशा नवी द्या कायमची या अरुणचित्रफलका ॥
जगन्नायका ! असा एकदां काळ येऊं द्याच ॥
निशा नको; दिन नको; असावा अरुण सारखाच ॥
लाल नभांतुनि होइल तेव्हां प्रेमाची वृष्टि ॥
'गोविंदाग्रज' गानिं रंगविल तीच प्रेमसृष्टि ॥

# ऐका बाल—कवीस

[ १४ वर्षें वयाच्या एका बाल-कवीची श्रुतिमनोहर, बऱ्याच प्रमाणांत अर्थशून्य, तथापि प्रतिभापूरित, अतएव गोड कविता वाचल्यानंतर मनाला वाटलेला आनंद पुढील शब्दांत अवतीर्ण झाला आहे. ]

गा रे गा रे गाच जरा ॥ माझ्या चिमण्या मुशाफरा ॥ ध्रु० ॥
ठराविकाला, नियमांला ॥ बंधाला जड जगताला ॥
जीव पहा त्रासुनि जाई ॥ नको नकोसें त्या होई ॥
करी जराशी बा घाई ॥ रिझवाया त्याला गाई ॥
गोजिरवाणें । अमोल गाणें । हृदयीं बागे ॥
अस्पष्टाचा सोड झरा । झटपट पळत्या मुशाफरा ॥ १ ॥

आम्ही गातों जें गाणें ॥ तें जगताचें रडगाणें ॥
हृदयीं जो भरला त्रास ॥ तो कविताचरणीं प्रास ॥
शब्दापाठीं हपापले ॥ अर्थासाठीं जन टपले ॥
हृदय करपलें । रसहि हरपले । कवनचि खपलें ॥
गा तूं आतां गाच जरा ॥ रसगंगेच्या मुशाफरा ॥ २ ॥

नियमांनीं झालों ठार ॥ ठराविकानें बेजार ॥
हा जगण्याचा बाजार ॥ सजीवतेचा आजार ॥
अमुच्या कवनाचा पूर ॥ मरत्या जीवाचा सूर ॥
परि तव कवनें । हलतां पवनें । झुलतिल भवनें ॥
त्या कवनाचा सूर खरा ॥ गा, धागडल्या मुशाफरा ॥ ३ ॥

स्वैरवृत्ति कवितादेवी ॥ बालवृत्ति तूंही तेवीं ॥
ती सौंदर्याची छाया ॥ तव वदनींही ती माया ॥
गालावरची लाल मजा ॥ दाविं प्रीतिच्या यशोध्वजा ॥
कवनचि रदनीं । कवनचि वदनीं । कवनचि नयनीं ॥
झुलवी खुलवी जीव जरा ॥ सुंदरतेच्या मुशाफरा ॥ ४ ॥

हृदयाचे घुंगुर गोड ॥ मन्मनिंचे हरितिल कोड ॥
हृदयाच्या हृदयीं खोल ॥ ओत कवनरस विनमोल ॥
फुललें विश्वाचें फूल ॥ वर आकाशाची झूल ॥

सुखदुःखांची । वाग जगाची । जरि कांट्यांची ॥
फुलांचाच तूं धनी खरा ॥ फुलांत फिरत्या मुशाफरा ॥ ५ ॥

चिखल दाट हा जगताचा ॥ रूढीचा, निर्बंधाचा ॥
मम हृदयाचें कल्हार ॥ पवनजलावर अवतार ॥
घेत असे करुनी धीर ॥ तूंच तयाचा शाहीर ॥
त्यांतच राही । गुंगत कांहीं । दंग सदाही ।
गा हृत्कमलाच्या भ्रमरा ॥ मनांतल्या तूं मुशाफरा ॥ ६ ॥

हिमवंतीच्या कणांपरी ॥ तव शब्दांची मजा खरी ॥
थेंब न वा ते पाण्याचे ॥ खडेहि किंवा स्फटिकाचे ॥
अस्फुट त्यांचा आकार ॥ वाऱ्यावर पळते स्वार ॥
अर्थ बोबडे । वेडे बगडे । बोल ते गडे ॥
उडवी त्यांना भराभरा ॥ वाऱ्यावरच्या मुशाफरा ॥ ७ ॥

अर्थकल्पनांसाठिं गडे ॥ कां बघसी इकडे तिकडे ? ॥
अर्थशब्द सोंगें सारीं ॥ वडेजाव हा बाजारीं ॥
धांव न कसली धरि हांव ॥ धांवायासाठिंच धांव ॥
अर्थ मरूं दे । शब्द खरूं दे । काव्य झरूं दे ॥
परी भरूं दे नादभरा ॥ चुकल्या मुकल्या मुशाफरा ॥ ८ ॥

अर्थ कळेना जरी कुणा ॥ तरि तो नशिबाचाच उणा ॥
मार्ग कुणा का दावाया ॥ ढगांमधें चमके माया ? ॥
मूठ झांकली लाखाची ॥ उघडतांच कुचकामाची ॥
अस्फुट गाना भिरक्या ताना । त्या घेतांना ॥
नाच बिजलिच्या धरुनि करा ॥ मेघावरच्या मुशाफरा ॥ ९ ॥

मुग्धापदिं घुंगुरवाळा ॥ गाग्राचा त्याला चाळा ॥
स्वैराचें बंधन त्याला ॥ खुला ताल त्या नाचाला ॥
रुम्झुम् शब्दा अर्थ नसे ॥ थबथबती परि दिव्य रसें ॥
त्या स्वच्छंदा । त्या मकरंदा । त्या रसकंदा ॥
नाचूं दे कवनांत जरा ॥ हृदयामधल्या मुशाफरा ॥ १० ॥

मार भरारी नभाकडे ॥ मेघावरतीं नाच गडे ॥
करि त्यांचे तुकडे तुकडे ॥ उडवी जग जिकडे तिकडे ॥

कविताजल जें चहूकडे ।। पडतां आत्मा थंड पडे ।।
'पाउसपाणी । अभाळदाणी । ' इकडे आणी ।।
शांत करी ही वसुंधरा आकाशांतिल मुशाफरा ।। ११ ।।

ऐकवि गगनाचें गान ।। जीव तुझ्यावर कुरबान ।।
सूर सारखा लाव चढा ।। दिव्य नाद करि पुढें खडा ।।
शब्दा शब्दा मुशाफरा ।। जिवाचाच देईन हिरा ।।
जीव किरकिरा । फारच अधिरा । बहिरासहिरा ।।
करावया मंजुळ मुखरा ।। गा गगनांतिल मुशाफरा ।। १२ ।।

अवकाशाच्या पानबुड्या ।। तरल जलीं जा टाक उड्या ।।
आनंदाच्या पलीकडे ।। काय मजा मज सांग गडे ।।
अज्ञेयाच्या परतीरा ।। नाचत नाचत जाच जरा ।।
तसा तरंगत । तसाच रंगत । नसतां संगत ।।
हात घाल जा परात्परा ।। अवकाशांतिल मुशाफरा ।। १३ ।।

विश्वाचीं अवघड कोडीं ।। कवनाच्या मंत्रें सोडी ।।
स्वानंदाच्या पैलथडीं ।। ब्रह्माची चल उकल घडी ।।
सर्वंच खालीं पहा बरें ।। जगास विसरूं नको बरें ।।
परात्पराचा । भवरा साचा । विस्मरणाचा ।।
नको सांपडूं त्यांत जरा । स्वानंदाच्या मुशाफरा ।। १४ ।।

परमात्म्याच्या भंवऱ्यांत ।। पडतां तूं गिरक्या खात ।।
त्या विस्मरणाची माती ।। जमतां, मोरा तुजवरतीं ।।
फुंकर तीन्ही काळांचा ।। मारुनि उडवूं थर वरचा ।।
झिम् झिम् मोरा । ये सामोरा । थोरापोरां —।।
वर न्याया कर देच खरा । चिरंतनाच्या मुशाफरा ।। १५ ।।

थकतां मग कोमल काया ।। घेच विसावा श्रम जाया ।।
विश्वकटाहावर पैस । पाय पसरुनी बा बैस ।।
शीळ वाजवुनि पवनांत ।। समाधान मिळवी शांत ।।
तरि त्या स्थानीं । मधुनी मधुनी । रंगुनि कवनीं ।।
गा रे गा रे गाच जरा ।। माझ्या चिमण्या मुशाफरा ।। १६ ।।

बा वाग्विलासा !

कांहीं लिहावें तुझ्यासाठिं हा विचार मनिं धरुनी ॥
लेखनसाधन घेउनि रात्रीं पडलों निज शयनीं ॥
वाम करावर मस्तक ठेवुनि, लेखनि अन्य करीं ॥
विषय कोणता घ्यावा याचा विचार फार करीं ॥
काठी, जोडा, छत्री, टोपी, ताट, तवा, पितळी ॥
कुत्रें, मांजर, दत्त म्हणोनि येति पुढें सगळीं ॥
पसंत न पडे परी एकही, सर्वां घालविलें ॥
श्रेष्ठ प्रतीच्या विषयास्तव मग मस्तक खाजविलें ॥
मूल, फूल, फळ, संध्या, रजनी, चंद्र, सूर्य, तरुणी—॥
समोर ठाके फौज अशी ही; रुचे न परि कोणी ॥
चर्वित चर्वण होईल, किंवा जुनी कल्पना ही ॥
" येउनि गेली कधींच ही तर, हींत मजा नाहीं ॥
संपादक टाकुनि देइल; ही न कुणास रुचे " ॥
अशा प्रकारें त्रासुनि गेलों; मुळीं मना न सुचे ॥
विषय शोधितां यापरी कवना, नव आले नाकीं ॥
गुंग होउनी नादीं मग मी उभय नेत्र झाकीं ॥
विचार करितां फार यापरि तन्मय होवोनी ॥
विचारब्रह्मीं लीन जाहलों नेत्रद्वय मिटुनी ॥
जागृत होउनि, नेत्र उघडुनी पाहीं मी नादीं ॥
तों कळलें कीं रात्र सरोनी उजाडलें अगदीं ॥
लेखनसाधन पाहुनि शयनीं नीट उठुनि बसलों ॥
तोंच होउनी स्मृति रात्रीची स्वतःशींच हंसलों ॥
कशाबशा मग लिहिल्या सत्वर ओळी या चार ॥
धाडित सांप्रत तुजसाठीं या; या तरि स्वीकार ॥

पांखरास—

पंख उभारुनि जरा ॥ भरारा ॥ जा जा उडुनी जा पांखरा ॥
निकट तरूच्या शाखेवरतीं नको बसूं खगवरा ॥ पंख...॥
गानमिषानें उडवुं नको रे रम्य नादनिर्झरा ॥
सहवासें तव नव शोभा या खास येत तरुवरा ॥
सुरासुराची लकेर चढतां जलसा येतो भरा ॥
एक एक हा सूर हालवी हृदयाला थरथरां ॥
हिरवी पानें; निळ्या नभाचा वर डोल्हारा खरा ॥
रंगवि संध्या तरल ढगेंही, नाना रंगीं खरा ॥
केला देवें या घुमटाचा सोनेरी पिंजरा ॥
विश्वाचें हें पवनहृदय ते चिरित जाति चरचरा ॥
खिन्न मनीं मम गाणें हें तव वर्षि हर्षनिर्भरा ॥
वाटे हृदयीं जिरवावा हा आनंदाचा झरा ॥
तन्मय होउनि विरुनि मिळावें चिन्मय मंगलतरा ॥
चढ्या लकेरीसरशीं जावें देवाजीच्या घरा ॥
सोबत घ्यावी तव पंखांची उडती पळती त्वरा ॥
क्षण-सहवासें जीव कोंडला होत असा बावरा ॥
परंतु सारा निधन मनिंचा स्वप्नभास हा खरा ॥
विषण्ण मानस; उदास जीवन; पीत निराशागरा ॥
हृदय तडफडें दुःखाग्नीनें मुकलें सुखसागरा ॥
चिरंमृताला गायन हें तव उगाच हलवि जरा ॥
चिरसहवासासाठीं परि मीं पसरितांच मम करा—॥
उडुनी जाशिल भुर्रदिशिं गगनीं खालीं टाकुनि धरा ॥
विश्वगामि तूं चंचल लहरी पवनावर भोंवरा ॥
क्षणांत गिरक्या घेतां घेतां जाशिल रे गरगरा ॥
दूर दूर तें पळतें गाणें करिल मनाचा चुरा ॥
मिळतां लघु सुख अधिक सुखाचा जीव सदा हावरा ॥
तीव्र निराशा होतां होइल फार कि रे घाबरा ॥
ऐकुं न येतां सूर भासमय चिरितिल मग अंतरा ॥
क्षणही माझ्यासाठीं न बसशिल तूं उडत्या पांखरा ॥

इकडे तिकडे फिरशिल टाकुनि येथें या पामरा ॥
जड, निर्जिव मी शोधुं कुठें तुज धरुनि तुझा घोसरा ॥
फुंकर एकचि सृष्टीचा तुज दूरवील खगवरा ॥
क्षणपरिचय हा अशा स्थितीहुनि फारच बरवा खरा ॥
अपूर्व ऐकुनि हर्ष जाहला तोच लाभ मज बरा ॥
सहवासानें प्रेम जडायापूर्वीच पळ, करि त्वरा ॥
हेंच मागणें हात जोडुनी आनंदी पांखरा ॥ पंख... ॥

## हाय हाय !

दिक्कालांनीं, अज्ञातांनीं, बांधिताच पाय ॥
एकलकोंडें अनंत कविमन रडें धाय धाय ॥
वाहे वारा कसा भरारां, वातचक्र फिरतें ॥
नव्याजुन्या पानांचें विश्वचि तयांत गिरगिरतें ॥
कण धूळीचे उडुनी जाती त्या वाऱ्यासंगें ॥
हाय ! हाय ! परि ठायींच ठरती माझीं जड अंगें ॥
या पृथ्वीचें आकर्षण हें मला तोडवेना ॥
पायांखालीं जरी तुडवितो परी सोडवेना ॥
जर इवल्याशा वाऱ्यावर हें जग गिरक्या खात ॥
मला न उडवी कसा मनींचा हा झंझावात ? ॥
हा वाऱ्याचा दरिया पाहुनि तसेंच बसवेना ॥
परि पोहाया बघतां माझें अंगच हालेना ॥
वायुसागरावर फेनाचे थेंबचि शतधारा ॥
तशा उसळती वरती वरनी लखलखत्या तारा ॥
किंवा वरुनी कुणि वाऱ्याची ही गंगा ओती ॥
नभोनिधीच्या उदरीं उडवी हे पळते मोती ॥
दिसतां मज तीं हवीं वाटतीं पुष्पें काळाचीं ॥
परी नयन इथुनीच टाकिती किरणें आशांचीं ॥
लाख तारका नभीं सहज या ठेविल्यांत देवा ॥
दोनच कां या नयनिं कोंडिल्या ?—त्याहि तिथें ठेवा ॥

मनांत माझ्या कुणीं गातसे नवलाचे सूर ॥
मलाच ऐकूं येति न; नुसती लागे हुरहूर ॥
माझें गाणें तें ऐकुनि मी व्हाया बेभान ॥
एकसारखा करितों माझ्या जीवाचा कान ॥
हाय हाय तें ऐकूं येत न; झालों हैराण ॥
मलाच लागति तीव्र सुरांचे मनांतले बाण ॥
आग लागतां कुठें तेथुनी भडकतात ज्वाला ॥
वाऱ्यावरती पळतां पळतां भेटतात काळा ॥
किती भावना, किती इच्छासही त्यांसह जातात ॥
हाय हाय कां मलाच त्या मग इथें टाकतात ? ॥
देवा अंतरिं आग भडकुनी जळून जाऊं दे ॥
त्या ज्वालामधिं माझी ज्वाला मिसळुन वाहूं दे ॥
मेघपृष्ठिवर चंद्रिका वर तेजा पाडी ॥
इथेंच राहुनि जीव विचारा मना तिथें धाडी ॥
त्या तेजस्वी ओसाडीवर खेळे जों आशा ॥
पायांखालीं कठिण भूमि तों बांधित निजपाशा ॥
हाय हाय त्या मेघांमधली एकादी बिजली ॥
जागी होइ न; त्यांची सारी सृष्टिच का निजली ? ॥
कडकडुनी पडतांच तनूवर सुटेल हा जीव ? ॥
हाय हाय परि कुणालाच कशि येईना कींव ? ॥
येतें कांहीं जातें कांहीं—मी नुसता बघतों ॥
कोणीं येतां जातां मोठ्या आशेनें उठतों ॥
उडत्या पंखांचा जीवाला लागतांच वारा ॥
तिथल्या तिथेंच हालचालिचा खेळ होत सारा ॥
शरीर माझें, जग हें माझें, परी जीव घेनें ॥
जिथें तिथें हें माझें मजला कसें आड येतें ॥
नको मला जें, दिसें न त्या जें, तसेंच नाहीं जें ॥
तें आणाया, तेंच बघाया जीव न हा लाजे ॥

( अपूर्ण )

## कळयांचीं फुलें कशीं झालीं ?

( ला बाइला ० ही चाल-थोडा फेरफार करून )

बाळ कुणीं । संध्याकाळीं रमे गुणी ॥
खेळतसे । बाळ अंगणीं हवें तसें ॥
बागेंत । मौजेनें झोंके घेत ॥
तों दिसली ! सुंदरशी त्याला वेली ॥
देठ कोंवळे । हिरवे पिवळे । नाजुक सगळे ॥
ती वेलीं । हिरवा शालू पांघरली ॥ १ ॥

परी तया । हवा सोबती खेळाया ॥
खेळगडी । मूल फूल सुंदर जोडी ॥
पाहतसे । परि वेलीला मूल नसे ॥
तिच्या कळया । होत्या मिटलेल्या सगळ्या ॥
जणुं दमल्या । फार खेळुनी; मग निजल्या ॥
हवेंत डुलणें । हेंच खेळणें । खेळुनि निजणें ॥
ही त्यांची । गादी हिरव्या पानांची ॥ २ ॥

बाळ गुणी । वाइट वाटे फार मनीं ॥
दिवसभरी । खेळुनि आला परत घरीं ॥
झोंपेंत । कितिदां गेला बागेंत ॥
धीर कुठें ? पहांट होतां बाळ उठे ॥
बागेंत । धांव तसाची तो घेत ॥
मौज तों किती । कळ्या न दिसती । फुलेंच हंसतीं ॥
बाळ डुले । चहूंकडे पाहून फुलें ॥ ३ ॥

आईला । शोधाया धांवत गेला ॥
मग बोले । " आई ! बघ हीं गोड फुलें ॥
काल कळ्या । आज फुलें झाल्या सगळ्या ॥
कशा उमलल्या ? कुणीं हंसविल्या ? हांसत बसल्या ॥
कशा कळ्या ? आई सांग मला, सगळ्या ? " ॥ ४ ॥

मग आई । बाळाला उत्तर देई ॥
" खेळासी । भ्रमति चांदण्या आकाशीं ॥
त्या हंसती । चहूंकडे पाहत बसती ॥
तों दिसल्या । कळया बिचाऱ्या हिरमुसल्या ॥
कळवळल्या । फार चांदण्या मग रडल्या ॥
आंसू पडले । ते दंव झाले । धांवत आले ॥
भुईवरी । पडले साऱ्या कळ्यांवरी ॥ ५ ॥

तो साचा । रंग पांढरा तारांचा ॥
कळ्यांवरी । चहूकडे जाउनि पसरी ॥
मग हंसल्या । कळया फुलें हंसतां झाल्या " ॥
सर्व असें । आई बाळा सांगतसे ॥
ऐकुनि हें । बाळ तिच्या वदना पाहे ॥
कां न कळे । मिठी मारिली तिला बळें ॥
त्या काळीं । आई आनंदें हंसली ॥
हंसता रडली । असवें पडलीं । त्याच्या गालीं ॥
तों साची । कळी उमलली बाळाची ! ॥ ६ ॥

## चेंडू

खेळत होता बाळ आमुचा चेंडू घेवोनी ॥
पाहत होतों आम्ही दोघे आनंदें वरुनी ॥
अडगळ होती भंवती परि तो लक्ष्य न दे तिकडे ॥
हांसे, धांवे, खेळे, उडवी चेंडू चोंहिकडे ॥
तन्मय होऊनि खेळत होता यापरि स्वच्छंदें ॥
पाहत होतों आम्ही त्यातें तशाच आनंदें ॥
पाहि तिकडे कां न कळे तों हांसु येत मला ॥
परि तें कळुनी तिला तिच्याही खळी पडे गाला ॥
इतुक्यामध्यें चेंडु उडाला अडगळींत पडला ॥
बघे बाळ चहूंकडे जरी तरि मिळे न तो त्याला ॥

निराश झाला, थकुनी बसला, बाळ जरा रडला ॥
रडत रडतची फिरुनि लाडका लागे शोधाला ॥
लक्ष्य देउनी फार शोधितां अवचित सांपडला ॥
हंसत लाडका खेळामाजीं फिरुनी दंग झाला ॥
निःश्वासानें सोडित मी हा प्रकार पाहोनी ॥
पाहे ती मजकडे वदे मी तन्मन जाणोनी ॥
खेळत आहों असेंच आपण अनीव आनंदें ॥
बागडतो हा चेंडु आपुला असाच स्वच्छंदें ॥
परि संसारीं बहु दुःखांची अडगळ ही साच ॥
एके दिवशीं बाळहि जाइल चेंडुसारखाच ॥
रडत बसूं मग असेंच आपण प्रिय बाळासाठीं ॥
फिरुनि हंसूं का असेंच— परि छे; आशा ती खोटी ॥
तोंच वदे ती "पुरे गडे, हें बोलं नये असलें" ॥
बघे मजकडे रागानें परि हसतहि प्रेमबळें ॥
पाहत होतों असेंच आम्ही कांहीं दिन जातां ॥
त्या दिवसाची स्मृति होऊनि ती भग्न करी चित्ता ।
तशीच होती अडगळ सारी– चेंडुहि तो होता ॥
किती यमाची निष्ठुरता परि– बाळ तेथ नव्हता ! ॥
बघुनि वदे ती–" चेंडु हाच तो ! बाळ परी नाहीं " ॥
परस्परातें मिठी घालुनी रडलों दोघेही ॥

## ये ये ये कविते !

[ एका रविवारीं कांहीं मित्रांना एक कविता देण्याचें ठरलें होतें; मुदत सरत आली पण कविताच सुचेना ! तेव्हां कवितेस हें पाचारण केलें होतें. ]

ये ये ये, आतां ये कविते ! नको छळूं याहुनि मातें ॥ ध्रु० ॥
रसिक मित्र हे जमले भंवतीं रविवारहि गेला ॥
घटका घटका भरत चालली सरत वायदा आला ॥ १ ॥

पाहूं कोठें कविते तुजला; मूढासम झालों ॥
नेत्र मनाचे फाडुनि तुजला शोधाया मी झटलों ॥ २ ॥

गरगर गरगर नेत्र फिरति जणुं चंचलता फिरती ॥
तुज हुडकाया चहूंकडे कीं स्थाना सोडुनि निघती ॥ ३ ॥

ऊर धडधडे, हृदय मारि जणुं मुक्या मनाच्या हांका ॥
हृत्पटिं आत्मा नाचत थै थै हट्ट घेउनी तव का ? ॥ ४ ॥

काव्यशून्य देहाला विटला; ध्यास तुझा मोठा ॥
वायुरूप हा आत्मा श्वासें धांवत बारा वाटा ॥ ५ ॥

वस्तुवस्तुमधिं शोधुनिया तुज चित्त विचारें दमतें ॥
काव्यहीन परि चित्र आपुलें जगदादर्शी बघतें ॥ ६ ॥

कोठें वससी ? कैशी असशी ? केव्हां येसी कविते ? ॥
ये ये, देतों मोबदला तुज वस्तु कोणती हवि ते ॥ ७ ॥

तारांमाजीं चंचलता जी चमकदार लुकलुकते ॥
तीच असिस, तरि हृदयभेद करि पडुनी उल्कापातें ॥ ८ ॥

चंद्रमया जरि क्षयकालीं कुठें जरि तरी जी दडसी ॥
तीच, निर्दये ! हपापलेल्या या हृदयिं न कां पडसी ? ॥ ९ ॥

रवींत असशिल तरि किरणांचे दोर सोडुनी खालीं ॥
नेत्रगवाक्षांतुनि आत्म्याच्या भरभर शीर महालीं ॥ १० ॥

फुलांत धरिशी सुगंधमय वा अदृश्यरूपा बरवी ॥
तरि वाऱ्याचा घोडा करि त्या हृदयरंगिं फिरवी ॥ ११ ॥

मेघमंडलीं जरि तूं विजली; पड कडकडुनी माथीं ॥
नाद हवा जर नाचाया तर गडगडाट करि साथी ॥ १२ ॥

जरी पर्वतोदरीं दडालिस, तोंड तयाचें फोडी ॥
हो ज्वालेची लाट मानितों त्या रसिंही मी गोडी ॥ १२ ॥

स्त्री-हृदयीं जरि असशी तरि धरिं रस्ता या हृदयाचा ॥
नेत्रकिरणिं तुज पूर देत हा प्रेमाच्या तारांचा ॥ १४ ॥

हाय ! हाय ! कां येशि न अजुनी ? त्रिखंड धुंडुनि झालें ॥
तुजविरहित मम हृदयिं रमाया परब्रह्म बघ भ्यालें ॥ १५ ॥

अंध, मूढतम, शून्यवृत्ति ही मानवता पाही ॥
कुठली वस्तु कुठें टाकिते भान न निजला कांहीं ॥ १६ ॥

देव दडविला दगडाखालीं, भावा ज्ञानजलीं ॥
स्त्री-हृदयाला तसें दडपिलें सोन्या-मोत्याखालीं ॥ १७ ॥

नीच राक्षसी मानवता तुज न कळे टाकी कोठें ॥
विषय तुझा हुडकाया कैसा ? कोडें पडलें मोठें ॥ १८ ॥

देवामाजीं वससी तरि तो देव पसरला जगतीं ॥
तूंच न दिसती कां मग, देवी ? जीवन तुजविण जगती ॥ १९ ॥

शून्यामाजीं रमसि राक्षसी शून्यवृत्ति असती ॥
शून्यवृत्ति या मम हृदयीं मग कां नच वद तूं वससी ? ॥ २० ॥

( चाल ) तों नाद विलक्षण उठले ॥ हृदय मम भरलें ॥ चालही बदले
खूण तों मनाला पटली ॥
कीं कविनादेवी हंसली ॥
जी सदाच या हृत्पटलीं ॥
अंतर्दृष्टिसि दिसली देवी, फार मला हंसली ॥
त्या हंसण्याचे नाद निघाले; तन्मयता जमली । २१ ॥

हृदयचि भरलें कवनरसानें, उचंबळुनि आलें ॥
रूप अश्रुमय भरुनि काढिनें नयनांचे प्याले ॥
कवनजलाचा ओघ चालला विश्व त्यांत न्हालें ॥
नीरसतेच्या मालिन्याचें नाम नष्ट झालें ॥
वस्तुवस्तुमाधिं कवन दिसें मग गावें कवणाला ॥
भांबावुनि बहु जाई कवनीं गाई मीच मला ॥
हा हृदयवसंतचि भला ॥ काय बहरला । जीव उमलला ॥
हृदयाचा फुलला डोला ॥
कवितेनें आत्मा ओला ॥
त्यावरी बसुनि घे झोला ॥

खोला खोला हृदयपटा; घ्या कवितेचा पूर ।।
कवन भुवन हें कवनचि जीवन; घ्या महापूर ।। २२ ।।

## ‘ वेषभूषा ’कारास सादरार्पित पद्यभूषा

रचिसि काव्यभूषा ? अथवा कुसुमचापपाशा ? ।। ध्रु ।।
मंजुल शब्दें गूढार्थानें, कविराया ! जें झांकी,
चित्रकाव्य तव पाहुनि ऐसें प्रश्न मना पडला कीं—
रचिसि ‘ वेषभूषा ’ ? अथवा कुसुमचापपाशा ? ।। १ ।।

मंजुल गुंजारवें रंजवी कुंज कुंजगत भृंग,
घालिसि कुंजमुखावरि रुंजी मृदुपादें होउनि दंग,
रचिसि नादभूषा ? अथवा कुसुमचापपाशा ? ।। २ ।।

शब्द तुझे व्यक्तार्थाखालीं दडविति मूकार्थानें,
गूढभाव लक्षितां लक्ष्य मम भलत्या वेडा वरिनें.
रचिसि शब्दभूषा ? अथवा कुसुमचापपाशा ? ।। ३ ।।

सुवेषभूषा लेख्यमिषानें योपिदंतरंगा—
शब्दचित्रिं अव्यक्त रेखुनी हसविसि चित्ततरंगा !
रचिसि चित्रभूषा ? अथवा कुसुमचापपाशा ? ।। ४ ।।

व्यक्त कल्पनांसह मम चित्ता प्रतिभा तव नेई,
अव्यक्ताच्या पटाआड त्या टाकुनि मागें येई.
रचिसि काव्यभूषा ? अथवा कुसुमचापपाशा ? ।। ५ ।।

पद्यावलिंतिल पदपुष्पांच्या अर्थामोदानें
प्रीतिदेवता हृदयिं जागविसि उद्दीपनमोदानें.
रचिसि अर्थभूषा ? अथवा कुसुमचापपाशा ? ।। ६ ।।

अर्थ खरा हा कीं प्रतिबिंबा बिंब दावि तुजशीं,
निजार्थाच मन माझें तैसें पाहत काव्यादर्शी.
रचिसि गूढभूषा ? अथवा कुसुमचापपाशा ? ।। ७ ।।

सुंदररमणीवर्णनपर हें पद्य न मज भासे,
मजसम वेडा श्रमीं पडाया मद्यचि वाहे खासें !
रचिसि पद्यभूषा ? अथवा कुसुमचापपाशा ? ॥ ८ ॥

[ एका तरुणीस आपल्या बालकाचें चुंबन घेतांना पाहून— ]

**उपजातिवृत्त**

धवाननालोकनचुंबनातें ।
लज्जा, न आज्ञा जनिं देत तीतें, ॥
ही बालरूपा प्रतिमा तयाची ।
करोनि इच्छा पुरवी मनाची. ॥ १ ॥

## काय करावें ?

[ आचरटपणापलीकडे या ओव्यांची फारशी किंमत नाहीं. ]

उन्हाळ्यासाठीं पाणी न ठेवून । नदी वेगें जातां पळून ।
भक्कम दगडांचें धरण बांधून । तिला अडवितां येतसे. ॥ १ ॥

अगदीं आपला नेम धरून । तोफ सुटतां धडधडून ।
हळुच बाजूला सरून । मारा चुकवितां येतसे. ॥ २ ॥

अंतराळीं कडकडून । वीज घरावरि पडतां तुटून ।
उंच खांबांत बांधून । पाताळीं सोडितां येतसे. ॥ ३ ॥

सावकारांनीं वैर धरून । जप्ती आणितां दावा करून ।
मागील बाकी देऊन । तिला उठवितां येतसे. ॥ ४ ॥

अगदीं नीट रोंख धरून । म्हैस मार्गीं येतां धांवून ।
एकदम छत्री उघडून । तिला पळवितां येतसे. ॥ ५ ॥

जुन्यानव्याची चोरी करून । भिकार कवि येतां कविता घेऊन ।
कशी तरी एकदां वाचून । त्रास चुकवितां येतसे. ॥ ६ ॥

सर्वांस उपाय येत दिसून । परि एका गोष्टीस आहे न्यून ।
तोंडाळ बायको कडकडून । येतां, काय करावें ? ॥ ७ ॥

## सत्सुम-दाम

### आर्या

ज्याच्या बोध-सुधेनें पावन झालें मदीय हीन मन ॥
श्रीज्ञानेश्वर-चरणीं प्रेमानें मी करीतसें नमन ॥ १ ॥

नमिला शिवरायगुरू परळीचा रामदास भक्तमणी ॥
यत्पद्कमलाधारें कालभयानें कधीं न विश्व गणी ॥ २ ॥

श्रीवर-कृपा जयावर श्रीवर ज्याचें न चित्त किमपी ही ॥
श्रीवरद्-साधुवर्णी श्रीवरदा प्रणति एकनाथाही ॥ ३ ॥

शशि भगणीं, मन करणीं, साधुजनीं तेचि हे तुकाराम ॥
तद्वचनपथक्रमणा त्यजुनि धरिल अन्य हेतु का ‘ राम ’ ? ॥ ४ ॥

जरि यवन, कवनकरणीं स्मरणीं आणूं नको कबीर कसा ॥
भक्तिवधू धरि करि ज्या भगवज्जनकंकणांत हीरकसा ॥ ५ ॥

ज्या हीन हीन म्हणति प्रणति करिति सुमति ज्यास तो चोखा ॥
वंदावा न कसा म्यां ? इंद्रियहो तद्गुणाम्ररस चोखा ॥ ६ ॥

ज्यास्तव अंत्यज रूपा धरि हरि तो वंदिलाचि दामाजी ॥
कां थोरवी न द्यावी त्यानें म्यां कृपण देत दामाजी ॥ ७ ॥

यत्किंकर शंकरसख नमिला जगदेकविप्रवर नरसी ॥
तद्भक्तिदशमरस सुख देई जे दे कविप्रवर न रसीं ॥ ८ ॥

नमिला भक्तिरसाचें धाम श्रीनामदेव जरि शिंपी ॥
लोकीं काम्य न कां ती मोतिं जिच्या उदरिं कठिण वरि शिंपी ? ॥ ९ ॥

मान्य कसा न मला हो गोरा जरि होय हीन कुंभार ? ॥
भार जयाचा प्रभुवर वंद्य मला रोहिदास चांभार ॥ १० ॥

सत्सुमदामीं दासी म्हणुनि न गुंफावि कां जनाबाई ? ॥
अक्षरमालेंतुनि कशि वांकडि तरि टाकवे जना बा 'ई' ? ॥ ११ ॥

दासी श्रीसुखदासीं आम्हांसी मायसी मिरादेवी ॥
सकरण तनु तच्चरणीं त्यजुनि नुतामान कां न कवि ठेवी ? ॥ १२ ॥

वंदन नंद-सुनंदकुंद-सुकलिकालि तुलसिदासाला ॥
मज्जन्मग्रामस्था साधुवरा नमन टेलदासाला ॥ १३ ॥

वंदि विवेकानंदा जरि अर्वाचीन मान्य साधु सदा ॥
कुमतप्रस्तर दुरवुनि वाहविलें जगतिं आर्यधर्मनदा ॥ १४ ॥

हीं षोडश कुसुमें निजदासें निशिदिनिं करोत शुद्ध मला ॥
वंदुनि अर्पी 'सत्सुमदाम' विनत 'राम' ईशपदकमला ॥ १५ ॥

## लोकमान्यांस भारतवर्षाचा आशीर्वाद !

[ लो. टिळक स्वराज्याच्या मागणीसाठीं इंग्लंडास गेले त्या दिवसाकरितां ]

( चाल : चन्द्रकांत )

अमृतसिद्धि हा योग मंगलचि जग सगळे गाय ॥
" महाभाग जन ! सुखं गम्यतां पुनर्दर्शनाय ॥ "
जें जें नश्वर गेलें निघुनी काळाच्या पाठीं ॥
अमृत तेवढें उरलें केवळ या दिवसासाठीं ॥
अंधाराची वाट कंठिली फिरलों संकष्टीं ॥
चार युगांची रात्र भोगिली या दिवसासाठीं ॥
रोज उगवला, रोज परतला, होउनि बहु कष्टी ॥
आनंदें रवि आज उगवला या दिवसासाठीं ॥
दक्षिणसागर होउनि घटिकापात्र निरभिमान ॥
मोजित होता या दिवसांचें मंगल घटिमान ॥
पहिला वहिला किरण पहाया या शुभ दिवसाचा ॥
गंगासिंधू धांवत होत्या आंदोलित हृदया ॥

या दिवसाच्या या सूर्याला अर्घ्योदक द्याया ॥
स्वस्ति वाचना सिंहगडावर चढला गगनांत ॥
थरथरुनी श्री तानाजीचा तो तुटका हात ॥
मंगल हृदया बघे पांचही करुनि प्राण गोळा ॥
पंजाबी सिंहाचा दुसरा फुटकाही डोळा ॥
व्यासवाल्मिकीकालिदास कवि आळवीत बसले ॥
या दिवसाच्या भूपाळीस्तव वाङ्मय नें नमलें ॥
योगिवृंदगिरिकंदरिं बसुनि लावुनि अवधान ॥
पाहत होते या दिवसाचें चिन्मंगल ध्यान ॥
आर्यभट्ट मिहिरादि काढुनी गगनाचा ठाव ॥
हुडकित होते या दिवसाचें एकदास नांव ॥
सोरठचा श्री सोमनाथही या दिवसासाठीं ॥
पडे त्रिस्थळीं फुटुनि लागतां महंमदी काठी ॥
निष्ठत अठ्ठावीस युगांवर भीमेच्या कांठीं ॥
खडा पहारा पांडुरंग करि या दिवसासाठीं ॥
अठरा पद्में सेना योजुनि जलधीच्या पाठीं ॥
श्रीरामांनीं सेतु जोडिला या दिवसासाठीं ॥
अठरा अध्यायांची गीता एक मुक्तकंठीं ॥
रणीं गाइली श्रीकृष्णांनीं या दिवसासाठीं ।
फितुरगडावर आग लागली या दिवसासाठीं ॥
पानपतावर रक्त सांडलें या दिवसासाठीं ॥
पोट बांधुनी वेद राखिले सरस्वतीकांठीं ॥
पुण्याई ती सर्वहि केवळ या दिवसासाठीं ॥
जन्मा येतो बाळ टिळकहि या दिवसासाठीं ॥
जन्मति श्रीमान् पंचम जॉर्जहि या दिवसासाठीं ॥

* * *

तहनाम्यावर सही घालितां करि खालीं मान ॥
दुसरा बाजीराव बघे वर धरुनी अभिमान ॥

* * *

न लगे दौलत, न लगे बरकत, नको कोहिनूर ॥
स्वदेश न लगे स्वराज्य न लगे हो सर्वहि चूर ॥

एक सांगणें एक मागणें तेंच लाखवार ॥
" मागुनि घ्यावी श्रीशिवबांची भवानि तलवार ।'
स्वदेशभूषा, स्वराज्यजननी सकाळें दाखवावी ॥
दावित दावित सौभाग्यश्री स्वदेशिं आणावी ॥
चहुं मुलखांतुनि नव खंडांतुनि मिरवित आणावी ॥
रायगडावर समाधिची मग पूजा बांधावी " ॥
म्हणेल जो तो ऐन जिवाचा देशभक्त कट्टा ॥
सर्वस्वाचा ताम्रपटचि तो, तोच अमरपट्टा ॥

( अपूर्ण )

## पांच देवींचा पाळणा

[ हरएक रियासतीच्या राखणीसाठीं कोणतें तरी एक जागृत दैवत असतें. इंग्रजी वाचकांना माहीत आहेच कीं, इंग्लंडभोंवतीं सेंट जॉर्ज, स्कॉटलंडभोंवतीं सेंट अँड्रयूज, आणि आयर्लंडभोंवतीं सेंट पॅट्रिक जागत्या डोळ्यांनीं नेहमीं पहारा करीत असतात. मराठेशाहीला अशा पांच देवी संरक्षक होत्या ! तुळजापूरची तुळजाई, सातारची मंगळाई, प्रताप-गडची भवानी आई, पुण्याची पर्वती, आणि पाराची वरदायी,—हीं तीं पांच पवित्र नांवें ! या देवींनीं शिवनेरीच्या बाळाला निजविण्यासाठीं हा पाळणा श्रीजिजाऊसाहेबांच्या मुखानें म्हटलेला आहे. इतिहास कल्पनेनें आधीं पाहण्याची कल्पना रामाकाळची पुराणी आहे हें सर्वांस ठाऊक आहेच. ]

( चाल—अजि अक्रूर हा नेतो श्रीकृष्णाला. )

गुणि बाळ असा जागसि कां रे वायां ? ॥ नीज रे नीज शिवराया ॥ ध्रु० ॥
अपरात्रीचा प्रहर लोटला बाई ! तरि डोळा लागत नाहीं ॥
हा चालतसे चाळा एकच असला ॥ तिळ उसंत नाहिं जिवाला ॥
निजवायाचा हरला सर्व उपाय ॥ जागाच तरी शिवराय ॥

चालेल जागता चटका ।
हा असाच घटका घटका ।
कुरवाळा किंवा हटका ।
हा कष्टविशी तुझी सांवळी काया ? ।। नीज रे नीज शिवराया ।। १ ।।

ही शांत निजे बारा मावळ थेट ।। शिवनेरी जुन्नरपेठ ।।
त्या निजल्या ना तशाच घांटाखालीं ।। कोंकणच्या चवदा ताली ।।
ये भिववाया बागुल तो बघ बाळा ।। किति वाई काळा काळा ! ।।
इकडे हे सिद्दि–जमान ।
तो तिकडे अफजुलखान ।
पलिकडे मुलुखमैदान ।
हे आले रे तुजला बाळ धराया ।। नीज रे नीज शिवराया ! ।। २ ।।

(अपूर्ण)

## कारंजाचें चढतें पाणी

यंत्रबंधनीं तिर्यजलातें अवरोधुनि यापरी
चढविता, सांगा, कां हो वरी ?

प्रवहण भूपृष्ठावर ज्याचा सहजधर्म हा असे
स्वर्गीं चढेल कां तें असें ?

क्षणैक चढलें तरी निदानीं मानीवरती पडे;
होइल चिखल मात्र चहुंकडे !

पाट बांधुनी मार्ग सुगम त्या करुनी दिधला जरी
जगांतिल माळ मळे किति तरी !

कारंजाचें चढतें पाणी पडतां खालीं असें
उदास "गोविंदाग्रज" हंसे !

प्रेमशोधन

कोणी एक कवि स्वकीय हृदया घेऊन आहिंडत ॥
प्रेमाचा करि शोध जें जगीं जना कष्टाविना लाभत ॥
विश्वाचें अति गूढ भाग धुंडुनि बघे ज्ञानाप्रती वास्तव ॥
होता प्राणहि द्यावया विनिमयें तो शुद्ध प्रेमास्तव ॥

( अपूर्ण )

## गाणें चांगलें कसें असावें ?

संगीताची करी योजना विधि का जगतींत ॥
हेंच कळेना पामर जीवां; हृदयिं न संगति ज्यांत ॥
भिन्नभिन्न हृदयांत भाव जे शब्दां पर असती ॥
संगीताच्या नादावरि ते बाहेरी येती ॥
पशूस मोही गीतध्वनि ही दंतकथा नच कांहीं ॥
पशु-मानव यांमधील सांधा ती जमवी पाहीं ॥

( अपूर्ण )

## काव्याची व्याख्या

शब्दांमध्यें, अर्थांमध्यें प्रासामध्यें काव्य नसे ।
नानारंगी वस्तूंतहि नच सौंदर्याचा लेख वसे ॥
सिंहाचें बळ अफाट म्हणजे शौर्याचें तें स्थानच कां ? ।
गोड सुरावट वेळू करिती; गाणें त्याला म्हणूं नका ॥
उंची इमला दिलरा दाखविल; शोभा म्हणजे काव्य नव्हे ।
काव्य कराया जित्या जिवाचें जातिवंत करणेंच हवें ! ॥

* * * *

काव्याची रचना नसे कठिण ही, अर्थास लागे कवि ।
आलीं वक्र जरी प्रकाशकिरणें तेजास दावी रवि ॥
अर्थावाचुनि बोल सुंदर जरी शोभा न त्यातें असे ।
शृंगारूनि उगाच प्रेत, परि तें जीवंत का होतसे ? ॥ १ ॥

( अपूर्ण

## समशेर दुधारी दिसता— *

[ पद. चाल—उद्धवा शांतवन कर... ]

समशेर दुधारी दिसतां । कां भीसी ऐसा का रे ? ॥
मरणाची मिळकत लोकीं । तूं मी हें विश्वचि सारें ॥
या कीं त्या धारेवरती । मरणाचें लागे बा रे ॥
॥ चाल ॥ जरि शेवट एकचि साचा ॥
मग वृथा वाद दोघांचा ॥
कोणीही कोठें नाचा ॥
तो नाच जरि प्रेमाचा !
प्रेमांतचि होवो कांहीं । मग वादचि राहत नाहीं ॥ १ ॥

## गुलाबाच्या पाकळया

मैना भटके वनांत । वेडा राघू झुरतो मनांत ॥ ध्रु० ॥
विस्कळले पर, पिसें विखुरलीं, गळले दोन्ही पांख ॥
अखंड झरणी झुळझुळ लाविति अरभे उघडे आंख ॥ १ ॥

* ही कविता रा. के. मा. सोनाळकर यांच्या "द्वैत कीं अद्वैत" या कवितेस अनुलक्षून लिहिली होती.

हालचालही हरली सारी– कुठलें चारापाणी ? ॥
बसल्या ठायीं खिळून बसला चित्र रेखिल्यावाणी ॥ २ ॥

घुमे पारवा इकडे, तिकडे त्या घुबडाला घूघू ॥
जित्या जिवाची समाध बांधुनि मधेंच बसला राघू ॥ ३ ॥

( अपूर्ण )

## दिवाळी

जी दुःखी कष्टी जीवां दुसरी माता ।
वाढत्या वयांतहि लोभ जिचा नच सरता ॥
त्या निद्रादेवीच्या मी मांडीवरतीं ।
शिर टेउनि पडलों घ्यावया विश्रांति ॥

भोगितां या परि शांती । दिव्य ती ।
निजतात जगाचीं नातीं । जागतीं ।
जाळत्या मनाच्या वाती । लोपती ।

धडधडां भोंवतीं तोंच फटाके उडती ।
मी जागा होउनि पाहत बसलों पुढतीं ॥
तों कळे उगवला आज दिवस वर्षाचा ।
वर्षाव जगावर करीत जो हर्षांचा ॥ १ ॥

ही जुनी दिवाळी नव्या दमानें आली ।
ही नवी टवटवी जुन्या जगाच्या गालीं ॥

या नव्याजुन्याच्या मंगल संगमकालीं ।
जगिं आनंदीआनंद झुल जणुं घाली ॥
चहूंकडे दिवे हे; दिवेच वरतीं खालीं ।
स्वर्गीय अग्नितेजानें जगतीं न्हाली ॥

काढिलें फोल विश्वाचें । चाळुनी ।
या रसांत नव तेजाचें । जाळुनी ।
ढीगच्या ढीग हीणाचे । गाळुनी ।

सत्त्वाचें बावनकशीच सोनें सारें।
टेविलें करा रे लक्ष्मीपूजन या रे ॥ २ ॥

ही त्रयोदशी धन पूजायाला असलें।
काढिलें जुन्यांतुनि नवें मनीं जें ठसलें॥
जरि घरोंघरीं नव धन हें हांसत बसलें।
नच परवा जरि लेणें जुनेंच असलें मसलें॥

तीं लेणीं गतकाळाचीं। सर्वही।
टाकिते गिळुनियां साची। जणु मही।
उघडते नव्या खात्याची। ही वही।

जी झरली खरली शोभा वर्षाजाळीं।
ती पुन्हा लागली ल्याया सृष्टी सगळी ॥ ३ ।

पालवी पळाली कधींच मधुमासाची।
धुंदीही नाहीं आतां वर्षावाची।
तरि साधीभोळी माता देवी सरला।
हें तत्त्व शिकविते चुकल्या मुकल्या बाळा॥

जें जुनें फार उपयोगें। जाहलें।
त्यांतुनी आपुल्या जोगें। जें भलें।
रंगवा नव्या नवरंगें। चांगलें।

प्रतिवर्ष नव्याला जन्म जुन्यांतुनि देई।
होळींत जाळितां शिशिर, वसंतचि येई ॥ ४ ।

अति निर्मल जलयुत श्यामपुलिन सरिता या।
घनदाट तमांतुनि चिमणासा शशिराया॥
जें काल पेरिलें तेव्हां वाटे गेलें।
तें आज पिकाला आलें शतपट झालें।

(अपूर्ण)

लक्ष्मीपूजन

ही सरती संध्या या सालाची जमली ।
तिजसवें दिवाळी ऐन भराला आली ॥
जनमनें उजळलीं; आनंदानें हंसतां ।
प्रतिबिंबदर्शना लाख लाविल्या वाती ॥
नवनव्या परींचे दिवे भिन्न रंगाचे ।
मांडिलें प्रदर्शन तेजोमय सौंदर्याचें ॥

( अपूर्ण )

पानपतचा फटका

( चाल : भल्या माणसा, दसलाखाची० )

कौरव-पांडव-संगर-तांडव द्वापर-कालीं होय अती
तसे मराठे गिलचे साचे कलींत लढले पानपतीं ॥ ध्रु० ॥

जासुद आला कथी पुण्याला—" शिंदा दत्ताजी पडला;
कुतुबशहानें शिर चरणानें उडवुनि तो अपमानियला । "

भारतवीरा वृत्त ऐकतां कोप अनावर येत महा
रागें भाऊ बोले, " जाऊं हिंदुस्थाना, नीट पहा.

' काळा 'शीं घनयुद्ध करूं मग अबदल्लीची काय कथा ?
दत्ताजीचा सूड न घेतां जन्म आमुचा खरा वृथा."

बोले नाना, " युक्ती नाना करुनी यवना ठार करा;
शिंद्यांचा अपमान नसे हा; असे मराठ्यां बोला खरा. "

उदगीरचा वीर निघाला; घाला हिंदुस्थानाला;
जमाव झाला; तुंबळ भरला सेनासागर त्या काळा.

तीन लक्ष दळ भय कराया यवनाधीशा चालतसे;
वृद्ध बाल ते केवळ उरले तरुण निघाले वीररसें.

होळकराचे भाले साचे, जनकोजीचे वीर गडी,
गायकवाडी वीर अघाडी एकावरती एक कडी.

समशेराची समशेर न ती म्यानामध्यें धीर धरी;
महादजीची विजली साची बिजलीवरती ताण करी.

निघे भोसले पवार चाले बुंदेल्यांची त्वरा खरी;
धीर गारदी न करी गरदी नीटनेटकी चाल करी.

मेहेंदळे अति जळे अंतरीं विंचुरकरही त्याचपरी;
नारोशंकर, सखाराम हरि, सूड घ्यावया असी धरी.

अन्य वीर ते किती निघाले गणना त्यांची कशी करा ?
जितका हिंदू तितका जाई धीर उरेना जरा नरां.

भाऊ सेनापती चालती विश्वासातें घेति सवें,
सूड ! सूड !! मनिं सूड दिसे त्या सूडासाठीं जाति जवें.

वीररसाची दीप्ती साची वीरमुखांवर तदा दिसे;
या राष्ट्राचे स्वातंत्र्याचे दृढस्तंभ ते निघति असे.

वानर राक्षस पूर्वी लढले जसे सुवेलाद्रीवरती
तसे मराठे गिलचे साचे कलींत लढले पानपतीं ॥ कौ. १ ॥

[ २ ]

जमले यापरि पानपताधरि–राष्ट्रसभा जणुं दुसरि दिसे;
वीर वीरमदयुक्त सभासद सेनानायक प्रतिनिधिसे.

अध्यक्ष नेमिले दक्ष भाउ अरि भक्ष कराया तक्षकसे;
प्रतिपक्षखंडना स्वमतमंडना; तंबू ठोकिति मंडपसे.

शस्त्रशब्द हीं सुरस भाषणें सभेंत करिती आवेशें;
रणभूमीचा कागद पसरुनि ठराव लिहिती रक्तासें.

एका कार्या जमति सभा या, कृति दोघींची भिन्न किती !
बघतां नयनीं वाहतीलची पूर अश्रूंचे स्वैरगति.

पूर्ववीरबल करांत राहे, आहे सांप्रत मुखामधीं;
हाय ! तयांचे वंशज साचे असुनी झालों असे कुधी !

जमले यापरि पानपतावरि भारतसुंदरिपुत्र गुणी
युद्ध कराया, रिपु शिक्षाया, संरक्षाया यशा रणीं ॥ कौ० २ ॥

[ ३ ]

अडदांड यवन रणमंडपिं जमले; युद्धकांड येथोनि सुरू.
करिती निश्चय उभयवीर रणधीर " मारुं वा रणीं मरूं. "

पुढें पडे दुष्काळ चमूंमधिं अन्न न खाया वीरांना;
म्हणती, " अन्नावांचुनि मरण्यापेक्षां जाऊं चला रणा. "

मग सेनेनें एक दिलानें निश्चय केला लढण्याचा;
स्वस्थ होळकर मात्र नीचतर पगडभाई तो यवनांचा.

परधान्यहरणमिष करुनि रणांगणिं पळले आधीं बुंदेले;
श्रीशिवराया युद्ध पहाया हांक द्यावया कीं गेले ?

धन्य मराठे ! धन्य यवन ते रणांगणामधिं लढणारे !
आम्ही त्यांचे वंशज केवळ हक्कांसाठीं रडणारे

आवेश प्रवेशे दोन्ही सैन्यामधें कराया युद्धखळीं;
परि स्वार्थ अनिवार मार दे, आर्यजनांमधिं करि दुफळी.

आर्यजनांचें दैवहि नाचे अभिमानाचें रूप धरी;
करि वसति मनिं सदाशिवाच्या; होय अमुच्या उरा सुरी.

सुरासुरीं जणुं डाव मांडिला बुद्धिबळाचा भूमिवरी;
परि दुर्दैवें वेळ साधिली प्यादीं आलीं अम्हांवरी !

कलह माजला, झालि यादवी, नवीन संकट ओढवलें;
कारस्थानीं हिंदुस्थाना व्यापुनि पूर्णचि नागविलें.

कुणि यवनांचा बाप जाहला, ताप तयाचा हरावया,
नया सोडुनी जया दवडुनी कुणीं लाविला डाग वया.

कुणि दिल्लीची वाहि काळजी, कोणी तख्तासाठिं झुरे;
कुणा लागला ध्यास प्रीतिचा विचार सारासारिं नुरे.

" लालन लालन ! " करि कुणि, साधी मर्जीनेची कुणि मरजी;
असे घसरले, साफ विसरले युद्धरीति अति खडतर जी.

गारदीच मज फार रुचे जरि यवन न सोडी विश्वासा;
निजबंधूंची करणी ऐकुनि सोडिं, वाचका, निःश्वासा !

कलहा करिती काय विसरती क्षुद्र वस्तुच्या अभिमानें,
जसे हल्लिंचे लोक तोकसम कलहा करिती नेमानें.

नेमानेमाच्या या गोष्टी कष्टी होतें मन श्रवणीं
असो; बुडाली एकी, बेकी राज्य चालवी वीरगणीं.

सरदारांच्या बुद्धिमंदिरा आग लागली कलहाची
शिपाइभाई परि नच चळले; रीति सोडिलि न मर्दांची.

नाहीं लढले, लढणारहि नच कुणी पुनरपि या जगतीं;
तसे मराठे गिलचे मोटे कलींत लढले पानपतीं ॥ कौं० ॥ ३ ॥

[ ४ ]

एके दिवशीं रवि अस्ताशीं जातां झाला विचार हा—
" प्रातःकालीं स्मरुनी काली युद्ध करूं घनदाट महा. " .

निरोप गेला बादशहाला, " युद्ध कराया उद्यां चला;
समरांत मरा वा कीर्ति वरा जय मिळवुनि आम्हांवरि अचला."

सकल यामिनी आर्यवाहिनी करी तयारी लढण्याची;
वीरश्रीचा कळस जाहला परवा न कुणा मरणाची.

परस्परांतें धीर मराठे गोष्टि सांगती युद्धांच्या,
वीरश्रीच्या शस्त्रकलेच्या जयाजयांच्या अश्वांच्या.

बोले कोणी, " माझा न गणी वंशचि मृत्यूभयासि कधीं;
आजा, पणजा, बापहि माझा पडला मेला रणामधीं.

बापसवाई बेटा होई खोटा होइल नेम कसा ?
पोटासाठीं लढाइ नच परि मान मिळविण्या हवा तसा ! "

कुणी धरी तलवार करीं तिस पाहुनि आनंदें डोले,
फिरवी गरगर करि खालीं वर वीर मराठा मग बोले—

" अफाट वाढीची ही बेटी मोठी झाली लग्नाला
प्राणधनाचें द्याज घेउनी उद्यांच देइन यवनाला. "

अशी चालली गडबड सगळी निद्रा कोणा नच आली;
कोठें गेली कशी पळाली रात्र न कोणाला कळली.

प्रभातरूपें ईर्षा आली; भीति पळाली निशामिषें;
भय मरणाचें कैचें त्यांना ? काय करावें हरा विषें ?

शिंग वाजलें संगरसूचक कूच कराया मिळे मुभा;
धांवति नरवर समरभूमिवर; राहे धनगर दूर उभा.

हटवायानें देशदरिद्रा मुखा हरिद्रा लावुनिया,
कीर्तिवधूतें जाति वराया समरमंडपीं धांवुनिया.

शहावलीचा हलीसारखा अताइ नामा पुत्र बली
यवनदलीं मुख्यत्व घेत कीं पापावलिमधिं जसा कली.

प्रणव जसा वेदांस, सदाशिव तसा आर्यबलसेनानी;
विश्वासातें पाहुनि वदनीं अंगुलि घातलि यवनांनीं.

आले यापरि रणभूमीवरि; जसे गात कवि यापुढतीं,
तसे मराठे गिलचे साचे कलींत लढले पानपतीं ॥ कौ० ॥ ४ ॥

[ ५ ]

वाढे जैसा दिवस, वाढलें युद्ध तसें अतिनिकरानें
हातघाइला लढाइ आली; अंबर भरलें नादानें.

उभय वीरवर गर्जति ‘ हरहर ’, ‘ अल्ला अकबर ’ उल्हासें;
भासे आला प्रळय; यमाला दिली मोकळिक जगदीशें.

अश्ववीरगज भक्तमंडळी गोंधळ भारतदेवीचा;
तलवारींच्या दिवट्या केल्या; सडा घातला रक्ताचा.

धूळ उडाली गुलाल झाली; “ उदे ” गर्जती भक्तवळी,
परस्परांचे बळी अर्पिती भूमि तर्पिती शिरकमळीं.

रणवाद्य भयंकर भराड वाजे शुद्ध न कोणा देहाची;
रणमदमदिरामत्त जाहले, हले फणाही शेषाची.

मनुजेंद्रदळा म्हणुं अंत न उरला देवेंद्राची नच परवा ।
म्हणुनि धूलिकण नभीं धाडुनी मेघसंघ कीं रचिति नवा ?

रक्तपाट अतिदाट वाहती वाट बांधिले अस्थींचे;
मृतगजतुरंग मकर खेळती कृत्य अगाधचि वीरांचें.
घोर कर्म हें बघुनी वाटे रविहि धरी निजसदनपथा;
कांपे थरथर स्थीर न क्षणभर; इतरांची मग काय कथा !
यापरि चाले लढाइ; म्याले दाढीवाले, मग हटले;
पळती, धांवति सैरावैरा; आर्यवीर त्यांवरि उठले.
आर्यजनां आवेश नावरे; भरे कांपरें यवनांला;
म्हणति " मिळाला जय हिंदूंला लढाइ आली अंताला ! "
तोंच अताई दूरदृष्टिचा धीर देत निजसैन्याल,
स्वयें धांवला, पुढें जाहला, स्फूर्ति पुन्हां ये यवनाला.
त्वरित पूर्ववत् समर चाललें, हले भरंवसा विजयाचा;
दाढी शेंडी एक जाहली खेळ शहाच्या दैवाचा.
करी अताई जबर लढाई नाहीं उपमा शौर्याला;
त्यावरि ये विश्वास, भासलें कीं खानाचा यम आला !
विश्वासानें अतिअवसानें खान पाडिला भूमिवरी
करिवरचरणीं मरण तया ये, शरश एक मग यमनगरी.
धीर सोडिती वीर शहाचे पळती आवरती न कुणा;
शहावलीची कमाऊ झाली यत्न तयाचा पडे उणा.
पहात होता शहा खेळ हा दुरुनी, तोही घाबरला,
म्हणे, " करावें काय ? न ठावें ! " दैव हात दे परि त्याला.
दक्ष वीर लक्षैकधीर तनुरक्षक सेनेसह धावे;
म्हणे चमूला, " पळति यवन जे कंठ तयांचे छेदावे. "
पुन्हां उलटले यवन लढाया हुकुम ऐकतां हा त्याचा;
शहा तयांतें सहाय्य होतां मारा करितो जोराचा.
जसे लढावे वीर संगरीं कविजन इच्छा मनिं करिती,
तसे मराठे गिलचे साचे कलींत लढले पानपतीं ।। कौ० ।। ५ ।।

[ ६ ]

नभोमध्यगत सूर्य होत मग युद्धहि आलें मध्याला;
हाय ! हाय ! या आर्यभूमिचा भाग्यसूर्य तो शेवटला !

सदा अम्हांला विजय मिळावा, प्रताप गावा जगतानें;
परि त्या काळीं फुटक्या भाळीं तसें न लिहिलें दैवानें !

सदाशिवाचा उजवा बाहू राहु रिपुस्त्रीमुखविधुचा,
बाऊ केवळ म्लेंच्छजनांचा, भाऊ माधवरायाचा,

बेटा ब्राह्मण बादशहाचा; पेटा साचा वाघाचा,
वीरफुलांतील गुलाबगोटा, वाली मोठा धर्माचा,

ताण जयाची द्रोणीवर उद्राण आणितां आर्याला,
विजयाचा विश्वास असा विश्वास—लागला शर त्याला !

मर्म हाणि तो वर्मी लागे कर्म आमुचें ओढवलें;
धर्म–सभेला आत्मा गेला, धर्मवधूकरिं शव पडलें.

अश्रू नयनीं आणी लक्ष्मी प्रिय भार्या त्या आर्याची;
उतरे चर्या, अधा न मर्या, परि ये स्मृति तिस कार्याची.

करी विचारा वीराचारा दारा वीराची स्वमनीं—
" नाथघात सैन्यांत समजतां धीर उरेल न आर्यजनीं. "

छातीचा करि कोट, लोटिला दुःखलोट अनिवार जरी,
नीट बैसवी प्रेता देवी धनुष्य त्याच्या दिलें करीं.

धन्य सती ती ! धन्य तिचा पति ! धन्यचि जननीजनकाला !
धन्य कवीचें भाग्य असे या म्हणुनि मिळे हें गायाला !

परि जें घडलें लपेल कुठलें ? वेग फार दुर्वार्तेला;
अल्पचि काळें भाउस कळलें—" गिळिलें काळानें बाळा ! "

" हाय लाडक्या ! काय कृत्य हें ? घाय काय हा भान करी
गोंडस बाळा, तोंड पुण्याला दावुं कसें ? कथिं तोड तरी, "

असा करी तो शोक ऐकुनी दुःख जाहलें सकळांला
अश्वावरतीं स्वार जाहला भाऊराया मरण्याला.

व्यंग समजतां भंग कराया आर्यांच्या चतुरंग बळा
सिद्ध जाहला शहा; तयाला देवानें आधार दिला.

फिरति मराठे आला वाटे अंत शिवाजीराज्याला;
भाऊराया योजि उपाया—तोही वाया परि गेला.

मान सोडिला, साम जोडिला; दूत धाडिला होळकरा;
प्रसंग येतां मत्त किंकरा धनी जोडिती असे करां.

दूत निघाला, सत्वर आला, होळकराला नमन करी;
म्हणे, " भाउचा निरोप ऐका—' साह्य करा या समयिं तरी.

उणें बोललों, प्रमत्त झालों, बहु अपराधी मी काका;
माफ करा, मन साफ करा, या आफतींत मज नच टाका.

मत्प्राणाची नाहीं परवा बरवा समरीं मृत्यु हवा;
परी लागतो डाग यशाला शिवरायाच्या तो दुरवा.

देशकार्य हें व्यक्तीचें नच; सक्ति नको; भक्तीच हवी;
आसक्ती सर्वांची असतां मिळवूं आतां कीर्ति नवी.

राग नका धरूं; आग लागते यशा; भाग हा सर्वांचा;
शब्द मुलाचा धरितां कैचा ? हाच मान का काकाचा ?

साह्य कराया यवन वधाया धीर द्यावया या काका ! ' "
असें विनविलें, हात जोडिले, दया न आली परि काका.

रट्टा दे भूमातेला; धरि कट्टा वैरी मान तिची
बट्टा लावी वयास; केली थट्टा ऐशा विनतीची;

दुःखावरतीं डाग द्यायला करी होळकर हुकूम दळा—
" पळा, मिळाला जय यवनाला ! " काय म्हणावें अशा खळा ?

फिरले भाले-भाले कैचे ? दैवचि फिरलें आर्यांचें;
पाहे भाऊ, वाहे नयनीं नीर; करपलें मन त्याचें.

निरोप धाडी पुन्हा तयाला—" पळा वांचवा प्राण तरी
पळतांना परि कुटुंबकबिला न्यावा आमुचा सवें घरीं "

घेत होळकर वीरवधूंतें; मग दक्षिणची वाट धरी;
देशहिताची करुनी होळी नाम होळकर सार्थ करी !

करी दुजा विश्वासघात हा; निजबंधूंच्या दे साची
परवशतेची माथीं मोळी, हातीं झोळी भिक्षेची !

काय कथावी युद्ध-कथा ? मग वृथा भाउचा श्रम झाला;
धीर सोडुनी पळति मराठे, पूर्ण पराभव त्यां आला.

कोणी वेणीमाधव धांवे; वार तयाचा शिरीं जडे;
भारतरमणीकंठतन्मणी धरणीवरतीं झणीं पडे.

भूदेवीची तुटे गळसरी ! फुटे दैव कीं आर्यांचें
आकाशाची कुऱ्हाड पडली; कडे लोटले दुःखाचे !

सैरावैरा आर्य धांवती; हरहर ! कोणी नच त्राता !
यवन करिति ज्या मग प्रळय भयंकर: वदा कशाला तो आतां ?

वर्णन करितां ज्या रीतीनें कुंठित होइल सुकविमति,
तसे मराठे गिलचे साचे कलींत लढले पानपतीं ॥ कौ० ॥ ॥ ६ ॥

[ ७ ]

सन सतराशें एकसष्ट अतिनष्ट वर्ष या देशाला
हर्ष मरे, उत्कर्ष उरेना; सकळां आली प्रेतकळा.

फुटे बांगडी दीड लाख ती; राख जहाली तरुणांची
आग पाखडी दैव अम्बरांवर; मूर्ति अवतरे करुणाची.

घरोघरीं आकांत परोपरि; खरोखरीचा प्रळय दिसे;
भरोभरीं रक्ताच्या अश्रू अबला गाळिति शोकरसें.

'दोन हरवलीं मोतिं; मोहरा गेल्या सत्तावीस तशा;
रुपये खुर्दा न ये मोजितां'—वचना वदती वृद्ध अशा;

घोर वृत्त हें दूतमुखानें कानीं पडलें नानाच्या;
'भाऊ भाऊ' करितां जाई भेटिस भाऊरायाच्या.

उघडा पडला देश तयातें हें नव संकट कां यावें !
दुःख एकटें कधिं न येत परि दुःखामागुनि दुःख नवें !

धक्का बसला आर्ययशाला; तेथुनि जाई राज्य लया,
रघुनाथाचें धैर्य हरपलें, जोड उरेना हिमालया.

"नाथ ! चालला सोडुनि अबला ! पाहूं कुणाच्या मुखाकडे ?"
"बाळा ! कैसा जासि लोटुनि दुःखाचे मजवरतीं कडे ?"

जिकडे तिकडे हंबरडे यापरी परिसती जन फिरतां;
कोणिकडेही तरुण दिसेना; सेनासागर होय रिता.

उडे दरारा, पडे पसारा राज्याचा; बळ घेत रजा;
उघडें पडलें मढें हत्तिचें कोल्हे त्यावरि करिति मजा !

भलते सलते पुढें सरकले, खरे बुडाले नीच-करीं.
मालक पडतां नीट बैसले पाटावरती वारकरी.

नडे आमुची करणी आम्हां; ! खडे चारले यवनांनीं;
तडे पडोनी यशपात्राला रडे सदोदित भूरमणी.

गंजीफांचा डाव संपला दिली अखेरी यवनांतें
स्वातंत्र्यासह सर्वस्वातें दूर लोटिलें निज हातें.

रूमशामला धूम ठोकितां पुणें हातिंचें घालविलें;
दुग्धासाठीं जातां मार्गीं पात्र टेवुनी घरिं आले !

करि माधव नव उपाय पुढतीं परि ते पडती सर्व फशीं;
परिटघडी उघडिल्या एकदां बसेल कैशी पुन्हां तशी ?

जसा नदीचा ओघ फिरावा पात्रीं पडतां गिरिशिखरें
पानपताच्या पर्वतपातें इतिहासाचा ओघ फिरे.

इतिहासाचें पान येथचें काळें झालें दैवबळें,
या देशावर अपमानाची स्वारी दुःखासहित वळे.

सर्वस्वाचा नाश जयानें वर्णुं तयातें अतां किती ?
व्यास वर्णितां थकेल यातें मग मी कोठें अल्पमति ?

जसें झगडतां त्वरित फिरावी सकल जगाची सरल गति
तसे मराठे गिळचे साचे कलींत लढले पानपतीं ॥ कों० ॥ ७ ॥

[ ८ ]

जें झालें तें होउनि गेलें फळ नच रडुनी लेशभरी;
मिळे ठेंच पुढल्यास मागले होऊं शहाणे अजुनि तरी.

पुरें पुरें हें राष्ट्रविघातक परपस्परांतिल वैर अहो !
पानपताची कथा ऐकुनी बोध एवढा तरि घ्या हो !

भारतबांधव ! पहा केवढा नाश दुहीनें हा झाला !
परस्परांशीं कलहा करितां मरण मराठी राज्याला.

हा हिंदू, हा यवन, पारशी हा, यहुदी हा भेद असा,
नको नको हो ! एकी राहो ! सांग आपणां किती कसा ?

एक आइचीं बाळें साचीं आपण सारे हें स्मरुनी,
एकदिलानें एकमतानें यत्न करूं तद्धितकरणीं.

कथी रडकथा निजदेशाची वाचुनि ऐसा हा फटका
लटका जाउनि कलह परस्पर लागो एकीचा चटका !

कौरवपांडव-संगरतांडव द्वापरकालीं होय अती;
तसे मराठे गिलचे साचे कलींत लढले पानपतीं ॥ ८ ॥

## कृष्णाकांठीं कुंडल

[ कुंडल कृष्णाकांठीं नाहीं; पण घटकाभर त्याला तेथें नेलें आहे. त्या वेळच्या गांवकऱ्यांचा थारेपालट आजच्या कुंडलकरांना दगदग देणार नाहीं, अशी आशा आहे. गांवठाणाच्या या हालचालीनें भूगोलाच्या भक्तांची थोडीशी दिशाभूल झाल्यास एक आण्याच्या भूगोलपत्रकानें त्यांचें समाधान होण्यासारखें आहे. ]

### साक्या

—१—

मनांत माझ्या गुणगुणतें हें रसिका कोणी कांहीं ।
" कृष्णाकांठीं कुंडल आतां पहिलें उरलें नाहीं " ॥

नव्या भरानें जुन्या जिवाचें गाणं हृदयीं खवळे ।
फिरत्या भवऱ्यावरी मनाच्या फेस भराभर उसळे ॥

उचंबळुनि येतील बोल ते उधळुनि देतों वरतीं ।
पढिकांची चतुराई सारी येथुनि झाली परती ॥

साधाभोळा मराठमोळा जोमदार घाटाचा ।
रानफुलांचा साज चढविला त्यास त्याच थाटाचा ॥

शाहीराच्या रसवंतीला भावभेटिचें लेणें ।
एकसुराच्या एकसराला बालेघाटी दाणे ।।
असेल रसिका, असलें कांहीं ऐकायाचा हेत ।
तरि ये; मनिंच्या मळ्यांत पिकलें हें शाळूचें शेत ।।
राखण करि त्या जीवासाठीं डोळ्यांचा हा माळा ।
तुझी बाहुली वसवि त्यांत; मग गोफण मारी काळा ।।
गोफणगुंडा फाडुनि टाकी पडदा काळाचाही ।
तुटती धागे तीन शेंकडा उणेपुरे हे पाही ।।
शिवनेरीचा हिरा चमकतो दख्खनच्या दरबारीं ।
रायगडाचें तटबंदीचें कोंदण साजे भारी ।।
सह्याद्रीभर चमके त्याचा जित्या जिवाचा जोर ।
तेजानें बघ पाजळल्या त्या राई काळ्याभोर ।।
त्याच लकाकीमधें तळपल्या त्या एका राईत ।
कृष्णाकांठीं कुंडल शिकवी मायलेंकरां प्रीत ।।
त्या राईंतिल सगळ्या वेली एकच गाणें गाती ।
त्या गाण्यांतिल प्रेमकहाणी—वेड लाविते म्हणती ।।
प्रीतीचें तें गाणें होतें; सहज लागल्या नादीं ।
कोणी येतां जातां त्यासी तेंच सांगती आधीं ।।
झुळझुळत्या वाऱ्यावर त्यांचीं पानें हलतांनाही ।
गुणगुणती तें गाणें; त्यांना छंदच दुसरा नाहीं ।।
वाऱ्यानें झुगझुगी हलवि तरि वेली तें कुजबुजती ।
सोसाट्याचा सूर लागला तरी तेंच ओरडती ।।
तुझ्यासारख्या रसिकासाठीं त्या तें गाणें राजीं ।।
कळ्याफुलांच्या वेलपत्तिनें लिहिती पानोपानीं ।।
चल, तें वाचुनि पहा एकदां बोलशील मग तूंही ।
" कृष्णाकांठीं कुंडल आतां पहिलें उरलें नाहीं " ।।

— २ —

चलाच रसिका, माझ्याखातर त्या राईंत फिराया ।
भलत्या वेळीं, भरल्या ठायीं, भलती मौज पहाया ।।

सह्याद्रीच्या कडेकपारी कोठें मोठे घाट ।
दरीपठारीं धुंडित जाणें भारी अवघड वाट ॥

तशांत पसरुनि रात्र आपुली काळी काळी काया ।
दक्षिण-उत्तर झांकुनि टाकी हिरवी डोंगरमाया ॥

थकाल वाटे रसिका ! माझ्या रसवंतीच्या राया !
मनासारखें मोल न मिळतां कष्टहि जातिल वाया ॥

परंतु आतां नकाच मागें परतूं इतक्यासाठीं ।
मायेखातर भटकलाच ना कान्हा यमुनाकांठीं ? ॥

बारामावळ देश तुम्हीहि पायाखालीं घाला ।
—पहा पुण्याहून कृष्णाकांठीं सहजासहजीं आला ॥

मार्गीं दिसल्या सह्यगिरीच्या चिमण्या चिमण्या बाळा !
वाजवितांना फिरतां रानीं पायीं घुंगुरवाळा ॥

भीमानामें इथें नांदते श्रीमती चंद्रभागा ।
पुंडलिकाची मायमाउली श्रीमहाराष्ट्रगंगा ॥

साधी सुरती बाळजिवाची, डामडौलही नाहीं ।
बघून घ्या ही रसिका ! इकडे नाचे नीराबाई ॥

काळा दरिया काळोखाचा वरतीं भरून राही ।
काळ्या राईमधें खालती काळी कृष्णामाई ॥

काळोखाचें रान माजलें, चंद्रारागी नाहीं ।
तिच्याच मागें पळे तिचा तो चंदेरी दरियाही ॥

जिकडे तिकडे काळीं रानें हमरंगानें खुलतीं ।
निळ्या चांदण्यालागी नुसतीं झालरमोतीं झुलतीं ॥

राईमधली हिरवळ आतां काळ्या रातीं कुठली ?
माथ्यावरची तशी कोंवळी रंगसभाही उठली ॥

निजली दुनिया, निजला वारा, नव्हतें हालत पान ।
लाख जिभांची बडबड थांबुनि निजलें सारें रान ॥

मिटुनि फुलांचे डोळे निजल्या वनदेवीच्या बाळा ।
उभीं झोंपतीं झाडें; त्यांचा उचलजागता चाळा ॥

कुठें कळकबेटांतुनि निघतां सुरांत वारा वाहे ।
निजली राई मधुनी मधुनी वाटे घोरत आहे ॥

क्रूर पशूंची विनशब्दांची लपतीछपती चाल ।
तीं राईचीं हलतीं स्वप्नें भयाण बहु बेताल ॥

काळे बुंधे खालीं नुसते वरतीं पान दिसेना ।
ठाण मांडुनी जणूं ठाकली वेताळाची सेना ॥

त्यांतुनि चिमणे झरे चालतां झुळझुळ हळु करितात ।
भुताटकींतुनि जातां भिउनी रामनाम म्हणतात ॥

भयाण रानीं भयाण राई; भयाण जिकडे तिकडे ।
भयाण रागी भीति नांदते बांधुनि काळे वाडे ॥

म्हणति अप्सरा आकाशांतुनि दुरून बघतांनाही ।
" कृष्णाकांठीं कुंडल आतां पहिलें उरलें नाहीं " ॥

थरथर कांपे वरती जी ती निळ्या रानची राणी ।
त्या तर इवल्या चिमण्या, परंतु देवहि पळति विमानीं ॥

" देवहि पळती विमानिं " म्हणसी शाहीरा ! तें नीट
कोण सांग मग कृष्णाकांठीं देवाहुनि हा धीट ?

पहा दिसे ती काटोखांतहि हलती काळी काया ॥
खास नसे ही नुसती तुमच्या चपळ मनाची माया ॥

* * *

[ त्या दोन जिवांची गांठ पडल्यावर ती त्याला विचारते—]

" कुठली दौलत या खांद्यावर मान ठेवुनि निजते ?
कुण्या कुळाचें नांव उजळितें तलवारीचें पातें ? ॥

कोण गडाचा उभा बुरुज हा बांका बरकंदाज ?
कुणीं चढविला लाजत मुरकत देहावर हा साज ? " ॥

[ तेव्हां तो सांगतो– ]

" रायगडावर धनी आमुचा, त्याला विकली काया ।
या देहाला, नांव साजणी, ' रायबागचा राया ' ॥

शिवरायाच्या शब्दांसंगें नाचतसे तकदीर ।
दोरीपासुनि सुटलेला हा वाऱ्यावरचा तीर ॥
मैदानावर बेलगाम कीं फिरे मोकळा वारू ।
भरदरियावर भरकटतां धरि फेर फिरंगी तारू ॥
तलवारीच्या धारेवरतीं हा जीव वारगीर ।
भालफळावर दिलें टांगुनी हातांनीं तकदीर ॥
रायगडावर खडे पसरले शिवरायाच्या पायीं ।
हिरेमाणकें तीं; आम्हांला दुसरी दौलत नाहीं ॥
मैदानाचा सुभा मोकळा, दुनिया मातीमोल ।
जिवंत मुडदा दिला गाडुनी पाताळाहुनि खोल ॥
पळत्या पायावरचा इमला; हिरवा महाल माझा ।
रानगांवचे कांटे किल्ले; त्याच रानचा राजा ॥
एकमांड घोड्यावर जाणें उत्तर हिंदुस्थानीं ।
भीमथडीला भाकर; तोंवर गंगथडीला पाणी ॥
जंगलशाही मिरास सारी, हिरवी दौलत न्यारी ।
रानबागच्या बादशहाची फिरते बेगम प्यारी ॥
होइल असतां बालीउम्मर सूरत ऐसी न्यारी ।
कुंडलवाली बादशहाची बाली बेगम प्यारी ॥
जयवंतीशीं लग्न लाविलें जेव्हां शिवरायांनीं ।
तोरणगडें तें तोरण बांधिति त्याच्या कुंडलकरणी ॥

[ त्यानें मागें एकदां कुंडल प्रांतीं मुशाफरी केली. त्या वेळीं ]

" पायाखालीं घालुनि थकलों कुंडलचें हें सदर ।
दूरदेशच्या मुशाफराची कुणी न केली कदर " ॥
" एक जिवाविण सुनेंच तेव्हां कुंडलचें हें सदर " ॥
" आला नव्हता "–" काय साजणी " ? " नव्हता आला पदर
गेल्या गोष्टी आज कशाला ? सोडा आतां राग ।
दूरदेशच्या मुशाफरा ! घ्या दिलादिलाचा बाग " ॥
कां वेलींचीं पानें फिरलीं; फुलें लाजलीं कां हीं ? ॥
हांसलीस कां झाडावरतीं तूंही, मैनाबाई ? ॥

[ तिनें 'बरोबर घेऊन चला' असा हट्ट धरला तेव्हां तो म्हणतो, व ती त्याला उत्तर देते– ]

तुझ्या कपाळीं सुबक बसावी बघ मोत्यांची जाळी ।
करवंदीची कांटेजाळी, परी आमुच्या भाळीं ।।

रायगडावर उघड्या पडल्या नव्या हिऱ्यांच्या खाणी ।
नटेल त्यांनीं रायबागच्या रायाजीची राणी ।।

टकमक टोंकावरी राहणें चढण उभी ती फार ।
पडेल खालीं बघतां असली नाजुक नवती नार ।।

प्रीतीच्या पंखांनीं येइल टाकुनि मागें गगना ।।
रायबागच्या राघूमागें ही मान्यांची मैना ।।

थंडीची हुडहुडी निवाली, सरता झाला माघ ।
रायगडावर जागा झाला जंगलांतला वाघ ।।

शहरगांवच्या हिरव्या फिरल्या पोरी चुकल्यावाणी ।
उजाड रानीं पडल्या तर त्या लागतील ना झुरणी ? ।।

चला विचारा त्या वाघाला, 'कधीं लागली पाठीं' ।
तुझी रानची राणी कुंडलच्या बाजारासाठीं ? ।।

वाघाची किंकाळी मोंगल घोड्याची कीं टाप ।
ऐकुनि छातीवरच्या चोरा सुटेल ना थरकांप ।।

तरीच कां ही कमरेवरची नागिण इतकी रोड ? ।
रायबागच्या रणमर्दाची जन्माची जी जोड ।।

शिवनेरीच्या शिवरायांनीं हीच दिली कां शीक ? ।
रायबागचे राघू पढले पोपटपंची ठीक !

नाहीं कोणी फसावयाचें बोल असे ऐकुनिया ! ।
दुसरी ग्वाही गाते आतां, अलम दुलखनी दुनिया ।।

[ तरी तिचा निश्चय फिरविण्याकरितां तो सुचवितो– ]

फसाल पुरत्या; असल्या गांठीं जन्माच्या ठरलेल्या ।
बनी बनाई बदलायाची नाहीं कांहीं केल्या ।।

"तेंच सांगतें—जिवा जिवाच्या आतां नजरा जमल्या ।
बनी बनाई बदलायाची नाहीं कांहीं केल्या"

[ तिचा निरोप घेऊन स्वारींत गेला असतां– ]

फुलांफुलांतुनि रंगत होतीं मधुर सुगंधी स्वप्नें ।

[ झाडावरच्या मैनेला दूती करून– ]

सखे, सवंगडी म्हणतिल ज्याला ‘ रानगांवचा राजा ’ ।
खूणगांठ ती, मैनाबाई—तोच शिपाई माझा ।।

तोच दिलाचा दोस्त, जिवाचा माझ्या मालक तोच ।
जें जें माझें त्याची त्याची झाली त्याला पोंच ।।

झाडावरचा राघू झाला जसा तुझा बेभान ।
तसाच राघू रायबागचा, कापी माझी मान ।।

वाऱ्यावरतीं उडती फिरती असली मैनाराणी ।
तुझ्या गळ्यानें परी सोडितां झालिस बापुडवाणी ।।

आणिक जें जें सुचेल तें तें सांग साजणी बाई ।
पढवणूक ही नको, तुलाही कळतें सारें कांहीं ।।

भरकन गेली उडूनि मैना; उरे मराठी मैना ।
हुरहुर करुनी जीव भागला काय सांगणें दैना ! ।।

[ पुढें तो घायाळ होऊन मेला तेव्हां– ]

जीव सांडुनी पडला माझा जीवाचा अलबेला ।
तोंडीं माती पडुनि रंगला जोबनरसरंगेला ।।

शिवबांच्या शिरपेंचासाठीं–बोली ठरली होती– ।
तोडुनि मंगलसूत्र जिवाचीं देणें माणिकमोतीं ।।

शिवनेरीच्या शिवा, कसा हो केला माझा घात ?
हातावरचा राघू नेला उडवुनि हातोहात ।।

घारीनें झडपिला हातिंचा बघतां बघतां हार ।
पुढतीं केला हात जरा तों विरून गेली गार ।।

चुना लाविला पानाला तो अजुनि वाळला नाहीं ।
विडा घेतल्यावांचुनि केली कां हो इतकी घाई ?

असें जसेंच्या तसेंच वढलें जातें पाउल तुमचें ।
पाय काढिला इथून पुरता; पुन्हां न परतायाचें ! ।।

अखंड भरला नव रंगांनीं हा इष्काचा प्याला।
दुनिया झुकती है ये हरदम, नहीं झुकानेवाला! ॥

[ संदर्भ न लागणाऱ्या ओळी ]

जशी रानच्या पत्रीसाठीं रुसे मंगळागौर।
रुसा साजणी; फुलते गुलशन दिलेचमनकी और ॥
लपंडाव हा सरला, राया, राज्य तुम्हांवर आलें!
हंसेल बाई या बोला ही साधीभोळी राई।
" कृष्णाकांठीं कुंडल आतां पहिलें उरलें नाहीं "।

[ त्या शोकानें तिचा अंत झाल्यावर— ]

ज्योत ज्योतिला मिळुनी गेली, माती मातीलाही।
" कृष्णाकांठीं कुंडल आतां पहिलें उरलें नाहीं " ॥

(अपूर्ण)

## देवल

वंदन नाट्य-मिलिंदा, गोविंदा तव पदारविंदांना,।
वंदन बलवन्नंदन, तेविं तुझ्या काव्य-सुंदरी-चरणा. ॥ १ ॥

आधीं कवित्व नाहीं; त्यांतहि कांहीं सुचूं न दे घाई,
परि उत्सुकता वदवी मजकरवीं बोल बोबडे पाही. ॥ २ ॥

वाही चार फुलें हीं प्रेमें हा बाल त्या तुम्हांलागीं,।
ज्या तुम्हां उभयार्थी बलवद्गुरु सार्थ तेविं वश्या गी. ॥ ३ ॥

आहे धाष्टर्य बहुत हें कवि-कुल-गुरु-राज मजहि हें ठावें,।
परि गुरु-जन-दर्शन-सुख रिक्त-करें म्यां वदा, कसें घ्यावें? ॥ ४ ॥

ती धन्या तव कविता रवि तापवितां उटी जशी अंगीं,।
खिन्न मना दंग करी गुंगवुनी स्वैर आपुल्या रंगीं. ॥ ५ ॥

हरि ताप ' शाप-संभ्रम ' संभ्रम निपजवि कवित्व रसिक-मनीं।
येथुनि उचलुनि बसवुनि मनो-विमानीं तयास ने गगनीं. ॥ ६ ॥

बोलूं काय अधिक मी ? जरि असती कवि जगीं अमित साच, ।
तरि " देवल ते देवल " वदती ते मान्य कां न मजलाच ? ॥ ७ ॥

निर्मूनि ' शारदा ' परि कां तुमची शारदा उगी बसली ? ।
कसली भीति धरी ती शक्ति जिची दांडगी असे असली ? ॥ ८ ॥

जिज्ञासा अधिका ही--क्षमा करावी परी महाभाग, ।
अथवा क्षमा कशाला ? महज्जनांतें कधीं न ये राग ! ॥ ९ ॥

द्या रसिकांतें कांहीं अजुनी; घ्या मग सुखेन आराम,
विनवित सविनय कविवर, नमन करुनिया पुन्हां पद्मा ' राम '. ॥ १० ॥

## घरांत बसलेल्या काजव्यास—

( चाल : भक्ति ग वेणी । माझी गुंफा ग साजणी ॥ )

उडुनि जा स्वैर, । काजव्या, चमक बाहेर. ॥ ध्रु० ॥

वासरमणी अस्तासी गेला,
कृष्ण करी तम सर्व जगाला,
अजुनि चंद्रमा वरति न आला,
असे ही वेळ, । जा, जा, जा, तोंवरि खेळ ! ॥ १ ॥

दिवस तुझे हे फार मजेचे,
तेज तुला हें नित्य कशाचें ?
आठवलें तुज बसणें कैचें ?
अगदिंच गैर ! काजव्या, चमक बाहेर. ॥ २ ॥

दाट तरूंची ती बघ राई,
चमकत चमकत तिकडे जाई,
प्रेम जसें नव-रमणी-हृदयीं,
वीज मेघांत, । जा, तैसा चमके तींत. ॥ ३ ॥

वदसि काय " चिरसौख्य न माझें,
तेज खरें नच तें अस्थिर जें,

मिरवाया मी म्हणुनी लाजें, ”
वेडा, बा रे, । हें वेड तुझ्या मानें सारें. ॥ ४ ॥

वेद, पुराणें नच पढलासी,
न्याय, तर्कही नच शिकलासी,
म्हणुनिच ऐसा मूर्ख रहासी,
मानवी कावा । वेड्या, तुज नाहीं ठावा ! ॥ ५ ॥

असेल त्याचा गर्व धरावा,
अल्प-अधिक हा भेद नसावा,
स्थिरास्थिराचा विचार जावा,
सोडुनि जातां । धन, पुन्हां धरावी लघुता. ॥ ६ ॥

“ ज्ञानवंत जगिं मनुजप्राणी,
क्षुद्र इतर ” हें कोण न जाणी ?
म्हणुनी अमुच्या नियमा मानीं.
जगाची रीती । जा, ठेविं आपुल्या चित्तीं ॥ ७ ॥

## सांग कसे बसलों ?

[ आचरटपणाचाच आणखी एक मासला. ]

### अंजनीगीत

भेट जहाली पहिल्या दिवशीं
परिचित नव्हतों कुणि कुणांशीं,
लाजुनि तेव्हां परस्परांशीं,
दूर— दूर— बसलों. ॥ १ ॥

दिवस यापरी जातां चार,
लज्जा उरली नाहीं फार,
त्रास न होतां मग अनिवार—
जवळ जरा— आलों. ॥ २ ॥

यापरि गेले महिने कांहीं,
परिचयास मग पार न राही,
लज्जा नुरतां तिळभर पाहीं—
सांग कसे बसलों ? ॥ ३ ॥

## कवीचा वधूवरांस आहेर *

### शार्दूलविक्रीडित

श्रीमन्मंगल मंगलप्रद असे जेथें उभा सर्वदा ।
मोदें तेविं सदा सदाश्रितपदा श्रीशारदा सर्वदा, ॥
पद्माही करि सद्म ज्यास अपुलें त्या मंडपीं मंगल ।—
जोडी मंगल कार्य मंगलतरा चिन्मंगला मंगल ! ॥ १ ॥

गंगौघा यमुना, सुकीर्ति विजया, चंद्रास तारा रवा, ।
अर्थातें प्रतिभा, कवीस कविता, स्वर्गा धरा सुंदरा, ॥
आत्मारामपदासि मुक्ति मिळतां जो हर्ष वाटे जना, ।
देवो तेविं अपूर्व योग तुमचा तो सर्वथा सन्मना ! ॥ २ ॥

श्रद्धा साधुजनीं, नया गुरुजनीं नम्रत्व विद्वज्जनीं, ॥
सेवा सेव्यजनीं, दया निजजनीं, स्नेहार्द्रता सज्जनीं, ॥
माया दीनजनीं क्षमा परजनीं, सुप्रेम साऱ्या जनीं, ।
ऐशा निर्मल सद्‌गुणांप्रति सदा आधार द्या स्वा मनीं. ॥ ३ ॥

मातातात जगांत वागति, न तें होईं तुम्हांतें पुरें, ।
तन्मार्ग क्रमिला यथाविधि, तरी कर्तव्य थोडें उरें. ॥
त्यांनीं वाढविलें तुम्हांस; ऋण हें तुम्हांवरी राहि; जें— ।
बाळें वाढवुनी तुम्हांसम गुणी, तें फेडिलें पाहिजे. ॥ ४ ॥

---

* ही कविता भाषांतर आहे.

आलें चालत जें क्रमागत कुळीं त्या सद्यशोवैभवा— ।
रक्षा दक्षपणें; सुलक्षणगणें लक्षैकधा वाढवा. ॥
ठेवा सुस्थिर वैभवा; परि करा त्या सद्यशा चंचल. ।
यावच्चन्द्रदिवाकरौ पसरुनी आसेतुहैमाचल ! ॥ ५ ॥

जैशा मस्तकिं या सुरक्तधवला मंत्राक्षता अक्षता ॥
तैशी सत्कृतिसंचवृष्टिकरणीं ठेवा सदा दक्षता. ॥
जैसा गर्जत वाद्यनाद सुयशा तैसें जगीं गाजवा ।
प्रेमें सुस्थिरशा चिरंतनयशा ऐशा ध्रुवा लाजवा ! ॥ ६ ॥

मालादान न हें; परस्पर परी सर्वस्व संतर्पण ! ।
केलें गुंफुनि सद्गुणांहिं सुमनें हें नित्य आत्मार्पण ! ॥
गंगायमुना ओघ भिन्न असतां एकत्र होती यथा ।
झालां त्यापरि एकरूप इथुनी; आतां न व्हा अन्यथा ! ॥ ७ ॥
जें जें सुंदर जें सुखप्रद तसें जें जें महन्मंगल ! ॥
जें जें वांच्छित जें अभंग जगीं तें देवो तुम्हां मंगल ! ॥
आशीर्वाद सहर्ष वर्षित असा ज्या मान्य आहे रसा ।
'गोविंदाग्रज,' शब्दहार करि हा सामान्य आहेरसा ! ॥ ८ ॥

प्रासंगिक–किंवा अप्रासंगिकच—

## श्लोक

[ एका सार्वजनिक समारंभांत, एका थोर गृहस्थाबरोबर आलेल्या त्याच्या उपवर कन्येच्या गळ्यांतहि इतरांप्रमाणें सहजगत्या व्यवस्थापकांनी पुष्पहार घातला; त्यावेळच्या त्या मुग्धेच्या वृत्तीस पाहून- ]

सन्मानार्थ सभेंत हार कुणिसा कंठीं तुझ्या घातला ।
तों झालें तुज कां कसेंच ? इतका संकोच कां वाटला ?
लोकांदेखत लाजसी नवल हें कांहीं न बाले ! परी ।
बाला पुष्पवती सलज्ज असते एकांतिंही यापरि ॥ १ ॥

पुणें.

# विचार

[ विचार ज्याच्या त्याच्या पाठीस लागलाच आहे; त्याची ओळख कशाला करून द्यावयाला पाहिजे ? ]

विचार करितां तुजविषयीं
गुंग विचारा ! मन
होई. ॥ ६० ॥
दिवसभरी करुनी धंदा
गुलाम पोटाचा बंदा
पडे न तो थकव्यासाठीं;
तोंच लागसी त्यापाठीं !
ताळतंत्र न तुला कांहीं
आदि अंत तुजला नाहीं !
दया न अंतरिं
करिसी स्वारी,
लदा तयांवरि—
खपती जे पोटावारी
या जगताच्या बाजारीं.

[ २ ]

तूं असती बहु नवलपरी,
विश्रांतीचा कामकरी;
निद्रा तव करितां नाश,
स्वप्नांतहि देसी त्रास !
झोंप जागती तयांप्रती,
ज्यांसीं तूं धरिसी हातीं.
नसल्या आधि
स्वैर शतावधि;
निर्मुनि आधी,
क्षणोक्षणीं मग वाढविसी
विश्वामित्र दुजा गमसी !

[ ३ ]

विपत्तिकाळीं आम्हांसी,
न कदाही टाकुनि जासी !
मित्र म्हणावें तुला जरी,
देह जाळिसी सदा तरी !
शत्रु म्हणावें जरि तुजशीं
यत्न हितास्तव तरि करिशी !
" कसें करूं मी ? "
" काय करूं मी ?
ध्रुवपद नामी
हें तुझिया रडगाण्याचें,
नांव न संकट जाण्याचें,

[ ४ ]

करिसी एकान्तीं गर्दी,
एकान्तहि जनसंमर्दीं.
जागा असतां कुणि त्यासी,
पुढचीं स्वप्नें दाखविसी !
निजतां कोणी त्याकरवीं,
करविसी तूं कामें बरवीं.
देइन म्हणशी,
सुंदर खाशी,
" उद्यां " नराशीं
" आज " हातिची परि हरिसी,
मृगजाळें मनुजा खेळविशी !

[ ५ ]

पुत्र भविष्यत्कालाचा,
जन्मसि त्याआधीं साचा.
चिंता जननी तुझी जरी,
घात इच्छिसी तिचा तरी.
वाढायाची गति अतुला,
काळाहुनि बहु वेग तुला.
दोन जनांवर,
लोभ अनावर,
करिसि निरंतर,
विचित्र लीला जशी तुझी
तशी नाढळे जगीं दुजी !

## घास

[ चाल : विडा घ्या हो नारायणा ]

घास घे रे तान्ह्या बाळा । गोविंदा गोपाळा ।
भरवी यशोदामाई । सांवळा नंदबाळ घेई ॥ ध्रु० ॥
घेई कोंडा कणी । त्रैलोक्याचा धणी ।
विदुराघरींचा । पहिलावहिला घास ॥ १ ॥
पोहे मूठभरी । क्षीराब्धीचा हरी ।
मैत्र सुदामजीचा । आला दुसरा घास ॥ २ ॥
धाली गुक्या देठीं । घ्यावी जगजेठी ।
द्रौपदीमाईचा । आला तिसरा घास ॥ ३ ॥
उरल्या उष्टावळी । फळांच्या वनमाळी ।
शबरीभिल्लिणीचा । घ्या हो चवथा घास ॥ ४ ॥
टाकू ओवाळून । मुखचंद्रावरून ।
" गोविंदाग्रजा " चा । उरलासुरला घास ॥ ५ ॥

मराठी ग्रंथ संग्रहा
दा. क्र.

## मोरपिसावरचा डोळा

डोळा साचा ॥ हा मोरपिसाऱ्यावरचा ॥ ध्रु० ॥
बुट्टे काळ्या शालूवरती । तारे निळ्या नभीं लकलकती ।
कृष्णजलावरी कमळें रमती । तसा डोळा हा ॥ मोरपिसावर पाहा ॥
दिसती रंग उघड नयनांतें । आहे विद्युत-शक्तिहि यातें ।

ओढी वस्तुमात्र; जग म्हणतें ! खरें असावें ।। कां नाहीं उगिच म्हणावें ? ।।
मोहकता तर आहे खास । ओढी ती त्याजवळि जगास ।
वाटे सौंदर्याचा वास । असावा त्यांत ।। ग्रह पहिला बघतां होत ।।
दिसतें काय कुणा परि यानें । रुदना खुलवी कां हंसण्यानें ।
फुलतें कुठल्या कीं प्रेमानें ? क्षणमात्रांत ।। हे विचार येत मनांत ।।
सजीवतेचें निर्जिव फूल । नुसती सौंदर्याची भूल ।।
ईश्वरतेची पोकळ हूल । भिन्न रंगाची ।। ही बैठक भिन्नपणाची ।।
क्षणमात्राची मोहकता ही । चंचलतेनें चमकत राही ।
प्रेमाचें मुळिं पाणी नाहीं । कसला डोळा ? ।। हे रंग जाहले गोळा ।।
शोभा प्रेमावांचुनि फोल । जिणेंहि याचें कवडीमोल ।
अर्थाविण मेलेले बोल । टाकुनि द्याना ।। खेळणें मुलाबाळांना ।।
कितीक असले फसवे डोळे । रंगीबेरंगी जणुं गोळे ।
जगांत पाहुनि फसती भोळे । दे ही जोड ।। देवा ते डोळे फोड ।।

## रांगोळी घातलेली पाहून—*

“ साध्याही विषयांत आशय कधीं मोठा किती आढळे;
नित्याच्या अवलोकनें परि किती होती जगीं आंधळे !
रांगोळी बघुनी इतःपर तरी होणें तयीं शाहणें, ”
रांगोळी बघुनीच केशवसुता हें आठवे बोलणें.
रांगोळींत तुझ्या विशेष गुण जो आर्या ! मला वाटतो,
स्पष्टत्वें इतुक्या अशक्य कथणें वाटे तुला काय तो ?
जो तूतें वदवे न अर्थ मनिंचा तोंडांत आला तरी,
तो मी बोलुनि दाखवीन अगदीं साध्याच शब्दीं परी.
चैत्रीं आंगण गोमयें सकलही संमार्जिलें सुंदर,
रांगोळीहि कुणीं तिथें निजकरीं ती घातिली त्यावर.

---

* केशवसुतांची ‘ रांगोळी घालतांना पाहून ’ ही उदात्त कविता ज्यांनीं वाचली आहे, त्यांनाच या कवितेचा अर्थ कळेल.

ज्यां आमंत्रण त्या घरीं मुळिं नसे ऐशा स्त्रियांलागुनी
त्या चिन्हांतुनि हा विशेष निघतो आहे गमे मन्मनीं—

या या ! आज असे सुरेख हळदीकुंकू पहा या स्थलीं
बत्तासे बहु खोबरें हरभरे खैरात ही चालली !

ठावें कोण न जात येत—दिधलें कोणास आमंत्रण;
नाहीं दाद घरांत ही मुळिं कुणा; दे धीर हें लक्षण.

संधी टाकुनि छान फौज तुमची कोठें पुढें चालली ?
बायांनो ! अगदीं खुबी विसरतां तैलंगवृत्तींतली !

नातें, स्नेह, निदान ओळख तुम्हां येथें न आणी तरी,
या; आमंत्रण राहुं द्या; परि शिरा साऱ्याजणीं या घरीं !
लाभे तें फुकटांतलेंच हळदीकुंकू तुम्हांला जरी,
होई काय नफा अचानक तयामाजीं न कित्तीतरी ?
ही आगंतुकवृत्ति आपण जरी धिक्कारिली यापरी,
प्राप्ती चार घरें उगीच फिरुनी होईल का हो तरी ?
चाले काय असें उगीच भिऊनी ? तुम्हींच सांगा खरें !
या डोळा चुकवून नीट; डरतां आतां कशाला बरें ?
कोणाच्या नजरेंत येइल तरी होणें असे कांहिं का ?
केला का खटला कुणावर कुणीं ऐसा अजूनी फुका !
बायांनो ! तर या, नकाच दवडूं संधी अशी हातची,
जा जें कांहीं मिळेल तेंच भरल्या रस्त्यांतुनी खातची !
कामें हीं असलीं हितावह कधीं होतील का लाजुनी ?
या-या-या तर धांवुनी; त्यजुं नका रीती पुराणी जुनी !
कोणाच्या घरचें असेल हळदीकुंकू कधीं नेमकें
ज्या बायांस नसेल हें चुकुनियां केव्हां जरी ठाउकें,
रांगोळी बघुनी इतःपर तरी होणें तयीं शाहणें,
कोठें चालत काय काय अगदीं हें नेहमीं पाहणें !

## विराम-चिन्हें

जेव्हां जीवनलेखनास जगतीं प्रारंभ मीं मांडिला,
जो जो दृष्टिंत ये पदार्थ सहजीं वाटे हवासा मला !
बाल्याची पहिली अशी बदलती दृष्टी सदा वागडे,
तेव्हां ' स्वल्पविराम ' मात्र दिसती स्वच्छंद चोंहींकडे !
आहे काय जगांत ? काय तिकडे ? हें कोण ? कोटें असे ?
सांगा ईश्वर कोण ? त्यापलिकडे तें काय ? केव्हां ? कसें ?
जें तें पाहुनि यापरी भकतसे, दक् संशयें टाकित,
सारा जीवनलेख मी करितसे तैं ' प्रश्नचिन्हां 'कित.
अर्धांगी पुढती करी वश मना शृंगारदेवी नटे,
अर्धें जीवन सार्थ होइल इथें साक्षी मनाची पटे;
प्रेमानें मग एकजीव बनतां भूमीवरी स्वर्ग ये !
केला ' अर्धविराम ' तेथ; गमलें येथून हालूं नये !
झाली व्यापक दृष्टि; चित्त फिरलें साश्चर्य विश्वांतरीं,
दिक्कालादि अनंतरूप बघतां मी होत वेड्यापरी !
सूक्ष्मस्थूलहि सारखीं असविनी; लागे मुळीं अंत न,
त्याकाळीं मग जाहलें सहजची ' उद्गार ' वादी मन ।
आशा, प्रेम, नवीन वैभव, तशी कीर्तिप्रभा, सद्यश—
हीं एकेक समर्थ आज नसतीं चित्ता कराया वश ।
सर्वांचा परमोच्च संगम चिरं जेथें असे जाहला,
देवा ! ' पूर्णविराम ' त्या तव पदीं दे शीघ्र आतां मला !

## वागेंत बागडणाऱ्या लाडक्या लहानग्यास—

थांब जरासा बाळ ! ॥ ध्रु० ॥

सुंदर लागा प्रभातकाळीं,
चहूंकडे हीं फुलें उमललीं,
बाग हांसते वाटे सगळी !
शीतल वारा, या जलधारा कारंजाच्या छान !
थांब जरासा बाळ !

रम्य तडागीं निर्मळ पाणी,
गाति पांखरें गोजिरवाणीं,
आनंदाचीं वसलीं ठाणीं,
खरें असे रे ! तरी नको रे मारूं लाडक्या धांव !
थांब जरासा बाळ !

पाहुनि सौख्याचा ठेवा !
सृष्टि करीलचि माझा हेवा !
माझ्यापासुनि फसवुनि न्यावा,
यत्न परोपरि, करितिल सारीं ! भुलशिल तूं लडिवाळ !
थांब जरासा बाळ !

तऱ्हेतऱ्हेचीं फुलें विकसलीं,
रंगी बेरंगीहीं सगळीं,
तूंही शिरतां त्यांच्या मेळीं;
माझें मग तें, फूल कोणतें कसें ओळखूं सांग ?
थांब जरासा बाळ,

बघ सुटला हा मोठा वारा,
वायुवृत्ति तव देहहि सारा !
उडवुनि नेइल तुला भरारा !
दिगंतराला, जातां बाळा ! पुन्हां कसा मिळणार ?
थांब जरासा बाळ !

स्वच्छ तडागीं प्रतिबिंबातें,
पाहुनि वेड्या धरावयातें,
चुकुनी जाशिल पाताळातें !
तयासारखा, क्षणीं पारखा होशिल बा आम्हांस !
थांब जरासा बाळ !

किती बुडबुडे पाण्यावरती,
इकडुन तिकडे तरंगताती,
चंचल लहरी, तूं त्या साथी,
क्षणांत बा रे, लपाल सारे, काळाच्या उदरांत !
थांब जरासा बाळ !

फूलपांखरें हीं स्वछंदी,
तूंही त्यांच्यासम आनंदी,
क्षणांत पडशिल त्यांच्या फंदीं!
त्यांच्या संगें, त्यांच्या रंगें, जाशिल उडुनी दूर!
थांब जरासा बाळ!

अशा तुला मग बागडतांना,
भरभर वाऱ्यावर फिरतांना,
फुलांत दडतां कीं उडतांना,
कवण उपायीं, आणूं ठायीं, पुन्हां? लाडक्या सांग!
थांब जरासा बाळ!

शब्दावांचुनि मंजुळ गाणें,
अर्थ तयाचा देवचि जाणे!
गाइन माझें गोजिरवाणें,
सप्तसुरांपरि या वाऱ्यावरि विरुनी जाशिल पार!
थांब जरासा बाळ!

बालरवीचे किरण कोवळे,
कारंजावर पडति मोकळे,
रंग खेळती हिरवे पिवळे,
धरावयासी, त्या रंगांसी जाशिल बाळा खास!
थांब जरासा बाळ!

जडावेगळी अमूर्त मूर्ति,
कल्पकतेची कीं तूं स्फूर्ति,
पुण्याची मम आशापूर्ति,
रविकिरणांवरि, जलधारांतरिं, तन्मय होशिल पार!
थांब जरासा बाळ!

## कवि आणि कैदी

[ संसृतीच्या पाशांत सांपडलेला आत्मा एकादे वेळीं तरी आपल्या परिस्थितीच्या वर जाण्याचा विचार करितोच; पण मायावश आत्ममूढता त्याला खालीं ओढिते. अविकारी आत्म्याच्याच " कवि " व " कैदी " अशा दोन बाजू आहेत. ]

( चाल – एडका मदन० )

मार भरारी । चल तोड बंधनें सारीं ! ॥ ध्रु० ॥
पायीं गंजत बेडी पडली,
नंकळे कोणी केंव्हां घडली;
पुढती चाल परी तव अडली,
व्याद भिकारी । चल तोड बंधनें सारीं ! ॥ १ ॥

अवजड बेडीसह जड पाय,
अनाथ जीवांवरती हाय !
टाकुनि चिरडिसि कोमल काय,
निर्दय भारी । चल तोड बंधनें सारीं ! ॥ २ ॥

नसतां मुळींच तूं अपराधी,
कोण तुझ्या ही पायीं बांधी ?
करुनी निधडा निश्चय आधीं,
फटका मारी । चल तोड बंधनें सारीं ! ॥ ३ ॥

तुटतां असली भिकार बेडी,
हंसतिल तुजला भणंग वेडीं,
कोणी तुजशीं धरितिल तेढी,
तयां धिक्कारी ! चल तोड बंधनें सारीं ! ॥ ४ ॥

मारी गरुडभरारी गगनीं,
सुख तें शेणकिडा का जाणी !
जाई शेणामधेंच कुजुनी !
सुखाचा वैरी । चल तोड बंधनें सारीं ! ॥ ५ ॥

असल्या शेणकिडयांच्या जाती,
जिकडे तिकडे बुजबुज करिती,
केवळ मरण्यासाठीं जगती;
येत ओकारी । चल तोड बंधनें सारीं ! ॥ ६ ॥

प्रकाश बघतां घुबडें दडतीं
एकांताची आवड वरिती,
रातींबेरातीं परि फिरती,
घाण ही भारी । चल तोड बंधनें सारीं ! ॥ ७ ॥

भिडतो गरुड सदा गगनाशीं,
वातावरणीं वसतिहि खाशी !
लावुनियां टक तेजोराशी
बघती घारी । चल तोड बंधनें सारीं ! ॥ ८ ॥

जाऊं त्यांमागुनि धीरानें,
काढूं शोधुनि लपलीं भुवनें,
गगनामागुनि निघतिल गगनें,
करी तयारी । चल तोड बंधनें सारीं ! ॥ ९ ॥

रविकिरणाचे दोर मोकळे,
बांधूं नवमेघांचे दोले,
वारा देइल त्यांतें झोले,
धन्य संसारीं ! । चल तोड बंधनें सारीं ! ॥ १० ॥

बसुनी तेथें तीन्ही काळीं,
पाहुनि मूर्खपणाच्या चाली,
जगता हंसूं गालिंच्या गालीं,
ब्रह्मानंदीं । रंगुनी स्वैर स्वच्छंदीं ! ॥ ११ ।

## केशवसुतांची कविता वाचून–

शिवरायाच्या मागें आम्ही लालमहालीं फिरणें,
तसेंच तुमच्या मागें आम्ही नवीन कविता करणें;
असेंच कांहीं कांहीं करुनी जीवित त्याला गणणें–
' गोविंदाग्रज ' म्हणे असे हें आम्हां लाजिरवाणें.

## रात्रीस ओरडणाऱ्या घुबडास

### वसंततिलका

जेव्हां धरी निजनिभा रवि आवरोनी।
तिग्मांधकार करि कृष्ण जगा भरोनी ॥
जेव्हां अशेष जग निद्रित नीडभागीं
जेव्हां सजीव जगता चलताहि त्यागी ॥ १ ॥

जेव्हां न ये श्रुतिपथावरि शब्द कांहीं।
भावि स्थिती जग धरी जनुपूर्व वा ही ॥
होई अशांत रव कर्कश तावकीन।
जो त्रास दे, खग मना करि भीतिदीन ॥ २ ॥

आधींच भीषण निशा, तम त्यांत घोर।
चोंहींकडे वन भयंकर; भीति थोर
येतां अशांत तव तापद शब्द कानीं।
घोर स्थितीसि जणुं पूर्णदशेस आणि ॥ ३ ॥

तो शांतिभंग करि कष्टवि लोकचित्ता।
होतां पुरी भयद ग्रंथिक रोगग्रस्ता ॥
जैसा करी जनमनांप्रति भीतियुक्त।
" श्रीराम " शब्द शववाहकसंघ–उक्त ॥ ४ ॥

प्रौढा रवासि ऐकुनि भीतचित्तें।
उरःस्थलीं दृढ धरी निज बालकातें ॥

मुग्धा समीप शयितस्वधवांगभागीं ।
वेष्टीत चंदनतरुप्रति जेविं नागी ॥ ५ ॥

चिंती धवा कुशल ती विरहार्त बाला ।
तोडी तशी उपवश स्वविचारमाला ॥
ऐसें खगा ! तव रवा जन अज्ञ भीती ।
भीती तसें तुज अमंगल मानिताती ॥ ६ ॥

आहेत अन्य खग जे तुजहूनि थोर ।
कांहीं तुझ्याहुनि रवा करिती कठोर ।
तूतेंच कां मग कथी जन सर्व भीती ?
शब्दा तुझ्या अशुभसूचक मानिताती ? ॥ ७ ॥

केलेंस पातक असें वद काय बा रे ।
किंवा गमे तव मना " जन मूर्ख सारे ! " ॥
छे ! लोक मूर्ख न; पडे तुजलागिं भ्रांती ।
घूका ! तुला जन सकारण निंदिताती ॥ ८ ॥

तूं घोर शब्द करिसी भलत्याच काळीं ।
लोकांसवें नससि, रीति तुझी निराळी ॥
रात्रीस तूंच फिरसी खगजात्यमित्रा ! ।
सूर्यप्रकाश दिपवीत तुझ्याच नेत्रां ॥ ९ ॥

यानेंच लोक उलुका ! तुजलागिं भीति ।
शब्दा तुझ्या अशुभसूचक मानिताती ॥
बा ठेव या सुनियमास सदैव चित्तीं ।
" लोकानुसारि नसतां जन निंदिताती " ॥ १० ॥

## जीवितास-

[ ईश्वरकल्प सौंदर्याचा परिचय या लोकीं नेत्रप्रत्यक्षापुरताच आहे असें नेहमीं प्रत्ययास येतें या प्रतीतीनें ज्यांना खेद होत नाहीं ते एका अर्थी धन्यच ! ]

— आणि जीविता, लाभ हाच का तुझ्या संगतीं राहुनियां ? ।
असेंच जाणें असे सदा का कालौघावर वाहुनियां ? ॥
सौंदर्याच्या दर्शनमात्रें जागृत होत्या जीवांत ।
विकल चेतना नाचे नुसती स्वस्थानीं व्हाया श्रांत ॥
जनसंमर्दीं अलभ्य शोभा पाहुनि, ठसवुनि मनिं घेणें ।
एकान्तीं तच्चिंतन करणें; दुःखावेगीं विस्मरणें ॥
दिव्यदर्शनें हृदयपटावर नवरंगांनीं रेखावीं ।
आणि आंतल्या अश्रूंनीं तीं सवेंच धुवुनी काढावीं ॥
अवश्य जीवश्वसनें निर्दय निःश्वासांनीं योजावीं ।
हृदयजलानें भरतां नयनें गेली घटिका मोजावी ॥
आद्यंतींचे क्षण सोडुनियां अशेष जीवनिं या देख ।
परिस्थितीचा रंग काढितां क्षणयुग्मचि उरतें एक ॥
पहिला क्षण तो कीं ज्यावरतीं स्वप्रकाश आशा धाडी ।
दुज्या क्षणावरिं तीव्र निराशा छाया प्रेतमया पाडी ॥
आयुष्याच्या क्षणाक्षणाचा हिशेब केवळ हा आहे ।
परंपरेला त्यांच्या दिधलें नाम मनोहर 'जीवन' हें ॥
रंग बदलुनी खेळत राही अशा क्षणांची ही जोडी ।
स्थलकालांच्या भिन्नत्वानें नित्य नवीं दिसतीं कोडीं ॥
क्षणाक्षणाला जनमरण हें प्राणिमात्र भोगित राही ।
चौऱ्यांशीचा फेरा याविण आणिक दुसरा तो नाहीं ॥
फसव्या पाण्यावरी पोहुनी, दम कोंडुनि मरतां ।
"गोविंदाग्रज" म्हणे जीविता ! लाभ तुझा नच यापरता ॥

## "समसमां संयोग कीं जाहला !"

[ अशीं फुलें नेहमीं सांपडत नाहींत म्हणूनच जगांतले ग्रामोफोन कवि-हृदयाच्या नालायकीचीं गाणीं गात असतात. ]

संध्याकाळ सदा उदास करितो माझ्या अभागी मना ।
त्यानें हर्षति जीवमात्र, परि तो मातेंच दे यातना ॥
नित्याचा क्रम एक हा ठरविला कीं काळ जायाप्रती ।
कोठेंही तरि शून्यवृत्ति फिरुनी, येणें घरा मागुतीं ॥ १ ॥

येतां एक दिनीं असेंच, दिसली वेली कुठेंशी मला ।
होती कांहिं फुलें तिच्यावर, मना आनंद तैं वाटला ॥
घ्यावीं काढुनि दोन तीन म्हणुनी जों जीव माझा भुले ।
वारा वाहुनियां जरा-- भरभरा सारीं उडालीं फुलें ॥ २ ॥

वेलीचीं नव्हतीं फुलें- तिजवरी होतीं कुणीं टाकिलीं ।
( प्रेमाचे शुकपाठ बोलत नटी, तें आठवे त्या स्थलीं ) ॥
कांहीं त्यांतुनि घेतलीं उचलुनी, चालावया लागलों ।
" याचें काय करूं ? " विचार करितां हा मी परि भागलों ॥ ३ ॥

कोणी मित्र मला पुढें भटकतां वाटेमधें भेटला ।
प्रेमें ओढुनियां स्वकीय सदनीं तो शीघ्र नेई मला ॥
माझें स्वागत तो करी बहुपरी खेदास न्याया लया ।
ग्रामोफोनहि लाविला; रिझवि तें गाणें मना माझिया ॥ ४ ॥

ज्या गाण्यांतिल शब्दसंघ पडला होता मनासारखा ।
गाणाराहि —गळा किती मधुर तो ! —लोकींच या पारखा ॥
अर्थानें तर वेड लागत मना; उत्कर्ष झाला रसा !॥
नाहीं एकच तेवढें हृदय तें; हा खेळ दैवा, कसा ! ॥ ५ ॥

ग्रामोफोनवरी तेव्हां संतोषें जीव हर्षतां ।
फुलें तीं टाकुनी होई " गोविंदाग्रज " चालता ॥ ६ ॥

## गरिबीचें गाणें

कुणि ऐका हो ऐका एकच वेळ । हा दुर्दैवाचा खेळ ॥
मी शास्त्रांचा मोठा पंडित नाहीं । नच शिकलों पढलों कांहीं ॥
मृत हृदयाचें रडकें केविलवाणें । गरिबीचें माझें गाणें ॥
दैवाचे पाहुनि झगडे ॥
मम हृदय जाहलें उघडें ॥
मग गाई वेडें बगडें ॥
घ्या मानुनि हें; चुकलें मुकलें कांहीं । तरि उपाय माझा नाहीं ॥ १ ॥

दुर्दैवाची करणी अघटित कांहीं । दुष्काळ पसरला बाई ॥
निज बाळाला पाजीना ती आई । गोठ्यांत उडाल्या गाई ॥
चहुं मुलखीं हो एकच उपासमारा । चिमणीला नाहीं चारा ॥
झाडावर नाहीं पान ॥
वैराणच रानोंरान ॥
दुनियेचा बदले वान ॥
लवलेश कुठें अन्नाचा न मिळावा ॥ पोटांत पेटला वणवा ॥ २ ॥

किति आड तळीं विहिरी गेल्या खोल । नांवाला नाहीं ओल ॥
जणुं प्रेतांच्या डोळ्यांच्या त्या खांचा । भेसूर भाव दोघांचा ॥
नदिनाल्यांना तापुनि रेतीचूर । मृगजळेंच आले पूर ॥
पाण्याविण होतां भडका ॥
दगडाला देती धडका ॥
परि पाझर कुठला खडका ॥
यमरायाचे दूत फिरति चौफेर । सर्वांचा उठला शेर ॥ ३ ॥

( अपूर्ण )

## प्रेमकाळ

संगम तीन्ही काळांचा ॥
प्रेमकाळ घडवी साचा ॥ ध्रु० ॥

हृदयदेवते, दे हाता ॥
प्रेमकाळ निर्मूं आतां ॥
दृढ आलिंगन दे हृदया ॥
चुंबन देई नंतर त्या-॥
एक करूं जीवा भावा ॥
प्रेमकाळ चल करूं नवा ॥
प्रेमकामने । प्रेमचुंबनें ॥ जोडुं या मनें ॥
वर्तमानकाळीं करुं ती ॥ भूत-भविष्यांची भरती ॥ १ ॥

सोडुनि सारें घरदार ॥
चिंतेचाही बाजार ॥
चुंबनेंच घेऊं नुसतीं ॥
सखे ! सारखीं; सोडुं न तीं ॥
काम एवढें मनीं धरूं ॥
जीवन चुंबनमयचि करूं ॥
आतां चुंबन । नंतर चुंबन । चुंबन जीवन ॥
इच्छा-तृप्ति क्रिया तशी ॥ चुंबनमय चल करूं अशी ॥ २ ॥

भूतकाळची क्रिया अशी ॥
आणुं वर्तमानापाशीं ॥
वर्तमानिची हीच क्रिया
भविष्यांतही नेऊं या ॥
झाल्याचें गोडें स्मरण ॥
होत्यांचे आशा-किरण ॥
असल्याच्या या कार्यांत ॥
जिरवुनि टाकूं निमिषांत ॥
चुंबन स्मरणीं । चुंबन करणीं ॥ आशास्फुरणीं–॥
चुंबन एकच राहूं दे ॥ कार्यांच्या प्रेमानंदें ॥ ३ ॥

आद्यंतीं तीन्ही काळीं ॥
इच्छा तृप्ति स्मृति सगळी ॥
एकरूप होतां कुठला ॥
काळभेद सखये ! उरला ? ॥
भेद असे जो कार्यांचा ॥
भेद तोच या काळांचा ॥
इच्छा चुंबन । आशा चुंबन ॥ स्मृतिही चुंबन, ॥
विलय तीनही काळांचा ॥ प्रेमकाळ निर्भेद चा ।
,क्रिया एकची करूं सदा ॥
क्रिया एकची स्मरूं सदा ॥
मनांत आणूं कितीकदां ॥
क्रिया तीच, नच दुजी कदा ॥

भूतभविष्यत्कालां ा ॥
वर्तमान एकच सांचा ॥
हा ऐक्याचा । हा प्रेमाचा । हा जीवांचा ॥
चुंबनसंगमकाल गणा । प्रेमकाळ त्यालागिं म्हणा ॥ ५ ॥

ओंठावरतीं ओंठ सदा ॥
कदा न सोडूं इष्टपदा ॥
चुंबनास आरंभ नसे ॥
अंतहि कुठला त्यास असे ॥
चुंबन एक अनाद्यंत ॥
सखये ! मरणापर्यंत ॥
ओंठ न हाले । चुंबन असलें । सदाहि चाले ॥
नव्या जुन्याचा एक ठसा । प्रेमकाळ चल करूं असा ॥ ६ ॥

## लीला

( अनाथबालकाश्रमांतील एक पांच वर्षांची मुलगी. )

### दिंडी

दिसे मजला हें पुढें गोड मूल ।
पडे कोमेजुनि रम्य तसें फूल ॥
एक निर्णय मनीं होत नसे साच
विषय दृष्टीचा द्विविध हा तसाच ॥ १ ॥

जसें वेलीचें दलितगलित फूल ।
बालविधवेचें तसें पतित मूल ॥
दिसतिं दोन्हीही सारखीं मलूल ।
कृपादृष्टीची कुणि न घालि झूल ॥ २ ॥

पांच वर्षांची छबकडी सुरेख ।
जणूं चिमणीशी हिरकणीच देख ॥
कशी चित्रासारखी उभी राही ।
नांव ठेवाया सोय मुळीं नाहीं ॥ ३ ॥

कुण्या ऋषिचे यानास अडखळून ।
पडे निखळूनी जणुं नीलपटांतून ॥
आलि खालीं ही चांदणीच एक ।
तरिच इतकी ही चमकते सुरेख ॥ ४ ॥

बाल अवयव रेखीव एवढाले ।
कल्पनेच्या जणुं श्रमें चित्र हाले ॥
काव्य तरळत जणुं हृदयिं कवेजनाचें ।
बालसौंदर्यहि असें देहिं नाचे ॥ ५ ॥

बालसौंदर्यहि असें देहिं नाचे ।
तरी वाटे हें स्वप्न निर्धनाचें ॥
यास कारण तें पाहतां दिसेची ।
जोड सौंदर्या उदासीनतेची ॥ ६ ॥

किती लीले ! तव वदन उदासीन !
सांग बाळे ! कां दिसशी अशी दीन ॥
बघावेंसें वाटतें जरी त्यास ।
तरी बघतां मन होतसे उदास ॥ ७ ॥

तोंच माझ्या लागलें कुणी काना ।
जन्मवार्ता कथि चित्तसमाधाना ॥
बालविधवेनें टाकिली अनाथ ।
मिळाली ती बालिका कंटकांत ॥ ८ ॥

जणुं कळुनी ही जन्मकथा नीच ।
असे तेऽव्हांपासून ही अशीच ॥
किती हंसवावी तरी हंसत नाहीं ।
दृष्टि भूभागीं यापरी सदाही ॥ ९ ॥

## विश्वाची विजयादशमी

नवरात्राची रात्र संपली सण आला दसरा ॥
पडल्या प्रहरीं जनता सारी करी येरझारा ॥
सृष्टिदेवता उघडुनि रविचें मावळतें दार ॥

खुलें टाकितें हें सोनेरी संध्याभांडार ॥
तें दसऱ्याचें सोनें लुटणें कविचा अधिकार ॥
तयार झाला, पुढें निघाला; हौसच अनिवार ॥

शब्दांचा चढविला क्षणोक्षणीं फुलता पोशाख ॥
अहंपणाच्या मुर्दुमकीचे अलंकार लाख ॥
तुरा शिरावर डुलतो पवनीं तरल कल्पनांचा ॥

(अपूर्ण)

## अपराध यांत कोणाच

हा असे खेळ दैवाचा। अपराध यांत कोणाचा ॥ ध्रु० ॥

कमलिनी मनोहर बाला। कमलमुखी शोभा वाही ॥
गुणरूप रेखिल्याऐसें। कोठेंही न्यून न कांहीं ॥
मकरंदें रसपूर्णा ती। कोणाला ठाउक नाहीं ॥

पंकांत जन्म परि तिजला ॥
देतांना विधि का निजला ॥
हें पाहुनि जीवची थिजला ॥

परिणाम पूर्व जन्माचा। अपराध यांत कोणाचा ॥ १ ॥

उदयाचलिं श्रीमान् रवि ये। निज तेज त्रिजगीं पसरी ॥
अति पवित्र त्या स्पर्शानें। कमलिनी जाहली हंसरी ॥
कुरवाळी तिजला स्वकरीं। भाग्याला उरली न सरी ॥

तेजाला तेज मिळालें ॥
दोन जीव एकच झाले ॥

“ मी कुठें, कुठें तूं ” सरले ॥
हा धर्मचि सम हृदयांचा । अपराध यांत कोणाचा ! ॥ २ ॥

( अपूर्ण )

## पुत्रशोक

### दिंडी

पूर सरितेला फिरुनि फिरुनि येत
फुटत गिरिचें पाषाणहृदय जेथ ॥
हृदय फुटतां हें, जरी दीनवाणी ॥
करुणरंगें रंगते “ रामवाणी ” ॥ १ ॥

पडुनि आकाशींच्याच कुऱ्हाडीचा ॥
घाव देवाच्या सबळ तांतडीचा ॥
वंशतरुचा रोपटा कोंवळाच ॥
तोहि एकुलता तुटे आज साच ॥ २ ॥

हिरा जीवींच्या जिवाचाच माझा ॥
गगननगरा जातसे बाळराजा ॥
शोकमंगल गावया गोड गाणीं ॥
सजे राजस रसवती “ रामवाणी ” ॥ ३ ॥

उचंबळुनी रस करुण येत रंगा ॥
भरुनि दुथडी वाहते हृदयगंगा ॥
“ रामरसवंती ” रमे काळिं ऐशा ॥
साक्ष देई श्रीमहाराष्ट्रभाषा ॥ ४ ॥

हाय !—शोकाच्या भरें काय आज ॥
बोललों हें सोडुनी भीड लाज ॥
क्षमा करिं हा अपराध शब्द मातें ॥
मायभाषे ! मज मूढ बालकातें ॥ ५ ॥

कुठें देवी मंगला मायभाषा ॥
कुठें पामर मी; काय ही दुराशा ॥

थोरथोरांची मायमाउली ही ॥
बोल भलते बोललों तिला कांहीं ॥ ६ ॥

ज्ञानदेवाच्या हृदयिं बघुनि कोडें ॥
भाविकांचें जी उकलि गूढ कोडें ॥
मराठ्यांच्या मंडळामाजि भावें ॥
जिनें भगवद्गीतेस नाचवावें ॥ ७ ॥

जिच्या सामर्थ्यें सहज नामयातें ॥
साध्य झालें फिरविणें राउळातें ॥
एकनाथाचें देव आणि पाणी ॥
जिच्या ओघांतूनि ती हीच वाणी ॥ ८ ॥

गोकुळींच्या चोरास धरुनि पायीं ।
बसवि जात्यावर जेधवां जनाई ॥
दळण दळितां गावया गोड गाणीं
आळवी तो श्रीरंग हीच वाणी ॥ ९ ॥

फक्त नांवाची ठेउनियां ठेव ॥
करी देवाशीं सदा देवघेव ॥
अभंगांनीं ही करि अभंग वाणी ॥
खरा देहूचा जातिवंत वाणी ॥ १० ॥

जिनें आतांही मारितां भरारी ॥
गूढ गगनें भेदुनी पार सारीं ॥
तत्त्वरत्ना उघडिल्या दिव्य खाणी ॥
तीच कृष्णाची * महाराष्ट्रवाणी ॥ ११ ॥

अशी थोरांच्या रमे हृदयधामीं ॥
बोल सलगीचे बोलिलों तिला मी ॥
मायभाषा म्हणुनीच सर्व साही ॥
बाळबोलाचा तिला राग नाहीं ॥ १२ ॥

अजुनि खेळत माझिया मनासंगें ॥
रंगवावी मीं तशी तीहि रंगे ॥

---

* कविवर्य केशवसुत

धीर येउनि यामुळें तुला माते ॥
बोलवी मी मजसवें रडायातें ॥ १३ ॥

हाय ! बघतां बघतांच काय झालें ॥
कुण्या जन्माचें पाप पुढें आलें ॥

( अपूर्ण )

## काळाला बजावणें

जबरदस्तिचा हुकूम माझा ऐकुनि काळा ! थांब जरा ॥
बजावणें हें माझें तुजला, शक्तीचा हा जोर खरा ॥
ऐकुनि जाशिल पुढें तसाची, तुझाच होइल तरि तोटा ॥
दटावणी ही फोल नसे; बा शब्द एक नाहीं खोटा ॥
ब्रह्मचारि बैरागी बळकट शून्याच्या हातीं सोटा ॥
निःसंगाची सोबत माझी ब्रह्मांडाचा करिं लोटा ॥
गाणें माझें काळा ! पाडिल चराचराला भुलावणी ॥
जो तो होइल ठायिंच वेडा ओळखील ना कुणा कुणी ॥
अवसानाच्या भरांत घेइन रविचंद्रांची झांज करीं ॥
दिनरजनीची जोडी ही तव क्षणांत मूर्खा ! वांझ तरी ॥
गाणें ऐकुनि त्या सूर्याचा प्रकाश होइल गार अति ॥
विरतिल तारा; रस पाझरतां तशी चंद्रिका अखंड ती ॥
दिनरजनीची जोडि फोडिसी नीरस असशी किती तरी ॥
एका काळीं, एका ठायीं दोघां मी रमवीन परी ॥
एकरूप तीं करितां यापरि झांज करीं रविचंद्रांची ॥
दिनरजनींचा खेळ बंद; जणू उघडझांप तव डोळ्यांची ॥
उभें ठेवितां समोर माझ्या ब्रह्मांडा करुनी वेडें ॥
अंधा ! ऐसा एकटाच तूं जाशिल कोठें सांग पुढें ? ॥
म्हणुनि सांगतों हुकूम माझा ऐक, नको करुं वृथा त्वरा ॥
बजावणें हें माझें तुजला; शक्तीचा हा जोर खरा ॥

## गेले गोपाळ कृष्ण—हा ! हाय !!

चल, ऊठ, कल्पने, जा बघ पाहूं आज जाहलें काय
कां श्रीभारतदेवी एकाएकीच मोकली धाय ?
जी एकमात्र भूषण पुरुषाप्रति तीहि वाङ्मयी देवी
ठेवी कां उतरोनि स्वभूषणें ? मूकवृत्ति कां सेवी ?
साऱ्या शहर पुण्याची पुण्याई काळवंडली कां ही ?
आनंदाची माया हांसत खेळत कुठेंच कां नाहीं ?
भारतसेवामंडलसदनाभवतीं उदास वदनांनीं
अश्रूंची पुष्करिणी केली कां ? काय जाहली हानि ?
श्री फर्ग्युसन मंदिरिं शोकाचा पूर लोटला कां हा ?
हे भिंतीचे दगडहि रडुनि म्हणति सारखेच कां ? हाहा !
म्हणतात झोंप आली शिक्षा ऐकिलि तरी त्वरित ज्यांस
ते धीर बाळ टिळकहि आज रडतात कां सनिःश्वास ?
हृदया ! धडधड न करी ! ऐक इथें कोण बोललें काय ?
नश्वर देहा त्यजुनी गेले गोपाळ कृष्ण—हा ! हाय ! !

( अपूर्ण )

## वीणावती सुंदरीस—

घुमे नाद तो सुंदरींच्या करीं
मनीं अंतरीं ही विराल्या परी ।।
तशा हृदयिंच्या सर्व तारा त्वरें ।
म्हणूं लागल्यीं गान एकस्वरें ।। १ ।।

चढे दिव्य हृद्गान तें सारखें ।
करी बाह्य विश्वास तें पारखें ।।
क्षणार्धांत चिद्वृत्ति ही रंगली ।
स्वगीतांतची बालिका गुंगली ।। २ ।।

अशा दिव्य त्या चित्तगीतापुढें ।
असे कायसें विश्व हें बापुडें ।

घुमे आंतल्या आंत गाणें असें ।
कळे तें जयाचें तयाला कसें? ॥ ३ ॥

म्हणोनी करीं शांत झाली गती ।
विचारांतरीं लीन वीणावती ॥
तिनें उधळितां नादरत्नाकरा ।
मनोवृत्ति साऱ्याहि आल्या भरा ॥ ४ ॥

मनांतील तारा निजार्थध्वनि ।
खडा ठेविती गूढता टाकुनी ॥
मुक्या प्रीतिचे भावही बोलती ।
मनोवृत्ति त्यां ऐकुनी डोलती ॥ ५ ॥

मिटी नेत्र बाला पहाया मना ।
तशी गुंगली सर्वही चेतना ॥
मुकें गान    अंतरीं पाझरे ।
विरे देहिंचा देहभाव त्वरें ॥ ६ ॥

जरासा तसा हात राही पहा ।
करी यौवनश्री असा खेळ हा ॥
खुले भाव सारा झुले जीवही ।
क्षणार्धांत झाली समाधिस्थ ही ॥ ७ ॥

## जिवास बोध

शिवोऽहं शिवोऽहं शिवः केवलोऽहम् !

( टिपणें )

जसें पाहिलें त्वां परा जीवजातां ।
तसें पाहणें आपणासीहि आतां ॥
तुला कर्मसाक्षित्व आलें निदानीं ।
त्रिवाचा करी बोध हा रामवाणी ॥ २ ॥

( अपूर्ण )

# परिशिष्टें

# परिशिष्ट : १

## नाटकांतील पदें

### संगीत गर्वनिर्वाण

(१)

प्रभुपदीं नमन तव पद तदधिक शतविधा मजसि
असत हे केकाकार आधीं । प्रभुपदीं ॥ धृ० ॥
अवगणी म्हणूनि झणिं, हरिहर विधितर न गणिति
अद्य—नग ही गतकवि, प्रभुबल तसा करिसि
जरि प्रसाद मजवरि असा पातेत तरि ।
प्रभुभयाहि गणिं निज मनिं नच कधिं ॥ १ ॥
विनवित नव कवि तूं करशिल प्रभुवरा, अमंगल
न जरि, सुमंगलचि तरि, अभंग निज
करि, वितरिशी सहज मजवरी निरवधि ॥ २ ॥

(२)

गगनांत कां राही धरा ही अनंत दीपका ॥
स्थिरतराहि, फिरत राही,
आज कां तारका-मालिका ॥ धृ० ॥
स्वांतीं किति येति कल्पना,
भ्रांतिप्रति चित्त सोडिना ॥ १ ॥
भ्रम जरि नयनां, स्थिर बघतांना,
शांतिप्रभा दे न कां मना ॥ २ ॥

निरखुन बघतां, आधिं अधिकता
अंतीं न कांहींच भावना ।। ३ ।।

( ३ )

नगरी सारी नटुनी थटुनी सकलाभरणीं ।
सरितामुकुरीं पाही कां ही वदना रमणी ।। धृ० ।।
दीप नयनिं बघतां पतिला । लाजुनि लपवाया तनुला ।
कृष्णतमाची शाल करी ।। १ ।।
तुषार नच जलयंत्र जलीं । स्पर्शें आलिंगनकालीं
सगळी ! घर्मजलें परि तनु भिजली । होती न हे
ध्वनि पटहें, धडधड हें करि हृदय परी ।। २ ।।

( ४ )

प्रलयाग्नीची वृष्टिहि झाली । मत्तनुची जरि रक्षा केली ।।
टाकुनि दिधली जळिं पातालीं । वृत्ति मनीं शांत ।। धृ० ।।
श्री जगदीशा प्रेमें गाइन । कल्पांतीं हा असाचि राहिन ।
राज्यपदाचा मोह न ठेविन । वृत्ति मनीं शांत ।। १ ।।
राज्यलोभ भय धन सुत दारा । व्यर्थ तयांचा जगीं पसारा ।
तारा अथवा क्रोधें मारा । वृत्ति मनीं शांत ।। २ ।।

( ५ )

जगदीश-पदीं जा शरण
शरणपर अन्य जगांत न या ।
तदितर इतर न दुरित हरित
हरि करील दया तरि हरिल भया ।। धृ० ।।
भक्त जरि असे सहस्रधा अपराधी
ठेवि श्रीहरि सदा करुणापराधी ।। १ ।।
कां भयासि अजुनी भाव हा न वधी ?
जावया शरण त्या न करा अवधि ।। २ ।।

( ६ )

अतुल तव कृति अति भ्रमवि मति ईश्वरा ।। धृ० ।।
वर्षती मेघजल, शांतविति भूमितल,

सलिल मग त्यजुनि मल जात सुरमंदिरा ॥ १
फिरविसी रविशशी, तेजविसि भूमिसी,
केवि जनं सुखविसी, कळत नच पामरा ॥ २ ।
करिसि गर्भावना, मग पयोयोजना,
पुढति अर्पिशि जनां पवन जल शुभकरा ॥ ३ ।
श्रम जनां-दिनभरी । विश्रमा शर्वरी,
रमवि संध्या बरी । रंगवुनि अंबरा ॥ ४ ॥
दिङ्-मंडलावरति नित्य नव विहरती
तारकातति, हरति नयन मन सुखकरा ॥ ५ ॥
पक्षि लक्षावधि, श्रवणसुख निरवधि
प्रसरिती स्वन नाद रस निर्झरा ॥ ६ ॥
वाग्वैजयंतींत शब्दमणि अगणित
स्वीकरुनि कविरणित, हसुनि खुलवी जरा ॥
गोविंद पूर्वपद अग्रज स्मरुनि पद
उधळि निज हृत्सुखद शब्दरत्नाकरा ॥ ८ ॥

(७)

माना वचना; मान्य न हें वच हरिचरणा ॥
आचरणा साच न या यश कधि जागा ॥ धृ० ॥
अशरणशरणा, शरण न तरि मरणचि समजा,
स्वजना सकला न करि हरिपदावमाना ॥ १ ॥

(८)

प्रेमाविना । जगतीं गति ना ।
करिते धरा । ही पावना ॥ धृ० ॥
नसतां रवि । तरि कांहिसा ।
शशि भूषवी । सकला भुवना ॥ १ ॥
परि आटला । प्रेमांबुधि ।
तत्साम्यता । करवे न कुणा ॥ २ ॥

(९)

कां शंका । कराया सांग विकट अघटित अशि
कृति कोणतीहि जी छेदिल या भयपंका ॥

लत्ताघातें कठिण गिरितटा । मुष्टिविघातें तडित्पटा ।
दृक्पातें वर गगनकपाटा । फोडुनि दाखवुं संरुद्ध—
बला वद का ॥

( १० )

आनंदाच्या सागरिं वाही । सृष्टि अशी तर नवल न काहीं ॥ धृ० ॥
रमवी स्वकरें नाथ सुतांसी । सुखविति बाळें नाथासही ॥ १ ॥
अशा सेवितां द्विविध सुखासी । मानिति अबला मोह
सदाही ॥ २ ॥

( ११ )

जगदीश तो विदेही । दिसला कुणासि नाही ।
तरि ही त्याविना न कांही ॥ धृ० ॥
दाही दिशांस राही । व्यापूनिया जगताही
भक्तास दूर न कांहीं तरि ही ॥ १ ॥
स्वजना सदाहि पाही । हृदयीं तयांच्या राही ।
विलया भयासि नेई तरि ही ॥

( १२ )

अनंत तेजांचा तूं राणा । विनवित देवा नारायणा ।
आणा करुणा करुणाघना ॥ धृ० ॥
कृति घोर बघुनि ही लाजवीत का दीना ?
घ्या झाकुनि आपुल्या सर्वसाक्षी नयनांना ॥ १ ॥

( १३ )

जगदीश वचनासी । करि पूर्ण करुणाराशी ॥ धृ० ॥
रक्षी तुझ्या श्रीदासी । दे धन्यता निज दासासी ॥ १ ॥
कर हा अबल वचना या । देतां तुझ्या वाचुनिया ।
धरि कोण अभिमानासी ॥ २ ॥

( १४ )

कृतिच मात्र हो नच वचनापरि ।
निर्दयता आचरणी दिसे खरी ॥ धृ० ॥

करितां न दया आपण नाथा ।
टाकिल कां जगदीश अनाथा ॥
दीनजनां तो नुरतां त्राता ।
सतत अवन करि ॥१॥

(१५)

रम्य आनंदपद पाहतां कानना ।
सहज सहवासपर हो मना कामना ॥ धृ० ॥
कांतार शांत करि, स्वांतास शांत जरि ।
शांत तर अंत तरि, सहज वाटे मना ॥ १ ॥

( १६ )

हा नित मोद सकल भुवना । प्रभुवरि भाव धरा ।
समजुनि, करि न कधिं नाश, कुणाप्रति जाणा ॥ धृ० ॥
येई धावुनि संकटसमया । भक्त जनांप्रति संरक्षाया ।
सहज करी जी अघटित कार्या । शक्ति न ही अवमाना ॥

( १७ )

उत्कंठा वैकुंठाची लावि मानसा ।
मोह न तरि आवरतां खास हा असा ॥ धृ० ॥
शून्य भूमि पापवशा । शून्य तिला मीहि जसा ॥
शून्य जशा दाही दिशा । शून्य मनीं वृत्ति तशा ॥
आयुष्यास पळ ही नीरसा रसा । पळ जीवन सम गमतें;
नीरसा रसा ॥

( १८ )

पूर्णचंद्रबिम्बवदन एकदा पहा हो ।
धूलिपुलिन मलिन कमल तेंच हें न कां हो ? ॥ धृ० ॥
धूलिमिश्र अश्रुजला बघुनि तत्त्वतां ।
चुंबनांनि मलिनांबुज मधुसि चाखितां ।
त्यासमचि आमुचेहि अधर माखतां ।
हांसलों परस्परांसि आठवतें कां हो ? ॥ १ ॥

( १९ )

देई हीच जोड । आई । विष हें देइ गोड ॥ धृ० ॥
व्यर्थ हा पसारा सारा । मनिं न देह मोहा थारा ॥
तुच्छ मानि या संसारा । माया सोड सोड ॥ १ ॥
हट्ट कधिंहि धरिला नाहीं । हाच आज शेवटचाही ॥
मागणें न याहुनि कांहीं । पुरवी हेंच कोड ॥ २ ॥
पुरवितां न आई ज्याला । कोण घेई जवळी बाळा ?
धीर धरुनि मायाजाळा । आई तोड तोड ॥ ३ ॥

( २० )

पंचानन संचारुनि । भीषणरव करित वनीं ॥
नारायणनामध्वनि । त्यांतहि असे ॥ धृ० ॥
गुंगुनिया कमलदलीं । गुंजारव करित अलि ॥
नारायणनामावलि । त्यांतही असे ॥ १ ॥
वायु करूनि वनिं निनाद । मंडित जणु तरुसि वाद ।
नारायण हाच नाद । त्यांतही असे ॥ २ ॥
चंडनाद सागरास । निर्झर करि मंद हास ॥
नारायणनामवास । त्यांतही असे ॥ ३ ॥
जनका निज ताराया । ब्रह्मार्पण करि काया ।
रक्त समूळ दुरिता या । धवल विमल करि निर्मला ।
शुभ मुहूर्त शुभ घटिका
हा अपूर्व योग निका
पुण्यबळावाचुनि कां
बाळ तुम्हां लाभला ?
धन्य तुझी पुण्याई । नवलाची नवलाई ।
धन्य तुझी ही आई । धन्य जन्म जाहला ।
जन्म मरण मंगला । अमर बाळ जाहला ॥

## पुण्यप्रभाव

( १ )

प्रभुपदास नमित दास मंगलमात्रास्पदा । वरदा सदवनिं लव यदवलंब न करि हरि दुरिता सौख्य वितरि ॥ धृ० ॥ सारस्वत—

चरणकमल— । दलिं विहरत कविमंडल । दुर्लभ तें दिव्य स्थल । पंकनिरत । राम रत । धन्य तरी ॥ १ ॥

( मुंबई, ६-६-१९१६ )

( २ )

नच संभव ज्या कांहीं होत अकारण तेंही । कालहि त्या नाहीं ॥ धृ० ॥ कलिका नाहीं खुलली, करपत तों अकालीं । हरपत मोहर कां वनिं वाई ॥ १ ॥

( मुंबई. ११-५-१९१६ )

( ३ )

शिशुपणाहूनि परिचित जनांसि बघुनि दुःखि हो स्वसुख असुखमय कटुतर वाटे । मोदहि विषसम ॥ धृ० ॥ मंद सदा आनंद विषादें । हृदयिं विरति खर वसवि निज धाम ॥ १ ॥

( मुंबई, १३-५-१९१६ )

( ४ )

व्याकुळ हें मन होई कां सतत कां त्यास छळ हा ॥ धृ० ॥ जगतिं न रंगे । विचारी परी तरंगे । नच त्या कांहि विसावा हा ॥ अनलज्वाला । जाळते अशी जिवाला । पसरी अंतरीं या दाहा ॥ १ ॥

( मुंबई, १४-५-१९१६ )

( ५ )

दशा आता अशापरी अजुनि जाईना । उपत्य कांहीं ना । मना तें साहीना ॥ धृ० ॥ प्रयास हा करि महा । योग तरी न पहा । तिळभर मान कसा तो राहीना ॥ १ ॥

( ६ )

अनुकार जना ने कालान्तरिं थोर पदा । छळि विहास हा असला । आधी जरि त्या सदा ॥ धृ० ॥ हा निश्चय कधिं न ढळे । प्राणान्तहि आला जरि । न मन तिळमात्र चळे । ये त्याप्रति यश तोंवरि । करिन यत्न परि । कल्पान्त घडला तरि । ही तापवीन तनु ॥ १ ॥

( मुंबई, ४-६-१९१६ )

( ७ )

फसवित पुरुषाप्रति स्त्री खनि कपटाची ॥ धृ० ॥ दोषमात्र पूर्ण गात्र । विश्वासा कधिं न पात्र । मोहपाश वागुराचि ॥ १ ॥

( ८ )

प्रभुसम पतिपद अबलांना । न दैवत लोकीं तयांना । शुभगति पतिप्राणा ॥ धृ० ॥ निजपतिवांचुनि इतर जनांशीं । दर्शन भाषण सुकृतासि नाशी । ईशपदीं रतिही पापचि त्यांसी । भयद खरविषसमाना ॥ १ ॥

( ९ )

हाल्त वार्ते मृदु शान्ति ही । भासे हासे कीं चंद्रालोक तनुल्कान्ति ॥ धृ० ॥ दशदिशा पुष्पपरागें दरवळुनि हसत जणुं असती ॥ १ ॥

( १० )

दावी निजकान्ति । वियतीं । शीतलमाया शान्त निशापति ॥ धृ० ॥ शान्त वैभवा कोमल किरणां । वितरि तरलतर धवलावरणा । दाहि दिशाप्रान्तीं ॥ १ ॥ विविध विरोधी भावांवरतीं । पसरी जणूं हा मुनि एकान्तीं । ज्ञानमया शान्ति ॥ १ ॥

( ११ )

नाचत ना गगनांत । नाथा । तारांची बरसात ॥ धृ० ॥
आणित होती । माणिकमोती । वरतुनि राजस रात ॥ १ ॥
नाव उलटली । माव हरपली । चंदेरी दरियांत ॥ २ ॥
ती ही वरची । देवाघरची । दौल्त लोक पहात ॥ ३ ॥

( १२ )

विनाश कां सहगामीच सदा भोगसुखाला ॥ धृ० ॥ सुवास वाहात राही । नाश तदा पुष्पाचा । विचार हा करि आनंदकालिं खिन्न मनाला ॥ १ ॥

( १३ )

गौरवा प्रसरी प्रभूच्या भव्य पट हा नभाचा ।
जीवकोटिप्रचुर भू करि कुंठिता तेवि वाचा ॥ धृ० ॥

भ्रमति अवकाशांत अणु हे अलक्ष्यरूपें ।
पवन त्यांतुनि शीघ्र फिरतां नाद चाले तयाचा ॥ १ ॥
विस्मयाकुल मनुजमतिला तदा भास होई ।
हुंकृतिध्वनि कोशवासी विश्व करि हाच साचा ॥ २ ॥

( १४ )

भुलूनिया खलजनालापा । जरि दिला ताप निष्पापा । तरि निरयनिरति न दुरापा ॥ धृ० ॥ या सदर्पा । बघुनी सर्पा । जात कोपा ॥ १ ॥ तनु सकंप नय कुजनिं उचित जरि घडत न तरि मलिन करी सत्प्रतापा ॥ २ ॥

( १५ )

दुर्दैवें हेतु झाला तुम्हां व्याया ताप हा ॥ धृ० ॥ उपकार आजवरि केला । तो अकालिं विलया गेला । अपकारमात्रें याला । स्मरावें आतां पहा ॥ १ ॥

( १६ )

अंतरिं खेद भरे, दीनवदन बोलेना । शून्य आलोक शून्य जग शून्य हृदय डोलेना धृ० ॥ शुभदर्शन चरणाचें, नच आतां म्हणुनी । देह हा जड जाहला शोकविकल हालेना ॥ १ ॥ व्यर्थ जीवित यावरी । वज्र पडेना कां शिरीं । हें अपयश आजि या प्राक्तनीं हत आलें ना ॥ २ ॥

( १७ )

करा करुणामया क्षमा । विषमा जरि गमे कृति हतकामा तरि सुखधामा सुपरिणामा ॥ ध्रु ० ॥ क्षणचि हृदय हें भरतां विकारीं । मोदभरें तव कृति न स्वीकरी । विसरुनि तें; अघ हें सहाया दे या शमा ॥ २ ॥

( १८ )

प्रलयाची जी हतदशा । आली ती कां आतां ? ॥ धृ० ॥ रविकिरणां वाटे भय याया । बघुनिया ऐशा एकान्ता ॥ १ ॥

( १९ )

भारसंचय पहा नियमि चंचलपदा । जातमात्रास या कर्मबंधापदा ॥ धृ० ॥ शकटभर जड यथा । महोक्षहि पाहतां ॥ सुटत न कष्टतां । चक्रपद्धति कदा ॥ १ ॥ पूर्वकृत संचिता । जीव हा ओढितां ॥ नियतिरेखांकिता । मात्र गति तापदा ॥ २ ॥

( २० )

अघटित कृतिसी करिसी कां ॥ धृ० ॥ या पापातें कवण अशि ।
महती आशा वद करवि ॥ जाळि अंतरंग जें । तदुपरि आत्म-
नाश चिरन्तनचि करि सुकृत लव नुरवि ॥ १ ॥

( मुंबई, २१-५-१९१६ )

( २१ )

कधि वदे प्रणय का कठोर बिकटहि वचना । रुचतसे तया
मृदुरचना । ध्वनि तिथें कलह तो माना ॥ धृ० ॥ कळे न
वळे न कुणासि जें । वच असेंहि वदतां लाजे । कुलीन
त्याप्रति जग समजे । पतित इतर जन मनीं गणना ॥ १ ॥

( २२ )

सदा हृदयीं या रंगे । तरंगे । प्रसन्न अंतरंगे । कदा न भाव
भंगे ॥ धृ० ॥ मूर्तिसुंदरा । मदनमदहरा । गुणां नटवि नटवरा ।
कुणा भुलवि न मधुरा । प्रणयरागें ॥ १ ॥ प्रेमविव्हला ।
हतबल अबला । प्रिय शरण पदतला । प्रिया हृदयिं या स्थला ।
न तरि भागे ॥ २ ॥

( मुंबई, २९-५-१९२६ )

( २३ )

अतिशय छळी दीन मनासि कां ? तापद असा हा ॥ धृ० ॥
विषमय गमे कां हृदयहि या संतत सुखाचा विहार ॥ १ ॥

( २४ )

रंग अहा भरला । सुबक भला । नाचत चंचल हा वरवरला ॥ धृ० ॥
भुलवुनि खुलवुनि हांसत खेळत । भारुनि केलें गुंग जीवाला ॥ १ ॥
हंसवी फसवी नटवी माया । शोभत बाई ज्याची त्याला ॥ २ ॥
बांधुनि नजरा जादूगारा । दाखवितां हा खेळ कुणाला ॥ ३ ॥

( २५ )

चतुरा चातुरी । तुमची न्यारी । भुलावणी खरीखुरी ॥
परि मारी । जिव्हारीं । दुधारी सुरी ॥ धृ० ॥
भोळा भाव भुलाया, टाकुनिया फांसा ।
केला डाव असा अवचित कां हो खासा ?

हा देव पावला आज कुणाच्या नवसा ?
रुसला कान्हा काय जिवाच्या रासा ?
तुटली सारी कां दिलदारी इतक्यावारी ?

( २६ )

आतां न करी हा चाळा । टाकि छंद बाळा ॥ धृ० ॥
शान्तिसुखाची झोप कशाची । भीति मजसि ही जार्ना घाली आळा ॥ १ ॥ धीर मला दे मंजुळ नादें । हास परतवी वीरा निर्दय काळा ॥ २ ॥

( २७ )

बोल ब्रिजलाला रे कांहीं हंसुनी बोल । भ्यालें जनाला । भ्यालें मनाला । सुटला माझा तोल ॥ धृ० ॥ करि उरिं धडपड रहा मनिंच तूं । हांसुनि भिरभिर वद नयनांनीं । नवलाखाचा बोल ॥

( २८ )

रणवीर कुमारा निकट बिकट रण हो झणि सिद्ध तया । यदपि वय न तव, उघडि नयन निज, हरुनि भया मज दे अभया ॥ धृ० ॥ प्रसंग घोर पाहुनिया भीत माता । तुझाच एक धीर तिला आतां । तात तुझे त्यजुनि मला दूर जाता । प्रभुस्वरूप तूंच जगीं, तूंच त्राता ॥

( २९ )

धिक् जगति शतधा शुभयशा । त्या वीरकर्मा या परि जरी नरवर कृति करिति अधमाधमा ॥ धृ० ॥ अनाथ अबलाजनालागिं छळितें जें । शिशुवरि शस्त्र धरूनि जें हृदयीं लवहि न लाजे । तरि त्या धिक् ॥ १ ॥

( मुंबई १४-५-१९१६ )

( ३० )

अनुचित वचनें ऐशीं । सतीतें व्यर्थ वदुनि अवगणुनि तिस जोडितसां कां यापरि पातकराशी ॥धृ०॥ पतिव्रतेच्या मंगलधामा । पतिव्रतेच्या शुभ नामा । अभद्रवचनीं विषसम विषमा । विडंबितां कां जोडोनिया पापासी ॥ १ ॥

( ३१ )

जडताच्च गडे शोभते असा प्रसंग ये तदा । त्वरा, रुचे न तापदा । कुलीनतेसि ती कदा ॥ धृ० ॥ मंद पडत पद तरी । ओढ जिवा फार जरी । जड-पदाहि थोर पाहिं दाविती विषादा ॥ १ ॥

(३२)

मार्ग दुजा नच जगांत । अतुल पातक ना तरी आतां । घडवित पितरां निरयपात ॥ धृ० ॥ थोर कुलीं जन्म ज्यास । सौख्यलेश नाही त्यास । कष्टदशा त्याला । अशिच नशिबाला । ना तरी कुल तें विलया जात ॥ १ ॥

( मुंबई, २२-५-१९१६ )

(३३)

निज बाळा रे गाणें गाते आई । करि आतां जो जो गाई ॥ धृ०॥ तुज जन्म दिला बाळा त्यांची स्वारी । लाखांत शिपाई भारी । बघ गर्दी ही बुरुजांची तुजभंवती । दगडांची त्यांची छाती ॥ कळिकाळाशीं झगडणार खंबीर । हे तुझेच हिरवे वीर ॥ ( चाल ) जीवांच्या जळत्या ज्योती । आकाशीं तारा होती । मोलाची माणिकमोतीं ॥ त्या डोळ्यांनी देवराय तुज पाही । करि आतां जो जो गाई ॥ १ ॥ दो दिवसांची ही दुनियेची वसती । सारखीच असती नसती ॥ तुज ऐसा हा बाळ नऊ नवसाचा । हातचा कि रे जायाचा ॥ ऋणानुबंधाच्या तुटल्या आतां गांठी । मग कुठल्या भेटीगांठीं ॥ ( चाल ) हें देवाघरचें लेणें । नशिबानें देणें घेणें । कुणितरी कुणास्तव रडणें । तीं रडणारीं रडतील धाईधाई । करि आतां जो जो गाई ॥ २ ॥

( ३४ )

नीज गुणी बाळ झणीं शान्त यावरी ।
गाऊं किती कुंठित मति नीज झडकरी ॥ १ ॥
हृदयाचा केला हो पाळणा नवा ।
बांधाया ममतेचा पाश मग हवा ।
हृत्तरंग हलवि तया करुनि मृदुरवा ।
ब्रह्मसगुण बाळरूप रमत अंतरीं ॥ २ ॥

(३५)

जिवास बसुनि हा घाय। दयाघना। घडि घडि छळित कसा अजुनि रुजत ना। हृदय करिल हें काय ॥ धृ० ॥ निकटिं न तान्हा। फुटला स्तनिं पान्हा। आतां होई निरुपाय। नावरे मना ॥ १ ॥

(३६)

क्षणैकमात्र जरि हे संलग्न जीव झाले। तुटे परि प्रसंगीं संबंध अचिरकालें ॥ धृ० ॥ वसतिस्थल एक तरी असती दशा विविध तयां। भिन्नकार्य जीवजात भिन्नगतिहि जगतीं या। खिन्नता न उचित विरहिं, दुर्जय जरि माया। फसवीत मोहजालें ॥

(मुंबई, ५-६-१९१६)

(३७)

पुण्यमया तव मूर्ति पहातां खनि जी केवल तेजाची।
इंद्रहि झाकिल नेत्रसहस्र काय कथा मग इतरांची ? ॥
देवी त्रिपुरेश्वरी प्रतिष्ठा करि कां देहीं या साची।
दर्शनमात्रें जाळुनि टाकी विश्वें सारीं पापाचीं ॥

(३८)

प्राणनाश नच परि जन्म नवा। या मरणें मिळवी मिरवी तेविं जन दिव्य पुण्यप्रभावा ॥ धृ० ॥ हतलाभाहुनि त्याग सुखाचा शतपट बरवा ॥

(मुंबई, २८-६-१९१६)

(३९)

हृदय कापितसे तापद वच व्यापि तसें विष जिवासि ॥ धृ ० ॥
देवि, उदार मनें दे आशा या जनासि ॥

(४०)

नाथ भय न राहि। तिळहि कांहीं दुरित हरिल तो हरि ल्वलाही ॥ धृ ० ॥ साक्ष तदीय पटुनि झणि अंतरिं। जरि संकट घन घोर ये तरिहि ॥

(४१)

अभागी जीवा शोक आतां पुरे हा ॥ धृ ० ॥ नशिबीं आलें। त्यापरी झालें। मन कां वृथा हें मनाशीं झुरे ॥ १ ॥ रडणें हसणें एकत्र जाणें नातें न आतां जगाशीं उरे ॥ २ ॥

(४२)

निरोप द्यावा आतां बाळा । टाकुनि जाते माता ॥ धृ० ॥
माझें माझें म्हणुनि आजवर जें लेणें ल्यालें ।
बाळ गुणाचें हाय कुणाचें आज परी तें झालें ॥ १ ॥
हे तारांनो, उर्चबळूं द्या करुणारसरंगा ।
अखंड वाहो नवतेजाच्या पुण्याईची गंगा ॥ २ ॥
घटकेचा संसार संपला लटका ठावठिकाणा ।
वनदेवींनो पदरीं घ्या हा माझा राजस राणा ॥ ३ ॥
अनाथ दुबळा देह पडे हा आई नाहीं त्याला ।
फुलत्या फुलवेतीची यावर मायापांखर घाला ॥ ४ ॥
भुतें जागतां उठतां दचकुनि हृदयींचा हा ठेवा ।
काळ्या रातीं जित्या फुलांचा खडा पहारा ठेवा ॥ ५ ॥
कळतें तुम्हां सारें कांहीं अहा फुलांच्या माता ।
लोभ असूं द्या इथून पुढतीं बोलत नाहीं आतां ॥ ६ ॥

(४३)

घडे नाथा प्रमाद जरीं आतां क्षमाच तरी हो तया । झुरे देह म्हणुनियां नुरे धीरच हृदया । हा जीव शरण चरणीं या । भ्रमुनिया दमुनिया श्रमुनिया ॥ धृ० ॥ हा सतत असो प्रेमभर असा । शुभ आनंदलाभ तसा हा । दासी सदाची करी याचना । प्राण पहा वाही । अचल करुनि मति पदिं सदया । तरि दया । करुनियां ॥

(४४)

हे प्रभुवर धृतिबल वितरी लोकीं त्यागास्तव खरतर । सुखी तरी विहित शुभसमया ॥ धृ० ॥ आर्यावर्ती आर्या । मान्य गणाया । दे नयपर सुमति पुरुषां । विनवित सविनय ॥

भावबंधन

(१)

करि नतिच ही स्तवनधी । प्रभुवर मौनमयचि पदिं । वचनें स्तवना क्षय ना साधी । दिव्य वितरिसी सहज सुगुणगण गूढ मनुज-हृदिं ॥ धृ० ॥ करावया प्रकट तया । शुभदा अघसंधा । निर्मिसि जरि वाटे खर आधीं ॥

( २ )

स्वजनकृतिचे गुरु दोष झाकुनीयां
घेति गुण लव जे गोड मानुनीयां
कृतज्ञत्वें त्यां नमन अष्ट अंगीं
महाराष्ट्राच्या रसिक जनांलागी ।

( ३ )

कृपाचि ज्यांची कारण केवळ मम पामरवचनात ।
वंदुनि त्या श्रीपादपदांप्रतिं याया यश कार्यातें ।
नवनाटकरचना । सादर करितों रसिकजनां ॥

( ४ )

करि मोहवश ना कसा । हा । नवकाव्यागम रसिकमानसा ॥धृ०॥ रमवि मुखिं न त्या वरुनि मुखरता । शमवि न सुरसें कवण रसरता । हृदयपिपासा ॥

( ५ )

कठिण कठिण कठिण किती पुरुषहृदय बाई । स्त्रीजातीप्रति झटता अंत कळत नाहीं ॥ धृ० ॥ रंगुनि रंगांत मधुर मधुर बोलती । हसत हसत फसवुनि हृद्‌बंध जोडिती । हृदयांचा सुंदरसा गोफ गुंफिती । पदर पदर परि शेवटिं तुटत तुटत जाई ॥

( ६ )

विनति अंतिम असे ईशवर तव पदा ॥ धृ० ॥ भालिं मम रेखिला । अखिल सुखलेख जो । अंकित प्रीतिच्या चरणतलिं करि सदा ॥ १ ॥ दुःख खरतर वितरि । प्रभुवरा मम शिरीं । देइ इजसी परी । सकल सुख–संपदा ॥ २ ॥

( ७ )

मोह नसावा । त्याग ठसावा । भावहि हृदयिं विरावा ॥ धृ० ॥
आशामय हें । स्वप्नचि आहे । हा भविं अनुभव यावा ॥ १ ॥
जीव निदानीं । नयनजलांनीं । ब्रह्मार्पणचि करावा ॥ २ ॥

( ८ )

रमते सहवासें प्रीति विलासीं । परि विरहें येत भरासी ॥ धृ० ॥
चमके रवितेजें हीरशलाका । घन तिमरीं द्युति परि अधिका ॥
तळपे किरणीं त्या कांचहि तैशी । तमिं विसरे परि तेजासी ॥
मिथ्या प्रीतीच्या चंचल जाति । विस्मरणें पावति विरति ॥

( ९ )

शांत मनि या । न धरि कधिं दया । न धरि कधिं माया ॥ पदिं तुझ्या विनति ही । न सखि मुख हें कधिं पाहि बाई ॥ धृ० ॥ ही कृतान्ताची । क्रिया ज्याची । सुता त्याची म्हणुनि याची । न सखि मुख हें कधिं पाहिं बाई ॥

( १० )

सुखा पारखा झाला । अभागी जो या प्याला ।
भरला का प्रेमाचा हा विषारी ऐसा प्याला ॥ धृ० ॥
नवरसलीला कोमल जाळुनियाच रस हा भीषण केला ।
हृदयदहन करि दुरुनिच हा । पळभरि अधरिं न जो ठरला ।

## राजसंन्यास

( १ )

### पांच देवींचा पाळणा

गुणि बाळ असा जागसि का रे वांया ।
नीज रे नीज शिवराया ॥ धृ० ॥
अपरात्रीचा प्रहर लोटला बाई ।
तरि डोळा लागत नाहीं ॥
हा चालतसे चाळा एकच असला
तिळ उसंत नाहीं जिवाला ॥
निजवायाला हरला सर्व उपाय
जागाच तरी शिवराय ॥
चालेल जागता चटका
हा असाच घटका घटका
कुरवाळा किंवा हटका ।

कां कष्टविशी तुझी सावळी काया
नीज रे नीज शिवराया ।। १
ही शांत निजे बारा मावळ थेट ।
शिवनेरी जुन्नर पेठ ।।
त्या निजल्या ना तशाच घाटाखाली ।
कोकणच्या चवदा ताली ।।
ये भिववाया बागुल तो बघ काळा ।
किति बाई काळा काळा ।।
इकडे तो सिद्दि जमान ।
तो तिकडे अफझुलखान ।
पलिकडे मुलुखमैदान ।
हे आले रे तुजला बाळ धराया
नीज रे नीज शिवराया ।। २ ।।

( २ )

तो एकच प्यारा बोल । मनीं या खोल । जाऊनी बसला
हृदयावर कायम ठसला ।। १ ।।

लाखाचें ज्याचें मोल । असा तो बोल । बोल या काळा ।
शोभलीस राजसबाळा ।। २ ।।

तो डावा डोळा – अहा । पुन्हा हा पहा । झाकला अरधा ।
करि जिवास मोहनबाधा ।। ३ ।।

भिवईची तिरपी तऱ्हा । मुरडुनी जरा । त्यावरी ढळली ।
टोंकाशीं कांहीं चळली ।। ४ ।।

हंसतांना थोडें कुठें । गाल तो उठे । आणि त्या भारें ।
निपजली मजा परभारें ।। ५ ।।

त्या रेघा चिमण्या भल्या । तोंच उमटल्या । तीन कीं दोन ।
डोळ्याचा साधुनि कोन ।। ६ ।।

तो भरून आला ऊर । रंगरसपूर । चालला श्वासें ।
ओंठावर अडलें हासें ।। ७ ।।

भयभीत नवा आनंद । पदर बेबंद । कंप कटिबंधा ।
जिव झाला अरधा अरधा ।। ८ ।।

नवतीची राजस लाज । गुलाबी साज । और तो कांहीं ।
गालांवर चढवी दोहीं ॥ ९ ॥

थरथरत्या ओंठावरी । प्रीत बावरी । बोल तो टाकी ।
नजरेचा पडदा झांकी ॥ १० ॥

तो एकच प्यारा बोल । जिवाचें मोल । घेउनी फिरुनी ।
एकदा ऐकवा कानीं ॥ ११ ॥

( ३ )

अडला रायगडींचा राणा । पडला आज शिपाईबाणा ।
ज्या राजवटी त्या रानवटीपरि जाणा ।
जन अवघे उघडे, नाहीं ठावठिकाणा ॥ १ ॥

बारा मावळ एकच दैना । चवदा ताल कोंकणीं रैना ।
गगनांत झांकिती देवदेवता नैनां ।
रानांतहि प्याला शेंदुर राघूमैना ॥ २ ॥

( ४ )

निघते घेऊनि तुमच्या नांवा ।
देवा शिवनेरीच्या शिवा ॥
जरि करीन सोबत भ्याल्या जिवा
पदराखालिं चिमुकला दिवा ॥
झड घालि तरि कशा वारा उजवा-डावा ।
घ्या सांभाळुनि, हा न्या आशेच्या गांवा ॥

( ५ )

अ. पाहुनि वाट सुंदरा देह कि रे झुरला ॥ जिवलगा रे
डोळ्यांत प्राण बघ उरला ॥

भरास आला खेळ—जाव हा कोणि तरि उकला ।
माझाच डाव कां हुकला ? ॥

पुरती झाली सांज, कळप हा विसांवत बसला ।
तो कीर कुणिकडे फसला ? ॥

घरिं घरिं चाले थाट देवावर फुलवरा कसला चढला ।
हा एक हार कां पडला ? ।।
बहरुनि आला बाग, चहुंकडे रंगास झुकला ।
माझाच मोगरा सुकला ।।
( चाल ) कां पाडिसि देवा, वज्रचुड्याला तडा ?
कुणिकडे उडाला मुद्रिकेंतला खडा ?
हरपला मणिच, मग उदास नागिणफडा ।
धरुनि भरंवसा जीव ज्यावरतिं आजवर ठरला ?
जिवलगा रे, तो आज वायदा सरला ।। १ ।।

( ६ )

का सख्या शिणविशी अशी । आपुली दासी ।
मन होत हिंपुटी; तसा शीण जीवासी ।
तो तुझ्या मुखींचा बोल पडूं दे राया ।
पसरीन जिवाचें जाळें त्यासि झेलाया ।। धृ० ।।
फुलवंती राजसवाळी । तिचा तूं माळी ।
जिवलगा, तीनही काळीं ।
ही माळ धरा हृदयाशीं । वहा देवासी ।
परवा न सख्या आम्हांसी ।
देहाची नाहीं माया । जिवाच्या राया ।
शिवगंगा तुमची छाया ।
करुनिया मनाचा रमणा । अहो भगवाना ।
लुटवा या पंचप्राणां ।
तो बोल एकदां बोल, वाहते आणा ।
तूं सुखी तरी सुख मजला— हा एकच बाणा ।। १ ।।

(१०)

साजणि बाई । सजवी मजसि करि घाई ।
लगिनघडि जाई । वेळ आली भरा
देव आले घरा । करी चतुराई ।। १ ।।
साजणि बाई । नटुनि थटुनि लवलाही ।
निघतें अगाई । राजराजेश्वरा ।
जवळिं या हो जरा । बघिन मुख कांहीं ।। २ ।।

साजणि बाई । चपळ पळत मन पाही ।
जवळिं नच राही । मंगलाचे सडे ।
टाकि चोंहीकडे । दावि नवलाई ॥ ३ ॥

# परिशिष्ट : २

[ **टीप**— या परिशिष्टांतील कविता 'समीक्षक' मासिकाच्या गडकरी विशेषांकांत फेब्रुवारी १९४४ मध्ये प्रसिद्ध झाल्या होत्या. ]

## १. झडपिला धारिनें हार !

[ स्वर्गीय सुखाच्या पहिल्या रात्रीनंतर दुसऱ्या दिवशीं सकाळीं नववधू आपल्या मैत्रिणीशीं असेंच हितगुज करीत असेल काय ? ]

विरे जळिं गार । झडपिला धारिनें हार !

गेल्या रात्रीं खेळत होती,
गालीं नयनीं हृदयावरती,
नाचत रोमारोमाभंवती,
सखे, ती लाज ! कुणिकडे पळाली आज ?

तुटुनी ज्याचें बंधन बाई,
लेश न बालपणाचा राही,
पडलें थोरपणाच्या डोहीं,
लज्जाजाल । हरपलें कालच्या काल !

लाजवि स्मृति ही ज्या रात्रीची,
नुसत्या कल्पनेंत चित्रींची,
हरुनी लज्जा माझ्या मनिंची,
रात्र ती मेली । हें काय करोनी गेली ?

**टीप** — 'पुण्यप्रभावां'तील कांहीं पदांच्या खाली लेखनकाल दिला आहे तो अस्सल कागदपत्रांच्या आधाराने दिला आहे. —**संपादक.**

डोळा भिडतां त्या डोळयाला,
रंगवि बघतां बघतां गाला,
रोमांचाच्या कांट्यावरला,
सदाचा ताजा । कुणि गुलाब नेला माझा ?

थरथर नाचत हृदयाभंवतीं,
लावी नजरहि पायावरतीं,
खिळवी जागिंच मारुनि मज ती,
कुठें ग आज । चोरट्या मनाची लाज ?

रात्री होतें अजाण पोर,
एका रात्रींत झालें थोर,
माझ्या बाळपणाचे चोर,
बाई फार । नवलाचे जादूगार !

हांसत हांसत मंदिरिं आलें,
बाई मी तर फत्तर झालें,
हृदयावांचुन कांहीं न हालें,
चाले श्वास । हालवी फार हृदयास !

गालीं, नयनीं ओठांवरतीं,
नाचे मुक्या प्रीतिची भरती,
चमकति घर्मबिंदु तनुभंवती
नव लाखाची । लाज ती नव्या नवसाची ।

......................

करुनी धिटाइचा भडिमार । हंसे ते केलें
मम हृदया कांपित गेलें
लबाड हासूं फसवें तसलें,
माझ्या ओंठावरतीं बसलें,
बाई तयानेंच मी फसलें,
कसें हें झालें । मी बाळपणाला मुकलें !

नयनीं किरणांचे जे भाले,
मृदु परि तेही निर्दय झाले,
लागुनि जखमा गालहि न्हाले,
झालें लाल । लज्जेचा प्रातःकाल !

अघटित जादू केली बाई,
त्यांचें त्यासहि भान न राही,
बघतां बघतां होऊनि जाइ,
कांहींच्या कांहीं । मज माझें कळलें नाहीं !
ओंठ ओंठ लागल्या काळीं,
मिटल्या नयनीं रात्र पसरली,
फुलत्या वदनीं सकाळ आली,
रंगली फार । गालावर ऐन दुपार !

□

टीप : ' परिशिष्ट २ 'मधील १३ कविता क्रमाने छापल्या नसून त्या खालीलप्रमाणे निरनिराळ्या पृष्ठांवर छापण्यात आल्या आहेत : झडपिला वारिनें हार ( १०४४ ), कथाशेष ( १०४६ ), काव्याबद्दल ( १०७३ ), एका मित्रास ( १०७७ ), सोडुनि गेला प्रिय जनका ( १०८२ ), अंतःकाळची याचना ( १०८२ ), जुन्या प्रेमास ( १०८३ ), अनंताचे सूर ( १०८८ ), हाय हाय [ परिष्कृत ] ( १०९१ ), शेवटची कविता ( १९०४ ) विद्ध मृग ( १०९७ ), चुंबन ( १०९७ ), निर्दय देवीस ( ११०२ ).

□

## कथाशेष

[ गोविंदाग्रजांच्या संकल्पित लिखाणात ' कथाशेष ' या नावाचे एक प्रेमनिराशापूर्ण खंडकाव्य लिहिण्याचा मानस असावा, असे या अपूर्ण काव्यावरून आणि त्यांनी केलेल्या कच्च्या टांचणांवरून दिसते. खंडशः प्रकरणांची नावे अशी :

१ उपोद्घात, २ प्रथम दर्शन, ३ आकर्षण, ४ भाषण ( आगगाडीच्या प्रवासात ), ५ संदिग्ध व्यक्ति, ६ स्पर्श, ७ स्पष्ट, ८ चुंबन, ९ शेवटचा प्रसंग, १० उपसंहार.

यातील ' उपोद्घात ' व ' संदिग्ध व्यक्ती 'मधील काही भागच त्यांनी लिहून ठेवलेला आढळतो. ]

**उपोद्घात :**

देहाभंवती अंधाराची अर्धी काळी छाया
व्यापि जिवाला आठवणींची अंधुक उदास माया
उदास संध्याकाळ; भोवती वारा वाहे कुंद
चढे शाहिरी शराब; झाला ' गोविंदाग्रज ' धुंद.
( उपोद्घातांतील एकदम केलेला हा शेवट )

एक मनाच्या मरजीसाठीं प्रीतीचा इतिहास
लिहून ठेविला, रसिक वाचका, खुशाल त्याला हांस
प्रेमकथा ही ऐकायला नको रिकामा कान,
ज्याची त्याला दसलाखाची मुक्या मनाची तान !

**संदिग्ध व्यक्ति** ( खंड ५ मधील काही अपूर्ण भाग )

पुढें लकाकत वाजत गाजत आला पाऊसकाळ,
हिरवळले त्याकाळी सगळे मिरजमळ्याचे माळ !
नाच परोपरी करि बिजलींची वर लखलखती घाई
भीतीनें डोळ्यांत तुझ्याही खेळे ती चपळाई !
शीतल जलकण तनुवरि उडवी शीतवात निजरंगें,
किंचित् भिजली, गारठली हीं अपुली विव्हळ अंगें
निकट-निकट तर सरलों—न कळत अंतर विलया गेलें,
उष्ण श्वासें परस्परांचे शीत निवारण केलें !
स्त्रीसहजा संकोचवृत्ति ही कोमल तितकी क्रूर
प्रसंग साधुनि करी विरस मग लावि पुढे हुरहूर !
चुकल्या चित्ता चटपट लागे, हृदय संशये हाले,
सीमारेषा निरखिल्या न तो इंद्रचाप मावळलें !
पुन्हा मनाच्या जगांत आली कितीकदां ती वेळ,
एकसारखा करी आपुला झाला तितका खेळ !
झालें असतें काय दुजाक्षणिं नच त्याची जाणीव
अवघड कोडें हुडकायातें करीत धडपड जीव !
क्षणचि आणखी एक, शब्द वा एक, एक दृक्पात्,
जरी लाभता तरि हा चुकता असा मनाचा घात !
उंच पठारावरी धांवतां, फूलपांखरामागें
हात सरकला पुढें अरेरे—पंखहि हाता लागे.
तोंच तेथुनि कडा लागला— तें सरतें पाऊल,
वरुनि तरळतें फुलपाखरूं पाडि दृष्टीला भूल !
अधांतरी ते भिरभिरतें मग—अंतर नसता फार,
जडावलेल्या जिवास भासे परि ते नानाकार !
निःश्वासाच्या लहरीवरतीं दूर तरंगत जाई,
उदास ओसाडीच पुढें ती वरतीं खालीं पाही !
नयनीं प्रीतीचा बोल तरंगे । गालावर पसरुनि रंगे ॥
श्वासें वाऱ्यावर विरुनि चाले । ओंठावर हसता हाले ॥
स्पर्शें थरथरुनी अंगिं शहारे । ‘ कांटेरी बोली ’ पसरे ॥ [ अपूर्ण ]

□

## मंगलाचरण

स्वानंदे नटला अनंतगुण जो या वस्तुमात्रांतरी
कल्पान्ती स्थल ज्या परंतु पुरते एकाच पत्रावरी
ज्यालागी स्तविता यथार्थ वदती वेद श्रमाने " अलम् "
तो श्रीमान् जगदीश मंगलदृशा कुर्यात् सदा मंगलम् ॥ १ ॥

योगाभ्यासपरा समाधिनिरता वा शास्त्ररत्नाकरा
तो तू लभ्य नव्हेस त्या तुज कसे आम्ही धरू ईश्वरा
लीलाजीवन हेच पूजन तुझें आम्हां कळे बालका
केलें अर्पण तें तुझ्या पदिं मुदें देवा जगच्चालका ॥ २ ॥

शालामंदिरिं मांडिती चिमुकली बाळे नवा खेळ हा
दृष्ट्या कौतुकपूर्ण विश्वजनका तूं सर्वदा त्या पहा
आशीर्वादबले त्वदीय सदया ने दूर तापत्रयी
स्वाध्यायासह बालकां शिशुजनीं क्रीडा सदा वाङ्मयी ॥ ३ ॥

रक्षी मोहर जी तरुवरिं पुढे होती फळे तोंवरी
सांभाळी कलिका लतांवरि; फुलें काळे तयांची करी ॥
भूगर्भी नवबीजरक्षण करी आवृष्टि जी सर्वदा
देवा त्या शुभदृष्टिनें शिशुगणा या पाहणें सर्वदा ॥ ४ ॥

—

## मुरलीचा नाद

[ चाल : परदेसी सैंया ]

परतीरीं कान्हा चिमणी काठीं
मुरलीपरी । अधरीं धरी ।। धृ ।।

पैलथडी कपटी काळा । ऐलथडी राजस बाळा
पाणी चढलें अवकाळा ।
उठ न तरी घात; न परी ।
आवरी । मन बावरी ।। पर० ।। १ ।।

क्षणोक्षणीं वाढे पाणी । गौळण परि वेड्यावाणी
ऐके तीं नसतीं गाणीं ।
तनु हरपली । जरि सलौलीं
ती तरी । नच सांवरी ।। पर० ।। २ ।।

त्या प्रभातीं गोपाळांशीं । पुष्पांच्या नवल्या राशि
दिसती यमुनातीराशीं
रडत हातें । धरि तयातें
श्रीहरी । हृदयावरी ।। पर० ।। ३ ।।

□

## उचंबळूनी हृदयसिंधु हा...

उचंबळूनी हृदय-सिंधु हा खळबळला या क्षणी
सुंदरि प्राणेश्वरी ये झणी
दूर किती तव वसति माझिया नशिबी आली दरी
देवते, दयाच मजवरी करीं
स्त्री जातीच्या मूढ भावना, सुंदरता एकली
मजला प्रिय न कधी वाटली
परंतु रसिके, तुला आज हा जीव शरण जाहला
हृदयी स्थान सदा दे मला
हा जीव गुंगला प्रेमाच्या नवरसें
भावना बहिरल्या शरीर हे रसरसें
लवथवली अंगी शराब माजुनी हंसे
धुंद जाहल्या नजरा आता विवेक कसला तरी
विसरुं स्वतांसही सुंदरी ॥ १ ॥

प्रेमपत्रिका लिहितांना ही गळुनि लेखणी पडे
सारखी तंद्री जीवा जडे
गुंग निशेच्या भरात झालो सजणे मज सावरी
पडुं दे । स्थळ दे मजला हृदयावरी
शृंगाराची लपतीं ठाणीं बेसावध राहूं दे
मला त्या रसरंगी नाहुं दे
तोंडास भिडवुनी तोंड सखे साजणी
लागूं दे नकळत पापणीला पापणी
होणार काय तें सुखेंचि होवो झणीं
ही इष्काची शराब आतां भाव विरविते दुजा
आतां गोविंदाग्रज तुझा
बोलत असतां अर्थ कळेना मान डोलते परी
वाटे बोलावेसे तरी
विवाहकाळी अंतर्पटही शास्त्रांनी काढिला
आता कशास पडदा दिला
लज्जेला गुण म्हणेल कोणी परका डोळा कधी
परी ती कशास दोघांमधी

विळखा घालुनि अंगा अंगा प्रति
गुंगीत पडावे सुखें मनीं नाचतीं
रोमांच सारखें अंगीं कोंदाटती
मी–तूं–पण हा भाव राहिला नाहीं मुळिंही सखे
झाले जगही मज पारखे.

२५३८ ... कोष्य २०१२ ... संग्रह शाखा

□

## विरहाचा शेवट आला

[ माझे परमवंद्य कविमित्र बापूसो. — रा. रा. गणेश नारायण टिपणीस, 'मनो-रंजना'चे 'भालचंद्र', हे शाळेला मे महिन्याची सुटी मिळाल्यानंतर, बरेच दिवसांचा विरह सोसून—एकदाचे सौ. सरस्वतीबाईंच्या दर्शनासाठी दापोलीस गेले. ते पुण्याहून निघण्यापूर्वी आदले दिवशी बोलण्याहून बोलणे निघता पुढील कवितेचा जन्म झाला. ]

( उद्धवा शांतवन कर जा या चालीवर )

विरहाचा शेवट आला । शापताप सरता झाला ।। धृ ।।

चिरविरहानंतर आता फिरुनिया प्रिया दिसणार
कळताच शीण विरहाचा का क्षणात नच जिरणार
तप खडतर चिरविरहाचे, साफल्य मूर्त मिळणार

तें दुःख तशा विरहाचें
शब्दें नच वर्णायाचें
अनुभव हे वर्णन त्याचे । ते पटेल ज्याचे त्याला ।। शाप ।। १ ।।

आशेच्या दोरासंगे विरहास ओढिले मागे
कल्पना धावली वेगें सखिमुखास भेटुनि रंगे
परतुनी जागवी अंगें सर्वास वृत्त ते सांगे
तों जें तें इंद्रिय जागे
बेभान असूया रागें
धावाया सवेग लागे । टाकुनि सकळ देहाला ।। शाप ।। २ ।।

मोडली सभा देहाची इंद्रिये जाहली स्वैर
एकरूप धांवित सारीं अन्योन्य विसरुनि वैर
नादात भान नच राही प्रभु तूच करी तरि खैर

आवरूं इथें कोणाला ?
कानांला की नयनांला
देहाला की जीवाला । ' मी ' आवरणारा नुरला ॥ शाप ॥ ३ ॥

धावतीं सारखी सारी राहेना कोणी मागें
म्हणूनीच देह ना भंगें ना तरि ती तुटती अंगें
दिसती जरि सारी संगे । तरि जें तें अपुल्या रंगें
परि भला फोल हा सारा
कल्पनाच करीत भरारा
सारखा आपुला फेरा । ' जा ये 'चा कळसचि केला ॥ शाप ॥ ४ ॥

मन काढी पाऊलवाट मग वाऱ्यावर मोकाट
जरि मार्गीं वारा दाट करि रस्ता आटोकाट
सुख बने तनूचा भार करिं गाऊनि सरती वाट
इंद्रिये मागुतीं पडली
चालता आपुल्या चाली
कल्पने ! शरण तुज आली । त्या भेटवि निजमित्राला ॥ शाप ॥ ५ ॥

तों वारा पुढुनी आला कल्पना रंगवी त्याला
इंद्रियास भासे सकलां की मंत्र सखीचा आला
त्या त्या निजमित्राचा या नुकताच योग जगुं घडला
त्या भवती जो तो नाचे
कर विचारि कुशल कराचे
प्रति अवयव निज अर्धांचें ॥ तो उद्धव दुसरा बनला ॥ शाप ॥ ६ ॥

तो अवचित आत्माराम खडबडुनी झाला जागा
श्वास ये सखीचा करूनी वाऱ्यावर पळती पागा
एकरूप त्याशी झाला धाग्याशी जमला धागा
तों सजीव शरीर जहालें
अवसान विलक्षण आलें
देहभान सारे सुटले । मग रस्ता कुठला उरला ॥ शाप ॥ ७ ॥

मस्तकीं कल्पना नाचे भूदेवी पायाखालीं
वाऱ्यावर भरभर चाले तनु तनुला फुलासम झाली
भूमीच आपुल्या मेळीं मग पायाखालुनि सरली
जसजशी वेळ ती येई
कल्पना बावरी होई
अधिकार गाजवुनि घेई । दे नाना चित्रें सकला ॥ शाप ॥ ८ ॥

तो पुण्य फळांसी आलें ती मंगलवेला आली
नयनांची घटकापात्रें सुमूहूर्ती स्वजलें भरलीं
हृदयाचीं वाजतिं वाद्यें दूरता त्यात विरघळली
हें लग्न जिवाभावाचें
संलग्न अशा हृदयांचे
क्षणभिन्नचि एकपणाचे । सखिमुख तों दिसलें मजला ॥ शाप ॥ ९ ।

मूखचंद्रोदय तो झाला कार्याचे सूर्य पळाले
तद्विरहतापतेजांत तारकायुग्म जें दडलें
तें आज पुन्हा वर आलें सवें नयनीं हासत बसलें
तों नेत्रा झाली मिळणी
प्रेमा त्या त्यांच्या किरणीं
'येजा'ची चाल विवरणी । जणुं जोडि जड देहाला ॥ शाप ॥ १० ॥

त्या क्षणीं अवयवां सकला ती शोभा दिसली पुरती
ती प्रभा चमकतां झलती प्रियसखिच्या देहाभोवतीं
सर्वांसही कळुनि ये की ठकवीत कल्पना होती
जातांना नेत्रीं बसलीं
मनिं ज्यांची भरती केली
तेव्हांचि चित्रे हसली
ती दावित होती सकला ॥ शाप ॥ ११ ॥

परि विरहाची शोभा ही कल्पनेस ठाऊक नव्हती
कल्पनेसही हें कळलें ती लाजुनि झाली परती
सत्यता तिच्या ये जागी कल्पनाच वा स्थिती होती
सत्यात कल्पना जिरली
एकठायिं दोघें रमलीं
त्या उभयालिंगन काली
विरहातुनि योग निघाला ॥ शाप ॥ १२ ॥

नेत्रांच्या झाल्या भेटी संमोह तयांना पडुनी
जें दर्शन लाभे आतां तें क्षणात जाईल पळुनी
ही भीती पडुनि जणुं नयना ते घेति आपुल्या मिटुनि
इंद्रिये जाहली मूक
केव्हांची तहानभूक
ती हरली आज अचूक
मग जडता येई सकला ॥ शाप ॥ १३ ॥

हृदयांची भाषा पटुनी निशब्द बोलका झाला
श्वासाशी श्वासहि बोलें तो मार्ग आत्मराजाला
क्षण विस्मरण स्मरणाचे एकान्त पाडि दोघांला
जीवाची सरली वेळ
भिन्नाचा होत समेट
जरि मिळे पुन्हा अशि भेट
तरि विरह नको मग कोणा
हें आपुलें आपण जाणा
विरहाचा शेवट आला ॥ शाप ॥ १४ ॥

□

## प्रणयिनी

मदन पराक्रम मोहन शक्ति, शक्त न ती कुणि वर्णाया
आदि अंत ना कळे कुणाला रंगरूप न ये उमजाया ॥ १ ॥
ब्रह्मा निर्मित जीव-शिवाला मन्मथ निर्मी प्रणयाला
प्रणयाचा मग जन्म विनटला, प्रणयिनि संगे प्रेमकला ॥ २ ।
प्रणयिनि विना जीव न जगती, रमती ना ते जगतात
रमति भ्रमति परिजन हसती अंतीं सुखास्तव रडतात ॥ ३ ॥
जन्म, जरा, नच व्याधि हिजला, मृत्यूला जी स्त्रैण करी
सचेतनाला चेतवुनि ती अचेतनाचा ध्यास धरी ॥ ४ ॥
चराचराला व्यापुनी उरली, सुरासुराला ती न मिळे
विश्वमोल ब्रह्मांड आगळे स्वरूप तियेचे कधि न कळे ॥ ५ ।
वर्णधर्म नच कळे कुणाला कुलगुण मंडित हो सकला
बहुविध रंगी चपल कुरंगी तरंगिणिची चतुरकला ॥ ६ ॥
रंग न दावी रंगविते परि दंभ न तिजला कामाचा
संग नको परि हवा कुणाचा भग्नाशेच्या हृदयाचा ॥ ७ ॥
जलधारा त्या पर्वत शिखरीं आलिंगुनि ज्या असतात
तशाच सरिता करिति खळखळ भू-प्रदेशीं वसतात ॥ ८ ॥
त्यजुनि प्रदेशा वाहत रमती सरिता-सागर संगम हा
प्रणयिनिचा अंत न लागे सप्तसागरिं रिघती महा ॥ ९ ॥

चपला चंचल सदा कडाडे मेघ-मंडला सोडुनिया
भू-मंडला धाक दावुनि चुंबुनि जाते चमकुनिया ॥ १० ॥
कमलिनी संगें भ्रमरहि रमतो रवि अस्ताला जात सदा
निशा उषेचा हात धरोनि तमांत रमते रोज फिदा ॥ ११ ॥
फुलें फुलवुनि, फळां कुजवुनि धरणी जिने ही भ्रष्टविली
प्रणयिनीची विषयपिपासा सृष्टिदेवीनें कां वरिली ॥ १२ ॥
जीव-जंतुचा नाश करूनिया परस्पराकर्षांत फिरे
कीटक प्राण्या माया दावुनि फुलपांखरें करीं धरे ॥ १३ ॥
देवहि चळले, दैत्यहि लढले, मानव रडले हिजसाठीं
ऋषि मुनिंचि सोंगें केली प्रणयिनीनें उफराटी ॥ १४ ॥
सौदामिनीसम प्रणयिनि चंचल विलासिनि जी कामुकता
एकनिष्ठता कुठेंच नसतां प्रणयिनिचा शोध वृथा ॥ १५ ॥
शोध कराया शोक पुरे तिज हास्य नको शृंगार खरा
वीर, शांत ना रौद्र भयानक, अद्‌भुत रस वैराग्य बरा ॥ १६ ॥
प्रणयिनि पोटीं वडवानल तो नयनाश्रुनि शांत करी
मुक्या मनाची विलापिका ही गोविन्दाग्रज गात पुरी ॥ १७ ॥

□

## शुक्राष्टमी

विश्वमंगला वरदायिनी जी पौर्णिमेची पूर्णकला
शुक्राष्टमि जणुं नववधु सजली सौंदर्याची चंद्रकला ॥ १ ॥
सौंदर्याचा मध्य साधिला साक्ष पहा तो नभिं चंद्र
अर्धोन्मीलित ओष्ठ सखीचे साक्ष देइ का मुखचंद्र ॥ २ ॥
चंद्रबळाच्या प्रणयकलेला शृंगारिक जी रतिशोभा
चंद्रबळाला ओढून आणित रमणी मधुचंद्रास प्रभा ॥ ३ ॥
थरथर कापे ओष्ट-बिंबद्वय मीलन अपुलें करताती
चुंबुनि त्यांना रमती दोघे, अधरिं पदर धरि नवयुवती ॥ ४ ॥
पद-युगलांचा चाळा चाले, मोह भाष्य करि कामुकता
कुरळ कुंतलावरती फिरवी हस्त-स्पर्श वरि नाजुकता ॥ ५ ॥
स्तनभाराला अन्य न उपमा मन्मथ-रतिचे ते हंस
हंसक्षीर कां न्याय कराया सुरत युद्धिचे कल-हंस ॥ ६ ॥

शुक्लाष्टमिचा चंद्रहि कलता मध्य नभावर जैं येतो
अर्धचंद्र मग विरहि जनाना मोह दावुनि तैं रमतो ॥ ७ ॥

दक्ष यौवना लक्ष वेधिति कामुक पति मुखचंद्राचें
स्मरारि-रिपुचें चिंतन करितो चित्तचकोरी तरुणाचे ॥ ८ ॥

विधु कांति ही कलंकिता कां यौवन-मुग्धाचा दोष
तारुण्याची लता बिलगते निकटिं वृक्ष कां करि रोष ॥ ९ ॥

नभीं चंद्रिका सोडुनि तिजला सागर-लीला विधु वरितो
चपला सोडुनि मेघ भटकतो, वायु-लहरिंनी तो रमतो ॥ १० ॥

शुक्लाष्टमिचा चंद्र प्रकाशहि उन्मादक नव प्रीतीचा
विरहांकित जी प्रेमि जोडपी चांदण्यांत ये गमतीच्या ॥ ११ ॥

शुक्लाष्टमिची चंद्र-चंद्रिका, रोहिणि रत्युत्सव-शृंगार
नभीं पाहुनी पुरुष-अंगना प्रीति-चुंबनिं सुरत विहार ॥ १२ ॥

कामुक-नयनीं शुक्लाष्टमि ही कामि जनाला वाटे प्यार
परंतु अंतीं निष्कामाला विरह व्यथेची ती होणार ! ॥ १३ ॥

शुक्लाष्टमिचा चंद्र पाहुनी त्याग भोग मनिं कांहीं न घे
'गोविन्दाग्रज' विरहि मनानें शुक्लाष्टमिची वाट बघे ॥ १४ ॥

□

## पुढें पहा !

दिक्कालांच्या अनंत वेळा मोजूं नको तूं पुढें पहा
भविष्याला हातीं धरोनि, वर्तमानीं मग सावध रहा ॥ १ ॥

भूतकालचिं प्रेतें गाडूनि, भविष्याचें जनन पहा !
वर्तमानीं तूं संगोपुनि नव काल अनंता पुढें पहा ॥ २ ॥

कळिकाळाचि नित्य उठावणी, यमदंडाचा अडसर हा
भिऊनि मानवा पळूं नको तूं, बेदरकारी पुढें पहा ॥ ३ ॥

कशासि मागें वळुनि पहासि, 'सिंहावलोकन' व्यर्थ पहा !
गरुडदृष्टीनें मारी भरारि अमर जीवनिं दक्ष रहा ॥ ४ ॥

अमृतवाणी, अमृत करणी, मेळ घालुनि पुढें पहा
भावी काल जो अमृतमय तो, हातीं धरोनि चालत रहा ॥ ५ ॥

चाल, चालुनि थकवा येतां; दमू नको तूं पुढें पहा
स्वावलंबनी चित्त रमूं दे; वित्त, कष्ट, जन-संग्रह हा ॥ ६ ॥

परोपकारी भूतदयेला प्रसंगावधानीच रहा
दातृत्वाचि कास धरोनि दानधर्म तूं करीत रहा ॥ ७ ॥

दिल्या वचना, देत्या दाना, माना तुकवूनि पुढें पहा
बोल कीर्तिचें, दान देहाचें, देश रक्षणिं देत रहा ॥ ८ ॥

वीर पराक्रम इतिहासाचि, बखरिंची ती वाणी पहा
देवधर्मरक्षणिं सदाचि, देशाचि काळजी वहा ॥ ९ ॥

पुराणश्रवणें आणि कीर्तनें ऐकूनि कानीं पुढें पहा
देशोद्धारीं आत्मोद्धारचि–स्वातंत्र्याचा तोच महा ॥ १० ॥

स्मृति-वचनांचा श्रुतिसि गोंधळ घालू नको तूं पुढें पहा
साधु महात्मे वर्तुनि गेले चरित्र त्यांचें तेच पहा ॥ ११ ॥

पाहूं नको तूं जीर्ण पाचोळा-पंचत्वाच्या पुढें पहा
वसंतसमयिं निज सृष्टिला फुटत पालवी गप्प रहा ॥ १२ ॥

पर्वत-माथा फोडुनि जाते चपला चंचल तीच पहा
नद्या निर्मुनि सागर भरिते; पुनर्जन्म घे मेघ अहा ॥ १३ ॥

मर मर मरती, गर्जत रमति, फिरते उडते मेघ पहा
जडसृष्टिच्या सजीवतेला तजेलाच ते देति महा ॥ १४ ॥

मेघासम बघ दुरि राहुनि कल्याणेच्छु पुढेंच व्हा
मागें राहुनि पुढेंचि जाणें, बुद्धीचा हा मार्ग पहा ॥ १५ ॥

पुढचि बुद्धि, पुढचें धोरण, सर्व कांहीं तें पुढें पहा
'गोविन्दाग्रज' दूरदृष्टीनें विनवी सकलां पुढें पहा ॥ १६ ॥

□

## काष्टकोळिष्टक

जुनाट वाडे आणि कवाडें पटई खांबाला
खिडक्या दारें कुठेंहि पहावे, तुळई आढ्याला ॥ १ ॥

पडक्या भिंती, खंडोगणती पहा लांकडांत
घरींदारीं कुठेंहि रमती, काष्टकोळिष्टक ! ॥ २ ॥

वास तयांचा पहात असतां व्याप दिसे फार
बाज, पाळणा, टेबल, खुर्ची, डेस्क कपाटावर ॥ ३ ॥

पाट पलंगी, देव्हाऱ्यावर चौरंगी रमता
काष्ट–जीवनिं झोंपाळ्यावर झुलाझुल पहातां ।। ४ ।।
धागेदोरे झुलते मनोरे, कोळ्यांचे ते अहा!
प्रयत्न त्यांचे जागोजागीं अनुकरणीय महा ।। ५ ।।
शुभ्र चांदण्या नभिं विलसती तशाच गमती मला
पहा कातण्या स्वच्छ पांढऱ्या तुळई आढ्याला ।। ६ ।।
धागेदोरे विणिता बा रे मोच हा बांधी ।
डांस, मच्छरा, माशी शिरता भक्ष्य नया साधीं ।। ७ ।।
उंच ठिकाणीं जाळे बांधुनि चढतो हा धीट
जाळें विणिता चढतो पडतो प्रयत्न अवीट ।। ८ ।।
प्रयत्न तुझा पाहुनि मरतो, भुणभुणतो भुंगा
काष्ट पोखरुनि कीड लावितो स्पर्धेचा इंगा ।। ९ ।।
स्पर्धेनें तुम्ही दोघे मरता, काष्ट जात वाया
गोविंदाग्रज रूपक लिहितो करा कारवाया ।। १० ।।

□

## ही दुनिया फिरती राही—

नव नवलाची दुनिया सारी बाई । वस्तूत वस्तुपण नाहीं ।।
नच ठरलेला भल्या–बुऱ्याचा भेद । स्थिर कुठें हर्ष ना खेद ।।
तूं खेळविसी निज जीवाची माया । जग सगळे केवळ काया ।।
स्थळकाळाचा छाप जगावर कसला । ‘ जग ज्यारें ज्याचें त्याला ’ ।।
‘ रंगांत कोणता राजा ’ ।
अमकाच सूर हा माझा ।
कायमचा त्याचा दरजा ।
हें कोणीहि ठाम ठरविलें नाही । ही दुनिया फिरती राही ।। १ ।।
—अपूर्ण )

[ या खंड काव्याचा शेवट खाली दिलेल्या चरणानें होणार होता असें दिसते—]
“ गोविंदाग्रज मानी दुनिया बोटावरचि थुंकी— ”

[ ‘ काष्ट कोळिष्टक ’ व ‘ ही दुनिया फिरती राही– ’ या दोन कविता गोविंदाग्रजांनी आपल्या बैठकीतल्या हितशत्रुमित्रांना वा चेल्यांना अहेरादाखल म्हणून बहाल केलेल्या आहेत. ]

□

# कोंवळी हिरवळ

गर्द हिरवा गडद पोपटी लांबरुंद नव गालिचा
वर्षाऋतुनें भूवरती हा विणिला कोंवळ्या हिरवळीचा ॥ १ ॥
कोंवळी हिरवळ पाहुनि खेळे निसर्गबाला धुंद पहा
भूदेवी जणुं खेळवी तिजला पर्यंकीच्या लीला अहा ! ॥ २ ॥
वनदेवीच्या पायघड्यांस्तव शरद मंजिरी सुकुमार
दुर्वांकुरमय गालिचाच हा पसरी सभोंवार ॥ ३ ॥
अथवा हेमंतानें दिधला मेदिनीला कां हा शालु ?
हिरव्या जरीबुटी पैठणींतली, नवोढाच ही लाजाळु ॥ ४ ॥
वर्षा-ऋतुच्या प्रारंभांतुनि कोंवळें हिरवळ तंतु
ग्रीष्म-ऋतुचा मान ठेवुनि, वसंत विणितो बिसतंतु ॥ ५ ॥
निर्झरणी त्या नाचत चाले, हिरवळ काठोकांठ कुठें
पुष्करिणीच्या सभोंवताली कोंवळीं हिरवळ नित्य फुटे ॥ ६ ॥
हिरवा शालु, हिरवी चोळी, हरितवसना भू ल्याली
पर्वतराजी हिरवळीचा शिरीं पदर घेऊनि उभी ठेली ॥ ७ ॥
वहात्या नद्यांना पाहुनि वाटे, जरीच्या भव्य किनारी !
सरोवरासह समुद्र ठिपके दिसती; गमती जरतारी ॥ ८ ॥
मारुत-पुष्पें उधळित सुमनें वसंत क्रीडा रम्य बहार
भूदेवीचा हिरवा शालु फेडुनि करतो सुरत विहार ! ॥ ९ ॥
वनश्रीचा रुबाब सारा, पल्लव-कुसुमें गाळुनि पार
निसर्गबाला यौवन हरपे जोगिणीरूपाचा अवतार ! ॥ १० ॥
परंतु रमता वसंत तिजला भुवनदेवीसह सकला
लता-पर्णवी फुलां-फळांनी बहरवितो अवनीला ! ॥ ११ ॥
भूमीवरची कोंवळी हिरवळ पाहुनि रसिका बोध करी
तृणवत् मानु नको तिला तूं हिरवट राहते सदा जरी ॥ १२ ॥
मातेसम तो ममता दावी-दुग्धपान जणुं बाळाला !
हरिणबालकें खुडुनि खाती, तुडविति कोंवळ्या हिरवळीला ॥ १३ ॥
हूड शिशूंच्या मोहक लीला हरिणबालकें करितात
गोविंदाग्रज कधिं नच तुडवि कोंवळी हिरवळ बघतात ॥ १४ ॥

□

## गुडघाभर गवता—

गुडघाभर गवता तुज पाहुनि मजला वाटे अभिमान
सृष्टिदेवीचें जणुं जावळ हें करूं या त्याचें गुणगान ॥ १ ॥
उंच सखल स्थल कुठेंहि राहो, डोलत हालत तें राहे
वायु तयाला उखडे ना कधिं वरुण तसाचि तें पाहे ॥ २ ॥
महापुरानें झाडें जाती, पर्वतशिखरें कोसळती
नदीनाले पडती झडती, गुडघाभर गवता न गती ॥ ३ ॥
वर्षाऋतुच्या आगमनानें जावळ हें भुरभुरतें अहा !
वसंतऋतुच्या सान्निध्यानें होतें पिंगट गवत पहा ॥ ४ ॥
जन्मा येतां पोषण करिते गाइ-म्हशींचीं खिल्लारें
मस्त अश्व, गज, हरिण बालकें-सर्वांचा हो चारा रे ॥ ५ ॥
भेदाभेद न राहे पोटीं, गुडघाभर या गवतांत
हिंस्र-श्वापदें, रान-सावजें बसती उठति पहा त्यांत ॥ ६ ॥
जीव-जीवाणुं हिंडति-फिरती आणि विषारी जंतु सदा
लालन-पालन करुनी रक्षी अविश्वासि नच राहि कदा ॥ ७ ॥
विश्वासानें ऐक्य साधिलें संग्रह करिते सर्पांचा
जीव-जंगली, प्राणी-विषारी, कीटक-योनी सर्वांचा ॥ ८ ॥
फुलपांखरें शिरीं नाचवी, टोळहि करिति मलखांब
विखार दुर्धर स्वारि भरोनि कुस्ती करि तो भलि लांब ॥ ९ ॥
अंगावरती लोळे-खेळे व्याघ्र सिंह जे अति क्रूर
शृगाल शलभा, मांडिवरी घे; कधी न कोणा करि दूर ॥ १० ॥
वस्तुस्थितिच्या अस्तित्वाचें वर्णन केलें यथामति
गुडघाभर गवताची ऐका सुकल्यावर मग काय स्थिति ॥ ११ ॥
हिरवटपणिच्या तारुण्यांतुनि जागवित राही जे मजुर
पिकल्या वृद्धपणांतहि जगवी नाशाची नच त्या फिकिर ॥ १२ ॥
कुणी कापुनि भरती भारे, ओझीं वाहति गंजी किती
कुणी झोंपड्या बांधुनि रहाती, आराम तिथला वर्णुं किती ॥ १३ ॥
कोपी, छप्परें, माळ्यावरची देत कृपेची सांवली तें
जनावरांच्या गोठ्यांवर जें,–तेंच गव्हाणी भक्षणिं तें ॥ १४ ॥
कितीक् इमले, बांधुनि बंगले, पहा तयांच्या भिंतीला
गिलाव्यांतल्या मातीला दे आधारहि बघ काडीला ॥ १५ ॥

'इकडचि काडी तिकडे न करिती–' आळशि नर जे जन्माचे
व्याप तुझा तो सततोद्योगी, मोल होत मग काडीचे ॥ १६ ॥

बुडत्या संसाराच्या सागरिं, काडिमात्र जो आधार
जन्मदरिद्री दांत कोरण्या काडीचा घे आधार ॥ १७ ॥

इतुकें वर्तन परोपकारी, तनु त्यागिता नित्य मरे
वणव्याला जें सदा भडकवी; बुडत्याला आधार पुरे ॥ १८ ॥

तृण तूं असुनि 'तृणवत्' कैसा मानुं तुला मज प्रश्न पडे
गुडघाभर गवता, तुज पाहुनि, गोविंदाग्रज घेत धडे ॥ १९ ॥

□

## आपले आपल्याबरोबर

आपलें आपल्याबरोबर । कोणी न येती खरोखर
गृह-सौख्याचा स्वार्थ पाहतां । देह-मंदिरी वाहत चिंता
कोणी कोणाच्या बरोबर । संगें न येती खरोखर ॥ १ ॥

शेती-वाडी कशासि पाहतां । देह-कुडी ही व्यर्थ शिणवितां
पोटा-पाण्याबरोबर । संगें न येती खरोखर ॥ २ ॥

जमीन-जुमला तो सर्वांचा । राजेश्वर्यी हो राजांचा
देश-प्रदेशा बरोबर । विलया जातो खरोखर ॥ ३ ॥

कसलीं राज्यें कुणी निर्मिली । कुणी पाहिली कुणी रक्षिली
कालाच्या त्या बरोबर । राज्यें न टिकती खरोखर ॥ ४ ॥

धन दौलत ही म्हणता माझी । चोर, लुटारू लुटतो पाजी
करभाराच्या बरोबर । राजे लुटिती खरोखर ॥ ५ ॥

गज अश्वांच्या नित्य परेडी । गो-वृषभांच्या अनंत कोडी
पशु-पक्षी ते बरोबर । संगें न येती खरोखर ॥ ६ ॥

अर्धांगाची शेज सोबती । सकाम रमणी, बनते युवती
पति-पत्नी मग बरोबर । संगें न राहती खरोखर ॥ ७ ॥

कोण कुणाचा माता-पिता । बहिण–भाऊ मग कसलें गणता
आप्तेष्टांच्या बरोबर । कोणी न जगती खरोखर ॥ ८ ॥

कुलकीर्तीचा कोणी न पालक । अथवा आपण आपुला बालक
स्वकुलांच्या तो बरोबर । संगें न राहे खरोखर ॥ ९ ॥

कुल-लौकिक तो राहे न पुरतां । लोकेष्णेच्या दारुण अंता
धर्माच्या मग बरोबर । संगें न जाती खरोखर ॥ १० ॥

रवि–चंद्राच्या गति निराळ्या । प्रकाश-किरणीं वेगवेगळ्या
ध्रुव–तारांच्या बरोबर । कोणी न चाले खरोखर ॥ ११ ॥

नदी-नाल्यांचा प्रवाह सगळा । मर्यादित तो समुद्र बनला
प्रवाह पतिता बरोबर । तोही न राहे खरोखर ॥ १२ ॥

पर्वत माथा आणि टेकड्या । उंच सखल त्या दरी वांकुड्या
हिमनगराजा बरोबर । संगे न दिसती खरोखर ॥ १३ ॥

विषवल्लीला अमृत न चले । सुवास दुर्गंधीला न मिळे
आकाश-भूमि बरोबर । संगें न मिळती खरोखर ॥ १४ ॥

नीति-अनीति स्वयंभू बनल्या । पाप-पुण्याच्या राशी सजल्या
सत्य-असत्या बरोबर । संगें न रमती खरोखर ॥ १५ ॥

मनोधर्म हो षड्रिपु स्वबळें । विकारधर्मीं वेगवेगळे
दशेंद्रियांच्या बरोबर । आत्मा नवर्ते खरोखर ॥ १६ ॥

षोडस-संस्कारांच्या पूजा । मानवी आत्मा करीतो मौजा
सुखदुःखांच्या बरोबर । कोणी न चाले खरोखर ॥ १७ ॥

‘ गोविंदाग्रज ’ नांव कीर्तीला । उपदेशास्तव बोधवी तिजला
“ रामनाम ” घ्या घरोघर । आपलें आपल्या बरोबर ॥ १८ ॥

□

## फुलतें निर्माल्य !

फुलां–मुलांच्या तऱ्हा पहाया चैतन्यास्तव ही अवनी
निसर्ग–रमणी जननी झाली, फुलां–मुलांना प्रसवूनी !

चंपक, जाई, जुई–मोगरा सुवास त्यांचा किति तरी
हिरवा चांफा गुलाब नाजुक शृंगारिला महिवरी !

बकुल–पुष्प सौगंधिक मादक, पन्नग मंदरास सदा
पारिजात कुसुमांचा राजा, नंद–वनिंचा ये वसुधा !

विविध तऱ्हेची मधु वासाची कितीक् पुष्पें असतील
परंतु परिमल नाहीं ज्यांना, त्यांना कोण विचारील ?

सदाफुलीला मंत्रोच्चारी, नेत्र-फुलाला काढाया—
लाल, शुभ्र कण्हेरीला घ्याया, पितयासह ये गणराया !

बलि-पूजेची लोह-पुष्पें हीं, वाहावी न म्हणती देवाला
शुभ्र धोतरा चिलमीसम तो आवडतो महादेवाला !

परि या आमुच्या झेंडु-फुलांच्या ताफ्यांचा नच कुणि वाली
दिवाळी-दसरा येतां-जातां तोरणांत बळि दिवाळी

'झेंड्या' 'चेंड्या' घोडीं सजवुनी, सीमोल्लंघनीं मुलें निघे,
फुलें झेंडूंची करि घेऊनि 'लक्ष्मीपूजन' स्वर्ण बघें !

गुणावगुणी मुलें जशी कीं, तशीच सुमनें शरीराची,
फुलांफळांची अशीच रीति फुलत्या हलत्या वृक्षांची !

लठ्ठ मुलांमधि सत्त्व न दिसतें, परि ते असतें गुबगुबीत,
झेंडु-फुलांची तशीच मूर्ती राहते ना तें टवटवीत !

म्हणून कांहीं द्वाड कार्टी, कुस्करताति मग त्यांना
आंत 'खोबरें' खाया रमति देति घेति सगळ्यांना

फुलत्या फुलां निर्माल्याला झेंडूला ही मुलें करी,
'गोविंदाग्रज' म्हणें मुलांना, बोला फुलांशी गाठ खरी !

□

## निखळलेली पायरी

चढउतार हा ज्यांनी होतो जपा पायऱ्यांना
एक निखळता दुसरी सुटते चाल चालतांना

प्रासादाचा पाया पहाया कोण शिरे आंत
पायरीचा पण शोध घ्यावया वरवर बघतात

चाल पाऊलीं वर्तनिं दिसते शुद्धाचरणाची
तशि जिन्याची पायरी असते उन्नत होण्याची

चुकुनि पाऊलें कुंठेहि पडतां अधोगति ठरली
निखळ पायरी जिन्यास असतां तोंडफोड गणली

पायरीपोटिं दर्जा येतो श्री, धी सर्वांचा
पायरी सोडून करी वागणूक मूर्ख वर्तनाचा

स्त्रीशालिनता सहजि सुटतां निखळ पायरीला
घसरत संसारी नर–नारी डोलारा पडला !

अधिकाराच्या पदावरि जे कोणी असतील
कुविचाराच्या पायरीखालीं सदाच बसतील

सुविचारानें गृहसौख्याचा सोपानहि चढतां
चढेल कोणी पळतां उतरतां पायरीच नसतां

पायरी पाहुनि पाय टाकणें चाल सावकाश
गोविंदाग्रज सावध करितो मान–धनिकास

□

## खडाष्टक

पति–पत्नींच्या खडाष्टकाची रीत असे न्यारी
प्रकार त्याचे समजायाला हवाच संसारी ।। १ ।।

संसाराच्या लग्न-बंधनीं मानुनी पुरुषार्थ
पुरुषार्थाची धर्मचारिणी असावी निःस्वार्थ ।। २ ।।

निःस्वार्थाच्या प्रणयाविना खडाष्टक न चाले
खडाष्टकाविण पति-पत्नींना गमेनासे झालें ।। ३ ।।

हंसवा रुसवा ‘ हो ’ ‘ ना ’ करतां लागती कामाला
परस्परांच्या खडाष्टकाचा प्रकार हा पहिला ।। ४ ।।

कंजुष पतिची उधळ्या स्त्रीशीं गांठ पहा पडतां
प्रकार दुसरा खडाष्टकाचा, ओढगस्त होतां ।। ५ ।।

विचार–आचारांतुनि निघतो भेदाभेद सदा
खडाकष्टकाचा प्रकार तिसरा संसारी विपदा ।। ६ ।।

पति-पत्नींची आवड-निवड भिन्न भिन्न असली
खडाष्टकाचा प्रकार चौथा, मनें कधिं न जुळली ।। ७ ।।

पति विलासी, अरसिक पत्नी संसारी असतां
खडाष्टकाचा प्रकार पंचम त्याग भोग नसतां ।। ८ ।।

कर्कश नारी मिळतां भारी मुखदुर्बळ पतिला
खडाष्टकाचा प्रकार सहावा, पति-पत्नी मधला ।। ९ ।

सासु-सासरे, जावा-नणंदा, दीर आणि आप्त
कलहाग्नीनें, खडाष्टकाचा प्रकार हो सप्त ॥ १० ॥

मुलांस मारून परस्परांचा राग-लोभ पहावा
त्या रडण्यांतचि खडाष्टकाचा प्रकार हो आठवा ॥ ११ ॥

पति-पत्नींनो, सहमत राहुनि संसारी आचरा
गोविंदाग्रज पाठभेद जे; खडाष्टका विसरा ॥ १२ ॥

□

## फुलांचा शोध

शोध फुलांचा करावया तूं रसिका वणवण हिंडुं नको
ऋतुमानानें फुलति-गळति; पुष्पराशि नव खुडूं नको ॥ १ ॥

असंख्य तारे आणि फुलें मग मोजदाद ती कोण करी
प्रकाश–परिमल कोण तयांचा घेउनि येती अवनिवरी ॥ २ ॥

अगणित पुष्पें पाहुनि वारे, कशासि कोणीं निर्मियली
निर्माल्याची भरती केली, कोमलता जणुं वाळविली ॥ ३ ॥

विविध तऱ्हेची रंग खुलावट उगाच केली काय पहा
फुलें निर्मुनी रंग देउनी देवहि शिणला व्यर्थ महा ॥ ४ ॥

मंद प्रकाशीं तारे जैसे आकाशार्णविं लुकलुकती
तशींच सारीं सुगंधपुष्पें या लोकीं तीं दरवळती ॥ ५ ॥

नभांत तारे तुटती सारे निखळत का हो नित्य सदा
कळ्या-फुलांच्या गळत्या राशी, भूवरतीहि त्याच पदां ॥ ६ ॥

तुटती तारे बघती सारें हातिं कुणाच्या कधिं नच ये
‘ गुलाब ’ खुडण्या जातां मारे, रुतति कांटे हाति न ये ॥ ७ ॥

नाजुकतेचा नखरा सारा, कंटक गुलाब कां करितो
शृंगारिक जो दिसतो वरवर गळत पाकळ्या तो वरितो ॥ ८ ॥

जनानखाना नटवित जैसा, नबाब सजला पुष्पांचा
पऱ्या पाकळ्या गुलाबि साऱ्या-रंग बदलला इष्काचा ॥ ९ ॥

पति सहवासी सतीस मिळतो घरांत आनंद
गुलाब नसतां त्यांचा होतो रसिका गुलकंद ॥ १० ॥

जाई-जुइचीं मुग्धा-पुष्पें युवा यौवनीं गमतात
अवघ्राणुनि हातीं घेतां, क्षण-सुख सर्वां देतात ॥ ११ ॥

शुभ्र मोगरा विनोदि हंसरा कुंद कळ्यांच्या उपमेचा
शेवंतीच्या लीला पाहुनि, गुलाम बनला वेणीचा ॥ १२ ॥

यौवन-पुष्पें निशिगंधाचीं तांबुस रंगीं गुल्बशिला
संध्या पुष्पें कामि जनांची नूतन संध्या कामिनीला ॥ १३ ॥

आम्रावरिच्या मद पुष्पांना मत्तमयूरी खातात
हृदय-पुष्पें इन्दुमतीला प्राणांतिक मग होतात : ॥ १४ ॥

सुम-संग्रामीं लीला दावी कपटनाटकी कृष्णसखा
नंदनवनिचा पुष्पराज हा-मृत्युलोकि ये प्रेमसुखा ॥ १५ ॥

प्रेम-पुष्प बकुलास पहातां परिमलतेचा दृढभाव
सुकुमारासम सुकतां जरि ते सुवास ममता निजभाव ॥ १६ ॥

घाण कण्हेरी हातीं न धरवे, राहि अमंगळ पुष्पांत
तिन्ही-त्रिकाळीं रंग बदलतो; पहा तेरडा रानांत ॥ १७ ॥

हीन करंटी कोरांटी जी काव्यांतिल ती फुलवात
सदाफुलीचा बिजवर नटला रमे स्मशानिं धत्तुरांत ॥ १८ ॥

कशासि रसिका हवींच हीं कां वर्णित अथवा दृश्यफुलें
उंबराचें तें फूल पहाया दृष्टि न्याहाळुनि काय मिळे ॥ १९ ॥

शोध नको मज भूलोकींच्या कळ्या-फुलांचा तो मोह
" कल्प-तरूंचीं फुलें " पहाया—मनास होतो संमोह ॥ २० ॥

क्षणभंगुर हीं जीवित-पुष्पें कशासि घ्यावी व्यर्थ करीं
गोविन्दाग्रज शोध फुलांचा कुठेंच केव्हां कधि न करी ॥ २१ ॥

□

## आगीवांचुन तेज न ज्यांना

१

आगीवांचुन तेज न ज्यांना शोधुनि पहा पंचभुतां
पृथ्वि, आप, तेजाचिं वलयें वायु-तत्त्व ने स्वर्ग-पथा

पंचभुतांच्या पंचभुतांना दाहकतेचा आधार
दाहकतेच्या तेजावरती परस्परें तीं साधार

पृथ्वी-तेज तें काठिण्याचें ओटी-पोटी दगड पहा !
आप-तेज जें ओलाव्याचे समुद्र-वडवानल दाहा
तेज प्रकाशिं आदित्याला बारा डोळ्यांचि आग
आग-तेज जें प्राण-वायुनें जीवहि जगतो सर्वांग
आकाशाचि तेज पोकळी आग-डोंब करी पृथ्वीचा
पृथ्वीच्या मग प्रळयांतुनि पुनर्जन्म हो आगीचा
जलप्रलयानें पृथ्वी बुडते अग्निरसानें ती तरते
तेज-वायुनें हलते डुलते आकाशास्तव जी फिरते
परस्परांच्या आगीवांचुन तेज न ज्यांना कोण वृथा
आगीवांचुन तेज न ज्यांना शोधुनि पहा पंचभुतां ॥ १ ॥

२

आगीवांचुन तेज न ज्यांना आप तत्त्व पहा महीवरी
पृथ्वि-गोल ते बुडवुनि उसळे मेघ-नाद मग स्वर्ग करी
जलचर, स्थलचर, वनचर, राहो देव मानवा कोणी असो
प्राण—वायुच्या जड शरिराला तृषित मनाला शांति वसो
पय, अमृत, विष, द्रवरूप जीं हीं असतीं सत्त्वें पाण्याचीं
जीव जगविण्या प्राण घ्यावया ठरली अंतिम नाशाची
जल-तत्त्वाचा विचार करितां अन्न-ब्रह्म-मय भूमीला
तृषित-क्षुधाग्नि शमवायास्तव पर्जन्याचा जन्म भला
पर्जन्याचे पाइक पाहता दिसती अंबरिं जे मेघ
त्या मेघांच्या उत्पत्तीला उष्ण वायुचे धुम-परिघ
धुम-परिघांच्या वर्तुळाला कारण रवीचें नव तेज
तसाच आंतून धुमसे सागर वमवी वडवानल सहज
या सर्वांच्या आगींवांचुन तेज न ज्यांना बोल अतां
आगीवांचुन तेज न ज्यांना शोधुनि पहा पंचभूतां

३

आगीवांचुन तेज न ज्यांना तेज-तत्त्व मय उभारणी
विश्वाचा संव्हार कराया ब्रह्म-मायेची उठावणी !
माया-रूपिणी आदि मायेची आग जाळिते ब्रह्माला
ब्रह्म-तेज मग प्रगटुनि विलसे आग वाटते मायेला

माया-ब्रह्म परब्रह्माची सांगड होता जी आग
त्या आगींतुन ज्ञान-दीप मग प्रभा उजळिते निजांग
निजांगाची आग पाहता बुद्धीचें जें तेज दिसे
तेज-तत्त्व तें ज्ञानहि असता ज्ञानाचें ब्रह्मांड पिसे
ज्ञान-तेज-बल तेंही जळले प्रखर बुद्धिचि आग पहा
बुद्धि-ज्ञान मग मैत्री उडता वस्तुमात्र हो तेज अहा !
तेजहि नसता वस्तू मरते, दृष्टि-तेज मग मावळते
चंद्र सूर्य ते असुनि परते, अंधःकारी आवडते
तेज-तत्त्व जनिं आगीवांचुन तेज न ज्यांना दृष्टि आतां
आगीवांचुन तेज न ज्यांना शोधुनि पहा पंचभुता ॥ ३ ॥

४

आगीवांचुन तेज न ज्यांना वायु-तेज-मय महाप्राण
प्राण अपानि जीवन-सत्त्वें पचवि पदार्थों विज्ञान
चराचराच्या उत्पत्तीला आणि स्थितीच्या नाशाला
वायु तेज हें आदिकारण वीर्य-वन्हीच्या ज्वालेला
श्वासोच्छ्वासें जठराग्नीला, प्रदीप्त वायु आप करी
जठराग्नीच्या शांतवनानें बुद्धि-तेज-बल पृथ्विवरी !
त्रिभुवन जीवन वायुविना बघ निरोधनाला वाव नसे
स्वर्ग सप्त पाताळ नाद-रव, निनादुनि तो गर्जतसे
प्रलय-प्रभंजन म्हणति जयाला तो हा वायु सूक्ष्म अति
अग्नि-शलाका चेतवितो जो, आप-तेज नव बिन्दु किर्ति
जल-सिंधूच्या पोटीं राहे पृथ्वीला जो फिर-फिरवी
स्वर्ग-पोकळी घुमवुनि पाहे वायु-चक्र मग गति नुरवी
वायु-गतीच्या आगीवांचुन तेज न ज्यांना प्राण वृथा
आगीवांचुन तेज न ज्यांना शोधुनि पहा पंचभुतां ॥ ४ ॥

५

आगीवांचुन तेज न ज्यांना दृष्ट-वस्तुंमधिं कुणी नसे
वस्तुं-वस्तुंमधि आग धुमसते, तेजानें मग वस्तु दिसे
पदार्थ तितुके अग्नि-कणानें अंतर्यामीं निर्मियले
परंतु तेजें पदार्थ ज्ञाना नानाभूतीं दर्शविले

शीतळ चंद्रा तेज प्रकाशी कारण स्वयंभू रवि गोल
लुकलुक तारे मंद प्रकाशीं, वन्हिक उल्का समतोल
ग्रह-मालेच्या नक्षत्रांना तेजोवलयें कुणिं दिधली
पाप-ग्रहांच्या क्रोधाग्नीचि, तेज-प्रदर्शनें भरविली !
मंगळ ग्रह अति क्रूरतेचा पहा आकाशीं ती लाली
शुक्राची चांदणी पहाया आग शनिची निळीकाळी !
परस्परांच्या क्रोध-वन्हितुनि प्रदीप्त तेजें ग्रह फिरती
नवग्रहांच्या परिभ्रमणाला आदित्याची अग्निगति !
व्योमांबरिं पहा आगीवांचुन तेज न ज्यांना कोण वृथा
आगीवांचुन तेज न ज्यांना शोधुनि पहा पंचभुतां ॥ ५ ॥

६

आगीवांचुन तेज न ज्यांना कोण कुणाचा हो शास्ता !
तेंच पहाया शोध करूं या अग्नि-तेज जें या जगता
सर्प-मण्याचें तेज पहाया विष-पिंडाची भीति जनिं
निच तेजाला प्रगट कराया क्रोध वन्हीचि आग मनिं
जळत्या पापांच्या राशीला पुण्य-तेज-बल दग्ध करी
आग मत्सरी शांति-तेज नव देहप्रदानिं मौन धरी !
मधमाशीच्या डंखाची ती आग नको; परि मध घ्यावा
वस्तुजात मग तेज पहाया आग अगोदर निजभावा
आगीवांचुन तेज न ज्यांना वस्तुमात्र कुणी गणूं नका
विवेक ज्ञानाविन न कोणी प्रश्न तुम्ही हा करूं नका
पंचभुतांच्या आगीतुनी आध्यात्मिक जें तेज असें
त्या तेजानें तुम्हीच पहा वस्तु-ज्ञान घ्या सार्थ कसें
अध्यात्माच्या आगीवांचुन तेज न ज्यांना कोण पुसें
गोविंदाग्रज पंचभुतात्मक सर्वांभूतिं नित्य वसे ॥ ६ ॥

□

## किंकाळी

भयाण जेव्हा किंकाळीचा उगम पाहाया मी धजतों
विकट हास्य भेसूर ध्वनिचा प्रतिध्वनिहि तो गमतो ॥ १ ॥

हास्याची मीमांसा करतां जगांत होतो मी शून्य
विलासलोलुप जगताचा मज स्वार्थ दिसे, तो अहंमन्य ॥ २ ॥

जग हें सारे जेव्हां हंसतें, तेव्हां कुणि तरी कां रडते ?
रडतां रडतां किंचाळिति कां ? सहाय्य कुणा नच कुणि करतें ॥ ३ ॥

जीवहि खातो जीवाला परि खातांना रडती दोघे
वतनदार कुळशेतकऱ्याला खिजगणतीला कोणी न घे ॥ ४ ॥

दरकदार सरदार मानकरी सेनानीची जी तलवार
खाटिक सुऱ्याचीच निशाणी दाखवीत हळुवार ॥ ५ ॥

गो-मेधाची, नरहत्येची, बलिदानाची जी रीत
देवराज्य धर्मांधांची ती, करणी पहा रे विपरित ॥ ६ ॥

दोहोंत रुदन्, आक्रंदन मग टाहो फोडी प्राणांचा
मुक्या पशुंच्या हंबरड्याला-रक्तपात हो मोक्षाचा ॥ ७ ॥

कापाकापी करुनि सारे, मिरविति मारे निजशौर्य
दुबळ्यांचे जन वाली बनले, झाले ' राजे ' अवतीर्ण ॥ ८ ॥

परस्परांना तेहि खाती, भूमि खाते सर्वांना
देव-धर्महि सहजि पचवी, किंकाळत भू-कंपांना ॥ ९ ॥

प्रलय प्रभंजन, अग्नि दारुण, कंप सुटे कां पंचभूता ?
सागर ' वडवानल ' कां वमतो ? ज्वालामुखीचि तीच कथा ॥ १० ॥

जळकीं प्रेतें पाहुनि रडती भूतें तीं किंचाळत कां ?
जयजयकारीं राजेही मरती, साम्राज्यें तीं गणूं नका ॥ ११ ॥

रडकीं गाणीं, रडकीं करणी मेळ न कधिं या दोघींचा
रक्त--रंगणि हक्क सांगती, राज-सिंहासन प्राप्तीचा ॥ १२ ॥

" हर हर " बोले युद्धिं चाले, शौर्याचा जो निजधर्म
मनोधैर्य मग खेळत बोले युद्धाचा तो रण-धर्म ॥ १३ ॥

रणधर्माच्या पडल्या आहुति, रणभेरीचें ' स्वाह ' सदा
विश्वविजयी जो अश्वमेध तो ओरड करीती ह्याच पदां ॥ १४ ।

जयजयकारीं शौर्याचे जे उठति लढति हुंकार
पृथ्वी-प्रलय रण-गीत गाऊनि, यम नित गातो बेसूर ॥ १५ [redacted]

त्याच सुरांच्या किंकाळ्यांनी सुरासुरांची रडगाणीं
' गोविंदाग्रज ' गाया रमतो ' किंकाळी 'ला आठवुनि ॥ १६ [redacted]

□

## स्वागत

शुभमंगल दिन सांचा । बहु भाग्याचा
निरखुनि सानुज श्रीयुवराजा
वृत्ति मनाच्या हर्षोद्भव ज्या
उधळुनि त्या नव वाङ्मय लाजा
एक नाद भरती गगनीं । जय शब्दाचा ॥ १ ॥

स्पर्शहि विघ्नांचा नच झाला
क्षेम निरामय आपण आला
केल्या वश नव विद्या सकला
भाग्यसूर्य ये उदयाला । प्रजाजनांचा ॥ २ ॥

अभिवादन करित निसर्गा । सुंदर योगा
प्रभा रवीची करि अर्धांगी
ज्योत्स्ना ठेवी विधुच्या संगीं
जो वसुंधरेसी योजी । अंबरभागा ॥ ३ ॥

विद्यावैभव लाभे उभयां
प्रजार्थ त्याचा सद्व्यय व्हाया
कुलकीर्तीतें अलंकाराया
प्रभुप्रसादें लाभ वडो । शत शरदांचा ॥ ४ ॥

[ भोरच्या युवराजांच्या स्वागतप्रसंगीं केलेलें पद ]

□

## एका—स पाहून

कष्टाळू तूं शांत राहुनि ओझीं वाहसि किती
गतजन्मीचा देणेकरी तूं कुमावता न गति
खर्च तुझा नच काडीचा कधि वैरण घे ना धनि
उकिरड्यावरी फिरता वाटे एका—स पाहुनि ॥ १ ॥

नरजन्मामधीं स्त्री वेषाची तृतियप्रकृति ही
अर्धनारी नटेश्वराची मूळ विकृति ही
भीष्म धुरंधर रणिं मारिला शौर्य अंगि न्यून
लज्जाहीना मानुनि एका—स पाहून ॥ २ ॥

नाना रोगें कितिक पिडिलें परि हा रोग महा
हस्तपाद अवयवादि झडले, बुद्धि तीव्र अहा !
कवण्या पापें नच अनुतापें रोग मुक्त हो न
महापाप हें वाटे एका—स पाहून ॥ ३ ॥

वेशीवरचा आरसा म्हणुनि उपमा तिज लाभे
नरा मोहूनि जर्जर करुनि मदनबाण शोभे
तन मन धन जरी अर्पण तिजला नित्य पहा करून
दहनभूमिसम वाटे इतरा एका—स पाहून ॥ ४ ॥

कूट प्रश्न हो कितिक ऐसे भरले जे या विश्वांत
समस्येनें गाऊनि पाहतो गोविंदाग्रज काव्यात ॥ ५ ॥

□

## तर्क–सर्कस

बुद्धिप्रयोगी सर्कस पहा ही तर्ककुतर्कांची
तर्क मनाचे, तर्क जनाचे, तर्क–वितर्कांची ॥ १ ॥

तर्कज्ञानी बनत घोरणी सावध करणीचा
तारेवरचि कसरत करतो, तोल रक्षणाचा ॥ २ ॥

अज्ञ कुतर्का घोरण सुटता जीवनमरणाचा
तोल सुटोनि विदुषकांचा प्रयोग हास्याचा ॥ ३ ॥

सदा विचारी, सिंगलबारी तर्क चालवोनी
तर्काला सुविचारी करोनि, घोरणीच ज्ञानी ॥ ४ ॥

डबलबारी अर्धझुलारी घेत खात झोके
तर्क-कुतर्की दोन्हीं मिळता गरल ज्ञान ओके ॥ ५ ॥

तर्क चालवी, तर्क मेळवी, तर्काचा खेळ
तर्क-कुतर्की वारू पळवी करीत घालमेल ॥ ६ ॥

तर्क-केसरी कोंडूनि घाला विवेकपिंजऱ्यांत
कुतर्क हत्ती पळवा, घ्या या प्रतोद रिंगणांत ॥ ७ ॥

तर्क तांत्रिका, तर्क भाविका, तर्कज्ञानाला
गोविंदाग्रज तर्कसर्कसीं नेई कुतर्काला ॥ ८ ॥

□

## ज्ञानोदय

(पद)

आणिति इकडे उदयगिरीवर
ज्ञानमया रविलागे तस्कर ॥ ध्रु ॥

मंगल दर्शन हे घडवाया
मंगल मानस विश्वजनां या
पापत्व मातें नेऊनि विलया
ओढिति ज्ञान–रवि तें कर जणुं सत्वर ॥ १ ॥

विश्वदृष्टि भगवंता पाहुनि
गगन सोडिले नक्षत्रांनीं
पळति संगे घेऊनि रजनी
धांवति उदयीं ज्यापरि तस्कर ॥ २ ॥

या सकलां विद्यांची हृदये
उजळाया निज तेजोवलयें
तेजोभास्कर हा वरवर ये
तळपति रश्मि ज्ञान-कण सुंदर ॥ ३ ॥

□

## काव्याबद्दल—

धनिक जनांच्या तनुवरि रत्नें नुसती बसतात
कविच्या हृदयीं प्रभा पाहुनी परि ती हंसतात!

० ० ०

ही अनवद्या, देवी आद्या, हीच अनंता ही,
चिरकालाची समकाला ही स्वसा काय नाही ?

वाहत जें जें पात्र सारखें एक अनंताचें
कालकवन हें दोरंगाचें दोन ओघ त्याचें!

त्रिकाळ यमुना कृष्णजलाची धवल कवनगंगा
उधळित जाती एकसारख्या हृत्तरंगरंगा!

ब्रह्मतटावर नौका एकचि ही धडकायाची
चिरंतनावर ध्वजा एवढी ही फडकायाची !

काव्यनगाच्या विशाल शिखरी, बाणलिंग नर्मदा,
शृंगार रसाची सर्वत्र भ्रमरी नवरस मकरंदा !

नव–रसाची मंदाकिनी ही निगम–कामधेनु,
चिंतामणि त्रैलोक्यव्यापिनी, नवनीता वानूं !

दोहन-मंथन, काव्य कल्पद्रुम, कवि हा काव्याला
सदा निर्मुनि काव्य–सागरिं वंदि शारदेला !

फलसंभारी कल्पलता ही काव्य–ज्ञान–गंगा,
गोविंदाग्रज काव्य गायनी गातो रस–रंगा !

□

## लोकल काव्यें

[ जोड शब्द किंवा अभ्यस्त शब्दांचा कवीच्या कल्पनाशक्तीने घेतलेला हा एक आगळावेगळा शोध –सं० ]

### १. मर्दोपमर्द !

वाग्विवीर तो मर्दहि पहिला, क्रियाशून्य जो वाचाळ
उपमर्दहि तो दुसरा गणला, वृत्तिशून्य जो बेताल ॥ १ ॥

आलस्याला कवटाळित जो कामचुकारि मर्द खरा
कार्यनाश विघ्नानें करतो, उपमर्दीचि परंपरा ॥ २ ॥

आड राहुनि कारस्थानि, गुप्त मर्द हो नित्याचा
उघडाउघडी वैर साधण्या उपमर्दचि ये नवसाचा ॥ ३ ॥

अपहाराला ग्रहण कराया मर्दहि दक्ष सदा भुवनिं
परवित्ताचा भुंगा बनतो, उपमर्दहि वर गुणगुणुनि ॥ ४ ॥

× × पळवोनि, घरी ठेवूनि मर्द करीतो रति-शोक
उपमर्दहि तो वणवण फिरतो, भ्रमण वैषयिक ॥ ५ ॥

प्रामाणिक मर्दाचि हिंमत कधिं ना लाभे मग त्याला
सुंदोपसुंदि पाही ना तो पापाला वा पुण्याला ! ॥ ६ ॥

मर्दोपमर्दी पाहूं जातां बोध मला कळला
गोविंदाग्रज उपमर्दाचा तिरस्कारी पहिला ॥ ७ ॥

□

## २. जोडाजोडी

जोडाजोडी शब्द उमटता, द्वंद समासाचा
पति-पत्नीच्या प्रणयापुरता अर्थबोध वाचा ॥ १ ॥

जोडाजोडी जे कुणि करिति, रीत बंधनाची
बंधनप्रेमें ऐक्य साधिले जोड जीवनाची ॥ २ ॥

जोडीविना जीवन जगति, जोडा मायेला
कायावाचा मनें करुनि जोडा-जोडीला ॥ ३ ॥

संसाराला जोडी नसतां, जन्म जात वाया
संन्याश्याला जोडा देता, दान-धर्म वाया ॥ ४ ॥

धर्मासाठीं जोडाजोडी विवाह रूढींच
कार्यापोटीं जोडाजोडी मिरास मर्जीचि ॥ ५ ॥

सर्वसंग्रहि जोडाजोडी करता ही यावी
' दोन देऊनि, चार मागण्या '—सर्वांना ठावी ॥ ६ ॥

पहिला जोडा, पहिली जोडी, गोड सर्व कांहीं
' गोविंदाग्रज ' जोडाजोडी मागतसे बा ! ही ॥ ७ ॥

□

## ३. लठ्ठालठ्ठी

कर्णसंपुटिं लठ्ठालठ्ठी शब्द ऐकतांना
हृदयकपाटिं लठ्ठालठ्ठी द्वैत बोलतांना ॥ १ ॥

नयनदृष्टिच्या गळेलठ्ठांना शब्द लठ्ठ दिसती
भावसृष्टिची लठ्ठालठ्ठी कामी-जन करिती ॥ २ ॥

पति-पत्नींचि लठ्ठालठ्ठी मानसिक चाले !
गृह-जीवनीं लठ्ठालठ्ठी व्यवहार बोले ॥ ३ ॥

आप्तेष्टांचि लठ्ठालठ्ठी कायद्यांत मेली !
तिचेंच पोटिं लठ्ठालठ्ठी जीवनांत आली ॥ ४ ॥

राजकारणीं लठ्ठालठ्ठी मुत्सद्दी बनली
प्रियाराधनीं लठ्ठालठ्ठी पराक्रमी ठरली ॥ ५ ॥

व्यापाऱ्यांचि लठ्ठालठ्ठी औद्योगिक गणली
बुद्धिहीनांचि लठ्ठालठ्ठी शैक्षणिक दिसली ॥ ६ ॥

शब्द-समुच्चय लठ्ठालठ्ठी अर्थ मात्र घ्यावा
गोविंदाग्रज अर्थापोटीं विनवित निजभावा ॥ ७ ॥

□

## ४. चेंदामेंदा

चेंदामेंदा शब्दप्रयोगी मजला नाही अवधान
शब्द–ज्ञान व्युत्पत्ति भाषा, मजला आहे अज्ञान ! ॥ १ ॥

भाव-भाषेंतुनि जें हें निघती शब्दांचे जंजाळ !
महाराष्ट्र–भाषेला वाढवी, राही ना ती कंगाल ॥ २ ॥

चुरा, चुरडणें, कुस्करण्यानें चेंदा शब्द चेचियला
मेंदीपासूनि मेंदा बनला, शब्द वरवंटा फिरवियला ॥ ३ ॥

जों जों मेंदी वाटुनि पहावी, बघा तियेच्या रंगाला
लगदा-लबेदा, काला करुनि ‘ चेंदामेंदा ’ बनविला ॥ ४ ॥

चेंदामेंदा जोडशब्द हा सामासिक मग योजितसे
गोविंदाग्रज शब्दसंग्रही, रूढार्थाला शोधितसे ॥ ५ ॥

□

## देव व दैव

[ शब्दसादृश्यांत एकाच मात्रेची वानवा; पण परस्परांतील अंतर–महंदतरच मानावयास हवें. ]

( ओव्या )

देव संशयाकृति । दैव हेतु निज-कृति
भूत भावी भावना । मात्र स्मृति-कल्पना
पाप-पुण्य वाक्संमिति । जन्मांतर तदनुमिति
विफल हो व्याहृति । मूढता तदा हाति ॥ १ ॥

असंभाषाकांक्षिणी । बुद्धि दुःखसाक्षिणी
विहीत कर्मकामना । विशद आत्मवंचना
फल कर्मा नच विसंबि । देव दैव तदवलंबि
कर्म संतति । यथा यत्न फल प्राप्ती ॥ २ ॥

□

## मनास बोध

पद १ ले

( चाल : ब्रधित स्वप्निं जरि तिला० )

सांडि सकल चिंतना । शांत शांत हो मना
चिंतुनि सुख कल्पना । करिसि आत्मवंचना
देहिं अनायम न असे । तुजहि सुख न लेश तसें
मरण भीति विफल कामना । हेतु काय जीवना ॥ १ ॥

[ अपूर्ण ]

□

## एका मित्रास—

स्वस्ति तुम्हांतें, मित्रा–वदते सहज अशी वाचा–
द्या मज हा अधिकार तुम्हांस ' मित्र ' म्हणायचा

मित्रकृपेनें *मित्रलाभ हा झाला मज तुमचा
किती वाढला तुमचा परिचय एकचि दिवसाचा !

थोर मनाशीं क्षणमात्राचा परिचय वर्षाचा
क्षण सहवासें ऋणानुबंधहि जमतो कायमचा !

अल्पकाळ जल वर्षुनि समयीं मेघ धन्य होती,
आणि आपुलें नांव करिति ना भूभागावरती !

[ *मासिक ' मनोरंजन 'चे संपादक काशिनाथ रघुनाथ मित्र, यांना अनुलक्षून लिहिलेली कविता. मित्रकृपेने म्हणजे गडकऱ्यांचे स्नेही विठ्ठल सीताराम गुर्जर यांच्या कृपेने –सं० ]

□

## मरणकाळचें गाणें !

सकलान्तक बा मृत्यो ! तुझा पाहूं दे बाजार
मरण नेमकें माझें मजला घेऊं दे साधार ॥ १ ॥

माल तुझा तो विविध तऱ्हेचा मांडिलि मृत्युपेठ !
ठराविक निज ग्राहक असतां, व्यापारि तव कां खोट ॥ २ ॥
भाव उतरतां–चढतां तुझा कायम नाहीं तुझे दर
तेजी–मंदी तुजला नसतां, नफा मिळविसि तूं फार ! ॥ ३ ॥
जमा खर्चिच्या वह्या न पाहसी, मस्तवाल तूं व्यापारी !
नफा–तोट्याची लाज न तुजला, चित्रगुप्त हो अधिकारी ॥ ४ ॥
मुनीम तुझा हिशोबी नसता, कशासि ठेविसि पेढीवरी
दिवाळखोरी दाखविण्या कां हातीं तयाच्या तिजोरी ? ॥ ५ ॥
नांवापासुनि करतो चोरी, 'चित्रगुप्त' म्हणें नाम खरें !
'दिवाणजी' तो 'गुप्त कशाला ? 'चित्र' बिचारें काय करें ॥ ६ ॥
जमा–खर्चीचा मेळ न याचा, 'श्रीशिल्लक' हा ठेवी ना ।
जमेची ना तोंड-मिळवणी खर्च–आढावा पाही ना ! ॥ ७ ॥
पाहीना तो व्याज–मुद्दला आणि खरेदी–विक्रीला !
ताळेबंद तव हिशोब कसला ? व्यापाराला तूं फसला ! ॥ ८ ॥
आड–गिऱ्हाईकी फसवूनि करिसि, मरणाचा कां तूं सौदा
धाऊक गिऱ्हाईक उगा मारिसि, गरजेचा तो हो बैदा ॥ ९ ॥
माल हवा तो ज्याचा त्याला, तव बाजारीं तो न मिळे !
नसतां जिन्नस भलत्याच्या मग माथीं मारिसि काय बळें ? ॥ १० ॥
नोकर तुझे हरामी सारे दुकानदारी करतात !
माल एकाचा दुसऱ्याला ते भाव खावूनि देतात ! ॥ ११ ॥
मापांची ते हात चलाखी. उणे-अधिक नच बघतात !
तोल देऊनि तराजू झुकवी, गिऱ्हाइकांना खातात ! ॥ २ ॥
'गल्ला' भरतो तुझिया नांवें, 'उधार–विक्री' कधि बंद !
'रोखीचे' जन–ग्राहक मेले, आलें दुकानीं जन्मांध ! ॥ १३ ॥
पळापळांच्या बाजारांतिल, क्षणाक्षणांचीं दुकानें !
पुनर्जन्म मांडणी पहातां, भरती गिऱ्हाईक प्राणानें ॥ १४ ॥
वृद्धत्वाचा जीर्ण पाचोळा, दुकानीं भरला भरपेठ !
रोग बहात्तर हमाल सारे, वाहुनी भरती बघ थेट ॥ १५ ॥

नर–रत्नांच्या राशिस सगळें, ग्रासुं पाहती मृत्युबळें !
लहान अर्भकें तेहि खातीं, कोंवळीं कोंवळीं नित्य फळें ॥ १६ ॥
पति–पत्नींच्या प्राणाची ती, किंमत बघ त्या नच ठावी
हातोहात उठावणी त्यांची–कवडी मोलाचें जग दावी ! ॥ १७ ॥
माता–पित्यांच्या पवित्रतेचा करिति नित्य लिलांव !
बहीण–भाऊ नात्याचा आवडेच रे त्या पुलाव ! ॥ १८ ॥
आप्तेष्टांचे चणे–कुरमुरे करूनि खाती ते भत्ता !
इष्ट–मित्र, गणगोत–सोयरे, राव रंक मग काय कथा ? ॥ १९ ॥
स्त्री–पुरुषांची भेदाभेद न कोणी न पाही विचारी ना !
सर्वस्वासह खाया बघती, फूस आंतुनि तुझीच ना ! ॥ २० ॥
वा मृत्यो ! तव न्याहरीला कां त्रैलोक्याचा लागे फराळ ?
त्या मानानें तुझेंच नोकर, खाबूपासरी झाले दलाल ॥ २१ ॥
हवरा मालक सदाच दिसतां, नोकर घरिं मग चोरी करी ।
स्वार्थि तुझी ती कृति पाहुनि सेवक करिति शिरजोरी ॥ २२ ॥
पोट धन्याचे सदा रिकामें आणि सेवका वखवख फार !
खा खा खावूनि मालक जगतो, खादाडांचा हो परिवार ॥ २३ ॥
तसाच मृत्यो ! मजला दिसतो, भोंगळ तुझा बघ बाजार ।
विश्वसंपुटिं कष्टी होत रे, देवाचे ते दशावतार ! ॥ २४ ॥
या सर्वांना खावूनि म्हणसि, – ' काळ पुरुष मीं भुकेला '
युगायुगाला मटकावोनि, सदा लागसी भिकेला ॥ २५ ॥
भांडवलाला निधि तो देतो, म्हणुनि खा खा तूं करिसि !
विष्णु जिष्णुला सदा रक्षितों, भक्षुनि सर्वा बघ जगसि ॥ २६ ॥
या जगण्यानें चालेल कैसा ? मृत्यो, तुझा हा बाजार ।
मृत्युंजय मग महादेव तो, तुलाच मुक्ति बघ देणार ! ॥ २७ ॥
अनंतजन्मींचे प्राणी जन्मुनि, येवूनि बघति तव व्यापार ।
लक्ष चौऱ्यांशि योनिंचे तें पाहतां पाहतां होतील ठार ! ॥ २८ ॥
भय नच मजला त्याचें आतां, मरणाचें मज मोल कळे ।
मोल मरणाचें द्याया–घ्याया, तव बाजारिं येतों बळें ॥ २९ ॥
बोल, उपाशी काळा आतां कोण मला तूं हंसणार ?
गिऱ्हाईक मी तुझाच आहें, पाहूं या तव बाजार ! ॥ ३० ॥
कितीक् आले, कितीक् गेले, मेले आपुल्या मरणानें ।
परंतु माझें मरणमोल मी, विचारितों तुज तोंडानें ॥ ३१ ॥

जन्म अनंतें चौऱ्यांशीनें, तुला आज दिसणार—
तुझ्या मृत्युच्या बाजारीं मी एकदांच येणार! ॥ ३२ ॥
नको जन्म मज मूल्य तुझा तो, देई माझें मरण मला।
हें बघ देतों मूल्य तयाचें, भला गिऱ्हाईक मीच तुला ॥ ३३ ॥
दाखिव माझें मरण कुठें तें, मोलही त्याचें मी करणार
मरणाच्या बाजारीं तुजला, मीच एक रे बघ नडणार! ॥ ३४ ॥
मम प्राणाचें दान घ्यावया, आहे तुझा अधिकार
परंतु त्याचें मोल कराया, तुजला नाहीं व्यवहार! ॥ ३५ ॥
मरणघडीच्या मुहुर्तानें मृत्यो, तुजला बोध करी
'मरणकाळचें गाणें' गातो, 'गोविंदाग्रज' मृत्युवरी! ॥ ३६ ॥

□

## प्रतीक्षा

शेषकन्यका सुलोचना ती सून रावणाची
इंद्रजिताची भार्या देवी साऱ्या जगताची
निकुंबलेला पतिव्रतेचे वीर रणा गेले
देह ठेविला घरीं सतीचा मन संगे नेलें
दैत्य वानरी निकुंबलेला रणकंदन केलें
तसे सतीच्या मनि तर्कांचें तुंबळ रण चाले
दार वाजले — आली कां ग रणांतुनि स्वारी
सखीजनाला पुरेंपुरेंसे करी सती भारी

[ अपूर्ण ]

□

## नौका

वाहत जें जें पात्र सारखें एक अनंताचें
काल कवन हें दो रंगाचें दोन ओघ त्याचे
त्रिकाळ यमुना कृष्णा जळाची धवल कवनगंगा
उधळित जाती एकसारख्या हृत्तरंगगंगा
ब्रह्मतटावर नौका एकचि ही धडकायाची
चिरंतनावर ध्वजा एवढी ही फडकायाची

□

## बापासाठीं रडणारास !

मृत जनकाचें प्रेत पाहुनी शोकसागरीं कां पडसी ?
गेलेले गुण आठवुनी कां एकसारखा बा रडसी ?
होता बलवान्, होता गुणवान्–आणिहि पुष्कळसा होता
—परंतु चढला पतंग; त्याला कसा चुकावा हा गोता !
जिवा अवश्यंभावि मरण हें; लोभ न धरणें प्रेताचा;
दृष्टिआड करिं जाळुनिया तें–क्रूरपणा हा काळाचा.
करीं उत्तरक्रिया झडकरी ऋण फेडाया कायमचें,
दीनवदन हा पुत्र तुझा–चल, समाधान तरि करिं त्याचें
ना तरि गिरवुनि धडा तुझा हा शिकेल तोही रडावया,
आजकालच्यासाठीं रडुनी उद्यांहि दवडिसि कां वाया ?
पुत्र असिसि तूं तसा जनकही; उभयहि धर्मा सांभाळीं,
'गोविंदाग्रज' सांगे बा रे रडणें आवरिं या काळीं.

□

## "न"साठीं आर्या

नत जन हनन मनिं न कां मानधना जनन हानिच्या नयनां ॥
नमनाहुनि अनुनय नच; अनुमानी शानखनिहि मुनिनयनां ॥

□

## सेवावीं ग्यां चरणकमलें

[ शिवराम महादेव परांजपे यांच्या 'काळ' वर्तमानपत्रांत ही सोळा ओळींची कविता श्रा. शु. १५, दि. २३ ऑगस्ट १९०७ शुक्रवारच्या अंकांत प्रसिद्ध झालेली आहे. —संपादक. ]

म्लेंच्छोद्वेगा प्रशमुनि करी मुक्तता आर्यभूची
गो-भू-देवा सुखवुनि खरी केलि वाणी गुरूची
धर्मा रक्षी; जगतिं उपमा ज्या "शिवाजी"स नाहीं
सेवावीं ग्यां चरण-कमलें कां न त्याचीं सदाही ? ॥ १ ॥
शौर्यें धैर्यें स्वगुरुसम जो शत्रु ज्यां काळ मानी
'संभाजी' तो निरुपम गमे आर्यधर्माभिमानी
देतां धर्मास्तव निजतनू भीति ज्यातें न कांहीं
सेवावीं ग्यां चरणकमलें कां न त्याचीं सदाही ? ॥ २ ॥

देशोद्धारास्तव झटुनिहीं कालमानें जयाची
हो दुर्दैवें सतत गणना " बंडवाल्यां "त साची
नाना नामें न कधिं सुखुं दे पाश्चिमात्त्यांस कांहीं
सेवावीं म्यां चरण-कमलें कां न त्याची सदाही ? ॥ ३ ॥

देशोद्धारीं श्रम बहु करी गाजवी नांव " टोपी "
घाली आत्मप्रचुरमतिनें टोपिवाल्यांस ' टोपी '
ज्याचें नाम—श्रवण सुटवी कंप आंग्लाधिपांहीं
सेवावीं म्यां चरण-कमलें कां न त्याची सदाही ? ॥ ४ ॥

□

## सोडुनि गेला प्रियजनका—

सोडुनि गेला प्रियजनका, का प्रियतम बाळेला ?
भलत्याकाळीं मुहूर्त निश्चय कां असला केला ?
किति हौसेनें विवाह कौतुक केलें हो माझें,
—आणि—पुढें परि चिंतनिंही हें वेडें मन लाजे !
शुभलग्नाचें शुभतर फल नच पाहिलेंत ताता,
कोणि करावें नव्या जिवाचें नवकौतुक आता ?
करील त्याचे लाड बहुपरी माता—हा हाय—
मूर्ति परी ती दिसतां आतां हृदयि बसे धाय !
शुभ सर्वस्वा मंगलधात्री सौभाग्याच्या जी
—काय वदावें, कसें वदावें—केविं दिसत आजी ! [ अपूर्ण ]

□

## अंतकाळची याचना

[ चाल – आम्रमंजरी तुला– ]

प्रार्थितसे एवढे गडे ग । पाहि जरा मजकडे गडे ग !
मृत्युलोकिंची वसती सरली । जीवन आशा वाटे गेली
मर्यादेपलिकडे गडे ग ! । इहलोकाजरि होत पारखा,
तरि भेटीस्तव तुझ्यासारखा, । जीव पहा धडपडे ग ? [ अपूर्ण ]

□

## प्लेगनें मेल्यावर सुचलेले विचार

मृत्युसाधनें अपुरी म्हणुनि 'प्लेगोबा' आला
गजाननाचे मूषक वाहन मटकावुन बसला

घरांत उंदिर पडतां बा रे! जो हो उल्कापात!
म्युनिसिपाल्टिी मोहिम करते, उंद्रावर संक्रांत

दूषित उंदिर मरुनि पडतां इतर मूषकांना
बळी द्यावया तुरंग भरला पहा सांपळयांना!

घूस घरांची तीहि मरते प्लेग-जंतुचा ध्यास
हवा बिघडुनि मानव मरती शहरांचा हो नाश

खेडोपाडीं कुठेंहि रमतो प्लेगोबा जो काळ
वृद्ध, तरुण स्त्री-पुरुषांसह ने बाळांचा हो कळिकाळ

प्लेगानें मेल्यावर सुचतो जगण्याचा विचार
"लस" टोंचुनि घेतांना व्हा चिरंजीव अवतार!

मूषक मारुनि मानव जगवा प्लेगाला हटवा
गोविंदाग्रज सदाच सुचवि टोंचुनि त्याला कटवा

□

## जुन्या प्रेमास—

प्रेमाची भाषणें परिसता किंवा वदता तद्विषयीं,
तुझी स्मृति क्षणमात्र होत मज, लहरी नाचवि जी हृदयीं!

तुटला आतां ऋणानुबंधच्चि-कुणी कुणाचें जरि नाहीं,
तरी न विसरे जीव-अपुलें गूढ असे जें मनिं कांहीं!

रविकिरणानें कमल विकसलें—कधीं कुठें तरि केव्हांही!
किरण मरे तें—कमलहि नाहीं—परि झालों तें नच "नाही?"

जें झाले तें चित्रगुप्तही लिहून ठेवी स्वर्गीत,
स्वच्छंदाची जी देवी ती जलवंती ही तें गात!

नवीं बंधनें तुला लाभली-आणि लाभतिल तशीं मला,
परंतु गेली पहिली भीति-प्रीती प्रतिपद चंद्रकला!

व्यवहाराची बुद्धि मन्मना तुजपासुनि ओढुनि नेई,
मदिरेची ही भ्रष्ट दिव्यता स्वतंत्रता मजला देई !
प्रेमाचे तें चरित्र जेव्हां आम्ही चालू केले,
आम्ही रडलों–जग हंसले–परि जें झालें तें झालें !
लग्न–बंधनीं वधु प्रणयिनी मुकली माझ्या प्रेमास
गोविंदाग्रज झाला पुरता संसारीं मग उदास !

□

## धाव सख्या

धाव सख्या गुणनिलया। हा वनसा हर्म्य तया ।।
पावन करि पुण्यमया। धांव धांव रे ।। १ ।।
इन्दु जरी दे विरहा। सुंदर तरी नभ न पहा ।।
मंदिर तव तेंहि अहा। धांव धांव रे ।। २ ।।
तात कष्टि निष्ठत यति। पालक भर शिरिं पडती ।।
बा तरिं तू त्वरित गती। धांव धांव रे ।। ३ ।।
पापरहित कृति अतुला। तापमया मृतिच तुला ।।
सांग करी या ऋनुला। धांव धांव रे ।। ४ ।।

□

## त्राता

ताप दे तुला ।। अशा ।। पाप हे तुला ।।
आलिंगिसि या तनुला तुजसि ना तुला ।।
व्यसनिं धन जननि पहा, करि निरत तरी हा ।।
प्रेमामृत चंद्रकला देत केतुला ।। १ ।।
विरही भाव करिति धाव। हृदयाचा घेत ठाव ।।
दृष्टि वदनीं बाळ ! या खेळते का। दूर झालों येथुनी एकमेका ।।
घात हातें करितात माता। तुला त्राता जगदीश एक आता ।। २ ।।

□

[ ' वाग्वैजयंती 'च्या आवृत्त्यांतून व ' संपूर्ण गडकरी भाग २ ', पृष्ठ १०१८–२० वर " **पुत्रशोक** " ही कविता, दिंडी-वृत्तांत साडेतेरा कडव्यांपर्यंत छापलेली आहे. उपलब्ध मूळ हस्तलिखितांच्या बाडांत, उरलेलीं अप्रकाशित कडवीं – एकूण ३५ पर्यंत मिळालेलीं, खाली देत आहोंत ! ]

अहा दैवा ! हा काय तुझा खेळ
कशी काळा रे, साधिलीस वेळ ॥ १४ ॥

पांच वर्षांचा छबकडा अहाहा
दुष्ट काळा नेलास कसा हा
क्रूर निर्दय तूं खरारे खराच
काळ म्हणति तुज तेंच असे साच ॥ १५ ॥

थांब बाळा थांब रे जरा थांब
स्वर्गलोकाचा मार्ग फार लांब
करूनि सोबत पडू देच तुझ्या कामीं
पहा आलों रे निघुनि हा असा मी ॥ १६ ॥

कळी हास्याची वदनिं फुलत आहे
तीही अर्धी उमलूनि तशिच राहे
जरा नाचूं दे बाळ तिचें फूल
होत जातें तें सारखें मलूल ॥ १७ ॥

देवराया, देवुनि बाळ राजा
परतवी रे परतवी हिरा माझा
फूल तोंडावर हंसवि जरा कांहीं
जिवें भावें वाहीन तेंच पायीं ॥ १८ ॥

ऊठ सखये निजलीस काय आतां
झोंप कशिही; तूं अशी कशी माता
निघालाना सोनुला जावयाला
दूध शेवटचें पाज जरा त्याला ॥ १९ ॥

पुन्हा नाहीं छबकडा दिसायाचा
दुधासाठीं रडणार तरि कशाचा
पुन्हां कुठला करणार तुझा छंद
तुटे कायमचा तो ऋणानुबंध ॥ २० ॥

प्रेमतरुचें करपतां बाळरोप
कुठुनि तुजला लागली काळझोंप
ऊठ; दावा साधिला ना यमानें
बाळ नेला ग आपुला ह्यानें ॥ २१ ॥

कशी निर्दय तूं–अहा, हाय हाय
शोकभारें बोलतों मीच काय
हाल बाळाचे पाहतां निदानीं
मातृहृदयाचे सहज होइ पाणी ॥ २२ ॥

प्राण जातांना हाल लाडक्याचे
काय उघड्या डोळ्यांनीहि पहायाचे
तुझ्या हृदयांतिल हृदय या विचारें
होय मूर्च्छित आधींच जणुं बिचारे ॥ २३ ॥

कठिण पुरुषाचे हृदय सखे साच
बघत बसलों ना उगिच मी असाच
काळ बाळाचा करि समक्ष घात
उडि न तरि मी टाकिली तन्मुखांत ॥ २४ ॥

परी मूर्च्छेच्या या अशा मिषानें
सोडवाया त्या तुझ्या प्राण-दानें
तुझ्या परिनें तू फार यत्न केला
हाय, सखये, तो परी फुकट गेला ॥ २५ ॥

तुझा माझा वा, जीव एक नेई
कसें नीचाचें समाधान होई
जरी नेतां दोघांस काळ पाहीं
" बाळरूपें " उरतोंच उभयतांही ॥ २६ ॥

म्हणुनि बाळचि उचलूनि सखे नेलें
एक घायें सर्वांस ठार केलें
तुझे माझे जड जीव कशाला गे
काळ आतां नेईल; परत मागें ॥ २७ ॥

जशी जाशी वा त्यास पोंचवाया
फीर मागें; तरि समयिं सखि अशा या
हृदय फाटुनि मम नयनिं येत पाणी
उदक बघतां परतणें प्रियजनांनीं ॥ २८ ॥

वेळ होती एकदां चांदण्याची
चंद्रिकाही आपल्या जीवनाची
बाग भंवती चिमुकली खुलुनि राही
चन्द्र वरतुनि तिजकडे डुलुनि पाही ॥ २९ ॥

फुलांवरुनी फिरुनियां गार वारा
जात हळुहळु जो सदा धांवणारा
भंग होईल आमुच्या समाधीचा
भाव भीतीचा हाच तन्मनींचा ॥ ३० ॥

एक वर्षाचा तान्हुला असेल
चित्र तेव्हांचें मनिं सदा ठसेल
जसा गुंगवि आम्हांस सुखसमाधीं
दंग तोही तैं आपल्याच नादीं ॥ ३१ ॥

उद्यां मामा येईल न्यावयाला
काय सांगूं लाडक्या सांग ! त्याला
कळत नाहीं मरण हें काय ज्यांना
काय सांगूं त्या तुझ्या सोबत्यांना ॥ ३२ ॥

कुठें कांहीं वाजतां सखे पाहे
भास होतो कीं बाळ धांवता हे
म्हणुनि मागें वळुनियां जों पहावें
तोंच कांहींतरी तिथें दिसुनि यावें ॥ ३३ ॥

पडता निश्चल ही कोमल काया
थरकांप सुटे बघ रे मम हृदया
मिटतां नेत्र तुझे भय कां भरते
कल्पनाच मग सारखी लवते ॥ ३४ ॥

विरतां गालिं हंसे, कां सुकुमारा
अश्रूंच्या नयनिं धांवति धारा
स्वप्नीं देव तुझ्याशीं हंसती
मज भंवती मग भूतें रडती ॥ ३५ ॥

□

## अनन्ताचे सूर

गाण्याचा पाहुनि जलसा,
मन रमलें नाही सहसा !
गोड सुरावट गायक ते,
गातां डुलती आयकते,
ताल सुरांहीं ती मिळणी,
गुंगुनिया गेले कोणी,
परंतु माझें मन न वळे,
कां माझें मजला न कळे !
सात सूर मिसळुनि नादीं
तानांची झाली गरदी !
भिन्नत्वा येई ऊत,
नादाचें नाचे भूत !

जनसंमर्दा पहावया,
गेलो मी मज विसराया,
भिन्न देश, भाषा भिन्न,
कृतिनेच, सृष्टि विच्छिन्न
कंटाळा आला पुरता,
तेथुनिही झालों सरता !

[ अपूर्ण ]

□

## मोटारखालीं सांपडून चेंगरताना—

बाष्प शक्तीच्या जोरावर जी चाले मोटार
तिचेच खाली सांपडतांना मरण दुर्निवार ! ॥ १ ॥
मृत्युसाधनें कितिक होती प्राणी नाशाला
आधिभौतिक शास्त्रें मिळती सांप्रत मृत्यूला ॥ २ ॥
रहदारीच्या मार्गावरी ज्या मोटारी फिरती
प्राण जिवांचे घ्याया त्यांना वाटे ना खंती ॥ ३ ॥

जीव–जिवाणुं चेंगरतांना चटणी हो त्यांची
मानवी आत्मा सांपडतांना गतीच मरणाची ॥ ४ ॥
पों ऽ पों ऽ करुनि आवाज करिते मृत्यूचि हांक
रमता प्राणी खालीं घेते प्राणाला ब्रेक ! ॥ ५ ॥
चतुष्पाद ही रबरी नारी ट्यूब–टायरांची
यांत्रिक घडणी अंतःकरणीं लोह–काठिण्याची ॥ ६ ॥
मोटारीला भूक न कांहीं–पान मात्र फार !
पी पी पाणी पिऊनि फिरते, पेट्रोल धार ॥ ७ ॥
मोबिलाईल्ला सदा भुकेली यांत्रिक तेलीण !
तैलकांतिची नार शोभली शनिची बहीण ॥ ८ ॥
वारा पिऊनि चाल चालते, वाऱ्यावर उघडी
' हवा खावया ' ' हवा द्यावया ', निघत घडोघडी ॥ ९ ॥
घडोघडीच्या भ्रमणांतचि मग कैक जीव मरती
लुळे–पांगळे शरिरीं दुबळे झटपट मरताती ॥ १० ॥
मस्तवाल जे व्यसनीं मरती मोटारीखालीं
चीड तयांची येते हिजला, निर्व्यसनि ठरली ! ॥ ११ ॥
परंतु तिचा ' चालक ' असतो व्यसनिं धुंद सदा
लहान बालकें चिरडुनि मारी मरणाची विपदा ! ॥ १२ ॥
अपघातानें अपघातांचि परंपरा चाले
मोटारखालीं सांपडून जे चेंगरून मेले ॥ १३ ॥
इच्छा नसतां ' इच्छा मरणी ' मानव कां झाला
गोविंदाग्रज कानीं लागतो–' घ्या मोटारीला ! ' ॥ १४ ॥

□

## हेंच मरण बरें !

मृत्यो ! तुझिया पापासाठीं मरण मागतों नित्य खरें
ज्या भूमिवर जन्म जाहला तिथेंच माझें मरण बरें ॥ १ ॥
अन्य ठिकाणीं मी मरण्याला वांच्छित ना कधिं मम जीव
कारण तुझीं अनंत पापें, दूषित करनिल ' जीव-शिव ' ! ॥ २ ॥
ज्या भूमिवर मृत्यु न चाले, जीव-जन्म घे नित्याचा
तिथेंच माझा अंत सुखाचा पाळण्यांत हो जन्माचा ॥ ३ ॥

जन्म, जरा, नच व्याधि मजला देवाज्ञेनें मी जगतों
मरण भाग्याचें मी अनुभवुनि, मृत्युंजय बघ मग बनतों ॥ ४ ॥
जो तो वदतो, मरण मागतो,—अब्रूसाठीं मरण हवें
अब्रूपोटीं मरण जगाया भाग्यशालि तें मज बरवें ! ॥ ५ ॥
व्याधिग्रस्त ते कळवळुनि मग हांक मारिति मृत्यूला
मीच एक बघ मृत्युउपाधि चुकवुनि जगवि मरणाला ॥ ६ ॥
लौकिक–मरणिं, मरो बिचारे ! मरण मारुनि मी जगणार !
जगतां जगतां मृत्यूला मी मारुनि पुरतां जगिं उरणार ॥ ७ ॥
ऐश्वर्यास्तव जगतिल सारे, मृत्यूला जे भीत मनीं
दारिद्र्यांतचि जगुनि वा रे ! दरिद्री-मृत्यू मी न गणी ! ॥ ८ ॥
आरोग्यानें मृत्युहि पळतो, बल-संवर्धनिं तो दडतो !
वज्रदेहि मग मरतां मरतां, मृत्यू नांवें कां रडतो ? ॥ ९ ॥
अशाप्रकारें, राखुनि शरिरें, मरणाची मी धन न करी
शरीर दुबळें, बुद्धि आगळें, मरण सदाचें मीच वरी ॥ १० ॥
ममतांधत्वें जग हें जगतें; मरतें अपुल्या मरणानें !
तसें मरण तें मला नको हें, जळकें मरणहि स्वर्गानें ॥ ११ ॥
मजला वाटे स्वर्ग-कपाटें, हवीं कशाला मृत्यूला ?
'स्वर्गवासि' हा 'किताब' त्याला, व्यर्थ कशासी कुणि दिधला ॥ १२ ॥
पंचभुतांचा देह येथला—'मातिंत मातीं' तो मिसळी !
आत्मा त्यांचा देव पळाला, 'ज्योतिस ज्योत' मिळालेली ॥ १३ ॥
त्या ज्योतिला तुम्हि कां म्हणतां मृत्यू गेला स्वर्ग-पथा
छे ! मातिमोलाचा मातिंत गेला, देहाचि ती शोक-कथा ॥ १४ ॥
शोक-कथेच्या देहाचें तें तसलें मरण मला न मिळो !
आत्म्याच्या अविनाश सुखाचें 'चिरंजीवपद' तेंच कळो ! ॥ १५ ॥
देह-मरण मी स्वर्गाकरतां कधिं, कुठें ना पाहणार
आत्म्याला मी परमात्म्यासह मरूं न आतां देणार ! ॥ १६ ॥
विष्णुपदास्तव विष्णूसाठीं मजला यावें मरण खरें !
भू–वैकुंठीं वास कराया, वैकुंठाला मृत्यु नुरे ॥ १७ ॥
धवलगिरीच्या पर्वतशिखरीं मजला कोणी लोटुनि द्या
लौकिक अर्थी खराच मजला, कैलासासि जाऊं द्या ! ॥ १८ ॥
देवाकरतां जन्म जाहला, देवा, कारण तूंच बरें
देवा, मजला मरणहि याया, 'देवरूप' जें मरण खरें ॥ १९ ॥

देशाकरतां धारातीर्थि, मरण मागती नरवीर !
मुक्ति-मरण हें—मला नको तें, देश-रक्षणां मी अधिर ! २० ॥

देवा, तुझियासाठीं जगतो, देहापोटीं मी झटतों
धर्मासाठीं प्राणी मरतो, देह कलेवर यम खातो ! ॥ २१ ॥

स्मशान-यात्रा, पार्यी घडतां, तिथेंच माझा देह पडो !
मृत्युंजय महादेवासन्निध, माझा मृत्यू मला घडो ! ॥ २२ ॥

देवा, तुझिया श्रीदासाठीं ‘ जगणें—मरणें ’ हेंच बरें !
‘ गोविन्दाग्रज ’ देवापोटीं, ‘ देवरूप ’ हो ! अमर खरें ॥ २३ ॥

□

## हाय हाय !

[ वाग्वैजयंतीच्या सर्व आवृत्त्यांत व ‘ संपूर्ण गडकरी भाग २, पृ. ९६०–६१ वर ही कविता अपूर्ण स्वरूपात प्रसिद्ध झाली आहे. गडकऱ्यांच्या हस्तलिखितात ही संपूर्ण स्वरूपात उपलब्ध झाली आहे. कविता पुरी करताना कवीने ठायीठायी संस्करण केल्याचे दिसून येते. सं—]

वाहे वारा कसा भरारा, वातचक्र फिरतें ॥
जुन्या नव्या पानाचें सारें विश्व त्यांत फिरतें ॥
कण धूळीचे उडुनी जाती त्या वाऱ्यासंगें ॥
हाय हाय, परि ठायिंच ठरती माझीं जड अंगें ॥
या पृथ्वीचें आकर्षण हें मला तोडवेना ॥
पायाखालीं जरि तुडवितों तरी सोडवेना ॥
वरतीं वरतीं पळती लपती लखलखत्या तारा ॥
वायुसागराच्या फेनाचे थेंबचि शतधारा ॥
विमानगतिनें कुणि वरतुनि रसगंगा ओती ॥
नभोनिधीच्या उदरीं उडवी हे पळते मोती ॥
दिसतीं मजला हवीं वाटती पुष्पें कालाचीं ॥
परी नयन इथुनीच टाकिती किरणें आशांचीं ॥
नको मला तें, दिसे न त्या जें; तसेंच नाहीं जें ॥
तें आणाया, तेंच बघाया जीव न हा लाजे ॥
वरती दरिया, खालीं दरिया, असेंच झालें ना ॥
मी पोहाया बघतों तरि हें अंगच हालेना ॥
मनांत माझ्या कुणी गातसे नवलाचे सूर ॥

मलाच ऐकूं येति न, नुसती लागे हुरहूर ॥
माझें गाणें तें ऐकुनि मी व्हावा बेभान ॥
एकसारखा करितों माझ्या जीवाचा कान ॥
अंतर्यामीं आग भडकतां जळून जाऊं दे ॥
त्या ज्वालांमधिं माझी ज्वाला मिळून राहूं दे ॥
हाय हाय तें ऐकूं येत न; झालों हैराण ॥
तीव्र सुरांचा मलाच लागे मनांतला बाण ॥
इथें टाकुनी मला नजर ही चहूंकडे फिरते ॥
दिसतें तितकें मला मिळेना नको तेंच मिळतें ॥
आग लागते कुठें तेथुनी धांवतात ज्वाळा ॥
वाऱ्यावरतीं पळतां पळतां भेटतात काळा ॥
किती भावना, किती श्वासही त्यांसह जातात ॥
हाय हाय का मलाच त्या मग इथें टाकतात ॥
येतें कांहीं जातें कांहीं मी नुसता बघतों ॥
कोणी येतां जातां मोठ्या आशेनें उठतों ॥
उडत्या पंखांचा जीवाला लागतांच वारा ॥
तिथल्या तिथेंच हालचालिचा खेळ होत सारा ॥
निश्वासाचें जीवन सारें; आशेची दृष्टि ॥
हाय हाय ही येत कपाळीं मनांतली सृष्टि ॥
मला नकोसा मी; तों असतों नित्य मला भीचें ॥
क्षणोंक्षणीं उंचावत नभ कीं भूमि होत नीच ॥
मेघपृष्ठीवर रुद्ध चंद्रिका नवतेजा पाडी ॥
इथेंच राहुनि जीव बिचारा मना तिथें धाडी ॥
त्या तेजस्वी ओसाडीवर खेळे जों आशा ॥
पायाखाली कठिण भूमि तो बांधित निज पाशा ॥
हाय हाय त्या मेघामधली एखादी बिजली ॥
जागी होते न; त्यांची सारी सृष्टिच का निजली ॥
कडकडुनी पहातांच तनूवर सुटेल हा जीव ॥
हाय हाय परि कुणालाच कशि येईना कींव ॥
देवा देवा खेळ असा हा मांडिलास काय ॥
मनांतला हा कैदी करितो सदा हाय हाय ॥
लाख तारका नभीं सहज या टेविल्यास देवा ॥
दोनच कुरंग्या नयनिं कोंडिल्या, त्याहि तिथें ठेवा ॥
या इवल्याशा वाऱ्यावर हें जग गिरक्या खात ॥

मला न उडवी कसा मनींचा हा झंझावात ।।
पळत्यासह कधिं पळतें मन कधिं उडत्यासह उडतें ।।
कधिं आकाशामागें दडतें सागरिं कधिं बुडतें ।।
कोण तयाला तिथून मागें ओढुनि आणीत ।।
पुन्हां कोंडितें या देहाच्या असल्या घाणींत ।।
कीं वाऱ्याच्या दोरांसंगें वरतीं उडवाया ।।
जीव मनाचा पतंग उडवी फिरुनी ओढाया ।।
तोड तोड त्या दोऱ्या देवा, मन तरि जाऊं दे
जीव मरूं दे, देह जळूं दे, कांहीं होऊं दे
एका अंशाची तरि आशा पूर्ण करायास
उरल्या सुरल्या माझा देवा करिं सत्यानास
हिरवा फिरता, पुरा लहरिचा; स्वैर विश्वगामी
जाग्या स्वप्नामधला माझा दाखवि मजला मी
सारे विश्व हें टाक जाळुनी; स्वप्नसृष्टि देई
मिटल्या डोळ्या दिसे तेंच दे; दिसणारें घेई
शरीर माझें जग हें माझें कसा जीव घेतें
जिथें तिथें हें माझें मजला कसें आड येतें
वस्तुवस्तुचा नाद निपजुनी वाऱ्यावर पळतो
पळतां पळतां दूर दूर मग कुणीकडे जातो
अट्टाहासें ओरडतां मज विरून जाऊं दे
नादरूप मज त्या नादासह झुकून वाहूं दे
रवितापानें जलबिंदूंची विरल हवा होते
कुणीकडे ती पळते याचा विचार मन करितें
संतापानें या देहाचे अश्रुच होऊं दे
अश्रुजलाच्या हवेंत मजला फिरून घेऊं दे
बघतो वारा, बघतो तारा, हें सारें कांहीं
माझ्या देहाचें कांहीं कसें होत नाहीं
कराच मजला ही कवीची कल्पनाच अथवा
त्याच्या प्रतिभेवरतीं मजला दे टाकुनि देवा
दुर्दैव्याचें सुदैव करिं जें पळे सदा दूर
निराश मनिंचें स्वप्न मला वा माझिच हुरहूर
भाव कुणाचा करिं मज अथवा कोणाची आशा
उंचउंच जी जाइल तोडुनि बंडाच्या पाशा
कुणा मुलाच्या मनांतली मज करिं वा जिज्ञासा

ज्या त्या वस्तूवर खेळूं दे मायामय भासा
ज्या रमणीचा नाथ न कळतां चिर नष्टचि झाला
तिच्या मनाची प्रेमाशा तरि करि देवा मजला
अशक्य असतें, अतर्क्य असतें, अनंत जें असतें
त्याच्या त्याच्या पलीकडे ही ती आशा जाते
त्या आशेच्या रूपानें तरि फिरून येईन
अमर्याद विश्वाला वळसा घालुनि येईन
काय दया तुज नाहीं किंवा असति फार दूर
शक्ति धाडिशी तिचा होतसे म्हणुनी कीं चूर
शक्ति मला जी धाडिशि दुरुनी ती विरुनी जाते
माझ्याजवळी येतां येतां इच्छामय होते
ती इच्छा मग मनीं सारखी लावी हुरहूर
त्या शक्तिचा जळत्या हृदयीं कीं होई धूर

शक्तिहीनता दिली अशी; असल्या इच्छा कां
अनोळखीला, उच्छृंखळ मन मारित कां हांका
बघुनि बिजेच्या नव्या वांकड्या अंधुक चंद्राला
वाटे त्याची करून द्यावी होडी जीवाला
बसून तीवर टाकुनि मागें भविष्यकाळाला
दिगंतिं जें जें, अनंत जें जें, हुडकावें त्याला
या वेड्याला हांसतात बघ हे सारे लोक
हंसोत—परि मग कां उरतो हा वेड्या मनिं शोक

□

## शेवटची कविता

[ शेवटची कविता ! माझी शेवटची कविता ! ! तिला प्रस्तावना काय लिहू ? माझी उद्यांची अनाथ कवितादेवी—देवी, तूच काय लिहावयाचें तें लिही. ]

शांत शांत दशदिशा; शांतवा तुमचे दशभाग
शांत जरा व्हा सुरासुरांनों सकळ महाभाग
अवकाशांतिल वायुसागरा लाटा करि बंद
चलच्चक्रा ! तव फिरत्या झुळुकी ठेव जरा बंद
देवदूत हो ! पाऊल वाजवुं नका; व्हाच शांत

भूतांनों क्षण बंद करा हा तुमचा आकांत
प्रकाशांतल्या अणूरेणू हो बंद करा नाच
काळोखाच्या रजःकणांनों! करा सहन जाच
नका सळसळूं देऊं तरुंनों तुमच्या पानांना
श्वासहि सोडुं न द्या लतिकांनों कोमल कुसुमांना
फुलत्या कलिकांनों ठेवा ग स्तब्ध हृदयपात्र
अर्धी उघडीं तोंडें तशींच ठेवा क्षणमात्र
नक्षत्रांनों चमकेची ही नकोच चाहूल
काळा, पळत्या क्षणाक्षणाचें थांबवि पाऊल
हृदया! धडधड करिशी कां रे, तूंच कसें फिरशी
कोंड झाली तरि, जीवा, धडपड करी मुळीं न अशी
महाभाग हो! या आज्ञेचा मानूं नका राग
आज्ञा नच ही; परी करपत्या आशेची आग
स्वप्नामधल्या स्वप्नांतहि मज येत काळझोंप
म्हणुनी हृदयांतुनीं उपटितों नवलाचें रोप
राग नका धरुं हतभाग्याचा ऐकुनि आकांत
शांत शांत परि जिकडे तिकडे व्हा सारे शांत
वाहूं द्या हा मम कवितेचा प्रवाह शेवटचा
ऐकूं द्या हा तिजला माझा निरोप शेवटचा
ऐकिलेंस ना—देवि—काय हें—कसला हा पूर
रडशी कां; वद, तुझें हृदयही झालें का चूर
होय, देवते, कविते करितों मीच तुझा घात
हा मातेच्या पहा गळ्यावर बाळाचा हात
सावध सावध देवि शारदे क्षणभर दे कान
चराचरांनों निरोप ऐका; व्हाच सावधान
गा विहगांनों, कविश्वरांनों, गगनगायकांनों
हंसा मुलांनों! हंसा फुलांनो, हंसा तारकांनों
ऐकत नाहीं मी त्या तुमच्या मादक मुरलीला
पाहत नाहीं सौंदर्याच्या मोहकतर लीला
कुंदलते करिं कुंदकळ्यांनीं हंसुनी उपहास
गञ्या गुलाबा झाडावरतिच हवा तसा हास
मार भरारी गरुडा गगनीं; मी येतच नाहीं
हे प्रतिभेचे पंख कापितों माझ्या हातांहीं
चमक सारखी इकडून तिकडे तूं चंचल बिजली

स्थिरावली कल्पना जागच्या जागीं ती थिजली
फूलपांखरा; तुझी तरळता फुलाफुलावरतीं
नाचूं दे; परि तरळ मना मी खिळिलें जड जगतीं
खुशाल आम्रा मज मदनाचे पुष्पबाण मार
ही सोनेरी ढाल रुप्याची हातीं तरवार
आईच्या मांडीवर पाहुनि मेलेलें मूल
पडावयाची नाहीं आतां मम चित्ता भूल
नवयुवतींच्या नेत्रकिरणि कुणि जरि केलीं जाळीं
तोडिन तरि मी क्षणार्धांत तीं सारीं या काळीं
राधारमणा श्रीकृष्णा तूं बंद करी मुरली
मनिंची मनांत जिरवीन इच्छा जी उरली सुरली
कलगीसाठीं कुणीं धावला जरी तुरेवाला
लागाबांधा तुटला आतां सलाम हा त्याला
धनिक जनांच्या तनुवरि रत्नें नुसती बसतात
कविच्या हृदयीं प्रभा पाडुनी परि तीं हंसतात
मज रिझवाया कालिदास वा येऊं द्या बाण
नीरसतेचें चिलखत करि मज अभेद्य पाषाण
ही अनवद्या देवि आद्या हीच अनंता ही
चिरकालाची समकाला ही स्वसा काय नाहीं

□

## नको ही परक्यांची सेवा

[ चाल : गणराया वंदा ]

नको ही परक्यांची सेवा । हांजी हांजी करण्यापेक्षा देह तरी ठेवा ॥ ध्रु० ॥
नको ही ही सोनेरी बेडी । देशहितास्तव इजहुनि शतपट बरवी लोखंडी ॥ १ ॥
जळो ती पदवी मानाची । श्वानदशा जी करवी आपुल्या या नरदेहाची ॥ २ ॥
नको हा आपसांतिल तंटा । त्या योगानें स्वातंत्र्यावरि फिरला वरवंटा ॥ ३ ॥
नको हा देशद्रोह नको । अजुनि तरी तो तेज आमुचें कधिंही नच झांको ॥ ४ ॥
नको ही भिक्षेची झोळी । भिक्षा मागुनि परवशतेची उतरत कां मोळी ॥ ५ ॥
" स्वदेशी " एकचि शस्त्र खरें । देशाचें हित होईल केवळ एक बहिष्कारें ॥ ६ ॥
सदोदितसेवा निजदेशा । उन्नति यावी त्यातें म्हणुनि अळवा परमेशा ॥ ७ ॥

□

## विद्ध मृग

संगीत व्याधा, सुखद हें तव यापरी नच थांबवी
या रसीं मरूं दे मला रसिकत्व पूर्ण दाखवी. [ अपूर्ण ]

□

## चुम्बन

गाल रंगले चुंबुनि परि मुख सखये होत मलूल
खुलवि त्याच किरणानें करपत जणुं जाईचें फूल [ अपूर्ण ]

□

## गुलाबास

[ दिंडी ]

फुलें असती रमणीय जरी सारीं
तुझा गुणगण परि त्यांस दूर सारीं
सकल महिला तव वर्णु तरी कसा बा
मूढ जरि मी, मज करिसि कवि गुलाबा ॥ १ ॥

वास घेतां तव मना सौख्य होई
तुझा रंगहि नयनांस तोष देई
तुझ्या वासानें जो न लुब्ध मोहें
असा अरसिक जगतांत कोण आहे ? ॥ २ ॥

वास घेतां मच्चित्त भुलुनि जाई
रंग बघुनि नयनांस सौख्य होई
तरुण रमणी, तूं, काव्य तेविं बाळ
सकल जगताला मूढतम कराल ॥ ३ ॥

सदा वाटे सहवास तव घडावा
तुझ्या स्नेहांतचि जन्म सर्व जावा
परी माझें इतुकें न थोर दैव
तुला आयुष्य न मुळीं देइ देव ॥ ४ ॥

दूर जायासाठींच काय वास
नाश व्हायासाठींच का विकास
होत दिवशीं ज्या पूर्ण तुज विकास
त्याच दिवशीं व्हावाच काय नाश ॥ ५ ॥
दुष्ट मानव जे नीच अनुपकारी
संग ज्यांचा दे त्रास मना भारी
स्नेहलेशहि नच ज्यांत गुणहि नाहीं
वर्षशत त्यां विधि वांचवीत पाहीं ॥ ६ ॥
सद्‌गुणांनीं तूं पूर्ण भरुनि जासी
दोष इतरांचे तूं न कधीं घेसी
वासगुण निज अन्यांस देसि देख
अशा तुजसिच आयुष्य दिवस एक ॥ ७ ॥
सज्जनातें सर्वदा दुःख होई
सदा दुष्टातें सौख्य देव देई
काय उफराटा न्याय हा जगाचा ?
गमे कंटाळा विधिस चांगल्याचा ॥ ८ ॥
तरुण रमणीचे दलितललित गाल
तेंहि कुसुमा तुजसारखेच लाल
तुझ्या ऐसा जरि वास त्यांस नाहीं
तरी दोघे तुम्हि सारखेच पाहीं ॥ ९ ॥
एक त्यांचा गुण मात्र तुजसि नाहीं
तुला कथितों परि राग धरिं न कांहीं
कधीं त्यांच्या घेतांच चुंबनातें
करिति रोमोद्‌भव तनुवरी गड्या ते ॥ १० ॥

□

## बंड्याची चित्रकला

[ पाच वर्षांच्या बंड्याला माझें चित्र काढायला सांगितलें; तेव्हां हां हां म्हणतां बंड्यानें एका कागदावर आडव्यातिडव्या चार रेघा ओढिल्या. चित्र काढितांना मात्र तो फार विचारपूर्ण दृष्टीनें माझ्याकडे पाहत होता. ]

चित्र काढितां येतें तुजला काय बालका ! एखादें ?
येत असेल तरी तयाचा नमुना मजला पाहूं दे.

आज्ञा ही मम ऐकुनि वंड्या सरसावे उत्सुकतेनें
कागद लेखनि ठेवुनि पुढती बाळपणाच्या ऐटीनें.
विचारपूर्ण दृष्टि; भ्रूलता चढल्या; आंठ्या भालीं;
स्वतांच झाला चित्र क्षणभर गुंतुनि विचारजालीं.
सर्वेच काढी पटावरी त्या कांहिंतरि रेघोट्या;
" चित्र पहा हें तुमचें ! " वदला आनंदानें मोठ्या.
विचित्र माझें चित्र असें हें पाहुनि मीही हंसलों;
हसतां हंसतां क्षणार्धांत परि विचारनादीं रमलों—
" स्वैर काढिल्या रेषा का या ? छेः छेः स्वैर न रेषा !
विचार तर तूं आधीं केला; जिज्ञासा तव पेशा.
विचार करितां कांहिंतरी तुज खचित कल्पना आली.
व्यक्त तिला केलीस बालका, असल्या रेषाजालीं,
क्षणभर मजला, क्षण चित्राला बघसी न्याहाळोनी,
साम्य आमुचें पटतें तुजला ( हा ? ) ठसा उमटला वदनीं.
तुझे मित्रही तुझ्या वयाचे जाणीवपणें बघती,
मान तुकविति, अर्थ तयाचा निःसंशय आकळिती !
बाळपणाचीं गूढ रहस्यें बाळांनीं सोडविणें,
ज्ञानमदानें आम्ही हंसणें; परी फुकट तें हंसणें !
काय कल्पना लिहुनि ठेविल्या या रेषांच्या खालीं—
सांग सांग मज, उगिच नकोरे टाकूं संशयजालीं.
' मानवतेचें गूढ काय हें ' मज बघुनी जो आला
संशय तुज तो रेषांनीं करि विकृत तुझ्या वदनाला.
त्या रेषांचें चित्र उतरलें काय कागदावरती ?
चित्रविषय टाकुनी पटावरि चित्रकार करि वसती.
अथवा टाकुनि बाह्यरूप मम जड अवजड म्हणुनी
आंतररूपा चित्रिं रेखिलें; विशेष भावच गणुनी ?
मृतप्रेम मम जातां उरल्या हृदयीं तरंगरेषा,
त्याच काढिल्या काय मनाच्या काढुनि आंतररेषा ?
रेषांमधुनी गांठी दिसती ठायिं ठायिं ज्या बाळा,
खुणगांठि का त्या प्रेमाच्या दत्त असे जें काळा !
परि चुकलों वाटतें काढितां स्वैर कल्पना नसत्या,
शुद्धपणाच्या जरि या रेषा, तरि काळ्या कां असत्या ?
मूर्खपणाच्या ज्ञानें चित्तीं तरंग उठती नाना,—
मनुजांच्या जे; चित्रिं रेखिलें काय बाळका, त्यांना !

‘ विश्व खरें का ? ’ ‘ देव खरा का ? ’ संशय अनेक असले
अडव्यातिडव्या रेषा बनुनी चित्रिं काय ते बसले ?
अथवा—भाळीं विधिनें लिहिल्या रेषा वेड्याबगड्या
चित्रपटावरि रेखुनि त्यांना करिसि काय बा उघड्या ?
अथवा आम्हां बाळपणींच्या लीला या काळीं—
स्मृतिपटलावर अंधुक दिसती रेषरूपें जवळी
त्यापरि तुज पुण्याईनें ईशाच्या संनिधतेच्या
जन्मांतरिंचें चित्र दिसे मम; रेषा का या त्याच्या ?
बोल, बोल; बा थके कल्पना; प्रतिभा चालत नाहीं;
सांग अर्थ या रेषांचा मज, प्रकाश पडुं दे कांहीं !

□

## बिपिनचंद्रपाल यांची सुटका झाली यास्तव

[ आर्या ]

**श्री**मद्‌भारतवर्षा ! हर्षाचें काय एवढें काज ?
**वि**विधापदास्पदा तुज सौख्य असें काय वाटलें आज ? १
**पि**तरांच्या अनुकरणें किंवा स्मरणेंच मुदित तव बाल ?
**न**वल गमे नाचति कां भोगित असतां असे कठिण हाल ? २
**चं**द्र सकलकलाहि परि इतुका मंदप्रकाश कां झाला ?
**द्र**वला तुझिया स्थितिनें किंवा कोणास पाहुनी दिपला ? ३
**पा**वे भयासि कां भय ? धैर्या कां धैर्य एवढें येत ?
**ल**पतो स्वार्थ असा कां ? देशद्रोहस्वघातसमवेत ? ४
**यां**चा कां याचितसे त्वदितर देशीं रहावया स्थान ?
**ची**त्कार कुणा भिउनी असत्य तें करित सोडुनी भान ? ५
**सु**ख कां वाटे इतुकें आतांचि स्वावलंबना सांग ?
**ट**पुनि बसे कां गगनीं स्वतंत्रता तुज वरावया सांग ? ६
**का** झाले मेघ मुके ? सिंहहि कां गर्जना करित नाहीं ?
**झा**ला लज्जायुक्त कां ? अधिकारोन्माद यापरी पाही ७
**ली**ना वृत्ति कशानें श्वानगुणासह पळावया लागे ?
**या** न्यायदेवतेसहि वाटतसे लाज कां अशी सांगे ? ८
**स्त**विती कां जगदीशा आनंदानें तुझे सकल तनय ?
**व**दनांबुजें तयांचीं प्रफुल्ल व्हावयास जाहलें काय ? ९

□

## कां ?

पंख तोलुनी गरुड सारखा फिरत असे कां आकाशीं ?
विचार जाउनि जा त्याशीं !

महानदांतें प्रसवि हिमालय राहुनि कां एकलेपणें ?
हेतु तयांतिल तो जाणे !

प्रकाश जगतीं पाडुनि फिरतो सूर्य असा कां गगनांत ?
उत्तर त्याच्या हृदयांत !

कष्ट सोसुनी महात्मजन कां झटती लौकिककल्याणा ?
चला विचारूं या त्यांना !

झाले साडे दहा ! पहा हा टोला पडला जोरानें —
मग मेलें त्या टोल्यानें !

'गोविंदाग्रज' म्हणे असूं द्या असेल जें त्यांचें कांहीं !
मार्ग आपला हा नाहीं !

□

## प्रणति

प्रणति लीन तव पदासि नृपाल !
निज परिजन ज्यास करित ॥
जया स्वकीय म्हणविसि ज्या सुखप्रदा सदाहि ॥
( साभिमान जयांसि म्हणविसि सुखप्रदा सदाहि ॥ )
आश्रयार्थ धांवुनि जरि सकलहि ॥
ललितकला दासी ॥ येतांच तव पदासि ॥
सुखद सदनि बसवुनि हसविसि नटविसि नव गुणांहि ॥
ही विशाल भव्य नयनसुभगा ॥
नाट्यरंगशाला ॥ गाईल तव यशाला ॥
करकरिल तव गुणगण-रती हृदय, उदारताहि ॥

□

दूर जायासाठींच काय वास
नाश व्हायासाठींच का विकास
होत दिवशीं ज्या पूर्ण तुज विकास
त्याच दिवशीं व्हावाच काय नाश ॥ ५ ॥
दुष्ट मानव जे नीच अनुपकारी
संग ज्यांचा दे त्रास मना भारी
स्नेहलेशहि नच ज्यांत गुणहि नाहीं
वर्षशत त्यां विधि वांचवीत पाहीं ॥ ६ ॥
सद्‌गुणांनीं तूं पूर्ण भरुनि जासी
दोष इतरांचे तूं न कधीं घेसी
वासगुण निज अन्यांस देसि देख
अशा तुजसिच आयुष्य दिवस एक ॥ ७ ॥
सज्जनातें सर्वदा दुःख होई
सदा दुष्टातें सौख्य देव देई
काय उफराटा न्याय हा जगाचा ?
गमे कंटाळा विधिस चांगल्याचा ॥ ८ ॥
तरुण रमणीचे दलितललित गाल
तेंहि कुसुमा तुजसारखेच लाल
तुझ्या ऐसा जरि वास त्यांस नाहीं
तरी दोघे तुम्हि सारखेच पाहीं ॥ ९ ॥
एक त्यांचा गुण मात्र तुजसि नाहीं
तुला कथितों परि राग धरिं न कांहीं
कधीं त्यांच्या घेतांच चुंबनातें
करिति रोमोद्‌भव तनुवरी गड्या ते ॥ १० ॥

□

## बंड्याची चित्रकला

[ पाच वर्षांच्या बंड्याला माझें चित्र काढायल सांगितलें; तेव्हां हां हां म्हणतां बंड्यानें एका कागदावर आडव्यातिडव्या चार रेघा ओढिल्या. चित्र काढितांना मात्र तो फार विचारपूर्ण दृष्टीनें माझ्याकडे पाहत होता. ]

चित्र काढितां येतें तुजला काय बालका ! एखादें ?
येत असेल तरी तयाचा नमुना मजला पाहूं दे.

आज्ञा ही मम ऐकुनि वेड्या सरसावे उत्सुकतेनें
कागद लेखनि ठेवुनि पुढती बाळपणाच्या ऐटीनें.
विचारपूर्ण दृष्टि; भ्रूलता चढत्या; आंठ्या भालीं;
स्वतांच झाला चित्र क्षणभर गुंतुनि विचारजालीं.
सर्वेच काढी पटावरी त्या कांहिंतरि रेघोट्या;
“ चित्र पहा हें तुमचें ! ” वदला आनंदानें मोठ्या.
विचित्र माझें चित्र असें हें पाहुनि मीही हंसलों;
हसतां हंसतां क्षणार्धात परि विचारनादीं रमलों—
“ स्वैर काढिल्या रेषा का या ? छेः छेः स्वैर न रेषा !
विचार तर तूं आधीं केला; जिज्ञासा तव पेशा.
विचार करितां कांहिंतरी तुज खचित कल्पना आली.
व्यक्त तिला केलीस बालका, असल्या रेषाजालीं,
क्षणभर मजला, क्षण चित्राला बघसी न्याहाळोनी,
साम्य आमुचें पटतें तुजला ( हा ? ) ठसा उमटला वदनीं.
तुझे मित्रही तुझ्या वयाचे जाणीवपणें बघती,
मान तुकविति, अर्थ तयाचा निःसंशय आकळिती !
बाळपणाचीं गूढ रहस्यें बाळांनीं सोडविणें,
ज्ञानमदानें आम्ही हंसणें; परी फुकट तें हंसणें !
काय कल्पना लिहुनि ठेविल्या या रेषांच्या खालीं—
सांग सांग मज, उगिच नकोरे टाकूं संशयजालीं.
‘ मानवतेचें गूढ काय हें ’ मज बघुनी जो आला
संशय तुज तो रेषांनीं करि विकृत तुझ्या वदनाला.
त्या रेषांचें चित्र उतरलें काय कागदावरती ?
चित्रविषय टाकुनी पटावरि चित्रकार करि वसती.
अथवा टाकुनि बाह्यरूप मम जड अवजड म्हणुनी
आंतररूपा चित्रिं रेखिलें; विशेष भावच गणुनी ?
मृतप्रेम मम जातां उरल्या हृदयीं तरंगरेषा,
त्याच काढिल्या काय मनाच्या काढुनि आंतररेषा ?
रेषांमधुनी गांठी दिसती ठायिं ठायिं ज्या बाळा,
ऋणगांठि का त्या प्रेमाच्या दत्त असे जें काळा !
परि चुकलों वाटतें काढितां स्वैर कल्पना नसत्या,
शुद्धपणाच्या जरि या रेषा, तरि काळ्या कां असत्या ?
मूर्खपणाच्या ज्ञानें चित्तीं तरंग उठती नाना,—
मनुजांच्या जे; चित्रिं रेखिलें काय बाळका, त्यांना !

'विश्व खरें का?' 'देव खरा का?' संशय अनेक असले
अडव्यातिडव्या रेषा बनुनी चित्रिं काय ते बसले?
अथवा—भाळीं विधिनें लिहिल्या रेषा वेड्यावगड्या
चित्रपटावरि रेखुनि त्यांना करिसि काय वा उघड्या?
अथवा आम्हां बाळपणींच्या लीला या काळीं—
स्मृतिपटलावर अंधुक दिसती रेषरूपें जवळी
त्यापरि तुज पुण्याईनें ईशाच्या संनिधतेच्या
जन्मांतरिंचें चित्र दिसे मम; रेषा का या त्याच्या?
बोल, बोल; बा थके कल्पना; प्रतिभा चालत नाहीं;
सांग अर्थ या रेषांचा मज, प्रकाश पडुं दे कांहीं!

□

## विपिनचंद्रपाल यांची सुटका झाली यास्तव

[आर्या]

**श्री**मद्भारतवर्षा! हर्षाचें काय एवढें काज?
**वि**विधापदास्पदा तुज सौख्य असें काय वाटलें आज? १
**पि**तरांच्या अनुकरणें किंवा स्मरणेंच मुदित तव बाल?
**न**वल गमे नाचति कां भोगित असतां असे कठिण हाल? २
**चं**द्र सकलकलाहि परि इतुका मंदप्रकाश कां झाला?
**द्र**वला तुझिया स्थितिनें किंवा कोणास पाहुनी दिपला? ३
**पा**वे भयासि कां भय? धैर्या कां धैर्य एवढें येत?
**ल**पतो स्वार्थ असा कां? देशद्रोहस्वघातसमवेत? ४
**यां**चा कां याचितसे त्वदितर देशीं रहावया स्थान?
**ची**त्कार कुणा भिउनी असत्य तें करित सोडुनी भान? ५
**सु**ख कां वाटे इतुकें आतांचि स्वावलंबना सांग?
**ट**पुनि बसे कां गगनीं स्वतंत्रता तुज वरावया सांग? ६
**का** झाले मेघ मुके? सिंहहि कां गर्जना करित नाहीं?
**झा**ला लज्जायुक्त कां? अधिकारोन्माद यापरी पाही ७
**ली**ना वृत्ति कशानें श्वानगुणासह पळावया लागे?
**या** न्यायदेवतेसहि वाटतसे लाज कां अशी सांगे? ८
**स्त**विती कां जगदीशा आनंदानें तुझे सकल तनय?
**व**दनांबुजें तयांचीं प्रफुल्ल व्हावयास जाहलें काय? ९

□

# कां ?

पंख तोलुनी गरुड सारखा फिरत असे कां आकाशीं ?
विचार जाउनि जा त्याशीं !

महानदातें प्रसवि हिमालय राहुनि कां एकलेपणें ?
हेतु तयांतिल तो जाणे !

प्रकाश जगतीं पाडुनि फिरतो सूर्य असा कां गगनांत ?
उत्तर त्याच्या हृदयांत !

कष्ट सोसुनी महात्मजन कां झटती लौकिककल्याणा ?
चला विचारूं या त्यांना !

झाले साडे दहा ! पहा हा टोला पडला जोरानें —
मग मेलें त्या टोल्यानें !

' गोविंदाग्रज ' म्हणे असूं द्या असेल जें त्यांचें कांहीं !
मार्ग आपला हा नाहीं !

□

# प्रणति

प्रणति लीन तव पदासि नृपाल !
निज परिजन ज्यास करित ॥
जया स्वकीय म्हणविसि ज्या सुखप्रदा सदाहि ॥
( साभिमान जयांसि म्हणविसि सुखप्रदा सदाहि ॥ )
आश्रयार्थ धांवुनि जरि सकलहि ॥
ललितकला दासी ॥ येतांच तव पदासि ॥
सुखद सदनि बसवुनि हसविसि नटविसि नव गुणांहि ॥
ही विशाल भव्य नयनसुभगा ॥
नाट्यरंगशाला ॥ गाईल तव यशाला ॥
करकरिल तव गुणगण-रती हृदय, उदारताहि ॥

□

## धिग् तव जीवन

धिग् तव जीवन, धिग् बुद्धीतें; धिग् त्या रूपाला
दुर्गुणसंघा आश्रय दे त्या धिग् सौंदर्याला
तुजसि कराया मत्कवनाचा विषय मजसि वाटे
स्मरतां तव कृति मत्तएव नद सर्वथैव आटे
जीव होतसे गतवृत्ताच्या स्मृतिनें ओशाळा
क्षुद्र वस्तु ! तव नीचपणाचा पडतां पडताळा
श्रीमान् रविच्या किरणीं शोभे भिकारडी काच
त्या भगवंता गमे तिच्या तो तेजाचा नाच

□

## अंतरिं खेद भरे

अंतरिं खेद भरे । दीन वदन बोलेना
शून्य आलोक, शून्य जग, शून्य हृदय डोले ना
शुभ दर्शन चरणाचें नच आतां म्हणुनी
देह हा जड जाहला । शोकविकल हाले ना
व्यर्थ जीवित यावरी वज्र पडेना कां शिरीं
हें अपयश आजि या । प्राक्तनिं हत आलें ना

□

## निर्दय देवीस !

हृदयशारदे ! निर्दय देवी ! ठेव मनीं खोल
प्रेमशरांनीं मरणाराचे शेवटचे बोल ॥ ध्रु० ॥
नव कवनाची अफू खाउनी गुगच्च होतों मी
बेसावध टाकिलास वेड्या प्रेमाच्या होमीं
मारिलेस जें निज नयनांच्या किरणांचे भाले
गुंग मनाला चैतन्याचें सौख्य तदा झालें
ठाउक नव्हतें परि मज जेव्हां भेदित तीं गेलीं
टोंकें त्यांचीं प्रेमविषांनीं होतीं भिजलेलीं

झरत चाललें हृदय सारखें प्रेमविषें न्हालें
नैराश्याचा धक्का बसुनी गमे ठार झालें
नयनशरांनीं मम हृदयाच्या बघ चिंध्या केल्या
फुटलें तुटलें सांधिते त्या आशाही मेल्या
चिरविरहाच्या तापानें त्या विलयातें नेल्या
रंगच्छायाही चिंध्यांच्या पार उडुनि गेल्या
मेलेल्या आशांची फांसुनि राखचि निर्जीव
पांघरतो हृदयाच्या चिंध्या हा वेडा जीव
बडबडतो वाटेल मना तें प्रेमविषें भकला
ज्या त्या वस्तूमध्ये दिससी वेड्या डोळ्याला
निर्दय देवी हाय ! किति हा केला अविचार
हृदयमंदिरा मोडुनि केलें प्रेमाला ठार
नयनशरांनीं करितां तुकडे माझ्या प्रेमाचे
अश्रुरूप नयनांतुनि वाहे रक्त पहा त्याचें
प्रेमविषानें रक्त करपतां निश्वासासरशीं
धगधगीत ही वाफ पसरते मिळते वाऱ्याशीं
त्या वाऱ्यानें भोंवतालचें जग हें होरपळे
सजीव होतें काल मला तें जळे आज सगळें
हें राखेचें चित्र जसेंच्या तसें पहा त्याचें
वस्तुवस्तुला ध्याया बघतां राख करीं नाचे
निर्दय देवी हंसतां हंसतां केलें हें काय
आग लागली जगास माझ्या विश्व लया जाय
कोमल बाला सौंदर्याची प्रेमाची खाण
जाणुनि हृदयीं झेलूनि घे मी तुझे नयनबाण
प्रेमयाचना करितां देशी हातहि हातांत
गमलें नव्हतें कीं तूं करिशिल असा पुढें घात
प्रेमांधानें विश्वासानें धरुनि करीं हात
टाकिलेंस त्या नैराश्याच्या भयाण डोहांत
त्या हृदयाची माती माती यापरि केलीस
कल्पनेंत मम शिरून आतां पाहत बसलीस
कां हंससी निर्दये दावुनी प्रीति अशी फसवी
तव शरिं मरणाराची तळमळ काय तुला हंसवी

करकमलांची दळें दळांशीं लावितांच अंग
सर्वस्वाच्या भेटीचा तो गमे पूर्वरंग

प्रेमांधाचा परि विश्वासें धरुनि असा हात
टाकिलेंस त्या नैराश्याच्या भयाण डोहांत

प्रेमयाचना परिसुनि हंसलिस गालींच्या गाली
हृदयाच्या रंगाची आली गालांवर लाली

भावि भाग्यसूर्याची माझ्या उषाच ती गमली
हाय ! निराशा रात्रीची या परि संध्या ठरली

भविष्यकाळामधून माझ्या दिवस पळालाच
काळ्या रात्रीं काळोखाचा अखंड हा नाच

आग लागतां हृदया निघती निःश्वासें ज्वाला
तापुनि लागे काळोखाचा रस उकळायाला

जळत्या जगांतलीं प्रेमाचीं भूतें हीं सारीं
रसरसलेल्या काळोखामधि भाजतात भारी

ऐक तयांच्या अखेरच्या या भयाण किंकाळ्या
बहिरें होतें अंगचि सारें बसति कानठळ्या

प्रेमहि माझें त्या हृदयाच्या स्मशानांत जळतां
हें स्मरणाचें भूत नाचतें त्या जागीं आतां

झाला माझ्या भोंवतालच्या विश्वाचा जाळ
त्या राखेवर नाचाया मी झालों वेताळ

ही हृदयाची आग भडकली जरा विझायाला
अश्रुजलाचा समुद्र गिळिला तरी न तो पुरला

जिथें जिथें ही पडते माझी सैतानी दृष्टि
कांहींच्या कांहींच होतसे तिथें तिथें सृष्टि

रम्य चंद्रिका करपुनि होतो तिचाहि काळोख
आनंदाच्या या नजरेनें होत महा शोक

जळती तारा, फुलें करपतीं, काय कथा यांची
निष्प्रेमानें राख जहाली श्रीजगदीशाची

आग भडकतां हृदयामधला ईश्वरही मेला
निर्दय देवी खेळ एवढा पहा तूंच केला

ही हृदयाची आग भडकती जरा विझायाला
अश्रुजलाचा समुद्र गिळिला तरी न तो पुरला

तुझा पूर्ण मुखचंद्र पाहुनी हृदयसागराला
पूर्णानंदें भरती आली पूर्ण पौर्णिमेला

परि तो निर्दय चंद्र न आतां करित रम्य हास्या
नैराश्याच्या काळोखाची आज अमावास्या

खळखळुनी हें आलें दुप्पट उधाण दरियाला
चिरविरहाचा वडवानलही आज उचंबळला

काळोखाचा अफाट दरिया आकाशीं वरतीं
काळ्या पाण्याचा हा दरिया हृदयाच्या भंवतीं

इकडे दरिया इकडे दरिया; कोण मूळ काया
कोण कुणाची छाया; खेळे लपंडाव माया

विरहाग्नीनें हीं पाण्याचीं विश्वें सळसळतीं
दोहीं दरियामधल्या लाटा धडांधडां जळती

एकमेकिवर आदळतांना किंवा जळतांना
त्या लाटांतुनि भीषणतेच्या निघती या ताना

झंझावातावरतीं त्यांचा नाद असा नाचे
सुरामागुनी सूर उसळती माझ्या कवनाचे

असलीं कवनें गातां गातां निराशांधकारीं
अर्धा मेला येउन पडलों मरणाच्या दारीं

तुझा विषारी घाव यापरी अपुर्ताच राही
सुख तरी नाहीं—नसो परी हा जीवहि नच जाई

टाक विषारी नजर जराशी पुन्हां एकदांच
पुन्हां एकदां—पुन्हां विषारी बाणांचा नाच

काळमुखीं दे लोटुनि झालों बहु कासावीस
हीच विनवणी तुझ्यासारख्या निर्दय देवीस

तुफान दरिया असा तयाच्या हलकल्लोळांत
मरणकाळचीं गाणीं असलीं बसलों मी गात

ये; कां लाविसि उशिर; एकदा करि पुरता ठार
निज भक्तांच्या हत्येची तर हौस तुला फार

□

## आकाशांत उडणाऱ्या शिंगरास

[ ' प्रेमसंन्यास ' नाटकावर ' शिंगरे ' नावाच्या कुणा व्यक्तीची लिहिलेली प्रतिकूल टीका ' इंदुप्रकाशा 'त प्रसिद्ध झाली. ती वाचून गडकऱ्यांनी लिहिलेली ही कविता. लिहून झाल्यावर त्यांनी ती आपले मित्र भाक्यामामा धडफळे यांजकडे पाठविली. त्यांनी ती प्रसिद्ध न करण्याचा गडकऱ्यांना सबुरीचा सल्ला दिला. गडकऱ्यांनी तो मानला. ]

ठाणबंद तूं नसतां शिंगरा उड्या मार खूप
पायबंद तव पायीं नसता चौखूरिं घे झेप ॥ १ ॥
लगाम तुजला वदनिं पडाया आहे आवकाश
खिंकाळत तूं मार उड्या बघ पाही आकाश ॥ २ ॥
नालबंद तव पद नच पाही खूर तुझे ल्हान
चेंडुपरि तूं मार उड्या घे आकाशिं उड्डाण ॥ ३ ॥
पाठीवरती जीन न अजूनि कोणी न आवळले
वाऱ्यावरच्या स्वैर वराती, पाहुनि घाबरले ॥ ४ ॥
चंदीचारा आणि तोबरा नाहीं तुला अजून
मुक्त सदा तूं उधाळायाला उड्या मार जपून ॥ ५ ॥
नयन-ढांप नच तर डोळ्यावर बंधरहित पुच्छ
वेलगामी खराच असति मानीं स्वर्ग तुच्छ ॥ ६ ॥
काव्यसंग्रही खोगीरभरति, कविशिंगरू करिति
गोविंदाग्रज पाहुनि म्हणतो रसिका परवडती ॥ ७ ॥

□

## श्रीबालबोध रामायण [ खण्ड प्रथमः ]

[ गोविंदाग्रजांच्या संकल्पित लिखाणाच्या यादीवरून असें दिसतें कीं, ते, ' रामायणें ', ' महाभारत ', ' दासबोध ' व ' ज्ञानेश्वरी ' ह्या सर्व धार्मिक ग्रंथांवर, आर्यावृत्तांत खंडशः लिहिणार होते. ' अनामिकाचे अभंग ' ते अडीच हजार लिहिणार होते. ]

श्रीरामाच्या विमला पदकमला प्रथम हा नमस्कार
श्रीसीतादेवीतें वंदन आनंद देतसे फार ॥ १ ॥
रचिलें श्रीरामायण ज्यानें तारावयास या महिला
श्रीभगवान् वाल्मीकिहि नमिला ज्यां जो कवींमधें पहिला ॥ २ ॥
जो व्रजभाषाभूषण दूषण नच आणितां कथाभागा
प्राकृत रामायण रचि वंदन ' तुलसी ' सत्या महाभागा ॥ ३ ॥
माझ्या ' मयूर ' कविच्या स्तवनीं होईन भक्तिनें भाट
दावि कथा रूपें जो लीलामात्रेंचि एकशें आठ [ अपूर्ण ] ॥ ४ ॥

□

# किर्लोस्कर नाट्यगृहाचे उद्घाटन

[ या उद्घाटनप्रसंगी गायिली गेलेली ही पदे ]

( १ ) संस्कृत ( दावर दादार )

जयतु नादि पद्मनादि सदा हि
तव भवहर पापजात
कुविघ्नविनाशि
हतमनोज मोहनादि ॥ ध्रु० ॥

रम्यवारिनाट्यसरसि नटवर ।
नटमिलिंदवृंदम् ॥
पीताष्टरसमरंदम् ।
भवतु तदनु भव बलवदमलपद–
तलजलजनादि ॥ १ ॥

रंगराजहंसवसति त्रिवसन ।
हृत्तरंगभंगम् । सर्वांगविविधरंगम् ॥
प्रसरतु सरउरगभरणनिराधि ।
कलरवनिनादि ॥ २ ॥

( २ ) ( सुदिन आजी )

तनु नितांता नतांगा ॥
करि मन जनपदां नमन ।
व्हाया अभिमत ॥
निरखुनि अखिलहि सुखकर हरखत ॥ ध्रु० ॥

रंगमंदिरांतरि । मंगलांगसुंदरी ॥
नवकवनमया । श्री विधितनया ॥
स्तुतिरत रमवु तुम्हां ॥ १ ॥

शांतिसौख्यसंपदा । वरुनि भूमि ही सदा ॥
गुणसुकणि खनि । करु सुखसदनीं ॥
सुखरतं भरतजनां ॥ २ ॥

□

# ईशस्तवन

[ चाल—जयति जय सुरसरित्० ]

अतुल तव कृति अति भ्रमवि मति ईश्वरा ! ॥ ध्रु० ॥
वर्षती मेघ जल, शांतविति भूमितल,
सलिल मग त्यजुनि मल जात सुरमंदिरा.
फिरविसी रविशशी, तेजविसी भूमिसी,
केविं जन सुखविसी, कळत नच पामरां !
करिसि गर्भावना, मग पयोयोजना,
पुढति अर्पिशि जनां, पवन जल शुभकरा !
श्रम जनां दिनभरी, विश्रमा शर्वरी,
रमवि संध्या बरी, रंगवुनि अंबरा.
दिङ्मंडलावरतिं नित्य नव विहरती
तारकातति, हरति नयनमन सुखकरा
पक्षि लक्षावधि, श्रवणसुख निरवधि,
प्रसरिती स्तवनधी, नादरसनिर्झरा.
वाग्वैजयंतींत शब्दमणि अगणित
स्वीकरुनि कविरणित, हंसुनि खुलवीं जरा !
'गोविंद' पूर्वपद अग्रज स्मरुनि पद,
उधळि निज हृत्सुखद शब्दरत्नाकरा !

□

REFBK-0024843

---

जें जें मनीं मुखीं आलें। तें तें येथ झालें ब्रह्मार्पण

ब्रह्मार्पणं ब्रह्महविर्ब्रह्माग्नौ ब्रह्मणा हुतम् ।
ब्रह्मैव तेन गंतव्यं ब्रह्मकर्म समाधिना ॥

—श्रीगीतोपनिषत्सु—श्रीभगवान

□

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५३७
दा. क्र. २४८४३
५/१०/२०६
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

